७८८५
म. ग्रं. मं. ठाणे
विषय कथा
सं. क्र. १२२८०

# नावात काय

## लेखक
## द. पु. परांजपे

REFBK-0014465

7 MAY 1984

તારીખ
૨૭।૬।૬૫
૧૨૨૯

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ३८६४३ वि: चरित्र
क्रमांक १२२८ दि. २५।५।५५

# नाटकी खेळ

लेखक
र. पु. परांजपे

RFBK-0014465

१६ फेब्रुवारी १९६५ ( माघ १८८६ )

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, नवी दिल्ली
याच्या वतीने प्रकाशित

मूल्य आठ रुपये

EIGHTY NINE NOT-OUT
*by*
R P PARANJAPYE
( *Marathi* )

PUBLISHED BY : MRS S. LIMAYE, M A FOR VENUS BOOK STALL, APPA BALWANT CHOWK, POONA 2 PRINTED AT : SANGAM PRESS (P) LTD 383 NARAYAN, POONA 2.

# हृद्गत

शिरसाष्टांग नमस्कार विनंति विशेष

अप्पा, आज तुम्हाला ९० वें वर्ष लागत आहे या दिवशीं तुमचें आत्मचरित्र प्रसिद्ध करण्याचा मान मला मिळत आहे, हें मी माझें भाग्य समजतों

माझ्या वडिलांच्या –प्रा हरिभाऊ लिमये यांच्या– अकाली मृत्यूनंतर तुम्ही पितृवत् आमचें संगोपन केलेत म्हणूनच आमचें घराणें वर आलें अशी कितीतरी घराणी गाजावाजा न करता तुम्ही वर आणलीत

हें तुमचें ऋण फिटणें शक्य नाही नव्हे, असल्या ऋणात रहाण्याचाच एक आगळा आनंद असतो त्या आनंदाचा मीं जन्मभर आस्वाद घेतला

तुमचें आत्मचरित्र प्रसिद्ध करताना म्हणूनच मला आज अभिमान वाटत आहे आजच्या शुभ दिनी तुम्हास कृतज्ञतापूर्वक मी वंदन करतों कळावें.

सेवेसी श्रुत होय ही विज्ञापना.

तुमचा

अ. ह. लिमये

व्हीनस बुक स्टॉल
पुणें २
१६–२–१९६५

# प्रस्तावना

स्वताबद्दल लिहिणें अगर बोलणें माझ्या स्वभावाला फारसें पसत नसल्यामुळें आत्म-वृत्त लिहावे म्हणून मला पुष्कळाकडून आलेल्या सूचना मी कित्येक वेळां झिडकारल्या होत्या याची दोन कारणें, एक म्हणजे आत्मप्रौढी मिरविण्यासारखी कोणतीही गोष्ट करणें म्हणजे माझ्या मनास कसेसेंच वाटतें, दुसरें म्हणजे पुस्तक लिहिलें तरी ते छापवून प्रसिद्ध करण्याकरिता लागणारी खटपट मला अगदी नको नॅशनल बुक ट्रस्ट याने दुसरें कारण नाहीसें केल्यामुळें मी, भीतभीत का होईना, हें काम करण्याचें कबूल केलें आहे परतु आत्मवृत्त लिहिण्याचें मनात कधीही नसल्या-मुळे मी माझ्या आयुष्यातील निरनिराळ्या प्रसगाची तपशिलवार टिपणे करून ठेवलेली नव्हतीं, यामुळे मला माझ्या स्मरणशक्तीवर व मनावर झालेल्या सामान्य प्रक्रियेवरच अवलबून रहावे लागत आहे, म्हणून पुस्तकामध्यें काही किरकोळ चुका असण्याचा सभव आहे अशा प्रकारच्या पुस्तकाचा विस्तार हवा तेवढा वाढविणें अर्थातच शक्य आहे, परतु सुदैवानें बुक ट्रस्टनें त्यावर मर्यादा घालून दिली आहे

या पुस्तिकेंत वर्णन केलेल्या पुष्कळ घटना मी वर्तमानपत्रात किंवा इतर नियतकालिकात पूर्वी वर्णन केल्या आहेत, अथवा सभामधून वा नभोवाणीवर सागि-तल्या आहेत परतु एक प्रकरण (केंब्रिजमधील जीवन) हें मात्र बहुतेक शब्दश माझ्या तेथील सेंट जॉन्स कॉलेजच्या ईगल या द्विवार्षिकांत १९५८ साली त्याच्या सावत्सरिक अकाकरितां लिहिलेल्या लेखावरून घेतलेलें आहे ज्या व्यक्तीबद्दल मला दूषणात्मक शब्द योजावे लागले त्याचीं नावें मी मुद्दामच बहुधा दिलीं नाहीत मृताची निंदा करणे हा माझा मानस नव्हता

हें पुस्तक तयार करताना मला खालील गृहस्थांची पुष्कळ मदत झाली आहे माझे धाकटे बधु हरी व कृष्णा, श्री श बा दवळे, माजी आय सी एस व पाटणा हायकोर्टाचे सेवानिवृत्त न्यायाधीश, प्रो व्ही व्ही नारळीकर–काशी विद्यापीठ, व प्रा ह वि तुळपुळे या सर्वांनीं या ग्रथाची समग्र हस्तलिखित प्रत वाचून मला महत्वाच्या सूचना केल्या आहेत या सर्वांस माझे हार्दिक धन्यवाद

माझ्या ९० व्या वाढदिवशी या पुस्तकाचा मराठी अनुवाद व्हीनस बुकस्टॉल पुणें याच्या मार्फत प्रसिद्ध होत आहे हें पाहून आनद होतो हा अनुवाद माझी नात सौ सई जोगळेकर हिनें केला आहे

१६ फेब्रुवारी १९६५
पुरुषोत्तमाश्रम
पुणें ४

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| | छायाचित्रे | |
| १ | पराजपे आडनावाचा उगम | १ |
| २ | माझे पूर्वज आणि मूळ गाव | ३ |
| ३ | आईवडील | ५ |
| ४ | बालपण | ८ |
| ५ | आंजर्लें, मुरुड, दापोली | १० |
| ६ | मराठा हायस्कूल | १३ |
| ७ | फर्ग्युसन कॉलेज | १८ |
| ८ | सेंट जॉन्स कॉलेज, केंब्रिज | २६ |
| ९ | प्रिन्सिपॉल | ४३ |
| १० | मुंबई कायदे कौन्सिल | ५३ |
| ११ | मॉण्टेग्यू चेम्सफर्ड सुधारणा | ६३ |
| १२ | मन्त्रिपद | ६६ |
| १३ | समित्या | ८६ |
| १४ | इंडिया कौन्सिल | ९६ |
| १५ | लखनौ | १०८ |
| १६ | दुसरें जागतिक युद्ध–राजकीय मते | ११७ |
| १७ | ऑस्ट्रेलिया | १२१ |
| १८ | पुणें विद्यापीठ | १४३ |
| १९ | अन्दमानची सफर | १४९ |
| २० | ग्रामसुधारणा | १५१ |
| २१ | खाजगी | १५६ |
| २२ | प्रकाशनें | १६२ |
| २३ | काळ आला होता | १६४ |
| २४ | सिंहावलोकन–ध्येयें व आकांक्षा | १६७ |
| | छायाचित्रें | |



डॉ पराजपे याचे आई-वडील

कै ती गोपिकाबाई परांजपे

कै पुरुषोत्तम केशव परांजपे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे स्थळप्रत.
अनुक्रम ........ दि. ........
क्रमांक ........ नो दि ........




डा परांजपे



चार पिढ्या

अप्पा, शकुतलाबाई, सई व अश्विनी



पणजोबा व पणती

अप्पा व अश्विनी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८९७३ दि. ...
क्रमांक ९२२८ नों दि. २०/६/६५

## प्रकरण पहिलें

# परांजपे आडनावांचा उगम

मराठी ग्रंथ संग्रहालय ... १४४६५

कोंकणस्थ चित्पावन ब्राह्मणाच्या साठ आडनावापैकी पराजपे किंवा पराजप्ये हें आडनाव बरेंच प्रचलित आहे अगदी अलिकडे, राहण्याच्या ठिकाणावरून किंवा धंद्यावरून नवीन आडनावे पडली आहेत पूर्वीचे काही पराजपे आडनाव बदलल्या-मुळें आता देव किंवा मडलिक या नावानें ओळखले जातात परायणजप्ये या मूळ शब्दावरून पराजप्ये हे आडनाव पडले असे म्हणतात काही ऐतिहासिक कागद-पत्रामध्यें पारायजप्या असा एकेरी उल्लेख आढळतो या आडनावाचा उगम पाहता पराजपे मडळी धार्मिक कृत्यें, जप आणि वेदपठण नित्य नेमाने आणि भाविकपणानें करीत असावी असें वाटते त्याचा मूळ धदा शेतीचा काहीं थोडी मडळी वडिलो-पार्जित भिक्षुकीहि करीत असावीत

सगळे पराजपे मूळचे रत्नागिरी जिल्ह्यातल्या आडिवरें गावचे रहिवाशी त्या गावच्या देवीला, —महाकालीला—सणावारी किंवा इतर धार्मिक प्रसगी अजूनहि जुन्या रिवाजाप्रमाणे नैवेद्य दाखवतात मी स्वत त्या गावी कधीं गेलों नाही, पण आमच्या कुटुबात ही पद्धत अजून चालू आहे

पराजपे मडळी या खेड्याहून निघून कोंकणामधल्या इतर बऱ्याच खेडेगावातून हळूहळू पसरली जेव्हा पुढे पेशवे गादीवर आले तेव्हां घाटमाथ्यापर्यंत काही कुटुबें जाऊन पोचली मात्र मराठ्याच्या इतिहासात पराजप्यापैकी कुणी चमक दाखविल्याचा दाखला नाही रामचद्र नाईकाचें जरी नांव आढळले तरी त्याची प्रसिद्धि पराजप्याच्या नावाला भूषणार्ह नाही खास

१९३४ साली प्रसिद्ध झालेल्या पराजपे कुलवृत्तातात तीनशेंछप्पन निर-निराळ्या कुटुबाची नोद आहे एकाच पूर्वजाची ही प्रजा असे खात्रीने सागता येणार नाही, कारण प्रत्येक कुटुबाला फारतर आपल्या दहा पिढ्याचा तपशील सागता येतो त्या त्या कुटुबाचे मूळ पुरुष त्या आधीच बरीच वर्षे विभक्त झाले असावेत माझ्या पूर्वजाची नावे वडिलापासून अशीं—पुरुषोत्तम, केशव, विठ्ठल, महादेव,

रामभट व दादंभट त्याच्या आधीच्या पूर्वजांचा माग लागत नाही ही नावे आपल्याला फार तर १६ व्या किंवा १७ व्या शतकापर्यंत नेतात महादेवापासून मात्र आमच्या कुटुंबाबद्दल बरीच सविस्तर माहिती उपलब्ध आहे त्याचे वंशज आता महाराष्ट्रभर, आणि महाराष्ट्राच्या बाहेरहि पसरले आहेत

## प्रकरण दुसरें

# माझे पूर्वज आणि मूळ गाव

माझे खापरपणजोबा महादेवभट, आडिवऱ्याहून निघून प्रथम दाभोळ आणि नंतर माझे जन्मस्थान मुर्डी येथें स्थाईक झाले त्यांचे चिरंजीव विठ्ठलभट, हे इळणे गावी नवीन योजनापूर्ण वसाहत स्थापन करण्याच्या ऐन तयारीत असताना मारले गेले त्या गावाशेजारच्या एका टेकडीवर, त्यांनी योजलेल्या इमारतीच्या बांध-कामासाठी काढलेले अवाढव्य चिरे अजूनहि पडलेले आढळतात त्यांची योजना गांवकरी मंडळींना बहुधा रुचली नसावी गावच्या देवळामध्ये पूजा करीत असताना, पाठीमागून त्यांच्यावर हल्ला करण्यात आला व ते वारले त्यांचे चिरंजीव, म्हणजे माझे आजोबा केशवभट, हे अति उद्योगी होते खेड तालुक्यातल्या शेरवली गावचा काही भाग खरीदून ते तेथे स्थाइक झाले होते त्यांची नातवंडे, पणतवंडे, काल-परवापर्यंत तेथें रहात होती पणजोबांच्याप्रमाणे आजोबांचाहि गावकऱ्यांच्या हातूनच खून झाला माझ्याविरुद्ध वर्तमानपत्रात कधी कांही छापून आले की माझ्या आईच्या जीवाची फार घालमेल होत असे 'लोकांना रुचणार नाही असें काही करू नकोस, त्यांचा रोष ओढवून घेऊ नकोस' असे ती मला नित्य बजावीत असे, न जाणो, माझाहि माझ्या आजोबा-पणजोबांसारखाच भीषण शेवट व्हायचा

माझ्या आजोबांना बरीच मुले झाली पैकी मी फक्त माझे वडील, चार चुलते, आणि दोन आत्याबाई, एवढ्यांना पाहिले आहे माझे वडील सर्वांत धाकटे आजोबा गेले तेव्हा ते अवघे तीन वर्षांचे होते माझी सगळ्यात वडील आते—लक्ष्मीबाई कर्वे —ही भारतरत्न धोंडो केशव कर्वे यांची आई ती जरी मुरूडला स्थाईक झाली होती तरी डॉ कर्वे यांचा जन्म शेरवलीला झाला माझे वडील ऐंशी वर्षांहूनहि अधिक काळ जगले किंबहुना त्यांच्या बहुतेक साऱ्याच भावंडांनी ऐंशीचा पल्ला ओलांडला फक्त एकच भाऊ अकाली, म्हणजे वयाच्या छप्पन्नाव्या वर्षी वारला माझ्या जन्मा-आधी बरोबर सहा वर्षे काका — माझे वडील — मुर्डीला येऊन स्थाइक झाले होते त्या गावी आमची काही भातशेते व बागाईत जमीन होती मेहनतीने कसली तर

एक कुटुंब पोसायला एवढी जमीन पुरेशी होती बागेची जमीन खाजण हटवून कमावलेली असल्यामुळें विशेष सुपीक होती माझ्या लहानपणी, या खाऱ्या मातीवर पोसलेल्या आमच्या माड पोफळी भरघोस उत्पन्न देत असत

सहाशें वस्तीचें मुर्डी गांव लहानसेच आहे ब्राह्मणाचीं तीस घरें असलेला मुख्य भाग, आणि गावानजीकच्या टेकड्यावर वसलेल्या कुणब्याच्या दोन वाड्या असे एकूण मुर्डीचे तीन भाग पडतात मुर्डीपासून सुमारे अर्ध्या मैलावर, समुद्रकिनारी आजर्लें गाव आहे आजर्लें गाव एक लहानसे बंदर असून तेथे सुमारें दोन हजार वस्ती आहे त्याच्या दक्षिणेकडे वहात जाणाऱ्या खाडीचें पाणी भरती आली म्हणजे मुर्डीच्या काही बागापर्यंत जाऊन पोहोचते आजर्ल्याजवळच्या एका टेकडीवर गणपतीचें सुरेख देऊळ आहे या देवळातून सभोवताली नजर टाकली की पश्चिमेला पसरलेला विशाल समुद्र, हर्णै बंदरानजीकचा सुवर्णदुर्ग किल्ला, दक्षिणेकडे नागमोडी वळणे घेत वहात गेलेली खाडी आणि आजर्लें गावाला चारी बाजूनी वेढणारे डोंगर असे अप्रतीम दृश्य दिसते

प्रकरण ३ रें

# आई वडिल

माझी आई चिखलगावच्या टिळक घराण्यातली लोकमान्य टिळकाची ती चार चुलीपलीकडची बहीण तिचे वडील साताऱ्याच्या राजेसाहेबाच्या पदरीं नोकरीला होते १८५१ साली तिचें लग्न झाले तेव्हा ते लग्नाला हजर नव्हते तिच्या एका चुलत्याने तिचे कन्यादान केले आईच्या नातेवाईकाची मला फारशी माहिती नाहीं फक्त एकाच मामाला आणि एका मावशीला मी लहानपणी भेटलों होतों

माझ्या वडिलाचा जन्म १८४२ च्या दसऱ्याच्या दिवशी झाला आई १८४४ साली अधिकश्रावण महिन्यात जन्मली लग्नसमयी काका नऊ वर्षांचे आणि आई सात वर्षांची होती त्याच्यावर बालविवाहाचा काही दुष्परिणाम झाल्याचें दिसत नाही काका—माझे वडील – ८५ वर्षें व आई ९७ वर्षें जगली त्याना झालेल्या तेरा मुलापैकीं आम्ही नऊ जणानी पुढे वंशवृक्ष वाढविला अजून आम्ही पाचजण हयात आहोंत, तिघे भाऊ व दोन बहिणी ७६ आणि ८८ च्या दरम्यान आमची वयें आहेत

मुलाच्या मानसिक आणि शारीरिक विकासाचे श्रेय बहुधा आईला दिले जाते आयुष्याच्या पहिल्या दहा वर्षांत माझ्या मनावर मात्र आईपेक्षा वडिलानीच अधिक संस्कार घडवून आणले आई आपल्या घरकामांत, आणि माझ्यानतर झालेल्या सहा मुलाच्या उस्तवाऱ्या करण्यात इतकी गढून गेलेली असे की माझ्याकडे लक्ष देण्याला तिला फुरसतच मिळत नसे मला धडपणे चालता बोलता येऊ लागताच तिची जबाबदारी संपली माझ्या उत्तम प्रकृतीचा आणि बुद्धिमत्तेचा वारसा मात्र तिच्या-कडून आला आईची प्रकृती टणक, आणि कष्ट उपसण्याची ताकद दाडगी माझ्या जन्मापासून तिची दृष्टी अधू व्हायला लागली वयाची शेवटची चाळीस वर्षें ती आधळी झाली होती, तरी इतर कोणचीही तिची कधी तक्रार नसे सर्वसामान्य लोकाच्या मानानें तिची बुद्धि फार तल्लख होती दृष्टि अधू असूनहि (किंवा कदाचित् त्यामुळेंच) तिची स्मरणशक्ति चागलीच तीव्र होती एकाद्या अनोळखी माणसाचे नाव तिच्यासमोर घेतले तर थोडक्याच चौकशा करून काही मिनिटाच्या

अवधीत ती त्याचा पुरता ठावठिकाणा लावीत असे तिची ही सवय बऱ्याच अंशी मी उचलली आहे नवी ओळख झाली की माझ्या ओळखीच्या जगाच्या नकाशात त्या व्यक्तीचे नेमके स्थान कुठलें हे शोधून काढल्याखेरीज मला चैन पडत नाही आईच्यापेक्षा माझ्या ओळखीचे विश्व अर्थातच मोठे आहे आईला लिहितावाचता येत नसे तिचें पाठातर मात्र दाडगें होतें रोजच्या पोथीवाचनामध्ये आमच्यापैकी कुणी काही चूक केली तर ती तात्काळ दाखवून देत असे तसेच कुणाला नवा अभग किंवा भक्तिपर गीत गाताना तिने ऐकलें की मुलापैकीं किंवा नातवडापैकी कुणाला-तरी तो उतरवून घ्यायला लावून ती लगेच पाठ करून टाकीत असे आई फार सभाषण-चतुर होती वादविवादात ती सहसा कुणाला हार जायची नाही ८५ व्या वर्षापर्यंत तिची कर्तृत्वशक्ति कायम होती हळूहळू तिच्या स्मरणशक्तीची तीव्रता कमी होऊ लागली आम्हां मुलाना मात्र शेवटपर्यंत ती जुन्या आठवणी रगवून सागत असे व जुनी गाणी म्हणून दाखवीत असे

माझी चार भावडे अगदी बाळपणींच वारली आम्ही नऊ जण मोठी झालो त्यापैकी शरीराने व बुद्धीने जरा मद असलेल्या आमच्या एका बहिणीवर आईचा विशेष जीव होता मी दहाबारा वर्षांचा असताना एकदा गमतीने आईच्या मायेची अशी वाटणी केली होती या बहिणीला रुपयामधले आठ आणे देऊन उरलेल्याचे चार आण्यापासून एक पै पर्यंत मी वाटे केले आणि बाकीच्या भावडामधें वाटून दिले स्वत साठी मी एक पैचाच वाटा घेतला होता आई म्हणत असे की काकाकडून आठ आण्याचा वाटा उचलून मी याची पुरेपूर भरपाई करून घेतली होती ही गोष्ट काही खोटी नव्हती आईच्या अखेरच्या दिवसात माझ्या सर्वांत धाकट्या बहिणीनें तिचा मोठ्या मायेनें सभाळ केला दापोलीजवळच गिम्हवण्याला, २४ डिसेंबर १९४० रोजी वयाच्या ९७ व्या वर्षी सुमारें ऐंशी वशज मागें ठेवून ती दिवगत झाली

नऊ वर्षांचा होईपर्यंत मी मुर्डीस होतों तेवढ्या अवधीत माझ्या मनावर काकानी फार चागले सस्कार घडवून आणले आईपेक्षा मला त्यांचाच लळा अधिक असे काका फार धार्मिक वृत्तीचे आणि भाविक होते सतत काहीं ना काही उद्योगात ते मग्न असत त्यामुळे ते गावच्या निरनिराळ्या भानगडीत लक्ष घालीत नसत कामाशिवाय ते कधी कुणाकडे गेले नाहीत, पण त्याच्याविषयी सगळ्याना अपार आदर वाटे देवळास जाण्याचा त्याचा रोजचा नेम कधी चुकला नाही पूजा आणि इतर धार्मिक विधी मोठ्या भाविकतेने ते करीत त्यात नुसता देखावा नसे काका रोजचा घरखर्च अगदी काटेकोरपणे लिहून काढीत असत त्याच्या खातेवह्या, १८७० ते १९२५ या काळामधल्या मध्यमवर्गीय कोकणस्थ कुटुबाच्या आर्थिक परिस्थितीवर प्रबंध लिहिण्यासाठी फार उपयुक्त ठरतील

काकानी तीनदा काशीयात्रा केली एकदा यात्रेला जात असता प्रवासात त्याना कुणी एका तरुणाने 'नुकतेच सीनियर रॅंग्लर झालेले पराजपे तुमचे कुणी

नातलग आहेत काय ? ' असे विचारले. तो माझा मुलगा " असें त्यानें ऐकल्यावर त्याच्या मनांत त्याच्याविषयी फार पूज्यभाव उत्पन्न झाला, आणि प्रवास संपेपर्यंत त्याने त्यांना हरप्रकारें मदत केली ही हकीकत काका मोठ्या अभिमानानें सांगत ते स्वत कधी वर्तमानपत्र वाचीत नसत जगात काय चाललें आहे याची खबर त्याना बाहेरून आलेल्या पाहुण्याकडून कळत असे रामायण महाभारत याची त्याना फार चागली माहिती होती त्याच्या बोलण्यात त्याचा प्रभाव पडलेला दिसे सुभाषिते व गोष्टी याच्या साधनाने त्यानी आम्हाला चागल्या वर्तणुकीचे धडे दिले

कुठल्याहि प्रकारच्या नव्या सुधारणाना आमच्या घरात मज्जाव होता केरोसीनचे दिवे काकाच्या मृत्यूनतरच प्रथम घरात आले तोपर्यंत मिणमिणत्या समई व ठाणवीवर सर्व कामें चालत असत पाथस्थ ब्राह्मणाना फुकट जेवण मिळेल असें मुर्डीत किंवा आसपासच्या गावात फक्त आमचे घर होते पिढ्यान् पिढ्या ही प्रथा आमच्या घराण्यांत चालू होती काका वृत्तीनें शात आणि सौम्य होते भावनाच्या आहारी ते कधी गेलेले असे दिसले नाहीत आयुष्याकडे पाहण्याचा त्याचा दृष्टीकोन स्थितप्रज्ञाचा होता उच्च शिक्षणासाठी माझे इग्लडला जाणें त्याना पसत नव्हते हें मला ठाऊक होतें माझ्या यशानतर मात्र त्याचें मत बदललें खाण्यापिण्याच्या बाबतीत ते स्वत अत्यत दक्ष असले तरी मी परदेशी काय केले याची त्यानी कधी चौकशी केली नाही

१९०१ च्या डिसेंबरमध्यें मी इग्लंडहून परत आलों तेथें असतांना माझ्या हातून काही मोठें पाप घडले असें मला वाटत नसल्यामुळें मी रिवाजाप्रमाणें प्रायश्चित्त घेण्याचें नाकारले काकानींहि तसा आग्रह धरला नाही मात्र ते असेपर्यंत मी मुर्डीला गेलों की माझी एकट्याची स्वतत्र पगत असे त्यांच्या पूजेच्या आणि इतर धार्मिक कृत्यांत मी कधी भाग घेतला नाही, परतु त्यासाठी लागेल तो पैसा मात्र वेळोवेळी आनदाने मी त्याना देत असे १९२६ डिसेंबर ३१ रोजी काका वारले

प्रकरण ४ थें

# बालपण

१६ फेब्रुवारी १८७६ रोजी माझा मुर्डी येथे जन्म झाला तेरा भावंडात मी सातवा होतो जन्मल्याबरोबर काही हालचाल न करता मी निचेष्ट पडून राहिलों होतो मला पाहून सुईण आईला म्हणाली, "मुलगा चांगला आहे, पण मेलेला गो मेलेला !" आईचा आत्मविश्वास दांडगा ती म्हणाली, "मेला कशान् ? चापट देस कुल्ल्यावर ठेवून एक चांगली, आणि हालव गदगद, नि डोचकीवर गार पाणी शिंपड," एवढे सोपस्कार करताच मी पचमात रडू लागलो असा माझा जन्म झाला मी पायाळू होतों पायाळू व्यक्तीने पाठीला पाय लावला तर उसण बरी होते असें म्हणतात या कामासाठी मला मुर्डी येथें नित्य बोलावणें येई, कारण गावात मीं एकटाच पायाळू होतो पुढें बरेच वर्षांनंतर या समजुतीविषयी मी सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ सर जेम्स फ्रेझर याना पत्र लिहून विचारलें अशाच प्रकारच्या समजुती जगभर निरनिराळ्या जातीमध्यें प्रचलित आहेत असे त्यानी सांगितलें पायाळू माणसाला विजेपासून भय असते असेहि म्हणतात अगदीं लहानपणापासून माझ्या मनावर ही गोष्ट बिंबली गेली होती विजा चमकत असल्या की मला घराबाहेर पडायची मनाई असे आता जरी त्या समजुतीत तथ्य नाही हें मला कळत असले तरी त्या जुन्या समजुतीचा माझ्या मनावर इतका पगडा बसला आहे की आभाळात विजा कडाडू लागल्या की माझे मनात चर्र होतें

माझ्या आधीची दोन आणि पाठचे एक अशी भावडें लहानपणीच वारल्यामुळें माझ्याबरोबर खेळायला माझ्या वयाचे कुणी नव्हते म्हणून मी नेहमी काकाच्या मागोमागे, बागेंत किंवा गोठ्यात, ते जिथें काम करीत असतील तिथें जात असे त्याच्या रोजच्या कामाची मला चांगलीच माहिती झाली माझ्या परीनें मी त्याना काही मदत करीत असे हेच खरे मूलोद्योगी (बेसिक) शिक्षण असें माझें ठाम मत बनलें आहे काका कधी शाळेत गेले नव्हते पण लिहणे, वाचणे हिशेब ठेवणे आणि शेतकी व बागाईतीविषयीं आवश्यक माहिती त्यानी घरीच मिळविली होती त्या

काळी ब्राह्मणाला वेद आणि इतर धार्मिक ग्रंथ तोंडपाठ येणे आवश्यक असे माझ्या थोरल्या चुलत्याना हे ग्रंथ मुखोद्‌गत येत होते पण माझे आजोबा गेले तेव्हा काका अवघे तीन वर्षांचे असल्यामुळे लहानपणी ऋग्वेद शिकण्याची त्याना सवी मिळाली नाही याची त्याना कायम रुखरुख वाटत असे काका पन्नास वर्षांचे झाले तेव्हा त्याचा सर्वांत मोठा नातू ऋग्वेद शिकण्यासाठी आजरल्यांच्या वैदिक पाठशाळेंत जात असे त्याच्यावरोबर ते अडखळत ऋग्वेदांतल्या ऋचा म्हणत असत आमच्या घरी सगळे सण आणि धार्मिक कृत्यें मोठ्या उत्साहाने केली जात आजऱ्याला काशी किंवा इतर ठिकाणचा दशग्रंथी ब्राह्मण आला तर त्याला आणि गावातल्या इतर विद्वान ब्राह्मणाना वेदपठण करण्यासाठी आमच्याकडे अगत्याने बोलावीत असत

मी वैदिक ब्राह्मण व्हावे अशी काकाची फार इच्छा होती पण मुंजीआधीं वेद शिकायचे नसल्यामुळे मला काकांनी उजळणी, लेखन व वाचन तेवढे शिकवले घुळाक्षरें मी प्रथम कधी शिकलो हे आता आठवत नाही मी नेहमी, अगदी मोठेपणी सुद्धा काकाच्या कुशीत झोंपत असें ते भल्या पहाटे उठत असत कित्येक वेळा मीहि त्याच्यावरोबर जागा होई अशा वेळी माझ्या उघड्या पाठीवर बोटानें मुळाक्षरें काढून ते ती मला ओळखायला लावीत असत मलाहि ते त्याच्या पाठीवर अक्षरें काढायला सागत अशा प्रकारे मी श्रीगणेशा शिकलों

जेव्हा प्रथम मी आजऱ्यांच्या प्राथमिक शाळेमध्ये वयाच्या सातव्या वर्षी दाखल झालो, तेव्हा मला पाढे, काही सोपी प्राथमिक उदाहरणें, आणि मोडी व बाळबोध लिहणेवाचणें, एवढ्या गोष्टी येत होत्या आमच्या जमाखर्चाच्या वहीत पै न् पैचा हिशोब लिहिला जाई काकाच्या देखरेखीखालीं मीहि बरेंच वेळा हिशोब लिहिला आहे मी सहा ते नऊ वर्षे वयाच्या दरम्यान लिहिलेले जमाखर्च आमच्या खातेवह्यात अजून आढळतील त्यायोगें मला आमच्या शेतवाडीत उत्पन्न होणाऱ्या धान्यफळाच्या किमती ठाऊक होत

रोज रात्री, जेवणानतर, रामायणमहाभारतामधला एखादा अध्याय काका मोठ्याने वाचून दाखवीत कधी कधी माझा सर्वांत मोठा भाऊ हे वाचन करीत असे मला वाचायला येऊ लागताच मीहि या वाचनात भाग घेऊ लागलो पांडवप्रताप, रामविजय, भक्तिविजय, आणि शनिमहात्म्य हे धर्मग्रंथ लहानपणीच माझ्या परिचयाचे झाले आमच्या गांवातले एक विद्वान् ब्राह्मण गणेशशास्त्री पेंडसे याच्याजवळ मी रूपावली व शिक्षा शिकलो मी मराठी चौथीत होतो तेव्हा माझी मुंज झाली मुंज होताच मला आंजऱ्यांच्या वैदिक शाळेंत घालण्याचा प्रश्न पुन्हा उद्‌भवला माझ्या प्राथमिक शाळेच्या शिक्षकानी या बेताला कसून विरोध केला माझी शाळेंत उत्तम प्रगती होत असल्यामुळें मला काढून टाकणे अविचाराचे ठरेल असे त्याचे म्हणणे त्याच्या म्हणण्याचा परिणाम होऊन माझे शिक्षण प्राथमिक शाळेत चालूच राहिले मला वैदिक ब्राह्मण करण्याची कल्पना अशा तऱ्हेनें कायमची विराम पावली

प्रकरण ५ वें

# आंजर्ले, मुरुड, दापोली

आंजर्ल्यांच्या शाळेत मी १८८२ मध्ये दाखल झालो जिल्ह्यामधल्या उत्तम शाळांत हिची गणना होत असे माझी इयत्ता मिळून शाळेत सुमारें शभर विद्यार्थी असावेत याना शिकवायला चार शिक्षक होते सर्वांत कमी वेतन असलेल्या मास्तराना महिना पाच रुपये मिळत हेडमास्तराचा पगार होता पचवीस रुपये अगदी खालच्या वर्गाला शिकवायला गणेश नारायण शित्रे हे एक असामान्य गृहस्थ होते आजूबाजूच्या खेड्यापाड्यातल्या लोकाना त्याच्याविषयी अपार आदर वाटे ते निष्णात आयुर्वेद-पारगत वैद्य होते त्याच्या वैद्यकीच्या ज्ञानाचा लाभ बहुधा सर्वांना फुकटच होई कामाविषयीचा आणि आपल्या विद्यार्थ्यांविषयीचा शित्रेमास्तराचा जिव्हाळा काही विलक्षणच होता १९०१ मध्ये इग्लडहून परतल्यावर मी त्याना नमस्कार करायला गेलो असता पहिल्याप्रथम त्यानी मला काही विचारलें असेल तर घन समीकरणे सोडविण्याची पद्धती ते विद्यार्थी होते तेव्हा साधी व वर्गसमीकरणें सोडविण्यापर्यंत ते बीजगणित शिकले होते घनसमीकरणे सोडण्याची रीत त्याचे मास्तर त्याना शिकवू शकले नाहीत शित्रे मास्तरांच्या मृत्यूनतर त्याच्या विद्यार्थ्यांनी आणि गावकऱ्यानी मिळून त्याच्या स्मारकासाठी निधी जमविला दहा वर्षांपूर्वी त्यातून शाळेसाठी आणखी एक इमारत बाधण्यात आली या इमारतीचे उद्‍घाटन करून तिला शित्रे मास्तरांचें नाव देण्याचा बहुमान मला मिळाला

आजर्ल्यांच्या शाळेत मी जवळ जवळ साडेतीन वर्षे विद्यार्थी होतों १८८५ च्या मे मध्ये माझे आतेभाऊ अण्णा कर्वे हे दरसालच्या रिवाजाप्रमाणे आपल्या मामाना – म्हणजे माझ्या वडिलाना – भेटण्यासाठी आले होते नुकतीच बी ए ची डिग्री मिळवून ते मुबईंत वेगवेगळ्या शाळातून शिक्षक म्हणून काम करीत होते खामगी शिकवण्याहि ते करीत असत स्वत चे शिक्षण पूर्ण करण्यापूर्वी असख्य अडचणींना त्याना तोड द्यावे लागले होतें त्यामुळें इतराना शिक्षणाबाबत शक्य ती मदत करण्याचा त्यानीं निर्धार केला या क्षेत्रातली त्याची आजन्म सेवा आणि

विशेषत स्त्रीशिक्षणासाठी त्यानी केलेलें कार्य आता सुपरिचित असून भारतात त्याला गौरवपूर्ण मान्यताहि मिळाली आहे ते आमच्याकडे आले असतां त्याचें माझ्याकडे लक्ष गेले आणि त्यानी मला पाठ करण्यासाठी इग्रजी मुळाक्षरें पाटीवर काढून दिली तास दीड तासात ती मी पाठ केली दुपारी जेव्हा परत आपल्या गावीं, मुरुडाला, जायला अण्णा निघाले, तेव्हा त्यानी मला "इग्रजी शिकायला माझ्या बरोबर चलतोस 'का ? " असे विचारले मी मोठ्या आनदाने कबूल झालों आणि लगेच टोपी डोक्यावर चढविली माझ्या जाण्याविषयी बहुधा आधीच त्यानी काकाशी बोलणे केले असावें त्या दिवसापासून ते मुबई व पुणे येथें माझे डिग्रीपर्यतचें शिक्षण पूर्ण होईतोंपर्यंत मला त्याच्या मार्गदर्शनाचा व निकट सहवासाचा लाभ झाला माझ्या शिक्षणाचा सर्व खर्च अण्णानींच केला आयुष्यात जें काही यश मला मिळाले असेल ते अण्णाचें प्रोत्साहन, मदत आणि थोर आदर्श यामुळेंच मिळू शकले त्याच्या-बरोबर मी मुरूडला गेलो आणि तिथल्या शाळेंत मराठी ५ व्या इयत्तेंत दाखल झालों त्यानतर अण्णा लवकरच मुबईला परतले मात्र जाताना त्यानी इग्रजी थोडे फार जाणणारे त्याचे एक स्नेही कृष्णाजीपत बागूल याच्याकडे मला पहिले इग्रजी पुस्तक आणि पहिली भाषातर पाठमाला शिकवण्याचे काम सोपविले मी मग माझ्या आत्याकडे, म्हणजे अण्णाच्या आईकडे, राहिलो मुरूडच्या त्या वास्तव्याच्या माझ्या आठवणी अत्यत आनददायक आहेत त्या घराला मी माझे दुसरे घरच मानीत आलों आतेसुद्धां मला आईच्या जागी वाटे भारतीय स्त्रीचा आदर्श मी तिच्यात पाहिला सात्विक साधेपणा, आणि कष्टाळू व सदैव दुसऱ्याच्या उपयोगी पडण्याची वृत्ती ही तिची वैशिष्ट्यें होती एका वर्षानतर मी मराठी सहाव्या—शेवटच्या—इयत्तेत गेलों त्या सुमाराला दापोलीच्या एस पी जी मिशनच्या हायस्कूलमध्ये, अण्णाचे एक स्नेही वामन बाळकृष्ण जोशी याची मास्तर म्हणून नेमणूक झाली अण्णानी मला त्याच्याकडे राहून त्या शाळेंत शिकण्यासाठी दापोलीला धाडलें १८८६ मध्यें पहिल्या तीन इग्रजी इयत्ता आणि १८८७ मध्यें चौथी इयत्ता मी पूर्ण केली दापोलीला मी सुमारे दीड वर्ष होतो

१८७६–७७ मध्यें, मोठा दुष्काळ सपल्यानतर मिशनऱ्याच्या आश्रयाला आलेल्या गरीब मुलाच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून एस् पी जी मिशन ही सस्था दापोलीला काम करीत असे तिने तेथे याकरिता एक शाळा काढली या शाळेची कलेकलेनें वाढ होऊन १८८७ मध्यें माध्यमिक शिक्षण देण्याइतपत ती समर्थ झाली रेव्हरड अल्फ्रेड गॅडनी हे मिशनचे व शाळेचे प्रमुख होते अगदी अखेर-पर्यंत त्यानी शाळेची सेवा केली तिच्या भरभराटीचे सर्व श्रेय त्यानाच आहे ते मराठी भाषेचे तज्ञ होते शाळेचे विद्यार्थी व भोवतालचे सारे लोक याचा त्याच्यावर फार लोभ असे दापोली गावाच्या परिसरांत त्यानी उचवटयाची अशी बरीच जमीन विकत घेतली आणि तीवर शाळेसाठी इमारत बाधली शाळेच्या विस्तृत आवारात

त्यानी वरीचशी आब्याची झाडें लावली ही झाडे अजूनहि चागलें उत्पन्न देतात शाळा जरी मिशनची होती तरी तीत धार्मिक प्रार्थना सर्व विद्यार्थ्यांना सक्तीची नसे फक्त खिरस्ती विद्यार्थ्यांना त्याच्या धर्मानुसार धार्मिक शिक्षण दिलें जाई गॅडन-साहेबाच्या नेतृत्वाखाली शाळेची कारकीर्द मोठी यशस्वी ठरली आपली सारी शक्ति त्यानी या कामी खर्च केली सुमारें तीस वर्षांपूर्वी, रेव्हरड गॅडनी वयोवृद्ध झाल्यानतर, गॉस्पलचा प्रचार करण्याचें मुख्य उद्दिष्ट शाळेकडून पार पाडले जात नाहीं या सबबीखाली ती बद करण्याचें मिशनने ठरविलें तालुक्यातल्या लोकांसाठी इतकी वर्षे उत्तम प्रकारचे कार्य करणारी ही समृद्ध शाळा बद व्हावी याची दापोलीतल्या कार्यकर्त्यांना खत वाटली, आणि त्यांनीं शाळेचे काम हातीं घेऊन ती चालविण्याच्या उद्देशाने " दापोली शिक्षण सस्था " स्थापन केली हीच सस्था सध्याहि शाळेचे काम चालविते गॅडनीसाहेबाच्या कामगिरीची कृतज्ञ आठवण म्हणून शाळेचें नाव अल्फ्रेड गॅडनी हायस्कूल ठेवण्यात आले आहे या सस्थेचा मी पांच वर्षे अध्यक्ष होतों शेतकी-प्रधान बहुशाखीय शाळा म्हणून सरकारनें नुकतीच या शाळेची निवड केली आहे तिच्या इमारतीची तसेंच सामुग्रीची फार मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून, आता राज्यामधल्या उत्तम शाळेत हिची गणना होते

## प्रकरण ६ वें

# मराठा हायस्कूल

दापोलीला इग्रजी चौथी इयत्ता पूर्ण केल्यानतर १८८८ च्या जानेवारीमध्ये मी आण्णाच्याकडे मुबईला गेलो मॅट्रिक होईपर्यंतची चार वर्षे मी त्याच्याकडेच होतों गिरगावातल्या एका जुनाट चाळीच्या चौथ्या मजल्यावर आम्ही रहात असू ह्या चाळीचा मागमूसहि आता शिल्लक नाहीं अण्णा, आणि त्याचे दोन मित्र, नरहर बाळकृष्ण जोशी आणि मोरेश्वर रामचद्र काळे, या तिघानी मिळून एकत्र बिऱ्हाड थाटले होते त्याच्या बायका मिळून घरकाम करीत काळे कुटुब एकदोन वर्षांत निघून गेलें अण्णा आणि जोशी या दोघाच्या स्वभावात जमीन अस्मानाचे अतर होते अण्णा हे अत्यत भिडस्त, शात, प्रसिद्धिपराङ्मुख, व्यवहाराला चोख आणि कार्य-दक्ष, तर जोशी हे दिखाऊ, अघळपघळ बोलके आणि सदैव आपली छाप दुसऱ्यावर कशी पडेल या विवचनेत मग्न दोघेहि बरोबरच शाळेत शिकले होते दोघानीहि अनेक अडचणी सोसून कॉलेजचें शिक्षण पूर्ण केलें होते या आमच्या एकत्र कुटुबात जवळ जवळ एकाच वयाची अशी आम्ही पाच मुले होतों चौघाना अण्णांनी शिक्षणा-साठी आणलें होते पाचवा भार्गव, हा जोशाचा सर्वांत धाकटा भाऊ हूडपणाबद्दल आम्ही प्रसिद्ध होतो मात्र अण्णाबद्दल आम्हा सर्वांना अत्यत आदर आणि भक्ति-भाव वाटे त्यानी उच्चारण्याच्या आंतच त्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी आमची धडपड चाले जोशाच्या बाबतीत मात्र उलटा प्रकार होता वेळोवेळी त्याच्या हातचा खरपूस प्रसाद खाऊनहि त्याचें काम करण्याचे आम्ही शक्य तेवढें टाळीत असू ते अत्यत बुद्धिमान गृहस्थ होते त्याच्याजवळ मोठ्याने वाचन करून, आणि जेवताना रगणारे त्याचे आणि अण्णाचे सामाजिक वा इतर विषयाबरचे वादविवाद ऐकून माझा फार फायदा झाला त्याचें पुढचें आयुष्य मात्र एकमार्गी राहिलें नाही आणि त्याच्या बुद्धिमत्वाचा म्हणावा तितका प्रभाव पडला नाही याचे मुख्य कारण म्हणजे सहवासात येईल त्या व्यक्तीची सहानुभूति गमावण्याची त्याची हातोटी व त्याचा स्वार्थी स्वभाव अण्णाचे कार्य – जगद्विख्यात आहे त्याबद्दल मी येथे तपशिलाने लिहिण्याचे कारण नाही

मराठा हायस्कूलमध्यें मी ५ व्या इयत्तेत दाखल झालों ही खाजगी शाळा राजारामशास्त्री भागवत यानी अण्णा व इतर सहकाऱ्याच्या मदतीने सुरू केली होती राजारामशास्त्री याचे व्यक्तिमत्त्व फार प्रभावी होते सस्कृतचे गाढे पडित आणि कट्टर समाजसुधारक म्हणून त्याची ख्याति होती त्याचा स्वभाव काहीसा विक्षिप्त असूनहि सर्वांना त्याच्याविषयी पूज्यभाव वाटे मुबईच्या सेंट झेवियर्स कॉलेजमधील आपली प्राध्यापकाची नोकरी सभाळून ते स्वत च्या शाळेंत सस्कृत आणि क्वचित् मराठी शिकवीत दापोलीला चौथ्या इयत्तेमध्यें जरी मी एक वर्ष सस्कृत शिकलो असलों तरी अण्णानी मला यापुढें लॅटिन ही दुसरी भाषा घेण्याचा सल्ला दिला तेव्हा ह्या आरभापासूनच्या अभ्यासाची मला भरपाई करावयाची होती पाचवीच्या मुलाबरोबर यायला मला चार महिने लागले लॅटिनविषयी मला फार आवड वाटू लागली होती मॅट्रिकच्या परीक्षेला मी बसलो तेव्हा या विषयाचे माझें इतर विद्यार्थ्यांच्या मानाने बरेच जास्त वाचन झालें होतें मॅट्रिक परीक्षेतील शिष्यवृत्ति मिळविण्याची माझी महत्त्वाकाक्षा मात्र पूर्ण होऊ शकली नाही माझा नबर दुसरा आला इतर विषयाकडे मी दुर्लक्ष केले नव्हते वर्गात माझा नबर बहुधा सर्व विषयांत पहिला असे मॅट्रिकच्या परीक्षेला वास्तविक मी १८९० साली बसावयाचा, पण त्या वेळी माझे वय चौदाच वर्षांचे असल्यामुळें आणखी चागली तयारी करण्याच्या दृष्टीने अण्णानी मला एक वर्ष थाबण्याचा सल्ला दिला मात्र रगीत तालीम म्हणून मी त्या वर्षी युनिव्हर्सिटी स्कूल फायनलच्या परीक्षेला बसलो या परीक्षेत माझा नववा नबर आला माझ्या वर क्रमाक आलेल्या बहुतेक मुलानी तीन ऐच्छिक विषय घेतले होते मी फक्त दोनच घेतले होते १८९१ साली मॅट्रिकला मी पहिला आलो शाळेत मी शिक्षकाचा आवडता विद्यार्थी होतों त्या सर्वांकडून मला फार प्रोत्साहन मिळाले विशेषत द ख गुप्ते, स वि आपटे, म स बापट, ना भि कापरेकर, आणि लॅटिनचे आमचे दीक्षित मास्तर याची नावे कृतज्ञतेने नमूद करावीशी वाटतात मराठा हायस्कूलमधल्या माझ्या निकटच्या मित्रापैकी शकर गोपाळ साठे आणि रामचद्र भास्कर भागवत या दोघाशी माझी पुढेंहि मैत्री कायम राहिली साठे नतर एल्फिन्स्टन कॉलेजात तत्त्वज्ञानाचा प्रोफेसर झाला १९५९ साली त्याचा पुण्याला अत झाला भागवत नाशिकच्या हायस्कूलचा हेडमास्तर होता सेवानिवृत्त झाल्या-पासून तो पुण्यालाच असतो आम्ही दोघेहि शाळेत लॅटिनचे विद्यार्थी होतो गाइडाना मी कधी स्पर्श केला नाही, पण वर्गांत आवश्यक असे त्याहून मी किती तरी अवातर वाचन करीत असें विषयाच्या तयारीसाठी शिक्षक जी मोठाली पुस्तके घरी वाचीत असत ती त्याच्याकडून मागून आणून वाचण्याचा माझा परिपाठ होता त्यातले बहुधा फारच थोडें माझ्या ध्यानात राहत असावें परतु अशा तपशीलवार पुस्तकांचे वाचन केल्यामुळे नेमलेल्या पुस्तकात असते त्याहून किती तरी विविध प्रकारची आणि सविस्तर माहिती मिळू शकते अशा प्रकारें नेहमीच्या

अभ्यासक्रमाच्या पुस्तकांव्यतिरिक्त मी एल्फिन्स्टनचे History of India आणि ग्रीनच्या History of the British People मधला बराच भाग वाचून काढला होता गणितामध्ये माझा पहिला क्रमांक असे कधी एखाद्या विद्यार्थ्याने मास्तरांना अवघड उदाहरण सोडवून दाखविण्याची विनंती केली तर मास्तर बऱ्याच वेळा ती कामगिरी माझ्याकडे सोपवीत असत इंग्रजीचा अभ्यास करताना, परीक्षेला आम्हाला मेकॉलेचा एकच निबंध होता तरी मी त्याने लिहिलेले बहुतेक सगळे निबंध वाचलेले होते मेकॉलेच्या लेखनशैलीवर वेळोवेळी प्रखर टीका होत असली तरी त्याच्या लिखाणापासून माझा बराच फायदा झाला हे नमूद केले पाहिजे त्याच्या लेखात जागोजाग विखुरलेल्या ऐतिहासिक आणि इतर दाखल्याविषयी जास्तीत जास्त माहिती करून घेण्याचा माझा नाद होता घरच्या प्रोत्साहनामुळे आम्हाला पुष्कळ वाचन करण्याची सवय लागली टिळक व आगरकर या दोन कट्टर विरोधकांची केसरी आणि सुधारक ही वृत्तपत्रें मी नेमाने वाचीत असें बऱ्याच वेळी आम्हाला सुधारकातल्या लेखाचे इंग्रजीत भाषांतर करायला सांगण्यात येई अधूनमधून मी टाइम्स ऑफ इंडियाहि चाळीत असे मात्र त्यातला फारच थोडा भाग तेव्हा कळायचा जोशी त्या वेळी मिल व स्पेन्सरप्रमाणेच अज्ञेयवादी होते त्यामुळे त्या दोघांचे लिखाण बऱ्याच वेळा ते माझ्याकडून मोठ्याने वाचून घेत मिलचे Subjection of Women व Liberty आणि स्पेन्सरचे Education आणि इतर काही लेख, आणि अशा प्रकारचे बरेंच वाङ्मय मी त्या वेळी वाचून काढल्याचे मला आठवते मला वाटते, की मुंबईमधल्या या वाचनातूनच माझ्या निरीश्वरवादी मताचा उगम झाला असावा मुर्डीच्या आमच्या सनातनी घराचे संस्कार माझ्या मनावर उरले नाहीत खास मराठा हायस्कूलला म्हणण्यासारखे चांगले क्रीडांगण नव्हते विद्यार्थी जगात त्या वेळी अभ्यासाव्यतिरिक्त इतर गोष्टींना फारसे स्थानहि नसे गृहकर्तव्य म्हणून घालाव्या लागणाऱ्या मंडईच्या खेपा आणि एक दोन मैलांचे रोजचे चालणे एवढाच काय तो आम्हाला व्यायाम होता सुप्रीम लेजिस्लेटिव्ह कौन्सिलपुढे त्या वेळी असलेल्या संमतिवयाच्या कायद्याबाबत आम्ही मुले शाळेंत चर्चा करीत असू पण एकदरीनें पाहता, राजकारणात किंवा अन्य सामाजिक घडामोडीत विद्यार्थी फारसे लक्ष घालीत नसत मुंबईच्या आमच्या घरात सुधारणेचे वारे खेळत होते घरात कधी धार्मिक कृत्ये झाली नाहीत मी तेथे असताना, मुंबईला एकदा काँग्रेसचे अधिवेशन भरले होते अधिवेशनानंतरची सामाजिक परिषद ज्या मंडपात घेण्यात आली तो काँग्रेसचा मंडप पाहायला मला नेले होते त्या वेळी ब्रॅडलॉला पाहिल्याचे मला अधूक अधूक स्मरण आहे तेव्हाच्या काळात, हेमन्त व्याख्यानमाला हा एकच बौद्धिक किंवा साहित्यिक स्वरूपाचा विरंगुळा होता या व्याख्यानांचा सविस्तर अहवाल केसरीत प्रसिद्ध होई कधी कधी ती सविस्तर छोटयाशा पुस्तक रूपाने छापली जात त्यापैकी मी बरीच वाचली होती त्यात मोर्लेच्या On-

Compromise चेच जवळ जवळ सार असलेले सामाजिक बाबतीत तडजोड या विषयावरचे तेलगाचें व्याख्यान, आणि पारशी, मुसलमान इत्यादि विभिन्न धर्मासंबंधी आणि संस्कृतीसंबंधी राजारामशास्त्री भागवत यांनी दिलेली दोन तीन व्याख्याने, यांचा समावेश होता त्या काळात विशेष कुणा प्रसिद्ध व्यक्तीशी माझा संबंध आला नाही मात्र शेठ विजभुखणदास आत्माराम (सर चुनिलाल मेहतांचे वडील आणि सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास यांचे चुलते) आणि जोशांचे स्नेही चिमणलाल सेटलवाड या दोघांकडे निरोप पोचविण्यासाठी मी अनेकदा जात असें चिमणलाल त्या वेळी मुंबईंत कायद्याचा अभ्यास करीत होते पुढें १९२१ साली, मुंबईच्या कॅबिनेटमध्यें चिमणलाल व चुनिलाल हे दोघे माझे सहकारी झाले

मी मॅट्रिकच्या परीक्षेला बसण्याच्या सुमारास, म्हणजे १८९१ च्या नोव्हेंबर महिन्यात, फर्ग्युसन कॉलेजमध्यें अण्णांनी गणिताचें प्राध्यापकपद स्वीकारावें, अशी गोखल्यांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीतर्फे त्यांना विनंती केली सीनिअर बी ए पर्यन्त शिक्षण देण्याची नुकतीच या कॉलेजला परवानगी मिळाली होती फर्स्ट बी ए पर्यन्तच्या वर्गांना टिळक गणित शिकवीत असत, पण त्यांनी आदल्याच वर्षी राजिनामा दिला होता अण्णांना मिळालेल्या या बहुमानाबद्दल आम्हा सर्वांनाच आनंद झाला गणिताचे कुशल खासगी शिक्षक म्हणून जरी अण्णांना मुंबईंत लौकिक असला, तरी १८८४ मध्यें कॉलेज सोडल्यापासून बी ए च्या गणिताशी त्यांचा संबंध तसा सुटलेला होता तेव्हा अण्णांनी फार भीतभीतच ही जागा स्वीकारली गोखले आणि अण्णा एल्फिन्स्टन कॉलेजात एकाच वर्गांत होते आपल्या संकोची स्वभावामुळे अण्णा जरी फारसे लोकांच्या नजरेंत भरलेले नसले तरी गोखल्यांना त्यांच्या स्वभावाबद्दल आणि कर्तृत्वाबद्दल अपार आदर वाटे अण्णांच्या भावी कामगिरीची सुरुवात या नव्या नोकरीपासूनच झाली मीहि त्याच वर्षी मॅट्रिक पास होऊन कॉलेजात पदार्पण करण्याच्या बेतात असल्यामुळें, या घटनेमुळें पुण्यास जाऊ शकलो दुर्दैवाने आम्हाला अत्यंत प्रिय असलेली अण्णांची प्रथम पत्नी राधाबाई, त्याच सुमाराला मुरूड येथे वारली त्या वेळीं अण्णांनी प्रकट केलेले असामान्य मन:स्वास्थ्य आणि कर्तव्यनिष्ठा माझ्या अजून स्मरणात आहेत पत्निनिधनामुळें त्यांच्या दिनक्रमात यत्किंचितहि बदल झाला नाही १८९१ च्या नोव्हेंबर अखेर अण्णा पुण्याला गेले डिसेंबरात माझा रिझल्ट लागणार होता तोपर्यंतचा काळ मी माझ्या गावी घालवला रिझल्ट लागल्या-नंतर मी पुण्याला जाऊन फर्ग्युसन कॉलेजात नाव घातले

मॅट्रिकच्या परीक्षेंत मी पहिला आलो खरा, पण निकाल लागण्याआधीच एक महिना मी विलक्षण बेचैनींत घालवला भूमितीचा पेपर सुमारें तीन तासांचा, पावणे दोन तासात सोडवून तो सुपरव्हायझरच्या हवाली करून मी मंडपाच्या बाहेर पडलो त्यानंतर वाटेंत मला माझा वर्गमित्र शंकर साठे यांचे वडील रावसाहेब गो मो साठे भेटले रावसाहेब साठे हे देशी वर्तमानपत्रांसंबंधी समग्र माहिती देणारे

सरकारी अधिकारी होते मला परीक्षा चालू असताना बाहेर आलेला पाहून त्याना आश्चर्य वाटले आणि त्यानी "काय रे, तू मंडपाबाहेर काय करतो आहेस ? आजारी बिजारी पडलास की काय ? " असें मला विचारले तेव्हा मी लवकर पेपर दिल्याचें त्याना सांगितलें रावसाहेबानीं विद्यापीठांत परीक्षकाचें काम केलें होतें इतक्या आधी पेपर दिलास ही तू मोठी चूक केलीस असे ते म्हणाले न जाणों सुपर-व्हायझर नेमका तेवढाच पेपर गठ्ठयात ठेवायला विसरायचा त्यानंतर एक महिना मी विलक्षण अस्वस्थतेंत घालवला मी मोठ्या उत्कंठेने अपेक्षा करीत असलेल्या शभर मार्कांऐवजी शून्य पदरात पडते की काय अशी मला धास्ती वाटू लागली सुदैवानें शेवट गोड झाला त्यानंतर बऱ्याच दिवसानी माझा पेपर ज्यानी घेतला होता ते सुपरव्हायझर मला भेटले पावणेदोन तासात पेपर सोडविल्याची ही हकीकत ते मोठ्या उत्साहाने आपल्या मित्रमंडळीत सांगत असत.

प्रकरण सातवें

# फर्ग्युसन कॉलेज

१८९२ मध्यें, जानेवारी महिन्याच्या आरंभी, मी पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्यें नाव घातलें कॉलेज त्या वेळी गद्रे वाड्यात भरत असे न्यू इंग्लिश स्कूलचीहि तीच जागा होती फर्ग्युसन कॉलेज १८८५ साली स्थापन झालें सुरुवातीला तेथे फक्त प्रीव्हियस आणि फर्स्ट बी ए चे वर्ग शिकविले जात असत सीनिअर बी ए आणि फर्स्ट बी एस्सी चे वर्ग मुंबई विद्यापीठाची संमती मिळाल्यावर, १८९२ साली प्रथम सुरू करण्यात आले कॉलेजांत शिक्षकवर्गाची संख्या बेताची होती, आणि साधनसामुग्री -- विशेषत शास्त्रीय उपकरणें -- अगदींच कामचलाऊ होतीं मात्र जे शिक्षक होते ते आपापल्या विषयात पारंगत होते प्रीव्हियसच्या वर्गात आम्हाला इंग्रजी शिकवायला गोखले, वासुदेवराव केळकर, इतिहासाला चिं ग भानू आणि गणिताला अण्णा कर्वे होते माझी दुसरी भाषा लॅटिन असल्यामुळे माझा मलाच तिचा अभ्यास करावा लागला प्रिन्सिपल आपटे, प्रोफेसर चादोरकर व प्रोफेसर पानसे हे तिघे संस्कृत शिकवीत मी प्रीव्हियसला असताच ऑगस्ट महिन्यात वामन शिवराम आपटे यांचे देहावसान झाले ते कॉलेजचे पहिले प्रिन्सिपल होते कॉलेजच्या अपूर्व यशाचें बरेचसे श्रेय त्यांच्याकडे जाते संस्थेसाठी त्यांनी घेतलेले अविश्रांत परिश्रम आणि समाजामध्ये त्यांना असलेली प्रतिष्ठा या दोन्ही गोष्टींमुळे कॉलेजच्या उत्कर्षाला फार मदत झाली प्रिन्सिपल आपटे संस्कृतचे गाढे पंडित होते आज सत्तर वर्षांनंतरहि त्यांनी तयार केलेले शब्दकोश आणि सुभाषित रत्नभांडार यांचें मोल कमी झाले नाही गोखले आम्हाला Bride of Lammermoor ही स्कॉटची कादंबरी शिकवीत असत माझ्या वर्गात मी पहिला आलो असल्यामुळे माझ्या अभ्यासाकडे त्यांचें विशेष लक्ष असे मला इंग्रजी निबंध लिहायला सांगून ते स्वत ते वाचून तपासीत असत त्यांच्या विषयाला अनुलक्षून इतर बरेच वाचनहि मी त्यांच्या मार्गदर्शनाखाली केले त्यांचें शिकवणें अत्यंत मुद्देसूद होते दुर्बोध अगर क्लिष्ट भाग असला तरी त्यांनी कधी त्याची टाळा-

टाळ केली नाही प्रा केळकर आम्हाला lady of the Lake शिकवीत साहित्यातले ते दर्दी होते शेक्सपीअरच्या Taming of the Shrew चे त्यांनी केलेलें त्राटिका हे मराठी रूपान्तर, जवळ जवळ मूळ कृतीइतकेंच सुंदर आहे Lady of the Lake हे काव्य सुलभ असल्यामुळें ते ते भरभर शिकवीत, प्रत्येक टर्मच्या मध्यापर्यंत पुस्तकातले तीन सर्ग त्यानी संपवलेले असत वर्गांत एकदा त्यानी मला मजजवळच्या पुस्तकामधला एक उतारा मोठ्याने वाचून दाखवायला सांगितला तो प्रसंग अजून माझ्या डोळ्यासमोर आहे मी समजून हुशारीने वाचतो, पण योग्य इंग्रजी ॲक्सेंटचा मला गंध नाही असे त्यानी त्याच दिवशी संध्याकाळी अण्णाना खाजगी बैठकीत सांगितले हा अभिप्राय अण्णानी मला सांगितल्यापासून इंग्लिश उच्चाराकडे मी फार बारकाईने लक्ष देऊ लागलों गोखलेसुद्धा आपल्या इंग्रजी उच्चाराविषयी विशेष दक्ष असत आम्हाला असलेल्या क्रमिक पुस्तकाखेरीज मी स्कॉटच्या दोन तीन कादंबऱ्या वाचल्या होत्या त्यांच्याविषयी अधिक माहिती व्हावी म्हणून हटननें लिहिलेले Life of Scott हें त्याचे चरित्रहि मीं वाचून काढलें इतिहासासाठी आम्हाला मेरिव्हेलच्या General History of Rome मधला सीझरच्या मृत्यूपर्यंतचा भाग होता प्रो मानूकडून मॉमसेन, आर्नेल्ड आणि ईन्हृ या इतिहासकारांची रोमच्या इतिहासावरची विस्तृत पुस्तकें आणून ती मी बरीच वाचून काढली शाळेमध्ये लॅटिनचा अभ्यास केला असल्यामुळें मला रोमन इतिहास थोडा बहुत परिचित होताच अण्णा गणित शिकवण्यात वाकबगार होते त्यांच्याकडेच मी राहत असल्यामुळे भूमिती आणि बीजगणित या विषयात मला लागेल तेवढी मदत मिळे प्रीव्हियसच्या वर्गांत पहिला वर्ग मिळवणारा, संपूर्ण विद्यापीठात मी एकटाच विद्यार्थी होतों त्या काळात पहिला वर्ग आजच्या इतका मवग नव्हता

प्रीव्हियसच्या परीक्षेनंतर बहुतेक विद्यार्थी इंटर आर्टस्कडे वळत काही थोडे, इंजीनिअरिंग, मेडिकल किंवा शेतकी कॉलेजात दाखल होत बी एस् सी ला नाव घालणाऱ्याची संख्या अगदीच मोजकी असे तरी पण अण्णानी मला तिकडेच जाण्याचा सल्ला दिला तेव्हां मी फर्स्ट बी एस सी मध्ये नाव नोंदवले माझ्या वर्गांत माझ्याखेरीज फक्त आणखी एकच विद्यार्थी होता आम्हाला फिजिक्स केमिस्ट्रीला प्रो गोळे, बायॉलजीला प्रो व्ही बी भाटे आणि गणिताला अण्णा कर्वे होते कॉलेजच्या प्रयोगशाळा मुळीच सुसज्ज नव्हत्या पण परीक्षेकरिता आम्हाला अगदी मामुली प्रात्यक्षिके करावी लागत फिजिक्स प्रॅक्टिकलला फक्त वेगवेगळी शास्त्रीय उपकरणे ओळखून ती कशी वापरायची एवढेंच सांगायचे असे ती आम्ही वापरून दाखवावी अशी आमच्याकडून अपेक्षा नसे केमिस्ट्री प्रॅक्टिकलच्या वेळी Reagents च्या सहाय्यानें वेगवेगळी रासायनिक द्रव्यें ओळखून दाखविणे, थोडक्यात म्हणजे प्रयोगनलिकांचा सर्रास वापर करणे, एवढेंच विद्यार्थ्यांचे काम

असे बायॉलॉजी प्रात्यक्षिकाला कांही मामुली प्राण्याची अथवा वनस्पतीची आम्हाला चिरफाड करावी लागे तसेंच शरीरशास्त्रामधले व वनस्पतीशास्त्रामधले काही नमुने काय ते ओळखावे लागत फर्स्ट बी एससी चा अभ्यासक्रम फार विस्तीर्ण होता आठ पेपर आणि चार प्रात्यक्षिकें ही काही क्षुल्लक बाब नव्हती मला वाटते, एका वर्षात आम्हाला करावा लागणारा अभ्यास लक्षात घेता, मी दिलेल्या सर्व परिक्षामध्यें हीच परीक्षा सर्वांत अवघड असावी या परीक्षेलाहि सपूर्ण विद्यापीठात प्रथम श्रेणी मिळवणारा मी एकटाच विद्यार्थी होतो मात्र या खेपेला एकूण फक्त पन्नास विद्यार्थी बसले होते केमिस्ट्रीच्या प्रॅक्टिकलला मला एक क्षार मिळाला होता माझ्या प्रयोगावरून त्या क्षाराचा घटक हा दोन विशिष्ट धातूपैकीं एक कुठला तरी धातू आहे, हे मला निश्चितपणे कळले होतें पण हे दोन धातु एकमेकांपासून वेगळे कसे ओळखायचे ते मी विसरलों होतों आमच्यावर देखरेख करणाऱ्या परीक्षकाला मीं या दोन धातूपैकी कुठल्याहि एका धातूचा एखादा क्षार मला देण्याची विनती केली तेव्हां त्या क्षारापैकी कुठल्याचाच Reagents म्हणून उपयोग केला जात असल्याचे ऐकिवात नाही, असें परीक्षकानें मला सांगितले क्षार मला कशासाठी हवा आहे असें त्यानें विचारल्यावर मी माझी अडचण मोकळेपणानें सांगितली दोन धातूमधला भेद ताडून पाहण्यासाठी मला क्षार हवा असल्याचे कळताच, त्यांनी तो देण्याचे साफ नाकारलें माझें उत्तर बरोबर होते किंवा नाही, हें कळायला आता मार्ग नाही, पण मला वाटतें की स्वतःच्या अक्कलहुशारीनें अशा बिकट प्रसंगातून विद्यार्थ्यानें तोड काढण्याचा प्रयत्न केला असता, त्याला परीक्षकाकडून उत्तेजन मिळायला हवे होतें मी परीक्षक असतों तर अवश्य अशी परवानगी दिली असती पण परीक्षकाना सामान्यपणें कल्पकता कमी असते असा माझा अनुभव आहे

फर्स्ट बी एससी पास करून मी सीनिअर बी एससी च्या वर्गांत गेलों माझ्याखेरीज एच व्ही गोळे हा एकच विद्यार्थी या वर्गात होता पुढे तो नाशिकला द्राक्षाचा प्रख्यात बागाईतदार झाला बी एससी परीक्षेसाठी एका वर्षांत आम्हाला तीन विषय घ्यावे लागत मी प्युअर मॅथमॅटिक्स, अप्लाइड मॅथमॅटिक्स आणि वनस्पतिशास्त्र हे तीन विषय घेतले होते केमिस्ट्री शिकण्याची त्या वेळीं फर्ग्युसनमध्ये सोय नव्हती नाही तर मी बॉटनी ऐवजी तोच विषय घेतला असता पण लवकरच मला बॉटनीविषयीहि जिव्हाळा उत्पन्न झाला मूळचा मी खेड्यातला असल्यामुळे, झाडेझुडपे आणि शेतकी याच्याशी माझा प्रारंभापासूनच निकटचा सहवास होता आम्हाला Pure व applied mathematics ला बी ए पेक्षां थोडा जास्त व एम ए पेक्षा थोडासा कमी असा अभ्यासक्रम होता माझ्या नेहमीच्या रिवाजाप्रमाणें, मी सगळ्या क्रमिक पुस्तकाचा बारकाईने अभ्यास केला होता त्याच्यातलीं सर्व उदाहरणे सोडवून शिवाय अनेक प्रगत पुस्तकेंहि मीं बरीचशी वाचून काढली होतीं साक्सची वनस्पतिशास्त्राचा इतिहास व वनस्पतीचे जीवन-

शास्त्र आणि डार्विनचे Origin of species हीं गहन पुस्तके मीं वनस्पति-शास्त्राच्या अभ्यासासाठी वाचली चार वर्षांतून फक्त एकदा मिळणारी सर जेम्स फर्ग्युसन स्कॉलरशिप १८९४ साली बी एससीच्या परीक्षेला मिळणार होती ती मिळवणाऱ्या विद्यार्थ्याला दोन वर्षे महिना पन्नास रुपये मिळत ही बहुमूल्य शिष्यवृत्ति मिळवण्याच्या उद्देशानें, एन व्ही सप्रे हा विद्यार्थी माझ्या आधी एक वर्ष फर्स्ट बी एस्सी प्रथम श्रेणीत पास झाला असूनहि मुद्दाम थाबून राहिला मात्र पुढे फर्ग्युसन कॉलेज सोडून मुबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजात त्याने नाव घातले एलि-एलिफन्स्टन कॉलेजात त्या वेळी पदवी परीक्षा उत्तम रीतीने उत्तीर्ण होणाऱ्यास दक्षिणा फेलोशिप मिळत असे फर्ग्युसन मध्यें ती ठेवलेली नव्हती ही स्कॉलरशिप मिळवण्यासाठी, तसेंच त्या कॉलेजात शिकवीत असलेल्या सुप्रसिद्ध प्रो हॅथॉर्नथ्-वेट याच्या शिकवण्याचा लाभ घेण्यासाठीं सप्रे मुबईला गेला आम्हा दोघामधली ही स्पर्धा पुण्याला व मुबईला अनेकजण मोठ्या उत्सुकतेनें पाहत होते स्पर्धेचा निकाल सप्रेला फार निराशाजनक ठरला त्याला दुसराच वर्ग मिळाला पहिल्या वर्गात मी एकटाच विद्यार्थी होतो ९०० पैकी पहिल्या वर्गाला लागणाऱ्या मार्कापेक्षा ५२ मार्क मला जास्त पडले सप्रेच्या दुर्दैवाचा कळस होऊन वर्षातच तो क्षयानें वारला बॉटनी प्रॅक्टिकलच्या परीक्षेला मला मिळालेले सूक्ष्मदर्शक यत्र सदोष होतें तेव्हाचे परीक्षक, सुप्रसिद्ध जीवशास्त्रज्ञ लेफ्टनट कर्नल के आर कीर्तिकर, याच्या-कडे मीं तक्रार केली पण त्यांनी माझे म्हणणे मनावर घेतले नाही दोष यत्रामध्ये नसून ते वापरणाऱ्यांत आहे असे त्यांना वाटले जेव्हा मी त्याना स्वत सूक्ष्मदर्शक वापरून पाहण्याची विनती केली तेव्हा त्याच्यात काही तरी उणीव असल्याचे त्याच्या निदर्शनाला आले त्यानतर त्यानी विद्यार्थ्यांना स्वत चीं उपकरणें आणता यावीत यासाठी खटपट करण्याचे आश्वासन दिलें

बी एससी च्या परीक्षेनतर माझ्या मनात गणिताच्या उच्च शिक्षणासाठी इग्लडला जायचे होते त्यासाठी फॉरिन स्कॉलरशिप मिळवायला अर्ज करणें आव-श्यक होते हिंदुस्थान सरकारची शिष्यवृत्ति मुबई विद्यापीठातर्फे १८९६ सालीच मिळणार असल्यामुळें मला दीड वर्ष थाबावें लागणार होतें मुबईत त्या वेळी एम एससी ची परीक्षा नसे त्यामुळें मी इटर आर्टसमध्यें नाव घातले फर्ग्युसन कॉलेजात दक्षिणा फेलोशिप ठेवलेली नव्हती पण तेवढ्या पगाराची मला स्पेशल फेलोशिप म्हणून कॉलेजने देऊ केली आणि मी इटर आर्ट्स व बी ए चे गणिताचे वर्ग घेऊ लागलो माझ्या वेळचे सोबती जमले की, त्या वेळच्या एका मजेदार घटनेची नेहमी आठवण निघत असे इटरचा माझा ट्रिग्नॉमेट्रीचा तास घेऊन झाला, की लगेच गोखल्याच्या पुढच्या तासाला मी बाकावर विद्यार्थ्यांच्यामध्ये बसून डी क्विन्सीचे Confessions of an Opium-eater शिकत असें १८९५ मध्यें इटर आर्ट्सच्या परीक्षेला मी पहिल्या वर्गात पहिला आलो माझ्याशिवाय पहिला

वर्ग मिळवणारा भुलाभाई देसाई हा आणखी एकच विद्यार्थी होता हिंदुस्थानच्या राजकीय जीवनात इम्पीरियल लेजिस्लेटिव्ह काऊन्सिलामध्यें, कॉंग्रेस पार्टीचा पुढारी म्हणून पुढे त्याने बराच लौकिक मिळवला या परीक्षेमध्ये मला फिजिक्सला ठेवलेले गिब्स पारितोषिक मिळाले

२७ मार्च, १८९५ रोजी, फर्ग्युसन कॉलेजचे गावामधल्या गद्रे वाड्यामधून नव्या इमारतीत स्थलांतर झाले त्या वेळचा समारंभ मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड सॅण्ड-हर्स्ट याच्या अध्यक्षतेखाली झाला मी कॉलेजचा फेलो असल्यामुळें ओघानेंच वसति-गृहाचा सुपरिंटेंडेंट झालों वसतिगृहात तेव्हा चार क्लब व एकूण शभर मुलें होती कै आपट्याच्या नतर आगरकर प्रिन्सिपल झाले कॉलेज नव्या जागेंत आल्यानंतर थोड्याच अवधीत दुर्दैवाने, त्याचें देहावसान झालें, आणि एम् एस् गोळे त्याच्या जागी आले प्रिन्सिपॉलसाठी बाधलेल्या नव्या घरात आगरकराचा मृत्यु झाला या घरात मी पुढे प्रिन्सिपल म्हणून वीस वर्षे राहिलो तर्कशास्त्र किंवा तत्त्वज्ञान हे विषय मी घेतले नसल्यामुळें आगरकराच्या शिकवण्याचा लाभ मला मिळू शकला नाही पण सर्व विद्यार्थ्यांप्रमाणे समाजसुधारणेच्या कार्याविषयीची त्याची तळमळ आणि त्याची उदात्त वृत्ति याविषयी मला अपार आदर वाटे त्याच्या सुधारकी मतामुळें ते फारसे लोकप्रिय झाले नाहीत अज्ञेय मतप्रणालीचे ते कट्टर पुरस्कर्ते होते त्याची भाषा जहाल असे मराठीवर त्यांचे प्रभुत्व होते अत्यत हलाखीच्या परिस्थितीत बाळपण गेल्यामुळे त्याच्या प्रकृतीवर अनिष्ट परिणाम झाला होता त्यामुळें सभासमेलने ते कधी गाजवू शकले नाहीत मात्र गोखल्याच्या सहकार्याने त्यानी स्थापन केलेल्या आणि चालवलेल्या सुधारक या वर्तमानपत्राने, लोकमान्य बाळ गगाधर टिळक याच्या लढाऊ पत्राला – केसरीला – चागलेच तोड दिले होतें आगरकर, टिळक व नामजोशी या तिघानीं न्यू इंग्लिश स्कूल व फर्ग्युसन कॉलेज स्थापन केले महाराष्ट्राच्या शैक्षणिक इतिहासात या दोन्ही सस्थाना फार महत्त्वाचें स्थान आहे

कॉलेजशी सबधित असलेल्या सार्वजनिक क्षेत्रामधील व्यक्तीमध्यें गोखले अग्रगण्य होते ते आम्हाला इग्रजी, इतिहास आणि अर्थशास्त्र असे विविध विषय शिकवीत कॉलेजमध्ये असताना जरी त्यानी या विषयाचे खास शिक्षण घेतले नसले तरी शिकवण्याची त्याची हातोटी वाखाणण्यासारखी होती इग्रजीवर त्याचे फार प्रभुत्व होते त्याचे शिकवणे पद्धतशीर असे, कारण वर्गावर येण्याआधी विषयाशी सबधित असलेलें सर्व वाङ्मय ते वाचून येत कॉलेजात मी फेलो असताना त्याना वारवार भेटण्याची सधि मिळे १८९५ साली, पुण्याला भरलेल्या इडियन नॅशनल कॉंग्रेसच्या स्वागतममितीच्या चिटणिसापैकी ते एक चिटणीस होते अधिवेशन यशस्वी होण्यासाठी त्यानी फार मेहनत घेतली त्या वेळी मी एक स्वयसेवक होतों त्या वर्षीचे कॉंग्रेसचे अध्यक्ष सुरेंद्रनाथ बॅनर्जी याच्या खास तैनातीला राहण्याची कामगिरी माझ्याकडे होती

त्या वेळचे राजकीय वादविवाद, इंडियन सोशल कॉन्फरन्स कॉंग्रेसच्या मंडपात भरविण्याबाबत टिळकपक्ष विरुद्ध रानडेपक्ष यांच्यात झालेले मतभेद, आणि तत्सम इतर घटनांचें विवेचन करण्याची ही जागा नाही त्या काळामधली एक विशेष उल्लेखनीय आठवण म्हणजे सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांची विस्मयजनक स्मरणशक्ति त्यांनी आपले अध्यक्षीय भाषण छापून काढलेलें होते हें भाषण करायला त्यांना पुरे तीन तास लागले छापील प्रतीकडे एकदाहि दृष्टि न टाकता ते अस्खलितपणे धडाधड ते भाषण न चुकता बोलत गेले सुरेन्द्रनाथ विद्यार्थिजगताचे दैवत होते कलकत्त्याला रिपन कॉलेज स्थापन करून त्यांनी केलेल्या महान शैक्षणिक कार्याचा गौरव करण्यासाठी पुण्याच्या विद्यार्थ्यांनी त्यांना एक मानपत्र दिलें पुण्यामधला सर्वांत ज्येष्ठ विद्यार्थी या नात्यानें हें मानपत्र वाचून दाखविण्याचा मान मला मिळाला

हिंदुस्थान सरकारची शिष्यवृत्ति मिळाली तरी मी शिक्षणक्रम पूर्ण करू शकणार नाही हे ठाऊक असूनहि इंटर आर्टस नंतर मी बी ए च्या वर्गात नाव घातलें गोखले घेत असलेल्या इंग्लिश, इंग्लंडचा इतिहास व अर्थशास्त्र या तासांना मी बसत असे १८९६ सालापासून फर्ग्युसनमध्ये तीन दक्षिणा शिष्यवृत्त्या ठेवण्यात आल्या व मी कॉलेजचा पहिला दक्षिणा फेलो झालों डी एम पटवर्धन व एन बी चंद्रचूड हे माझ्या वेळचे दुसरे दोघे भारत सरकारच्या शिष्यवृत्तीसाठी मी अर्ज केला होता माझ्या परीक्षाबद्दलची तपशीलवार माहिती करून देण्याच्या दृष्टीने गोखले मला मुंबई विद्यापीठाच्या सिंडिकेटचे सदस्य न्यायमूर्ति रानडे आणि इतर काही मंडळी यांच्याकडे घेऊन गेले या वर्षाआधी कित्येक वेळा ही शिष्यवृत्ति केवळ अधिक लायक उमेदवाराचा अर्ज नाही म्हणून दुसऱ्या किंवा तिसऱ्या वर्गाच्या अर्जदारालाहि मिळालेली होती माझ्या वर्षी अनेक लायक उमेदवारांचे अर्ज आले होते प्रत्येक अर्जदाराच्या शैक्षणिक कृतींचे तपशीलवार निवेदन तयार करून, त्याच्या आधारें शिष्यवृत्ति देण्याचा विद्यापीठाचा शिरस्ता होता त्या वर्षी एल्फिन्स्टन कॉलेजचा पी एस पाठक हा दुसरा उल्लेखनीय उमेदवार होता त्यानें गणित घेऊन बी ए ला पहिला वर्ग व एम ए ला दुसरा वर्ग मिळवला होता युनिव्हर्सिटीच्या परीक्षा-मधल्या मार्कांची माझी टक्केवारी त्याच्यापेक्षां बरीच अधिक होती पण त्याने माझ्याहून उच्च पदवी मिळवली असल्याकारणाने सिंडिकेटच्या काहीं सदस्यांचा कल त्याच्या बाजूला होता स्कॉलरशिप अखेर मला मिळाली या मुद्द्यावर चार विरुद्ध तीन अशी मते पडली होती असे मला नंतर कळलें.

मी कॉलेजात होतो तेव्हा आताच्या इतके अभ्यासेतर कार्यक्रम नसून विद्या-र्थिवर्गाला अभ्यासाविषयी एकूण बरीच आस्था वाटत असे बहुसंख्य मुलें सुशिक्षित घराण्यातली असल्यामुळे हें अस्वाभाविक नव्हतें फर्ग्युसन कॉलेज गावात असेपर्यंत आमचे क्रीडांगण कबुतरखान्यात होते तिथे आम्ही फुटबॉल व टेनिस खेळत असू

डबलबार व सिंगलबारहि विद्यार्थ्यांसाठी ठेवलेले होते फुटबॉल व क्रिकेट हे खेळ आताइतके सुनियंत्रित नसले तरी लोकप्रिय होते आंतर्विद्यालयीन सामने त्या वेळी होत नसत तेव्हाचा क्रिकेटचा खास प्रसग म्हणजे पारसी प्रेसिडन्सी मॅच, किंवा पुणे जिमखाना विरुद्ध वाय एम सी सी चा वार्षिक सामना या दोन्ही प्रसगी अलोट गर्दी – विशेषत शाळकरी व कॉलेजमधल्या मुलाची उसळत असे पुण्यात तेव्हा फक्त दोन नाट्यगृहें होती सिनेमा अद्याप भविष्याच्या उदरातच होता नाटकात फक्त पुरुष कामे करीत आजकालच्या विद्यार्थ्यांना चित्रतारकाविषयी जसें आकर्षण वाटतें, तसें त्या काळात कुणाला नटाविषयीं – स्त्रीपार्ट करणाऱ्या नटाविषयी सुद्धां – वाटत नसे आमचें एक वादविवादमडळ होतें तिथें आमच्या अनेकदा सभा भरत कालिदास श्रेष्ठ की भवभूती श्रेष्ठ या विषयावर रगलेला एक परिसवाद माझ्या चागल्या स्मरणात राहिला आहे कै पागारकरानी कालिदास हा फार स्त्रैण नाटककार आहे असा आरोप करून भवभूतीचा पक्ष घेतला होता बहुसख्य विद्यार्थी टिळकाचे अनुयायी होते काही थोडे आगरकर, गोखले व रानडे याच्या भक्तगणापैकी होते

केसरी व सुधारक हीं त्या वेळची दोन प्रमुख पत्रें बऱ्याच मुलाची कॉलेजात येण्याआधीच लग्नें झालेली असत निदान कॉलेजचा अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत सहसा कुणी अविवाहित राहिलेला नसे काही जण तर कॉलेज सोडण्याच्या आत बाप बनत माझें लग्न मी प्रीव्हियसच्या वर्गांत असताना झाले कॉलेजची फी हल्लीच्या मानाने फारच कमी असे क्लबच्या जेवणाचा खर्च दरमहा सुमारें १० रु येई व बहुसख्य विद्यार्थी ब्राह्मण असत मुबई, कर्नाटक, आणि वऱ्हाड अशा भागामधून विद्यार्थी येत नागपूरला त्या वेळी विद्यापीठ नव्हते कपड्याविषयी सागायचे म्हणजे सामान्यपणे, धोतर, सदरा, कोट, टोपी हा विद्यार्थ्याचा वेष होता डेक्कन कॉलेजच्या जुन्या काळच्या फोटोंमधून आढळतात तशी भली मोठाली पागोटी एव्हाना नाहीशी झाली होती माझ्या वेळी कॉलेजात मुली नव्हत्या कॉलेज गद्रे वाड्यात असताना, १८९५ साली प्रथम दोन मुलीची नावे नोंदविली कॉलेजने त्याना एका बाजूस चिकाच्या पड्याआड वाके दिली होती पण काही महिन्यानी कॉलेज गावाबाहेर नव्या ठिकाणी आल्यानतर ही प्रथा बद पडली

हॉस्टेलमध्यें चार क्लब होते बहुतेक मुलें जेवताना सोवळें नेसत आजच्या-पेक्षा एकूण वातावरण धार्मिक होतें १८९३ सालीं अण्णानी विधवेशी पुनर्विवाह केला तेव्हा मी त्याच्याकडेच राहत होतो कॉलेजच्या वार्षिक समेलनाच्या वेळेला, मी बहिष्कृत म्हणून माझें पान ब्राह्मणेतराच्या पगतीत वाढण्याचे सर्वांनी सगनमताने ठरविले

मला हिंदुस्थान सरकारची शिष्यवृत्ति मिळाल्याचे ज्या दिवशी जाहीर झाले, तो दिवस सपूर्ण कॉलेजने आनदोत्सवाप्रमाणे साजरा केला त्यापूर्वी कॉलेजचा कुणी

विद्यार्थी इंग्लंडला गेलेला नव्हता किंबहुना शिक्षणाप्रीत्यर्थ फारच थोडे महाराष्ट्रीय विद्यार्थी परदेशी गेलेले होते मला प्रत्येक मेसने मेजवानी दिली १८९६ मध्ये मी जेव्हा जाण्यासाठी मुंबईला निघालो, तेव्हा मला निरोप द्यायला शंभर विद्यार्थी आगगाडीतून खडकीपर्यंत मजबरोबर आले होते

प्रकरण आठवें

# सेंट जॉन्स कॉलेज, केंब्रिज

१ ऑगस्ट १८९६ रोजी मी हिंदुस्थानचा किनारा सोडला जाताना मला बोट फार लागली इंग्रजी रीतिभाती आणि आहार या बाबतीत मी अगदीच अनभिज्ञ असल्यामुळे सुरुवातीसुरुवातीला मला फार जड गेले मातृभूमि सोडण्यात आपण चूक केली की काय असें कित्येकदा मनात येत असे ऑक्सफर्ड किंवा केंब्रिज येथें शिकण्यासाठी हिंदुस्थान सरकारने ठेवलेली सालिना २०० पौंडाची शिष्यवृत्ति मिळाल्याबरोबर मी सेंट जॉन्स कॉलेजात नाव घातले गणिताच्या विद्यार्थ्यांना या कॉलेजाविषयी मोठे आकर्षण वाटे सेंट जॉन्सबद्दल मी फार ऐकले होते, तसेच तेथील काही माजी विद्यार्थी माझ्या परिचयाचे होते या कॉलेजात शिकलेल्या गणित तज्ज्ञांनी लिहिलेली बरीच पुस्तकेंहि माझ्या वाचनात आली होती या सर्व गोष्टीमुळे साहजिकच मी या संस्थेत प्रवेश मिळविण्यासाठी अर्ज केला, आणि तो मला अगदी विनासायास मिळालाहि एफ् न्यू कोर्ट या भागात मला राहण्याची खोली मिळाली तिथेंच मी ओळीनें चार वर्षे राहिलो चार्लस् टेलर हे कॉलेजचे प्राचार्य होते त्यांचे "एन्शंट अँन्ड मॉडर्न जॉमेट्री ऑफ कॉनिक्स" हे प्रसिद्ध पुस्तक मी हिंदुस्थानातच वाचले होते विद्यार्थ्यांना त्याचें क्वचितच दर्शन घडत असे माझ्या केंब्रिजच्या संपूर्ण वास्तव्यात फक्त चार पांच वेळाच त्यांच्या भेटीचा योग आला कॉलेजच्या आवारात नेहमी दिसणाऱ्या प्रमुख व्यक्तींपैकी (dons) प्रा मेयर आणि लिव्हिंग, पीटर मेसन आणि बेझंट यांची नावे घेता येतील सी ई ग्रेव्हज् हे माझे मुख्य मार्गदर्शक शिक्षक होते, आणि जे आर टॅनर त्यांना सहाय्यक होते ग्रेव्हज् क्लासिक्स (लॅटिन व ग्रीक भाषा) आणि टॅनर हे इतिहास शिकवीत सर्वसामान्य मार्गदर्शन करणें आणि मला कॉलेजात काही अडचण आली तर मदत करणे एवढेंच त्यांचे काम असें विद्यापीठाचे अधिकृत प्रवक्ते (Public Orator) जे ई सॅंड्स् आणि डॉ डी मॅक्ॲलिस्टर हे आणखी दोन ट्यूटर होते डॉ मॅकॲलिस्टर ही एक विलक्षण विभूति होती ते सीनिअर रँग्लर तर होतेच पण पुढे त्यांनी डॉक्टरी पदवी मिळवून

ब्रिटिश मेडिकल कौन्सिलेचे अध्यक्ष, ग्लॅसगो विद्यापीठाचे कुलगुरु, आणि अखेर फ्री चर्च ऑफ स्कॉटलंडचे प्रमुख म्हणून विविध प्रकारें काम केलें या दोघाशीं माझी अगदीच नावापुरतीच ओळख होती

त्या वेळचे कॉलेजचे ट्यूटर्स मुलाच्या अभ्यासाकडे विशेष लक्ष देत नसत स्थानिक पालकाच्या जागी फक्त ते असत विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर देखरेख करण्याच्या पर्यवेक्षकांची प्रथा अलीकडे सुरू झाल्याचें कळतें पूर्वीं व विशेषत गणिताच्या विद्यार्थ्यांसाठी अशी पद्धत अमलात नव्हती

मॅथॅमॅटिकल ट्रायपॉसच्या पहिल्या भागाच्या सर्व विषयासाठी कॉलेजने व्याख्यानाची व्यवस्था केली होती माझ्या पहिल्या तीन वर्षांत, प्रो फोरसाईथ् याची व्याख्याने सोडली, तर कॉलेजबाहेर कुठलीच व्याख्यानमाला मी ऐकली नाही कॉलेजच्या नेहमीच्या तासाखेरीज, गणिताच्या विद्यार्थ्यांना त्याच्या जोडीला वेगळी शिकवणी करावी लागत असे पेंड्लबरी, वेब, लार्मोर, लव्ह आणि बेकर ही मडळी वर्ग घेत त्याशिवाय वेब् याच्या खास शिकवणीला मी जात असें पेंडलबरी आणि लार्मोर यांच्या व्याख्यानाचा विद्यार्थ्यांना फारसा उपयोग होत नसे मात्र लार्मोर हे एक थोर शास्त्रज्ञ होते पुढें ते लुकेशियन प्रोफेसर ऑफ मॅथॅमॅटिक्स, रॉयल सोसा-यटीचे सेक्रेटरी व विद्यापीठाचे पार्लमेंटमधले प्रतिनिधि (एम पी) होते लार्मोर शिकवतात त्यातले निम्में अनावश्यक असते आणि निम्मे पाठ्य पुस्तकात दिलेलेच असतें असे आम्ही विद्यार्थी कुचेष्टेने म्हणत असू पण त्याचे तास बुडविण्यांत आम्ही फार मोठी चूक करीत आहोंत, असें वेब् आम्हाला नेहमी सागत, न जाणो, त्याना एखाद दिवशी काही तरी महान् शोध लागायचा आणि त्या शोधाच्या जन्मकाळी आपण उपस्थित नव्हतों म्हणून मग जन्मभर चुटपुट लागायची पाळी यायची, असे ते विनोदाने म्हणत बाकीचे तिन्ही शिक्षक फार चागले होते ऑक्सफर्ड विद्यापीठामध्ये गणिताचे प्राध्यापक म्हणून लव्ह् याची नेमणूक झाल्याची वातमी वर्तमानपत्रात जाहीर झाली तेव्हा साऱ्या वर्गाने आनदाने टाळ्या वाजवल्याचे मला आठवते बेकरच्या तासाना चौथ्या वर्षींहि मी जात असें शुद्ध गणिताच्या सर्व शाखाबद्दलचे त्याचे ज्ञान खरोखरच सखोल होते ट्रायपॉसच्या दुसऱ्या विभागाच्या वेळी, खास अभ्यासासाठी विषयाची निवड करताना मला त्याची बहुमोल मदत झाली

वेबच्या नेहमीच्या तासाबरोबरच त्याची खास शिकवणीहि मी घेत असें कॉलेजच्या गणितविश्वामधली वेब ही एक विख्यात व्यक्ति होती त्याचे विनोद फारच खुमासदार असत अनेक दिवसानी भेटणारे त्याचे विद्यार्थी जुन्या विनोदाच्या आठवणी काढून पुन्हा एकदा हसत असत सात आठ विद्यार्थ्यांच्या गटाला असलेली वेबची खास शिकवणी म्हणजे एक वेगळें व्याख्यानच होते असे म्हटले तरी हरकत नाही शिवाय घरी करून आणण्याकरिता अभ्यास म्हणून दर आठवड्याला ते आम्हाला गणितातील नवीन उदाहरणे (problems) सोडविण्यास किंवा पुस्तकांतच

दिलेले सिद्धांत लिहून नीट काढावयास एक प्रश्नपत्रिका देत आमची उत्तरें बरोबर आहेत किंवा नाहीत हे ताडून पाहण्यासाठीं प्रश्नपत्रिकाचीं अधिकृत उत्तरें त्याच्या टेबलावर ठेवलेली असत वेब आणि बेकर, दोघेहि माझ्या प्रगतीबद्दल विशेष आस्था दाखवीत व माझ्या अभ्यासात जातीनें लक्ष घालीत शैक्षणिक क्षेत्रामधील माझ्या यशाचे श्रेय बहुश त्याच्याकडेच जातें त्या वेळी मॅथॅमॅटिकल ट्रायपॉसचा निकाल प्रसिद्ध करिताना गुणानुक्रमाची प्रथा होती या यादीमध्ये वरचा क्रमांक मिळवायला खास शिकवणीची अथवा तयारीची अत्यंत आवश्यकता असे हॉपकिन्सन, राउथ इत्यादि सुप्रसिद्ध खासगी शिक्षकाच्या परंपरेंत वेब हे जवळजवळ शेवटचेच १९०९ मध्ये गुणानुक्रमाची प्रथा बंद करण्यात आली त्याबरोबरच उच्च शिक्षणासाठी गणित घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला लागणाऱ्या या अति तपशीलवार शिकवणीचीहि पद्धत नष्ट झाली पुढे ट्रायपॉसच्या दुसऱ्या विभागासाठी, गणिताचे आणखी उच्च शिक्षण घेऊ इच्छिणारे, वरच्या श्रेणीचे काही थोडे रँग्लर काय ते दाखल होत या शिक्षणक्रमासाठीं मी फॉरसाइथ, बेकर, हॉबसन, बेरी आणि रिचमंड याच्या तासांना बसत होतो

पहिल्या भागाच्या परीक्षेत माझें नशीब बलवत्तर होतें, माझ्याच वर्गांतील पुढें फार प्रसिद्धीस पावलेले, जीन्स व हार्डी या दोन बुद्धिमान विद्यार्थ्यांनीं ही परीक्षा माझ्या आधी, म्हणजे त्याच्या दुसऱ्याच वर्षी घेतली असल्यामुळे वरच्या क्रमांका-साठीची स्पर्धा बरीच अनिश्चित होती. पेंब्रोकच्या जॉर्ज बर्टविसल या विद्यार्थ्या-बरोबरीचे मार्क मिळून सीनियर (पहिल्या क्रमांकाचा) रँग्लर होण्याचा मान सुदैवाने मला मिळाला माझ्या या यशाचें इंग्रजी व अर्थातच हिंदी वृत्तपत्रांनी वारेमाप कौतुक केलें नोव्हेंबर १९०१ मध्ये कॉलेजचा फेलो म्हणून माझी निवड करण्यात आली त्या काळात फेलोवर कर्तव्याची कोणतीच बंधने नसत त्याने केंब्रिजलाच राहिले पाहिजे अशी सक्तीहि नसे फेलोशिपची मुदत सहा वर्षांपर्यंत चालू असे १९०१ च्या डिसेंबरमध्यें मी जरी भारताला परतलों तरी फेलोशिपचें एकूण वेतन म्हणून मला जवळ जवळ १,१०० पौंड मिळाले १९४५ मध्यें कॉलेजचा ऑनररी फेलो ही बहुमानाची पदवी मला कॉलेजने बहाल केली ही बातमी मला मी ऑस्ट्रेलियात भारताचा वकील असताना कळली

मॅथॅमॅटिकल ट्रायपॉसच्या पहिल्या भागाच्या परीक्षेला प्रत्येकी तीन तासाचे असे पेपर्स असत त्या चौदा चौदा पेपर्सचे दोन विभाग पाडलेले होते चार दिवसाच्या पहिल्या भागात सात पेपर्स द्यावे लागत हे पेपर्स प्युअर आणि अप्लाईड मॅथॅमॅटिक्सच्या सर्व शाखांच्या प्राथमिक अभ्यासावर आधारलेले असत नंतरच्या चार दिवसांच्या भागातले सात पेपर्स याच विषयावरच्या उच्च अभ्यासक्रमावर आधारित असत प्रत्येकी चार दिवसाच्या या दोन भागाच्या दरम्यान एका आठवड्याचें अंतर असे या आठवड्याच्या अखेरीस गणितामध्यें ऑनर्स मिळवण्यास पात्र ठरलेल्या विद्या-

र्थ्यांची यादी प्रसिद्ध होई या यादीत असलेल्या विद्यार्थ्यांनाच दुसऱ्या भागाला बसण्याची परवानगी मिळे हे चौदाहि पेपर लाबलचक असत तरीहि, उत्तमोत्तम तयारी केलेल्या विद्यार्थ्याला सगळा पेपर नेमलेल्या तीन तासांत लिहिता आला पाहिजे अशी अपेक्षा असे प्रत्यक्षात मात्र, विद्यार्थ्याला सर्व प्रश्नाची उत्तरे पूर्णपणे ठाऊक असतील तरच तो ती दिलेल्या वेळेंत जेमतेम लिहून काढू शके पेपरात दिलेली वेगवेगळीं उदाहरणे व प्रमेये यावर डोकें खाजविण्यास मात्र त्याला वेळ उरणार नाही असा याचा अर्थ होत होता एका पेपरामध्यें दहा प्रश्न असून प्रत्येक प्रश्नामध्यें पुस्तकातील काही सिद्धात व त्याच्या अनुरोधाने एक प्रमेय असे तेव्हा असा पेपर दिल्या वेळेत सोडविणे अगदी मी मी म्हणणाऱ्या विद्यार्थ्यांसदेखील अवघड जाई प्रत्येक विभागाच्या शेवटच्या प्रश्नपत्रिकेंत पुस्तकावर आधारित नसलेली नुसती वीस अवघड उदाहरणेंच असत ट्रायपॉसच्या आतापर्यंतच्या इतिहासात, हा सपूर्ण पेपर सोडविण्याची वहादुरी कुणी केली असल्याची नोंद नाही मी स्वत या दोन्ही बिकट प्रश्नपत्रिकेतली प्रत्येकी सुमारें सहा उदाहरणें सोडवू शकलों मॅथॅमॅटिकल ट्रायपॉसच्या परीक्षातून घातलेलीं उदाहरणे व प्रमेये नतर बहुधा या विषयाच्या निरनिराळ्या शाखावरच्या सर्वसामान्य पाठ्यपुस्तकातून दिली जातात आम्ही केंब्रिजला दिलेल्या १४ पेपराच्या या खडतर परीक्षेची आठवण झाली की एका दिवसात दोन पेपर सोडविण्याच्या बिलक्षण कठीण कामगिरीबद्दल अधूनमधून तक्रारी करणाऱ्या भारतीय विद्यापीठातल्या छात्राचे हसू येते आमच्या वेळेपेक्षा हल्लीच्या विद्यार्थ्यांची बौद्धिक व शारीरिक प्रकृती अधिक नाजूक झाली असल्यास न कळे

१३ जून १८९९ रोजी ट्रायपॉसचा निकाल लागला आणि २० जूनला पदवीदान समारभ झाला सकाळीं होणाऱ्या पदवीदानाच्या वेळी फक्त पहिल्या श्रेणीतील ऑनर्स विद्यार्थ्यांनाच पदवी देण्यात येत असे पदवी घेणारा विद्यार्थी उपकुलगुरूपुढें गुडघे टेकी उपकुलगुरु मग एक लॅटिन मत्र उच्चारून त्यास पदवी बहाल करीत सर्वांत आधी पदवी मिळवण्याचा मान सीनिअर रँग्लरचा असल्यामुळे सर्वप्रथम माझें व बर्टविसलचे पदवीदान झालें आम्हा दोघापैकी उपकुलगुरूपुढे प्रथम मला नेण्यात आलें कारण सेट जॉन्स कॉलेज हे पेम्ब्रोक कॉलेजपेक्षा मानाने ज्येष्ठ होते, आणि बर्टविसल पेम्ब्रोकचा विद्यार्थी होता मात्र पदवी मिळाली प्रथम त्याला, कारण त्याचें नाव बी पासून सुरू होतें आणि माझे पी पासून दुसरी व तिसरी श्रेणी मिळवणाऱ्या ऑनर्स पदवीधराचा आणि इतर वेगवेगळ्या विषयाचा साध्या पदवीधराचा पदवीदान समारभ दुपारीं होत असे या प्रसगी, मॅथॅमॅटिकल ट्रायपॉसच्या परीक्षेंत तिसऱ्या श्रेणींतला शेवटचा क्रमाक पटकावणारा विद्यार्थी हा त्याच्या कॉलेजातील विद्यार्थ्यांची एक प्रकारची उत्सवमूर्तीच होत असे त्याला वुडन स्पून " किंवा लाकडी चमचा हें नामाभिधान मिळे सेनेट हॉलच्या दोन्ही बाजूच्या मज्जाना दोर बांधून एक भला मोठा लाकडी चमचा टागण्यात येई, त्यावर या

विद्यार्थ्याच्या कॉलेजचें बोधचिन्ह काढलेले असे पदवी घेण्यासाठी विद्यार्थिमहाशय पुढें आले की त्याना चमचा घेता येईल अशा बेतानें दोरी खाली सोडली जाई मग बंदुकीप्रमाणे तो चमचा खांद्यावर घेऊन एखाद्या विजयी सैनिकाच्या थाटात ही स्वारी टाळ्यांच्या कडकडाटात सेनेट हॉलच्या बाहेर पडे जमावाच्या ओरड्याने हॉल अक्षरश दणाणून जाई माझ्या वर्षी ३५ रँग्लर, २२ सीनियर ऑप्टिमी (दुसरी श्रेणी) आणि २२ ज्यूनिअर ऑप्टिमी (तिसरी श्रेणी) होते शिवाय परीक्षेला बसलेल्या स्त्रियाची एक वेगळीच यादी होती त्या काळी स्त्रियाना परीक्षेला बसायची तेवढी परवानगी असे त्याना पदवी मिळत नसे या यादींत, दोघींनीं रँग्लर, तिघींनी सिनियर ऑप्टिमी आणि सात जणींनी ज्यूनिअर ऑप्टिमी होण्याइतके गुण मिळवले मॅथॅमॅटिकल ट्रायपॉसच्या दुसऱ्या भागाची परीक्षा मी १९०० सालीं दिली या परीक्षेला माझ्याबरोबर फक्त आठ रँग्लर बसले होते त्यापैकी एक स्त्री होती या परीक्षेत गुणानुक्रम नसे, पण उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे तीन वर्ग पाडून वर्गाच्या तीन तुकड्या केल्या जात बेव्हन, बर्टविसल, हार्डी आणि मी—पहिला वर्ग पहिली तुकडी जोन्स आणि मॅकलॅरेन या दोघाना पहिला वर्ग दुसरी तुकडी, दुसरा वर्ग तिसरी तुकडी एकाला, आणि दुसरा वर्ग पहिली तुकडी एकमेव विद्यार्थिनीला असा निकाल लागला १९०८ साली मॅथॅमॅटिकल ट्रायपॉसचे आमच्या वेळचे नियम बदलले व गुणानुक्रमाची पद्धत बद झाली शेवटची सीनियर रँग्लर ही पदवी आणि अर्थातच शेवटचा लाकडी चमचा १९०९ साली बहाल करण्यात आला

गुणानुक्रमाची पद्धत चालू असताना झालेल्या भारतीय रँग्लरमध्ये पहिले रँग्लर आनद मदन बोस हे होते हे ब्राह्मो समाजाचे नामवत नेते, इडियन नॅशनल कॉंग्रेसचे माजी अध्यक्ष आणि कलकत्त्याच्या सिटी कॉलेजचे सस्थापक होते १८७४ मध्ये ते १६ वे रँग्लर झाले होते त्याच्या नतर ती गुणानुक्रमाची पद्धत बद होईपर्यंत पुढील भारतीयानी रँग्लर ही पदवी मिळवली

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | मलिक | (क्रमाक २२) | १८९२ |
| (२) | ए के कामा | (क्रमाक २१) | १८९५ |
| (३) | पी एस पाटक | (क्रमाक १६) | १८९८ |
| (४) | र पु पराजपे | (सीनिअर रँग्लर विभागून) | १८९९ |
| (५) | बालकराम | (क्रमाक ४) | १९०० |
| (६) | बी एन कामा | ( ” ६) | १९०१ |
| (७) | सी एन कामा | ( ” ७) } विभागून | १९०१ |
| (८) | एच जी घारपुरे | ( ” ७) } विभागून | ” |
| (९) | एफ् एम खान | (२३ विभागून) | १९०५ |
| (१०) | ए टी राजन | (सीनियर रँग्लर विभागून) | १९०६ |
| (११) | बी. डे | (क्रमाक ६) | १९०६ |

(१२) एम व्ही भिडे (२०) १९०७
(१३) बी एन राव (९) १९०९
(१४) जी एस चावला (१२) १९०९
(१५) इनायततुल्ला (विभागून २७) १९०९

नव्या नियमानुसार, ट्रायपॉसची एक प्राथमिक परीक्षा योजण्यात आली ती परीक्षा पहिल्या अथवा दुसऱ्या वर्षाच्या शेवटी, केव्हाहि घेता येई मात्र तीवरून पदवी मिळत नसते पदवी परीक्षेत, म्हणजेच दुसऱ्या परीक्षेंत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचीं नावे इग्रजी वर्णानुक्रमें, रँगलर, सीनिअर ऑप्टिमी व ज्युनिअर ऑप्टिमी अशा तीन वर्गांत विभागली जात एका विशेष परिशिष्ट बी मधील आणखी विषय घेतलेल्या विद्यार्थ्यांपैकी परीक्षकाच्या चाचणीस उतरणाऱ्याच्या नावापुढे ( b ) अशी खूण केली जाई याच परिशिष्टातील विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी परीक्षकांच्या मतें ज्यानी विशेषच ज्ञान दाखविले आहे व जे विशेष पात्र ठरले आहेत, त्याच्या नावापुढे ( b* ) अशी खूण करण्यात येई माझ्यामागून b* हें प्रशसा चिन्ह मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांत माझे दोन शिष्य एन एम शहा व जी एस. महाजनि आणि मी कॉलेज सोडल्यावरचे फर्ग्युसनचे सिद्यार्थी एस डब्ल्यू शिवेश्वरकर हे होते हे नियम पुन्हा एकवार बदलण्यात आले आहेत मॅथॅमॅटिकल ट्रायपॉसमध्यें आतां तीन विभाग पाडले आहेत दुसऱ्या भागात उत्तीर्ण होणारे विद्यार्थी पदवीस पात्र ठरतात.

२०० पौंडाच्या वार्षिक स्कॉलरशिपवरच मला काय ती गुजराण करायची असल्यामुळें मी फार बेताने खर्च करीत असे त्यांतील ३७ पौंड १० शिलिंग हा मोठा वाटा खासगी शिकवणुकीचे शुल्क म्हणून जाई पहिल्या वर्षाअखेरीस, हिंदुस्थान सरकारच्या शिष्यवृत्तीशिवाय ८० पौंडाची कॉलेजची एक शिष्यवृत्ती मला मिळाली आणि मग जरा जास्त स्वास्थ्य लाभले पहिल्या टर्मचे माझें बिल जेव्हां इडिया ऑफिसकडे धाडण्यात आलें, तेव्हां माझ्या टयूटरनें मला अगदी खास सवलत म्हणून ५ पौंड सूट दिली होती हें कृतज्ञतापूर्वक नमूद करावेंसें वाटते तीन वर्षे मुदतीची माझी हिंदुस्थान सरकारची शिष्यवृत्ती, शिक्षकाच्या शिफारशीमुळें आणखी दोन वर्षे वाढविण्यात आली यातील शेवटचे वर्ष मी पॅरिस व गटिंगनला घालविले

केंब्रिजला असताना, माझ्या कॉलेजातल्या शिक्षकाव्यतिरिक्त इतर कोणा केंब्रिज मधील प्रसिद्ध व्यक्तीची व माझी प्रत्यक्ष भेट झाली नाही मात्र ज्याच्या लुकॅशियन प्रोफेसरशिपचा १८९९ साली सुवर्णमहोत्सव झाला त्या सर जॉर्ज स्टोन्स याचे एक व्याख्यान मी ऐकलें ज्योतिषशास्त्राचे प्रोफेसर स्र रॉबर्ट बॉल याचेहि एक व्याख्यान मला ऐकायला मिळाले सुप्रसिद्ध आंरी प्वाँकारे (Henri Poincare) याना बहुमानाची पदवी बहाल करण्यात आली त्या प्रसगी मी हजर होतों नतर

पॅरिसमध्ये त्याचे एक व्याख्यानही ऐकण्याचा मला योग आला केंब्रिज युनियनमध्ये होणाऱ्या वादविवाद सभाना मी नेमाने हजर रहात असें तेथे अनेक निमंत्रित वक्त्याची भाषणे मला ऐकायला मिळाली मी स्वत तेथें मात्र बोलायला लाजत असें, एकदा लॉंग व्हेकेशनमध्ये काय ते मी तेथे बोललों होतों इंडियन मजलिसच्या साप्ताहिक बैठकीनाहि मी नियमितपणे जात असें एक टर्म मी तिचा अध्यक्षहि होतों वर्तमानपत्रे वाचण्याचा मला फार नाद होता मी ती अगदी नेमाने आणि अधाशी-पणाने वाचीत असे किंबहुना हा नाद इतका जबर होता की ट्रायपॉसच्या परीक्षेच्या दिवशी सुद्धा सकाळी परीक्षेला जाण्यापूर्वी युनियनमध्ये जाऊन मी वर्तमानपत्र वाचलें असल्याचे आठवते इग्लडचे पुढें पतप्रधान झालेले ऑर्थर बाल्फर यांचें एक व्याख्यान या काळात मला ऐकायला मिळालें होते मी केंब्रिजहून निघण्याआधी दोन वर्षे बोअर युद्ध सुरू झाले युनियनमध्यें आणि इतरत्र त्या सबधात खूप कडाक्याचे वाद चालत बहुमानाची पदवी स्वीकारण्याकरिता लॉर्ड किचनर एकदा केंब्रिजला आले होते, त्याचेंहि युनियनमध्ये व्याख्यान झाले याच प्रसगी सेनेट हॉलच्या भोवतालचा कठडा कोसळून माझे एक सहाध्यायी हॅवलॉक याना जबर दुखापत झाली, आणि त्याना एक वर्ष बुडवावे लागलें हॅवलॉक पुढे न्यूकासल येथे गणिताचा प्राध्यापक झाला मॅफेकिंग जिकले गेल्यावर ठिकठिकाणी मिरवणुका व जरा वाह्यात अशी निदर्शनें झाली आनदाच्या भरात लोकानी एक प्रचड होळीहि पेटविली होती या प्रकारावरूनच "मॅफिकिंग" हा शब्द पुढे प्रचारात आला

मी केंब्रिजला असताना दोन वादग्रस्त मुद्यावरून खडाजगी वाद झाले ते मला आठवतात स्त्रियाना पदवी द्यावी किंवा नाहीं यावर बराच वादविवाद झाला होता विद्यार्थिनीना ट्रायपासच्या परिक्षेला नुसते बसता येत असे तेंही सौजन्याच्या नावाखाली त्याच्या नावाची यादी मात्र वेगळी छापण्यात येई या युनियनमध्यें स्त्रियाना पदवी देण्याच्या प्रश्नावर कडाक्याचा वादविवाद झाला आणि अखेरीस १४०० विरुद्ध ७०० अशा मतांनी स्त्रियाच्या विरुद्ध बाजूनें निकाल लागला या वादसभेत पुढे हिंदी राजकीय क्षेत्रात बाप्टिस्टा काका म्हणून प्रसिद्धि पावलेले माझे हिंदी मित्र जोसेफ बाप्टिस्टा यानी बायकाच्या बाजूनें फारच प्रभावी भाषण केलें होतें दुसरा गाजलेल्या वादगाचा विषय मॅथेमॅटिकल ट्रायपॉसमधली क्रमवारी पद्धत व त्याबरोबरच सिनियर रँग्लर हें नाव, आणि लाकडी चमच्याचा प्रघात, या तीनहि गोष्टी नष्ट करण्याबाबतचा होता याहि बाबतीत मोठ्या प्रमाणावर कागदी घोडे नाचवले गेले, आणि अखेरीस दोन्ही सूचना फेटाळल्या गेल्या पुढें १० वर्षांनी क्रमवारी पद्धत बद झाली पदवी मिळवण्याचा अधिकार व पुरुषाना असलेल्या इतर सर्व सवलती जवळ जवळ ४० वर्षांनतर स्त्रियाना मिळाल्या

माझ्या सहाध्यायापैकी, पुढे उच्चपद प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांत ई एस् मॉंटेग्यू याचे नाव प्रामुख्याने घेता येईल हेच मॉंटेग्यू पुढें हिंदुस्थानचे सेक्रेटरी ऑफ स्टेट

अनुक्रम ........ दि. ........
........ ९२२८ ........ २४१५६५


झाले १९१७ मध्ये ते भारतात आले असता त्याची माझी भेट झाली होती माझ्या बरोबरचे दुसरे विद्यार्थी लॉईड हे पुढें मुबईचे गव्हर्नर झाले त्यावेळी मी मुबई सरकारच्या मत्रीमडळात होतों लॉईड हे ट्रिनिटि कॉलेजचे विद्यार्थी असून केंब्रिजच्या बोटीचे सुकाणूधर होते, पण त्यांची आणि माझी केंब्रिजला मात्र कधींच भेट झाली नव्हती सुप्रसिद्ध डॉहर्टी बधू आणि अँचन बधू याना आमच्या कॉलेजच्या टेनिस कोर्टावर खेळताना मी प्रत्यक्ष पाहिले आहे तसेंच ग्लॉस्टर काउन्टी मधून खेळणारे डॉ डब्ल्यू जी ग्रेस आणि गिल्बर्ट जेसप याना ब्रिस्टल येथें खेळताना मी प्रत्यक्ष पाहिले आहे पुढें थिऑसॉफिकल सोसायटीचे अध्यक्ष झालेले अरुडेल आणि जिनराजदास हे दोघे माझ्या बरोबरच सेंट जॉन्सचे विद्यार्थी होते मार्च मोसमांत होणाऱ्या बोटीच्या शर्यतीमध्यें कॉलेजच्या बोटीचें सुकाणू धरून जिनराजदासांनी कॉलेजला प्रथम स्थान प्राप्त करून दिले होतें त्याचे लाबलचक नाव उच्चारायला कठीण म्हणून त्याच्या मित्रमडळीनी त्याना जिजर हें सुटसुटीत टोपण नाव बहाल केलें होतें त्या काळी इग्लिश क्रिकेटच्या विश्वात गाजलेल्या रणजितसिंहजीच्या नावाच्या उच्चाराशी माझ्या नांवाचें थोडेफार साम्य वाटल्याने, माझे शिक्षक वेब हे मला रणजी असे म्हणत असत

भारतीय विद्यार्थ्यांना सेंट जॉन्स कॉलेज चें नेहमीच आकर्षण वाटत आले आहे सेट जॉन्सचे गोविद विठ्ठल हे केंब्रिजमधले पहिले हिंदी विद्यार्थी १८६६ त ते सीनियर ऑप्टिमी झाले पुण्याच्या डेक्कन कॉलेजमधील गणिताचे प्राध्यापक गोविंद विठ्ठल करकरे म्हणजेच हे गोविद विठ्ठल त्याना दीर्घायुष्याचें वरदान लाभलें पुढे १९३१ साली त्याचें निधन झाले त्याच्या निवृत्तीच्या काळात त्याचा व माझा बराच परिचय झाला होता एकदां मी आमच्या कॉलेजचे १८९८ सालचे सीनियर रँग्लर आर डब्ल्यू एच टी हडसन याना भेटायला गेलो होतों तिथें त्याच्या वडिलाची गांठ पडली प्रा डब्ल्यू एच हडसन हे सेंट जॉन्सचे माजी फेलो होते ट्रायपॉसच्या परीक्षेसाठी गोविंद विठ्ठल हे आपले खासगी शिष्य असल्याचें त्यानी मला सांगितले मुबई सरकारच्या मॉंटेग्यू चेम्सफर्ड सुधारणानुरूप नेमलेल्या पहिल्याच मत्रिमडळात एकूण सात सदस्य होते त्यापैकी तिघेजण सेट जॉन्सचे विद्यार्थी होते, हा एक मजेदार योगायोगच म्हटला पाहिजे ते तीन मत्री म्हणजे सर मॉरिस हेवर्ड, सर कावसजी जहागीर व मी सेट जॉन्सच्या आणखी उल्लेखनीय व्यक्ती म्हणजे जुळे कामा बधू मी तिसऱ्या वर्षात असताना कामा बधूनी कॉलेजात प्रवेश केला पुढे दोघेहि रँग्लर व आय सी एस झाले हे दोघे आवळेजावळे भाऊ इतके सारखे दिसत की बी एन कुठला व सी एन कुठला हे ओळखणे कुणालाच शक्य होत नसे ते नेहमी बरोबरच असत परीक्षेंतहि चार पाच गुणापेक्षा अधिक अतर त्यांच्यात कधी पडले नाही त्याची भव्य शरीरयष्टि पाह्यला मोठी गमत वाटे तंतोतत सारख्या असणाऱ्या जुळ्यांचे (Identical twins) हें एक उत्तम उदाहरण होते

त्याकाळी विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांचा फारसा संबंध येत नसे एका खाजगी मेजवानीच्या प्रसंगी न्यून्हमची एक विद्यार्थिनी काय ती मला भेटली होती मुलींनी कोणीतरी सोबत घेऊन बाहेर पडण्याचे दिवस मात्र संपले होते ट्रायपॉसच्या दुसऱ्या भागात माझ्या वर्गामध्यें एक विद्यार्थिनी देखील होती विद्यार्थिनींच्या गर्टन कॉलेजमध्ये घडलेला एक गमतीदार प्रसंग आठवतो केंब्रिजमधल्या निरनिराळ्या स्थळाची नीट माहिती व्हावी म्हणून मी सहज फेरफटका मारीत होतो केंब्रिजला जाऊन मला फार दिवसहि झाले नव्हते अज्ञानाच्या भरात मी गर्टन कॉलेज पाहायला गेलो, पण मला प्रवेशद्वारापाशीच अडविण्यात आले मी विन्मुख होऊन परतणार तोंच मिस मॅनिंग या वयस्क इंग्रजी स्त्रीशी माझी तिथें अचानक गाठ पडली या बाईला हिंदी विद्यार्थ्यांबद्दल फार जिव्हाळा वाटत असे तिने गर्टनला शिकणाऱ्या कुमारी चॅटर्जी नावाच्या एका भारतीय विद्यार्थिनीशी माझी ओळख करून दिली एक थोर कवयित्री म्हणून पुढे मान्यता मिळवणाऱ्या आणि आयुष्याच्या अखेरीस उत्तर प्रदेशाच्या राज्यपाल होणाऱ्या सौ सरोजिनी नायडू म्हणजेच ही कुमारी चॅटर्जी विद्यार्थीदशेत होतों तेव्हा मी न्यून्हम कॉलेज कधींहि पाहिलें नव्हते तीस वर्षांनंतर मी इंडिया कौन्सिलचा सदस्य म्हणून इंग्लंडला गेलों असता हा योग जुळून आला माझी मुलगी त्यावेळी न्यून्हममध्येच शिकत होती तीस वर्षांत विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्यातील सामाजिक संबंधात बरेच बदल झालेले मला आढळले आता तर विद्यार्थिनी स्त्रियांना पदव्या मिळायला लागून विद्यापीठाच्या विश्वापुरतें त्यांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान प्राप्त झालें आहे तेव्हा आता अधिकच बदल झाले असल्यास नवल नाही सेंट जॉन्समधले माझे एक सहाध्यायी डब्ल्यू डी रज् हे विवाहित होते खास परवानगीने ते शेलफर्डला रहात असत मात्र घर बायकोचे आणि हे भाडेकरू अशी योजना त्यांना त्यासाठी पत्करावी लागली होती मी त्यांच्याकडे नेहमी जात येत असे

एकंदरीने पाहता, केंब्रिजला असताना मी कॉलेजच्या अथवा विद्यापीठाच्या जीवनात फारसा प्रामुख्याने भाग घेतला नाही हिंदी विद्यार्थ्यांच्यात मात्र मी पुढाकार घेत असे केंब्रिजमध्ये मी अनेक चांगले मित्र जोडले इंग्रजांच्या सामाजिक व राजकीय जीवनातील सर्वोत्तम गोष्टींचें सूक्ष्म अवलोकन करायचे, हे ध्येय मी आपल्यापुढें ठेवलें होतें अजूनहि इंग्लंड व इंग्रज लोक यांच्याविषयी मला तितकीच आपुलकी वाटते मला कॉलेज हे माझें दुसरें घरच वाटे सुट्टीमध्ये केंब्रिज सोडून बाहेर जाणें भागच पडत असे म्हणून मी लंडन व ब्राइटन, ईस्टबर्न, क्लिफ्टन अशा ठिकाणी जात असे एक संपूर्ण सुट्टी मी स्कॉटलंडात घालविली स्कॉटने आपल्या वेव्हर्ली काद-बऱ्यात रंगविल्यामुळें अजरामर झालेला हा भूप्रदेश पाहून डोळ्यांचे पारणे फिटले सेंट जॉन्स व केंब्रिज या दोहोंविषयी मला अजूनहि अपार जिव्हाळा वाटतो माझ्या बौद्धिक घटनेत त्यांचा वाटा फार मोठा आहे या दोन्ही संस्थांचा मी आजन्म ऋणी राहीन

राजकीय क्षेत्रात मी जरी कट्टर राष्ट्रवादी असलो तरी केंब्रिज व इंग्लंड याच्यापासून आपल्या देशाला स्फूर्तीचे सतत पाठ मिळाले असेंच मी म्हणेन क्वचित प्रसंगी त्याच्या चुकांमुळेहि आपल्याला पुष्कळ शिकायला मिळेल उदाहरणार्थ, आता बोअर युद्धाचा विषय काढला की कोणताहि इंग्रज आज साठ वर्षांनंतर त्याचें समर्थन करण्याचें धाडस करीत नाही

मी केंब्रिजला असताना निरनिराळ्या कॉलेजातले मिळून तिथे ६०–७० भारतीय विद्यार्थी होते त्यापैकी जवळ जवळ एक तृतीयांश तरी हिंदी विद्यापीठातून आय सी एस अथवा इतर उच्च शिक्षणासाठी आलेले असे अत्यंत बुद्धिमान विद्यार्थी होते कित्येक मात्र लंडनला बारच्या टर्म्स भरून जोडीला केंब्रिजची पदवी मिळ-वण्यासाठी आले होते सेंट जॉन्स कॉलेजमध्यें आम्ही आठ किंवा दहा हिंदी विद्यार्थी होतो आमच्यापैकी बहुतेकाना कॉलेजची अथवा सरकारची शिष्यवृत्ती मिळत होती या बहुतेक जणाची हिंदुस्थानातली शैक्षणिक कारकीर्द उज्वल असून पुढें केंब्रिजमध्येहि त्यानी नांव कमावले माझ्या वेळच्या हिंदी विद्यार्थ्यांपैकी मुंबई प्रांताचे पी एस पाटक, एच एच वाडिया, टी टी सोडा, कामा बंधू, ए सी ए लतिफ (आल्सा लतिफी) आणि मी, पंजाबचे बालकराम आणि मनोहर लाल, कलकत्त्याचे जे एन पाल आणि पी के सेन, अलाहाबादचे बी सी घोष आणि नागपूरचे एच जी घारपुरे यांपैकी पाटक, कामा बंधू, पाल, बालकराम, घारपुरे आणि लतिफ हे आय सी एस झाले क्राइस्ट कॉलेजचे रामणि मेनन, जी ए खान, व हरिनाथ डे, किंग्सचे ए सी चॅटर्जी, आर नारायणन् व ई एम नानावट्टी आणि फिट्झ् वुल्यम हॉलचे जॉजेफ बॅप्टिस्टा, व्ही आर पंडित, व ट्रिनिटी हॉलचे पी पी जिनवाला असे इतर कॉलेजातील श्रेष्ठ विद्यार्थी महाराष्ट्रामधले आम्ही पाच जण होतों दर रविवारी आम्ही एकत्र भेटत असू आमच्या बैठकीला किंवा सभेला आम्ही मराठा कॉन्फेडरसी असे नाव दिले होतें भारतीय विद्यार्थ्यांची इंडियन मजलिस नावाची एक संस्था होती, आणि या संस्थेच्या सभा निरनिराळ्या सभासदाच्या खोल्यातून आळीपाळीने भरत असत राजकीय आणि इतर किती तरी प्रश्नावर आम्ही चर्चा करीत असू दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकाच्या गैरसोईबद्दल निषेध व्यक्त करणारा आणि बुद्धिवादाच्या प्रसारकार्याचे अभिनंदन करणारा, असे दोन ठराव मी मांडले असल्याचे आठवते

जे डी कॅडक हे माझे सेंट जॉन्समधले सहाध्यायी दरबानहून आलेले होते त्या-वेळी गांधी दरबानला वकिली करीत असल्याने त्याच्याशी कॅडकचा थोडासा परिचय होता सेंट जॉन्सचे आणखी एक विद्यार्थी मॉरिस अलेक्झांडर, हे तर पुढे गांधींचे सहकारी होते मी केंब्रिजला जाण्याआधी एकच वर्ष जेम्सनची सुप्रसिद्ध स्वारी झाली होती या स्वारीचा यशस्वी रीतीने प्रतिकार केल्याबद्दल प्रेसिडेंट क्रूगर याला कायझरने तारेनें धाडलेला अभिनंदनपर संदेश, आणि रॅन्ड येथील सेसिल ऱ्होड्स

व इतर उद्योगपतींची जबाबदारी, या विषयावरच्या काथ्याकूटानें तेव्हाच्या वृत्त-पत्राचे रकानेच्या रकाने भरलेले असत नतर तीन वर्षांनी बोअर युद्ध सुरू झाले हे युद्ध न्याय्य का अन्याय्य होते या विषयी केंब्रिज युनियनमध्यें वरचेवर साधकबाधक चर्चा होत असे पॅरिसचे ड्रेफ्युस प्रकरण हेंहि तब्बल वर्षभर वृत्तपत्राचे खाद्य बनले होते फाशोडा घटना देखील याच सुमारास घडली या सर्व घटनाचे मी सूक्ष्म अवलोकन करीत असें इग्लिश राजकीय परिस्थितीच्या अभ्यासाचा मला बहुमोल उपयोग होऊन नवी दृष्टि लाभली

१८९८ मधल्या एका विशेष प्रसगाची आठवण होते पी एम पाटक हे नुकतेच खुल्या चढाओढीच्या परीक्षेत आय सी एस झाले होते उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये माझ्या खोलीच्या वरच्याच खोलीत ते रहात होते एके दिवशी मी जेवण झाल्यानतर त्याच्याकडे गप्पा मारायला गेलों असता तिथे एका वृद्ध इग्रजी गृहस्थाची गाठ पडली त्याचें नाव मला ठाऊक नव्हते भारतीय राजकारणाबाबत पाटकाचे विचार जाणून घेण्याच्या दृष्टीनें ते पाटकाशी हिंदुस्थानातल्या घडामोडीबद्दल चर्चा करीत होते ओघाओघाने पुण्याचा विषय निघाला तेव्हा टिळक हे अत्यत जहाल-मतवादी असून ब्रिटिशाचे वैरी आहेत असे उद्गार या गृहस्थानी काढले टिळक आणि गोखले याच्या दृष्टिकोनातील फरक मी त्यांना समजावून देण्याचा प्रयत्न केला पण त्याचें म्हणणे असे की टिळकासारख्या जहाल माणसाला आवरणे सर-कारला जरी सोपें असलें तरी गोखल्यासारख्या समजस आणि मुद्देसूद इसमाला तोड देणें कठीण होतें गोखल्याशी उडवाउडवी करून चालणार नव्हते हे वृद्ध इग्लिश गृहस्थ म्हणजे सर विल्यम ली-वॉनर असे मला नतर कळले मुबईतील एकेकाळचे ते कट्टर हिंद-द्वेष्टे भारतांतील सनदी नोकर म्हणून त्याची ख्याती होती भारतातील सरक्षित सस्थानें या विषयावर त्यानीं लिहिलेले पुस्तक प्रसिद्ध आहे ते माजी जोनिअन असून सुट्टीत अनेकदा ते कॉलेजांत रहायला येत असत

माझ्या बरोबरीच्या विद्यार्थ्यांपैकी आणखी एक उल्लेखनीय व्यक्ति म्हणजे जोसेफ बाप्टिस्टा कॉलेजातील इतर विद्यार्थ्यांच्या मानाने हे वयाने बरेच वडील होते सिधमध्यें जगल खात्यात ते नोकरी करीत असत वरिष्ठ अधिकाऱ्यानी करायला सागितलेलीं काही बेकायदेशीर कामें करण्याचें त्यानी नाकबूल केले व नोकरीवर लाथ मारून ते बाहेर पडले सरकारी नोकरीवर असेपर्यंत प्रत्येक हुकूम हा पाळलाच पाहिजे, नाहीं तर खुशाल कॉंग्रेसमध्ये दाखल व्हावें असे त्याच्या वरिष्ठाने उद्गार काढले असल्याचें बाप्टिस्टानी मला नतर सांगितले राजिनामा देऊन बाप्टिस्टा लगेच केंब्रिजमध्यें बारच्या अभ्यासासाठी दाखल झाले युनियनमध्ये ते नेहमी बोलत असत विनोदप्रचुर व अस्खलित वक्तव्याबद्दल त्याची ख्याती होती या गुणामुळें पुढें हिंदुस्थानातहि ते वक्ता म्हणून गाजले मायदेशाला परतल्यावर सार्वजनिक जीवनात "बाप्टिस्टा काका' या नावाखाली ते प्रसिद्ध

आहेत टिळकाचे ते कट्टर अनुयायी होते मुबई विधान परिषदेच्या निवडणुकीत ते दोनदा माझ्याविरुद्ध उभे राहिले होते आमची मैत्री मात्र त्याच्या मृत्यूपर्यंत अबाधित राहिली

इग्लडातील हिंदी लोकाचें नेतृत्व ओघानेच दादाभाई नौरोजी याच्याकडे होते मी लडनमध्यें गेलों कीं त्याना भेटल्याशिवाय रहात नसें ते ब्रिटनच्या वेल्बी कमिशनचे सदस्य होते ब्रिटनच्या हिदुस्थानविषयक आर्थिक धोरणाविरुद्ध त्यानी लिहिलेले खरमरीत टीकालेख बरेच गाजले Poverty and un-British rule in India या नावाचें त्याचें पुस्तकहि प्रसिद्ध आहे हिंदुस्थानबद्दल पसरविण्यात आलेले गैरसमज दूर करण्याच्या दृष्टीने ते वृत्तपत्रातून हिंदी विषयावर बरेचदा लिहीत असत खरें पाहता मी विभूतिपूजक नाही पण दादाभाईंची देशभक्ति, निष्ठा आणि सात्विकता यांविषयी मला अमाप आदर वाटे त्याच्या वृद्धापकाळांत ते मुबईजवळ वार्सोव्याला आपल्या जावयाकडे रहात तिथें त्याना भेटायला मी बरेच वेळा गेलों होतो भारताविषयी आपुलकी वाटणारे इतर इग्लिश गृहस्थ म्हणजे डब्ल्यू एस केन, सर विल्यम वेडरबर्न आणि जे हर्बर्ट रॉबर्ट्स

माझी आणि बालकरामाची मैत्री, ही माझ्या केंब्रिजच्या आयुष्यातली सर्वांत महत्वाची घटना मी समजतों १८९७ मध्ये बालकराम पजाब विद्यापीठातून हिंदुस्थान सरकारची शिष्यवृत्ति मिळवून केंब्रिजला आले त्याचाही गणित हाच विषय होता एक वर्ष ते माझ्या मागें असले तरी आमची लगेच मैत्री जमली ती त्याच्या निधनापर्यंत, म्हणजे १९२९ पर्यंत, कायम टिकली आमची एकमेकावर भावाभावासारखी माया होती एकमेकापासून आम्ही कोणतीहि गोष्ट छपवून ठेवली नाही १८९९ मध्ये खुल्या परीक्षेंत आय सी एस होऊन १९०० साली मॅथॅमॅटिकल ट्रायपॉसच्या परिक्षेत ते चौथे रँग्लर झाले पण सरकारी नोकरीतल्या कामापेक्षा त्याना गणिताचीच जास्त आवड होती इडियन एज्युकेशनल सर्व्हिस जर हिंदी लोकाना त्यावेळी खुली असती तर आपण आय सी एस मधून राजिनामा देऊन गणिताचे प्राध्यापक झालो असतो असे ते नेहमी म्हणत १९०० साली ते हिंदुस्थानाला परतले कायदा आणि शासन खात्यातल्या तसेंच अर्थखात्यातल्या त्यानी निरनिराळ्या अधिकाराच्या जागा भूषविल्या, पण त्याचें खरे प्रेम गणितावरच होतें नोकरीत असतांनाहि त्याची गणिताची आराधना थाबली नाही गणितातील नवनवीन शोध व सिद्धात याची माहिती ते करून घेत माझ्या सागण्यावरून त्यानी फर्ग्युसन कॉलेजच्या मासिकासाठी सापेक्षता या विषयावर एक सुलभ लेख लिहून दिला होता सार्वजनिक प्रश्नामध्ये बालकराम विशेष आवडीने लक्ष घालीत केवळ हौस म्हणून ते जिप्सी लोकाची भाषा शिकले होते आयुष्याच्या शेवटच्या एक दोन वर्षांत ते रामानुजन प्रमेयाचा अभ्यास करीत होते कोणत्या सख्या दोन वेगळ्या पद्धतीनी दोन घनाची बेरीज म्हणून माडता येतील यावर त्याचे सशोधनकार्य चालले

होते त्याच्या निधनानंतर मिळालेल्या भाराभर कागदपत्रामध्ये १० लाख पर्यंतच्या अशा सख्याची नोंद सापडली मृत्यूसमयीं ते मुंबई सरकारचे कायदे सल्लागार होते काही काळ मुंबई हायकोर्टांत न्यायाधीश म्हणूनहि त्यानी काम केलें होते १९२९ च्या एप्रिलमध्यें महाबळेश्वरी त्यांचे हृदयविकारानें अकस्मात निधन झालें त्याना आणखी आयुष्य लाभले असते तर हायकोर्टाचे न्यायाधीश म्हणून त्याची लवकरच कायमची नेमणूक झाली असती त्याच्या मृत्यूची अनपेक्षित वार्ता मी इंग्लडमध्ये असताना वाचली या बातमीने माझ्या मनावर फार मोठा आघात झाला त्याचे अवशेष अद्यापहि कायम आहेत

युरोपातील माझी पाचहि वर्षे मुख्यत्वें गणिताचा अभ्यास करण्यात गेली, तरीहि वाङ्मयात्मक विषय आणि इतर सामाजिक प्रश्नाकडे दुर्लक्ष न करण्याचा गोखल्याचा उपदेश मी शक्य तों पाळण्याचा प्रयत्न केला गणिताचा माझा रोजचा आठ तासाचा अभ्यास झाल्यावर मी उरलेला वेळ इंग्रजी वाङ्मय व दैनंदिन वृत्तपत्रे वाचण्यात घालवीत असे मोर्लेचे ग्रंथ, स्कॉटच्या कादंबऱ्या व इतर जगन्मान्य लेखकाचे साहित्य मी याच काळात वाचून काढले अशा प्रकारें कोणत्याहि विषयावर चाललेल्या चर्चेमध्यें इतर विद्यार्थ्यांच्या बरोबरीने भाग घेण्याइतपत माझी तयारी झाली किंबहुना, इतिहास वा वाङ्मय याबाबतचें गणित शिकत असलेल्या इंग्रज विद्यार्थ्यांचे ज्ञान हें कित्येकदा इंग्लडमध्ये असलेल्या याच विषयाच्या हिंदी विद्यार्थ्यांच्या मानाने बरेंच तोकडे असल्याचे दिसून येई एके दिवशी सकाळीं वेब यानी आपल्या शिकवणीच्या तासात देशभक्ती म्हणजे काय ? " असा वर्गाला प्रश्न केला जोसेफ चेंबर्लेन यानी आदल्याच दिवशी पार्लमेंटमध्यें केलेल्या भाषणाचा संदर्भ मनांत धरून वेबनी हा प्रश्न केला होता चेंबर्लेननी आपल्या भाषणात देशभक्ती म्हणजे बदमाषाचा शेवटला आसरा, ही जॉन्सनची व्याख्या उद्धृत केलेली होती वर्गांत जाण्यापूर्वीच मी वृत्तपत्र वाचले असल्यामुळें वेबना बरोबर उत्तर मी देऊ शकलो त्याना फार आश्चर्य वाटले व त्यांनी जॉन्सनची व त्याच्या लिखाणाची सविस्तर माहिती मला विचारली त्याबरोबर लाइव्हज ऑफ दि पोएट्स, रासेलस, दि रँबलर दि व्हॅनिटी ऑफ ह्यूमन विशिस् इत्यादि पुस्तकाची नावे सागून मी जॉन्सनविषयीची सविस्तर माहिती सांगितली माझ्या सहाध्यायांना आश्चर्याचा धक्काच बसला कारण हा विषय शाळेंत शिकला नसल्यामुळें ह्या पुस्तकाची नावेंहि त्यानी कधी ऐकली नव्हती खरे पाहता त्यावेळी इंग्लडमधील बहुतेक शाळातून शुद्ध इंग्रजी येणे किंवा इतिहास आणि वाङ्मय याबाबत माहिती असणे हें तितकेसें आवश्यक मानले जात नसे आय सी एस आणि होम सिव्हिल सर्व्हिसेसच्या खुल्या स्पर्धेमध्ये इंग्लिश स्पर्धकापेक्षा निबधांत कित्येकदा हिंदी विद्यार्थीच इंग्रजी निबधात अधिक मार्क मिळवीत

इंग्लडमधील माझ्या पहिल्या वर्षांत बहुतेक सुट्ट्यात मी के डब्ल्यू भट आणि

एन बी वागळे या माझ्या लंडनमधल्या स्नेह्याकडे जात असें १८९७ साली मार्च महिन्याच्या सुट्टींत वेल्बी कमिशनपुढे साक्ष देण्यासाठी गोखले इंग्लंडला आले होते मार्सेलसहून लंडनला येताना वाटेत त्यांना शेजगाडीमध्ये काही अपघात झाला आणि त्यामुळे काही दिवस त्याना अथरुणावर पडून रहावें लागलें मी त्यावेळीं लंडनमध्येच असल्यामुळें त्यांच्याकडे रोज जात असें कमिशनपुढें त्यानीं सादर केलेल्या त्यांच्या लेखी निवेदनाचा बहुतेक भाग मीच लिहून काढला ते मला तोंडी सांगत असत व मी उतरून घेत असें हिंदी लोकांच्या बाजूचे प्रभावी समर्थन केल्याबद्दल इंग्लिश वृत्तपत्रानीं गोखल्यांच्या निवेदनाचे फार कौतुक केलें हिंदी वर्तमानपत्रानी तर गोखल्याना डोक्यावरच घेतले महादेव गोविंद रानडे व गणेश व्यंकटेश जोशी यांच्या विपुल सहाय्यानें गोखल्यानी हिंदी आर्थिक परिस्थितीचा सखोल व परिपूर्ण असा अभ्यास केला होता त्यामुळें कमिशनच्या उलट तपासणीला ते यशस्वी रीत्या तोंड देऊ शकले हिंदुस्थानमधला एक उगवता तारा म्हणून गोखल्याना सर्वमान्यता मिळू लागली एवढ्यात दोन युरोपियनाचा पुणे येथें खून झाल्याची बातमी येऊन थडकली जूनमध्यें राज्यभवनात राणीच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त खाना झाला त्या रात्री हा खून करण्यात आला त्यावेळी पुण्यात प्लेग बोकाळला होता या गंभीर परिस्थितीतलें सरकारचे बेपर्वाईचें व दंडुकेशाहीचे धोरण आणि विशेषत या कामी नेमलेल्या ब्रिटिश सैनिकाचें गैरवर्तन या दोन गोष्टीमुळें प्रक्षोभ माजून त्याचें पर्यं-पर्यवसान या खुनात झाले होते

गोखल्याना या संबधात त्यांच्या पुण्यामधील मित्राकडून खाजगी पत्रें येत होती हिंदी लोकांविरुद्ध ब्रिटिश वृत्तपत्रानीं चालविलेल्या विषारी प्रचाराला आळा घालण्यासाठी पुढे सरसावून जनतेसमोर हिंदुस्थानची बाजू मांडणें हें आपलें कर्तव्य आहे असे त्याना वाटले काही इंग्लिश मित्राच्या सल्ल्यावरून त्यानी आपल्याला खाजगी रीत्या मिळालेली माहिती पार्लमेंटच्या कांही सभासदाच्या बैठकीपुढे ठेवली गोखल्यांच्या आरोपासंबधी विचारणा करताच मुंबई सरकारने कानावर हात ठेवले गोखले लवकरच हिंदुस्थानला परतले ब्रिटिश सैनिकांविरुद्ध त्यानी केलेले आरोप सिद्ध करण्याचें त्याना आव्हान करण्यात आलें या आणीबाणीच्या प्रसंगी त्याना माहिती पुरवणारे मित्र पुढें येण्यास कचरले आणि अखेर गोखल्याना सपशेल माफी मागावी लागली त्याबद्दल बहुतेक हिंदी वृत्तपत्रानी त्यांच्याविरुद्ध चांगलीच झोड उठवली मात्र अशा परिस्थितीत त्यांनी योग्य मार्गच अवलंबिला, असेहि काही पुढाऱ्याचे मत पडले टिळकाचे कट्टे अनुयायी, आणि १९१७ च्या मॉटेग्यूच्या घोषणेला उत्तर म्हणून प्रतियोगी सहकार ही शब्दयोजना प्रचारात आणणारे माझे केंब्रिजमधले सहाध्यायी जोसेफ बाप्टिस्टा हे गोखल्यानी योग्य तेंच केले व आपल्या उज्वल राजकीय भविष्याची पर्वा न करता गोखल्यानीं उदात्त अशाच मार्गाचा अवलंब केला असे गौरवद्गार त्यानी काढल्याचे मला स्मरते इंग्लडांत राहून मी या घडा-

मोडीचे सूक्ष्म निरीक्षण करीत होतो आपली भूमिका समजावून सांगणारीं पत्रें गोखल्याकडून मला वेळोवेळी येत असत

माझी हिंदुस्थान सरकारची शिष्यवृत्ती मुळात तीन वर्षांची होती ट्रायपॉसच्या पहिल्या भागातील माझ्या यशानंतर ती प्रथम एक वर्ष, व पुढे मला काही महिने पॅरिस व गटिंगन येथें घालविता यावे म्हणून आणखी एक वर्ष, अशी दोन वर्षे वाढविण्यात आली शिष्यवृत्ती चौथ्याहि वर्षीं चालू रहावी म्हणून मी जो अर्ज केला होता त्या अर्जाचा विचार चालू असताना, १८९५ सालीं पुण्याला भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात मी स्वयंसेवक म्हणून काम केले होतें ही गोष्ट इंडिया ऑफिसात माझ्याविरुद्ध उकरून काढण्यात आली मीच या गोष्टीचा उल्लेख, ब्रिटिश काँग्रेस कमिटीच्या अभिनंदनपर पत्राला उत्तर लिहितांना केला होता हिंदुस्थानातील ब्रिटिश सरकारच्या जुन्या खाजगी कागदपत्राचा अभ्यास करणाऱ्या एका संशोधक विद्यार्थ्यानें अगदी अलिकडेच मला एक मोठी मनोरंजक माहिती सांगितली फर्ग्युसन कॉलेजच्या विद्यार्थ्याला अभिनंदनाची तार केल्याबद्दल सेक्रेटरी ऑफ स्टेटने लॉर्ड कर्झनची चांगलीच हजेरी घेतली होती अर्थातच फर्ग्युसन कॉलेज त्यावेळी सरकारच्या गैरमर्जींत होते गणिताच्या ट्रायपॉसच्या दुसऱ्या भागानंतर मी स्मिथ्स् पारितोषिकासाठी प्रबंध लिहण्याच्या कामी गुंतलो प्रा फॉरसाइथ यांनी मला एक विषय सुचविला होता मात्र कोणतेहि नवे सिद्धांत त्यामध्यें काढू न शकल्यामुळें मला पारितोषिक मिळाले नाही दोन्ही पारितोषके हार्डी व जीन्स यांच्यात समान विभागली गेली, कारण या दोघांचे प्रबंध सारख्याच दर्जाचे मानण्यात आले

स्मिथ्स् पारितोषिकासाठी माझा प्रबंध दाखल केल्यानंतर मी पॅरिसला रवाना झालों तिथे मी तीन महिने घालविले पॅरिसमध्ये विद्यार्थ्यांच्या वर्तणुकीवर कोणत्याहि प्रकारचे बंधन घालण्यात येत नसे कॉलेज वसतिगृहे अथवा देखरेख याचा संपूर्णपणे अभाव होता सॉर्बोनमधली व्याख्याने सर्वांना खुली असत दार्बू, पिकार, पॅंलव्हे, (नंतर फ्रान्सचे पंतप्रधान) बोरेल अशा त्या काळातल्या काहीं प्रख्यात फ्रेंच गणितज्ञाची व्याख्याने मी ऐकली कॉलेज द फ्रान्स मधील पॅंलेव्हेची व्याख्यानमाला ऐकण्यासाठी मी अगदी खास परवानगी काढली होती Celestial Mechanics वर आरी प्वांकारे यांची व्याख्याने झाल्याचे मला आठवते

पॅरिसहून मी एक टर्म नंतर जर्मनीमधल्या गटिंगन गावी गेलों क्लाइन व हिल्बर्ट या त्यावेळच्या सुप्रसिद्ध गणितज्ञाच्या नेतृत्वाखाली असलेले गटिंगन विद्यापीठ हे गणितांचें एक मोठे केंद्रच होते उच्च दृष्टिकोणामधून प्राथमिक गणित विषयावर क्लाइनची व्याख्यानमाला ऐकण्याची संधी मला मिळाली ही माला प्रथम जर्मन भाषेत व पुढें इंग्रजीत प्रसिद्ध झाली आहे गणितामधील मूलभूत कल्पना या विषयावर हिल्टबर्टनेंहि माला गुंफली होती या मालेमधलें प्रत्येक भाषण नावापुरते दोन तास, पण शैक्षणिक चर्चेचा हिस्सा वगळता प्रत्यक्षात दीड तास चालत असे.

हिल्टबर्टने चालविलेल्या एका चर्चावर्गालाहि मी हजर होतो या वर्गात एकाद्या विद्यार्थ्याला एका विशिष्ट विषयाचा अभ्यास करायला सांगून तो विषय त्याला वर्गाला समजावून द्यायला लावत असत इतर विद्यार्थी चर्चेत भाग घेत मार्गदर्शनाचे व अधूनमधून सूचना देण्याचे काम प्राध्यापक करीत विद्यापीठाच्या गणित विभागाला जोडूनच अद्यावत व संग्रहसंपन्न असे वाचनालय होते तिथें सर्व महत्वाचीं पुस्तकें व नियतकालिके ठेवलेली असल्याकारणाने अभ्यासू विद्यार्थी तिथेंच आपला बराच वेळ घालवीत सर्व जर्मन विद्यापीठातून द्वंद्वयुद्धाला प्रोत्साहन देण्यात येत असे विद्यार्थ्यांची निरनिराळी मंडळे (Corps) असत, या मंडळात बहुधा श्रीमंताची मुले भरलेली असत द्वंद्वामध्यें चेहऱ्यावर लागलेल्या जखमाचे व्रण ही मुलें मोठ्या दिमाखाने मिरवीत कायझरच्या ऐन कारकीर्दीचा तो काळ होता, त्यामुळे लष्करी वातावरणाच्या छाया सर्वत्र पसरलेल्या दिसत गटिंगनला ताकूजी योशिये या जपानी विद्यार्थ्याशी माझी चांगली मैत्री झाली होती तो पुढे कियोतो विद्यापीठात प्राध्यापक झाला तेथील पर्शियन वकीलाच्या मुलाशीहि माझी चांगली ओळख झाली होती पुण्याच्या डेक्कन कॉलेजात बरीच वर्षे प्राध्यापक असलेले डॉ कीलहॉर्न तेथे संस्कृत शिकवायला होते संस्कृत व्याकरणावरचे त्याचे पुस्तक हें आमच्यावेळचे एक गाजलेलें क्रमिक प्रकाशन होते. डॉ कीलहॉर्न याना भेटायला मी बरेच वेळा जात असे पुण्यासंबंधील जुन्या आठवणी काढण्यात ते दंग होत असत रामकृष्ण गोपाळ भांडारकर याना देण्यात आलेल्या सन्माननीय पदवीबद्दलच्या मूळ ठरावाची प्रत मला गटिंगनमध्यें पाहायला मिळाली जर्मन विद्यापीठात शिक्षण घेणारा मी बहुधा पहिलाच हिंदी विद्यार्थी असेन माझ्यानंतर दोन महिन्यानी, केंब्रिजला असलेले डॉ गणेश प्रसाद हे शिकण्यासाठी तिथें आले पुढे बनारस व कलकत्ता विद्यापीठात प्राध्यापक आणि उत्तर प्रदेश विधिमंडळात सभासद म्हणून त्यानी काम केले

गटिंगनमधली टर्म संपल्यानंतर मी हॅनोव्हर, ड्रेस्डन, लायप्झिग आणि बर्लिन या उत्तर जर्मनीमधील महत्वाच्या शहराना जाऊन आलो प्रत्येक ठिकाणची वैशिष्ट्यें मुख्यत्वें वस्तुसंग्रहालयें आणि चित्रकलाप्रदर्शनें मी पाहिली त्यामुळें चित्रकलेमधलें फारसे काही गम्य नसले तरी निदान उत्तम कलाकृतींचा रसास्वाद घेण्याइतपत माझी तयारी झाली कित्येक चित्रकाराच्या कलाकृती तर नावे अथवा माहितीपत्रिका न पाहताच मी ओळखू लागलो मानववंश शास्त्राच्या वस्तुसंग्रहालयात मोडी लिपीचा नमुना आणि सोंगट्या या प्रसिद्ध महाराष्ट्रीय खेळाचा कापडी पट व त्याची सविस्तर माहिती, या गोष्टी पाहून तर मी चकितच झालो होतों बर्लिनजवळ असलेल्या पॉट्स्डॅमलाहि मी जाऊन आलो येथे बॉक्सर धामधुमीच्या काळात वॉल्डरसेच्या नेतृत्वाखाली जर्मन सैन्याने लुटून आणलेला चिनी मूल्यवान वस्तूंचा संग्रह कडेकोट कुलपात ठेवलेला होता ह्या खजिन्याचे ओझरते दर्शन मला दाराच्या फटीतूनच घडले जर्मनीतील पॉटस्डॅम, बर्लिन व इतर ठिकाणचे राजवाडे मला फारसे आकर्षक वाटले

नाहीत. पॅरिस व फ्रान्सची नक्कल करण्याचा काहीसा अयशस्वी प्रयत्न करण्यात आला आहे असेच त्याच्याकडे पाहून मला वाटले. जर्मनीमध्ये मला सुव्यवस्था व टापटीप याचे प्रमाण जरी फ्रान्सपेक्षा अधिक वाटले तरी फ्रान्सचें सौंदर्य मात्र या देशात कुठेहि आढळले नाही. १९०१ च्या ऑक्टोबरमध्ये मी केंब्रिजला परतलो. सेंट जॉनच्या फेलोशिपसाठी माझी निवड होताच मी नोव्हेंबर महिन्यात इंग्लंड सोडले व डिसेंबरच्या सुरवातीस मायदेशी परत आलो.

## प्रकरण नववे

# प्रिन्सिपल

इंग्लण्डला जाण्याआधीच मी डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा आजन्म सेवक म्हणून नाव नोंदविले होते केंब्रिजमधल्या माझ्या यशानतर, सरकारनें फर्ग्युसन कॉलेजच्या सचालकाना अनधिकृतरीत्या असे सुचविले की माझी इच्छा असल्यास, इडियन एज्युकेशनल सर्व्हिससाठी माझ्या नावाचा विचार करण्यास काही हरकत नाही तोपर्यंत ही सर्व्हिस युरोपिअनासाठीच राखून ठेवल्याप्रमाणे होती गोखल्यानी मला कळविले की माझ्या मनात ही नोकरी स्वीकारायची असल्यास, आजन्म सेवक राहण्याच्या बधनातून मला मोकळें करायला इतर सदस्याची हरकत नव्हती शब्द परत घेण्याची माझी तिळमात्र इच्छा नाही असे मी त्याना उलटटपाली कळविले कॉलेजच्या कीर्तींत काही भर पडेल असे वाटल्यामुळे व मुख्यत्वे गोखल्याच्या आग्रहावरून, मी इग्लडहून परतताच मला कॉलेजचा प्रिन्सिपल नेमण्याचे लाइफ मेंबर्सनी ठरविले मी अगदी अननुभवी, आणि सर्व आजन्म सेवकात कनिष्ठ होतो तेव्हा माझ्याऐवजी खुद्द गोखले, अथवा कराचीच्या डी जे सिंध कॉलेजमधली मोठी किफायतशीर नोकरी सोडून १८९६ साली संस्थेमध्ये रूजू झालेले राजवाडे, यानी ही जागा भूषविणे उचित होईल असे मी पदोपदी गोखल्याना सांगितले त्याच्या हाताखाली काम करण्यास माझी पूर्ण तयारी होती पण लाइफ मेंबर्सनी माझें म्हणणें मनावर घेतले नाही, आणि १९०२ च्या सुरुवातीपासून मी कॉलेजचा प्रिन्सिपल झालो पहिली दोन वर्षे मात्र, रजेवर असलेल्या प्रि गोळेयाच्या जागी मी बदली म्हणून काम पहात होतो १९०४ साली मी कायम झालो मी फर्ग्युसन कॉलेजच्या प्रिन्सिपलच्या बगल्यामध्यें राहात असें राजवाडे आमच्या शेजारी रहात माझ्या सहकाऱ्याकडून मिळालेल्या हार्दिक साहाय्याची कृतज्ञतेने नोंद करावीशी वाटते विशेषत राजवाड्याचे मला फार सहकार्य मिळाले कॉलेज कारभारातल्या अडचणी व कटकटीबाबत मी हरघडी त्याना सल्ला विचारीत असे त्याच्या अमोल मदतीमुळेंच माझी कारकीर्द यशस्वी होऊ शकली माझ्यासारख्या बऱ्याच मागाहून आलेल्या माणसाची त्याना मागें

टाकून नेमणूक झाली, याने सुरुवातीला त्याना जरा वैषम्य वाटले होतें मला ही गोष्ट फार नतर कळली आपल्या वागणुकीत त्यानी केव्हाहि ही गोष्ट दर्शविली नाही त्याच्या अखेरच्या दिवसांपर्यंत आम्ही दोघे उत्तम मित्र राहिलो सेवानिवृत्त होण्यापूर्वी राजवाड्याना माझ्या जागेवर येतां यावें, यासाठी प्रिन्सिपलशिपची माझी दहा वर्षें पूर्ण झाल्यानतर, मी त्याच्यासाठी राजिनामा देण्याची इच्छा त्याच्या-जवळ प्रकट केली परतु आपल्या दिलदार स्वभावाला अनुसरून त्यानी या सकल्पाचा साफ इन्कार केला उलट, कॉलेजने तुमच्या नेतृत्वाखाली प्रगती केली असून तुम्हीच हे कार्य चालवीत रहावें अशी इच्छा त्यानी बोलून दाखविली अन्याय झाला असल्याच्या जाणीवेमुळें त्याना प्रारभी वाटलेल्या विषादाचा नतर मागमूसहि राहिला नाही राजवाडे इग्रजी व सस्कृत या भाषाचे गाढे पडित होते वासुदेवराव केळकराच्या मृत्यूनतर, कॉलेजला इग्रजीच्या वाकबगार प्राध्यापकाची आत्यतिक गरज निर्माण झाली हे कळताच राजवाडे कराची सोडून धावून आले यात त्यानी फार मोठा स्वार्थत्याग केला हें नि सशय आहे कांही वर्षानतर ते कॉलेजातून निवृत्त झाले पुढे सुरतेच्या एम टी बी कॉलेजात प्रिन्सिपल म्हणून त्यानी काही वर्षें काम केले नतर सेवानिवृत्तीच्या काळात, उरलेले दिवस राजवाड्यानी निरुक्ताच्या सशोधनात घालविले

माझ्या सर्व सहकाऱ्याबरोबर माझे चागले सबध होते प्राध्यापकाच्या खोलीमध्ये नेहमी खेळीमेळीचे व घरगुती वातावरण असे एन एस पानसे, एच जी लिमये, जी सी भाटे, के आर कानिटकर आणि व्ही जी काळे हे त्यातल्या त्यात माझ्या निकटच्या सहवासात आले अण्णा अद्यापि गणिताचे प्राध्यापक म्हणून काम पहात होते मात्र त्या विषयाचा प्रगल्भ भाग ते बराचसा माझ्याकडे सोपवीत पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्येहि ते कांही काळ शिकवीत असत विद्यापीठ परीक्षात उत्तम यश मिळविलेले नवनवीन लोक कॉलेजात भरती करण्याकडे माझे कायम लक्ष असे जी बी कोल्हटकर, पी डी गुणे, व्ही बी नाईक, व्ही जी काळे, या मडळीना मी कॉलेजात आल्यावर थोड्याच वर्षांत आणले आमच्या सोसायटीचा आजन्म सेवक होण्यासाठी शैक्षणिक लायकी एवढी एकच अट नव्हती लाइफ मेंबरला, किमान वीस वर्षे तरी आपल्या आर्थिक उत्कर्षाचा विचार सोडावा लागत असे तसेंच सामाजिक व राजकीय प्रश्नाबाबत, गोखले रानडे याच्या मनाशी जुळती मतें असणे आवश्यक होतें जरी आमच्या सस्थेचे स्वरूप राजकीय अथवा सामाजिक नव्हते, तरी अप्रत्यक्ष रीत्या आमचा नेहमी या अगाशी सबध येई एकीकडे सरकारशी व दुसरीकडे समाजातल्या जहाल पक्षीयाशी आमचे नेहमी तटे होत १८९० मध्यें सहकाऱ्याशी तीव्र मतभेद झाल्यावरून टिळक व त्याचे दोन अनुयायी हे लाइफ-मेंबरशिपचा राजिनामा देऊन बाहेर पडले त्या वेळेस जनमन आमच्याविरुद्ध बरेच प्रक्षुब्ध झाले होते स्वाभिमान न सोडता असल्या प्रसगी आम्ही शक्य तेवढ्या नेटाने

गाडें चालविले सरकारी धोरणाविरुद्ध जाण्याची वेळ आलीच, तर परिणाम काय होतील याचा विचार आम्ही करीत नसू त्याचप्रमाणे, अधून मधून आम्हाला तत्वत अमान्य असलेला कांहीं विशिष्ट मार्ग अनुसरण्याविषयी जनतेकडून कितीहि जोराची मागणी झाली, तरी आम्ही आमच्या शिक्षणासबधीच्या ध्येयापासून कधी च्युत झालो नाही

शैक्षणिक धोरण वा कारभार याविषयीं सरकारशीं आमचे जे विविध तटे झाले त्याची सविस्तर माहिती कॉलेजच्या सुवर्ण उत्सवाच्या वेळी प्रसिद्ध झालेल्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या इतिहासात सापडेल, तेव्हा मी तपशिलात शिरत नाही विद्यार्थिवर्गाची शिस्त विशेषत त्याचें राजकीय सभाना हजर राहणे वगैरे बाबीतून निर्माण होणारे पेचप्रसग सोडवून योग्य धोरण आखणें, व शिस्त राखण्यासाठी योग्य उपाययोजना करणे, ही सर्वस्वी आमची कामें आहेत हें आम्ही सरकारशी झालेल्या तीव्र झगडयातून कबूल करवून घेतले तसेच बऱ्याच वादविवादा-नतर, आमच्या सोसायटीच्या लाइफ मेबर्सचें राजकारणात भाग घेण्याचें स्वातत्र्य कायम राहिले अर्थात् त्यानी कुठल्याहि प्रकारच्या हिंसक अथवा राजद्रोही चळवळीत भाग घेऊ नये असे गर्भित होते आम्ही करीत असलेल्या स्वार्थत्यागाचा उद्देश विद्वज्जड पडित निर्माण करणे हा नव्हता सपूर्ण तरुण पिढीची बौद्धिक व नैतिक उन्नति करण्याचें ध्येय डोळ्यापुढे राखले होतें या ध्येयाची पूर्ति उत्तम उच्च शिक्षणाचा प्रसार केल्यानेच होईल असा आमचा ठाम विश्वास होता त्यासाठी सरकारने पुरेशी तजवीज केलेली नव्हती मरतेशेवटी, नाखुषीने का होईना, पण सरकारला आमचा दृष्टिकोन स्वीकारावा लागला लोकही हळू हळू आमच्या कामाची किंमत ओळखू लागले अप्रिय मत प्रदर्शित केल्याबद्दल वा अन्य काहीं कृत्याबद्दल आमच्यापैकी एकाद्यावर अधूनमधून टीकेची झोड उठत असे सस्था सोडल्यानतर आज ३५ वर्षांनीं, माझ्या शैक्षणिक कामगिरीचा आढावा घेतेवेळी, आयुष्यामधला सर्वांत लोकोपयोगी आणि आणि आनददायक काळ मी फर्ग्युसन कॉलेजात घालवला असे मोठ्या समाधानाने म्हणावेंसे वाटते तरुण मनाशी सपर्क आणि थोर अशा सहकाऱ्याचा निकटचा सहवास यामुळें चैतन्य व समाधान याची मला कधी कमतरता भासली नाही

कॉलेजचा प्रिन्सिपल व सोसायटीच्या कार्यकारिणीचा चिटणीस या नात्याने सोसायटीच्या व्यवहारात माझा बराच भाग असे मी प्रिन्सिपल असतानाची पहिली दोन वर्षे डेक्कन कॉलेजचे प्रिन्सिपल सेल्बी हे कार्यकारी मडळाचे अध्यक्ष होते त्यांच्यानतर त्याच्या जागी सर रामकृष्ण गोपाळ भाडारकर आले त्यानी १९२० पर्यंत काम पाहिले भाडारकराविषयी माझ्या मनांत अत्यत आदर उत्पन्न झाला वृत्तीनें ते कांहीसे तुटक असले तरी मनानें अत्यत मायाळू होते त्याना समाजसुधारणा, धर्म व शिक्षण याविषयीं विलक्षण आस्था वाटे मराठ्याच्या ऱ्हासानतर ब्रिटिशाची राजवट जेव्हां नव्यानें सुरू झाली होती, तेव्हाच्या काळांत भाडारकराचे बाळपण गेले

होते त्यामुळें इतरापेक्षां त्याना ब्रिटिशाच्या कर्तृत्वाबद्दल अधिक कौतुक वाटे परकीय सत्तेमधल्या दुर्गुणाविषयीं ते आमच्या इतके जागरूक नव्हते परतु देशाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी त्याचे स्नेही रानडे व तेलग याच्याइतकेच ते उत्सुक होते भाडारकर प्रार्थनासमाजाचे प्रमुख असून वृत्तीनें अत्यत धार्मिक होते तरीहि माझ्या नास्तिक मताविषयी त्याना फार आदर वाटे कॉलेजचा प्रिन्सिपल म्हणून मला कायम करण्याविषयीचा ठराव जेव्हा गव्हर्निंग बॉडीपुढें आला, तेव्हा माझ्यावर वृत्तपत्रामधून टीकेचा भडिमार होत होता शाळाकॉलेजातून धार्मिक शिक्षण देण्याच्या तत्वाला मी कसून विरोध केला असल्यामुळें हा रोष मजवर ओढवला होता या छापील टीकेच्या जोरावर एका सदस्याने माझ्या नेमणुकीला हरकत घेतली भाडारकरानी मोठ्या आवेशाने माझी बाजू लढवली तत्वासाठी अप्रियता पत्करून, परिस्थितीला मी धैर्याने तोंड देत होतों, हा माझ्या बाजूचा फार महत्वाचा मुद्दा आहे असे त्याचे म्हणणे होतें सोसायटीच्या कौन्सिलपुढें व गव्हर्निंग बॉडीपुढें येणार असलेल्या प्रश्नावर, मी व प्रो एच जी लिमये भाडारकराबरोबर नेहमीं आगाऊ चर्चा करीत असू भाडारकर बहुधा बोर्डाच्या सर्व सूचना मान्य करीत असत त्याच्या मते निधी जमविणें व रोजचें कामकाज पाहणें हीं लाइफमेंबर्सचीं कामें होतीं कौन्सिलकडे व गव्हर्निंग बॉडीकडे फक्त व्यवहार सुरळित चालले आहेत किंवा नाही हे पाहण्याची जबाबदारी होती कुठल्याहि प्रस्तावाबद्दल सर्व सदस्य सहमत आहेत काय असें त्यांनी विचारले कीं आम्ही लाइफ मेंबर्सच्या समितीचाच हा निर्णय आहे असें सागत असू आमच्यामध्यें काही मतभेद झालेच असल्यास, त्याची वाच्यता आम्हीं कधी बाहेर केली नाही अशा पद्धतीने, माझ्या वेळेला आजन्म सेवक, सोसायटीचे कौन्सिल आणि गव्हर्निंग बॉडी या तीनहि शाखा एकोप्याने काम करीत असत मला वाटते की लाइफ मेंबर्समधली एकजुटीची भावना जरा कमजोर झाली म्हणजेच काय ते गव्हर्निंग बॉडी मध्यें पडून त्यांच्या इच्छेविरुद्ध निर्णय द्यावा लागत असे मी तिथें असेपर्यंत, कॉलेजचें व सस्थेचे नियन्त्रण करताना मला लोकसत्ताक पद्धती अल्प प्रमाणांत चालवून पाहण्याचे उत्तम शिक्षण मिळालें

१९०२ मध्ये मी प्रिन्सिपलपद स्वीकारले तेव्हा कॉलेजातल्या विद्यार्थ्यांची सख्या ३०० हून कमी होती पहिल्या वर्षाच्या अखेरीस जेव्हा आकडा ३०० च्या बराच वर गेला तेव्हां आता कॉलेजची छान चलती होत आहे, माझ्या वेळेप्रमाणे काटकसर करण्याची यापुढें आवश्यकता नाही, असे गोखल्यानीं मजजवळ उद्गार काढले त्याच्या वेळीं सर्वच खर्च हात राखून करावा लागत असे कॉलेजची विद्यार्थिसख्या वाढतच होती मी निवृत्त होण्याच्या सुमारास, हजेरीपटावर एकूण १२०० नावे होती एका वर्षी विद्यापीठाच्या टर्म्स बदलल्या त्या वेळी ही सख्या १४०० च्याहि वर गेली होती मुबई विद्यापीठाशी सलग्न असलेल्या कॉलेजापैकी एक महत्वाचे कॉलेज म्हणून लवकरच आमच्या कॉलेजचें नाव झाले मुबई इलाख्यामधून व

बाहेरूनसुद्धा अनेक विद्यार्थी फर्ग्युसनकडे आकर्षित होत

कलकत्ता विद्यापीठाचा कारभार तपासण्यासाठी जेव्हा सॅडलर कमिशननें हिंदुस्थानला भेट दिली तेव्हां त्यापैकी एक प्रमुख सदस्य सर आशुतोष मुखर्जी यानीं कमिशनला फर्ग्युसन कॉलेज पाहण्याचा आग्रह केला हिंदी लोक स्वत चें उच्च शिक्षण सभाळायला पूर्ण समर्थ आहेत, विशेषच नाणावलेला एकादा शिक्षणतज्ञ सोडला तर युरोपिअन लोकांची तेवढ्यासाठी मुळीच आवश्यकता नाही, हें दाखवून देण्याचा त्याचा इरादा होता

हिंदी विद्यापीठ कायदा लॉर्ड कर्झनच्या कारकीर्दीत बदलण्यात आला इम्पीरियल लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्ये रगलेल्या वादविवादात गोखले, आशुतोष मुखर्जी व भाडारकर यानी बजावलेली कामगिरी हिंदी शिक्षणाच्या इतिहासांत फार महत्वाची आहे १९१३ व १९१४ साली हिंदुस्थानामधल्या वरिष्ठ सरकारी नोकरवर्गाशी सबधित असलेल्या प्रश्नाबाबत विचारविनिमय करण्यासाठी, इस्लिग्टन कमिशन हिंदुस्थानात आले होते या कमिशनपुढे मी दोनदा साक्ष दिली इडियन सिव्हिल सर्व्हिसच्या सबधात, इग्लड व हिंदुस्थान या दोन्ही देशात एकाच वेळी परीक्षा ठेवण्याची प्रथा पाडण्यात यावी, असा मी जोराचा पुरस्कार केला दुसऱ्या वेळेला इडियन एज्युकेशनल सर्व्हिससाठी माझी साक्ष घेण्यात आली शैक्षणिक जबाबदाऱ्या स्वीकारण्यास हिंदी लोक समर्थ आहेत, युरोपिअनाची त्यासाठी गरज नाही असे मत मी त्यावेळी आग्रहाने माडले दोन्ही साक्षीमध्ये मी सपूर्ण हिंदी जनतेचा दृष्टिकोण माडला होता या खेपेस बहुतेक वृत्तपत्राकडून माझ्या जबान्याची वाहवा झाली

१९०४ मध्ये मुबई विद्यापीठाची पुनर्रचना झाली, तेव्हा नव्या सेनेटमध्ये प्रो राजवाड्याची व माझी नेमणूक झाली लिमये भाटे व कानिटकरहि आमच्या मागून काही दिवसानी नेमले गेले सेनेटपुढे असलेल्या सर्व प्रश्नाचा आम्ही बारकाईनें अभ्यास करीत असू मात्र अलिकडच्या काळांत आढळणाऱ्या पद्धतीप्रमाणे आम्ही कधी आमचा स्वतत्र पक्ष बनविला नाही सेनेटचे इतर सभासद आमचे विचार आदरपूर्वक ऐकत असत त्या विचाराच्या अनुषगानें कित्येक वेळा आमचा निर्णय मान्य केला जाई

सिडिकेटने नेमलेल्या बहुतेक समित्यांवर आमच्यापैकी एकाददुसरा सदस्य असेच विद्यापीठाचें काम करण्यात आम्ही फार शक्ति खर्च करीत असू या कामापायी आम्हाला बरेच वेळा कॉलेजचे रोजचे तास बुडवावे लागत मग सुट्टीच्या दिवशी व रविवारी जादा काम करून वाया गेलेला वेळ आम्ही भरून काढीत असू विद्यापीठाच्या जबाबदाऱ्याचा आम्ही शिक्षणकार्यावर कधीहि परिणाम होऊ दिला नाही कॉलेजच्या प्राध्यापकापैकी बऱ्याच जणाची विद्यापीठांत परीक्षक म्हणून नेमणूक होत असे माझ्या वेळेच्या आधी हा मान क्वचितच आमच्या वाटचाला येई

विद्यापीठाच्या परीक्षामध्ये कॉलेजचा निकाल बहुधा समाधानकारक असे. प्रथमश्रेणी मिळवणाऱ्या मोजक्या विद्यार्थ्यांमध्यें फर्ग्युसनचे विद्यार्थी कमी नसत. त्या काळात पहिला वर्ग मिळविणें हे खरोखरच भूषणहि होतें आज हा मान सहज-प्राप्य झाला आहे कित्येक वेळा पहिल्या वर्गात दुसऱ्या व तिसऱ्या वर्गाइतकेच विद्यार्थी असतात आमचे काही विद्यार्थी लडनमध्यें आय सी एस ची परीक्षा उत्तीर्ण झाले होते

खेळाच्या क्षेत्रामध्येहि फर्ग्युसन मागें नव्हते १९०४ साली आम्हाला नॉर्थकोट क्रिकेट ढाल मिळाली तोपर्यंत ही ढाल मुबईच्याच कॉलेजाना मिळत असे टेनिस-मध्येंहि आमच्या मुलानी चमक दाखविली जे एच चिन्मुळगुद या माजी विद्यार्थ्यानें फैझी बरोबर खेळून काही वर्षे वेस्टर्न इडिया डबल्स चॅम्पियनशिप मिळवली होती आमचे काही क्रिकेटपटु मुबईच्या क्वॉड्रँग्युलर क्रिकेट सामन्यामध्ये हिंदू सघात घेतले गेले होते

फर्ग्युसन कॉलेजच्या सुरुवातीच्या काळात, स्वत ला मोठे गिप्ट समजणारे डेक्कन कॉलेजचे विद्यार्थी फर्ग्युसनला कुचेष्टेने टिनपॉट कॉलेज म्हणत असत पण ही परिस्थिती लवकरच पालटली मुबई इलाख्यात, किंबहुना सपूर्ण हिंदुस्थानात, एक फार महत्वाची शिक्षणसस्था म्हणून फर्ग्युसनने नाव कमावले याचें श्रेय व्यक्तिश मला नसून आम्ही सर्वांनीच केलेल्या अविश्रात परिश्रमाना आहे कॉलेजनें आपली प्रतिष्ठा हल्लीही कायम राखली आहे हें पाहून मला अत्यत समाधान वाटतें

सुरुवातीला कॉलेजच्या कामात, प्लेगमुळें नित्य खड पडत असे साधारणपणे प्लेगला कॉलेजच्या नव्या वर्षी प्रारभ होऊन, पहिल्या टर्मच्या मध्यापर्यंत तो टिकाव धरत असे या परिस्थितीत, जादा तास घेऊन सपूर्ण अभ्यासक्रम पुरा करण्याची आम्ही दक्षता बाळगत असू प्लेग प्रकरणात एकदा माझ्या तोडचे पाणी पार पळाले होते १९०३ च्या सुमारास, मुबई विद्यापीठाकडून मला एक पत्र आलें त्या पत्रात मी निरनिराळ्या परीक्षाना धाडलेल्या विद्यार्थ्यांपैकी अनेकांनीं टर्म्स पुऱ्या भरल्या नसल्यामुळे, त्याना परीक्षेला बसण्याची परवानगी मिळणार नाही, अशा आशयाचा मजकूर होता वस्तुस्थिती अशी होती की दर वर्षी, ज्या ठिकाणी प्लेग चालू असेल तिथल्या कॉलेजच्या विद्यार्थ्याला त्याचे दिवस पूर्ण नसले तरी प्लेग टर्मची सवलत देण्याची विद्यापीठाच्या सिंडिकेटने सोय केलेली होती पण नेमक्या या वर्षी सिंडिकेटने असा ठराव पास केला नव्हता याचा परिणाम शेकडों विद्यार्थ्यांचे वर्ष बुडण्यात झाला असता मी तत्काळ मुबईला गेलों आम्ही दाखल केलेल्या नावाच्या यादीमध्ये योग्य बदल करून, उपस्थितीचा आकडा कमी पडत असलेल्या विद्यार्थ्यांच्या नावापुढें आवश्यकतेप्रमाणे दिवस भरायला, आम्हाला विद्यापीठाच्या कचेरीनें परवानगी दिली या सारवासारवीत प्रामाणिकपणाचा अश फार कमी होता असे खेदाने म्हणावे लागते योग्य ठराव सिंडिकेटकडून वेळीच मान्य करून घ्यायचा राहिला, या अल्पशा

तात्रिक चुकीमुळे एवढा घोटाळा झाला सिंडिकेटला हा ठराव पूर्वोक्त कालालाही लागू करता आला असता हे फार उशीरा माझ्या ध्यानात आलें त्यायोगें ही बनावट कारवाई टाळता आली असती

प्लेगच्या संबधात माझी आणखी एक विचित्र आठवण आहे वेळेवर कुठल्याच कॉलेजात नाव नोंदवलें नसलेल्या मिशनमधल्या एका विद्यार्थ्यांचे मला पत्र आलें मार्च महिना अर्धा संपत आला असता, त्याला फर्ग्युसनमध्ये प्रीव्हियसच्या वर्गांत प्रवेश हवा होता त्या वर्षी प्लेगने पहिल्या टर्मभर धुमाकूळ घातला असल्यामुळे मी विद्यार्थ्यांना सर्वत्र स्थिरस्थावर झाल्यानतरच येण्यासबधी पत्रे लिहिलीं होतीं या अटीवर या विद्यार्थ्याचें नाव मी नोंदवून घेतलें खरे पाहता त्यानें जानेवारीत नाव दाखल करून घ्यायला हवें होते पुढच्याच टर्मच्या सुरुवातीला त्याने कॉलेज बदलीचा दाखला मागितला तेव्हा नियमानुसार प्लेग टर्म बहाल असा शिक्का असलेला दाखला मला त्याला द्यावा लागला अशा तऱ्हेने पुण्यात पाऊलही न ठेवता तो मुलगा फर्ग्युसन कॉलेजचा विद्यार्थी बनला होता ही त्याची वागणूक अति धूर्तपणाची आहे असे वाटून सुद्धा मी त्या परिस्थितीत दुसरे काही करू शकलों नाही सुमारे २० वर्षांनतर, लेजिस्लेटिव्ह कौन्सिलातल्या विद्यापीठाच्या जागेसाठी मी उभा राहिलों असता या विद्यार्थ्याची गाठ पडली तो त्यावेळी वकीली करीत होता मी त्याला पूर्वीची आठवण देताच तो इतका थक्क झाला की मला मत देण्याचें त्याने तत्काळ कबूल केले

सर्वसाधारणपणे, कॉलेजामध्ये शिस्त राखणे, हे फारसे अवघड काम नव्हते विद्यार्थी सामान्यपणे सद्वर्तनी व थोडयाफार प्रमाणांत अभ्यासूहि होते क्वचित एकादा मुलगा अप्रशस्त राजकीय कार्यांत भाग घेई अशा वेळी कॉलेजच्या हितासाठी मला काही तरी उपाययोजना करावी लागे वि दा सावरकराच्या बाबतीत माझ्या-वर अशी वेळ आली होती कॉलेजांत शिकत असेपर्यंत, आक्षेपार्ह राजकीय भाषणे न करण्यासबधी मी त्याना समज दिलेली होती या सूचनेकडे त्यानी दुर्लक्ष केल्या-मुळे त्याच्याविरुद्ध इलाज करणे मला भाग पडले या प्रकरणामुळें लोकात बरीच खळबळ उडाली होती पण सावरकराच्या व माझ्या नतरच्या सबधावर या सग-ळ्याचा यत्किंचितहि परिणाम झाला नाही उलट सस्थेच्या दृष्टीने मी योग्य निर्णय घेतला असेच त्याचे मत असल्याचे समजते

माझ्या सागण्यावरून प्रिन्सिपॉलच्या घराजवळच मुलींना राहण्यासाठी दोन खोल्यांची व्यवस्था करण्यात आली विद्यालयात मुलींच्या वसतीगृहाची अशा तऱ्हेने अल्प प्रमाणात सुरुवात झाली आगरकराच्या मृत्यूनतर त्याच्या स्मारकासाठी जमविलेला लहानसा निधी, निधीचे चिटणीस व माझे स्नेही हरि नारायण आपटे याजकडे होता या जमलेल्या ३००० रुपयाचें काय करावें, याबाबत त्यानीं माझें मत विचारताच मी त्याना मुलींच्या वसतिगृहाची कल्पना सांगितली त्याना ती

तत्काळ मान्य झाली विद्यार्थिनींसाठी राहण्याची सोय करण्याची प्रथा तेव्हापासून सुरू झाली असे म्हणायला हरकत नाही आता फर्ग्युसनमध्येच नाही तर पुण्यातल्या व पुण्याबाहेरच्याहि कॉलेजातून मुलींची वसतीगृहे आढळतात पचवीस वर्षांनंतर लखनौला असताना तिथल्या आय टी (मुलींच्या) कॉलेजात शिकत नसलेल्या विद्यापीठातल्या विद्यार्थिनींकरिता वसतिगृह स्थापन करण्यासाठीं मी तिथल्या विद्यापीठाचे मन वळवू शकलो होतों

फर्ग्युसन कॉलेज नेहमीच मागासलेल्या वर्गाच्या विद्यार्थ्यांना नादारीची सवलत देऊन उत्तेजन देत आले आहे कॉलेजच्या पहिल्या महार विद्यार्थ्याचे नाव भटकर इतर विद्यार्थ्यांच्या विरोधाला न जुमानता मी त्याला अगत्याने कॉलेजात व वसतिगृहांत प्रवेश दिला होता तेव्हापासून कित्येक हरिजन मुले आमच्या व इतर कॉलेजांत दाखल झाली त्याना प्रवेश मिळायला अलिकडे काहीच अडचण भासत नाही

माझ्या इतर काही सहकाऱ्यांबरोबर मी मुलांच्या खेळामध्ये विशेषत टेनिसमध्यें सामील होत असे काळे व मी कॉलेजच्या टेनिस सामन्यामध्ये कित्येकदा खेळलों आहोंत काळे क्रिकेटहि खेळत लॉर्ड विलिंग्डन जेव्हा मुंबईचे गव्हर्नर होते तेव्हा गणेशखिंडीमध्ये गव्हर्मेंट हाउसचा संघ विरुद्ध फर्ग्युसन कॉलेजचा संघ असा सामना झाला होता काळे आमचे संघनायक होते गोलंदाज म्हणून त्यांची पूर्वी ख्याती होती लॉर्ड विलिंग्डन स्वत उत्तम क्रिकेटिअर होते उमेदीच्या काळात त्यांनी केंब्रिज विद्यापीठाचे व केंट काउंटीचे संघनायकत्व केले होते या सामन्यात ते फार सावधगिरीने फलंदाजी करीत असल्यामुळें बराच वेळ टिकले होते अखेरचा उपाय म्हणून काळ्यांनी स्वत कडे गोलंदाजी घेतली वाढते वय व सुटलेली सवय अशा परिस्थितीत सुद्धा त्यांनी पहिल्याच चेंडूनें विलिंग्डनची विकेट घेतली नंतरच्या काळात कधीं विलिंग्डन मला किंवा काळ्यांना भेटले की, ही आठवण काढल्याशिवाय रहात नसत

गव्हर्नरची कॉलेजला अनौपचारिक भेट, हा एक वार्षिक कार्यक्रम असे बहुतेक गव्हर्नरांना कॉलेजविषयी फार आस्था वाटायची लॉर्ड विलिंग्डन पुढें व्हाइसरॉय झाल्यानंतरच्या काळात आपल्या राजकीय धोरणामुळे जरी अप्रिय झाले असले तरी ते फर्ग्युसन व डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे खरे मित्र होते सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजची स्थापना, शिक्षणखात्याचा व कार्यकारिणीमधल्या युरोपिअन सभासदांचा कडवा विरोध असूनसुद्धा, केवळ यांच्या सक्रिय पाठिंब्यामुळे होऊ शकली त्यांच्या या हार्दिक सहकार्याच्या ऋणनिर्देशासाठी सांगली कॉलेजला त्यांचें नाव देण्यात आलें आहे

धर्म व राजकारणविषयक माझ्या काहीशा अप्रिय मतांवर वर्तमानपत्रांतून वेळोवेळी झोड उठत असली तरी विद्यार्थ्यांशी माझे संबंध बहुधा सलोख्याचे असत

माझ्या जुन्या विद्यार्थ्यांचा माझ्यावरचा लोभ व आदर आजपर्यंत तसाच कायम आहे यानच मी कॉलेजसाठी केलेल्या स्वार्थत्यागाचे फळ मला मिळाले असे मी मानतो माझ्या हाताखालून १०,०००च्यावर विद्यार्थी गेले असावेत. वेगवेगळ्या क्षेत्रात शिरलेल्या या जुन्या विद्यार्थ्यांना भेटून गतकाळाची उजळणी करण्यात मला नितात समाधान वाटते अगदी अनपेक्षित ठिकाणीही मला माझे विद्यार्थी भेटतात लखनौला मी उपकुलगुरु होतो, तेव्हाची गोष्ट उत्तर प्रदेशातले अस्सल खेडवळ जीवन पाहण्याची इच्छा मी प्रकट केल्यावरून तिथला एक तालुकदार मला आडवाटेला असलेल्या एका लहानशा खेड्यात घेऊन गेला होता आश्चर्य म्हणजे तिथे मला डुबे नावाचा माझा एक विद्यार्थी भेटला मी प्रमुख असलेल्या सस्थामधून कित्येक हजार विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत या सम्था म्हणजे फर्ग्युसन कॉलेज, लखनौ विद्यापीठ व पुणे विद्यापीठ या विद्यार्थ्यांपैकी कित्येक जणाच्या सुखद स्मृती मी मनाशी बाळगून आहे त्याच्याहि माझ्याबद्दल काही गोड आठवणी असाव्यात असे वाटते मी ज्याना अगदी सुरुवातीला मदतीचा हात दिला होता असे विद्यार्थी—त्याची नावेहि मी आता विसरून गेलो आहे—आज इतक्या वर्षानतरहि, आपली कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी मला येऊन भेटतात शिक्षणतज्ञाच्या आयुष्यातला हा सर्वश्रेष्ठ बहुमान आहे असे मी समजतो

कॉलेजच्या जीवनक्रमामध्ये कित्येकदा दुर्घटनाहि घडत असत त्यापैकी एकच नमूद करतो १९०५ च्या सुरुवातीला वाय के कुटे नावाच्या एका मुलाचे पत्र आले मॅट्रिकच्या परीक्षेला पहिला नबर असूनहि गरिबीमुळे कॉलेजशिक्षण कसे घ्यायचे या फिकीरीत तो होता मी त्याला फर्ग्युसनमध्यें बोलावले आणि त्याला नादारी व शिष्यवृत्ती देण्याचे कबूल केले विद्यापीठात त्याची कारकीर्द फारच यशस्वी ठरली पण गरिबीमुळे दोन वर्षे बुडाली असल्यामुळे आय सी एस ची परीक्षा द्यायला मात्र तो वयाच्या अटीमुळे अपात्र ठरला पुण्याला तो आमच्या-घरच्यापैकीच एक असल्यासारखा होता त्याला जवळचे कुणी नातेवाईक नसल्या-मुळें, तो प्रो एच जी लिमयाना व मला आपले पालक मानीत असे डिग्री घेतल्या-नतर इग्लडला जाऊन त्याने गणिताचा ट्रायपॉस केंब्रिजला पूर्ण केला परत आल्या-नतर काश्मीरला दोन वर्षे प्राध्यापकी केली नतर मुबई विद्यापीठाने ग्रथपालनाचे खास शिक्षण देण्यासाठी त्याची निवड केली व पुढें त्याला विद्यापीठाचा ग्रथपाल नेमले १९१८ च्या ऑक्टोबरच्या सुमारास परीक्षेच्या काही कामासाठी मी मुबईला गेलो होतो तेव्हा कुटेनें सरदारगृहामध्ये गळा कापून आत्महत्या केली असल्याची भयानक वार्ता मला टेलिफोनवरून कळली त्याच्या मृत्यूची चौकशी झाली तेव्हा मला हजर रहावे लागले त्याचा आर्थिक व्यवहारहि मी माझ्या हातात घेतला लायब्ररीचे शिक्षण घेण्यासाठी जेव्हा तो दुसऱ्या खेपेला इग्लडला गेला होता, तेव्हा बहुतकरून एका इग्रज मुलीवर त्याचे प्रेम जडले होते तिच्याकडून काही निराशजनक मजकूर आल्यानतर त्याने आत्मनाश केला असावा कुटेनें हिंदु शिक्षण निधीकडून

कांही हजार रुपये उसने घेतले होते त्याला तारण म्हणून स्वत च्या आयुष्याचा त्यानें विमा उतरवला होता कर्ज फेडीसाठी त्याने पूर्ण तजवीज करून ठेवली असल्याचें त्याच्या मृत्यूनंतर माझ्या निदर्शनाला आले त्याची सर्व चीजवस्त मी जमा केली त्यात पुस्तकाचाच भरणा जास्त होता कुटेच्या खात्यावर बँकेत २००० रु होते त्याच्या पुस्तकाच्या संग्रहावरून, त्याला अनेक भाषाच्या अभ्यासाची अत्यंत आवड असल्याचें दिसलें प्राचीन व नव्या एकूण १५ भाषा त्याला कमी अधिक प्रमाणात अवगत होत्या त्याच्या नावावर असलेली रक्कम फर्ग्युसन कॉलेजला देणगीदाखल मिळाली हॉस्टेलमध्यें एका खोलीला त्याचें नाव देण्यात आले आहे कुटेच्या मृत्यू-मुळें मला फार मोठा धक्का बसला कर्तृत्व व प्रचंड मेहनत याच्या जोरावर तो कुठल्याहि क्षेत्रात नाव कमावील असा मला विश्वास होता

प्रकरण दहावें

# मुंबई कायदे कौन्सिल

माझ्या विद्यार्थिदशेपासूनच, सामाजिक प्रश्नाविषयी, विशेषत राजकीय स्वरूपाच्या सामाजिक प्रश्नाविषयीं मला जिव्हाळा वाटत आला आहे वर्तमानपत्रेंहि मी अधाशीपणानें वाचीत असें इग्लडमधले हिंदी विद्यार्थी बहुधा उदारमतवादी (लिबरल) व साम्राज्यविरोधी (ॲण्टिइम्पीरियॅलिस्टीक) मताकडें झुकलेले असत कारण कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षापेक्षां लिबरल पक्षाला हिंदी आकाक्षाविषयी अधिक सहानुभूती होती हिंदुस्थानला परत आल्यानतर मी प्रिन्सिपलपदी रुजू झालो त्याच सुमारास गोखले पथ व आगरकराचा समाज सुधारक पक्ष यांच्याशी माझा सबध जडला मात्र आवश्यक तेव्हा विद्यार्थ्यांसमोर व क्वचित प्रसगी जाहीर सभेंत भाषण करण्यापलीकडे मी फारसा भाग घेतला नाहीं प्रत्येक प्रश्नाचा केवळ बुद्धिवादी दृष्टिकोणातून विचार करण्याचा मी प्रयत्न करीत असें माझें स्पष्ट मत, मग ते कितीहि अप्रिय असो, उघडपणें माडायला मी कधी कचरलों नाही

मुबई विद्यापीठाच्या कारभारात व एकूण शैक्षणिक घडामोडीत मी बरेंच लक्ष घालीत असें त्याचा परिणाम म्हणून की काय, विद्यापीठाच्या सेनेटमधल्या कांही सरकारी सदस्यानी, आगामी निवडणुकीत मी विधानपरिषदेमधली विद्यापीठासाठी राखून ठेवलेली जागा लढवावी, असे सुचविलें त्यासाठी सर फिरोझशहा मेहताचे अनुयायी चिमणलाल सेटलवाड यांच्याशी सामना द्यावा लागला असता फिरोझशहा हे विरोधी पक्षाचे प्रमुख असल्यामुळें सहाजिकच सरकारच्या मर्जीमधले नव्हते

१९१३ च्या सुमारास, निवडणुकीसाठीं माझे नाव सुचवलें तर माझी कांहीं हरकत आहे काय असें विचारण्यासाठीं, कार्यकारिणी (एक्झक्युटिव्ह कौन्सिल) मधला एक सभासद, क्लॉड हिल, यानें मला पत्र लिहिलें सरकारी अधिकारी वर्ग व सेनेटमधले सरकारच्या बाजूचे सदस्य, याचा पाठिंबा मिळवून देण्याचें त्याने आश्वासन दिलें मी आधीच सेटलवाडला मदत करण्याचें कबूल केलें असल्यामुळे

या गोष्टीला मी मान्यता देऊ शकत नाही असें तत्काळ त्याला कळवावें लागले तथापि, निवडणुकीनंतर गव्हर्नरने आपल्या खास अधिकारात मला विधानसभेवर नेमले राजकीयक्षेत्रात औपचारिकपणें पदार्पण करण्याची ही माझी पहिलीच वेळ नेमणूकपत्रकात किंवा इतर रीतीने मी विधानपरिषदेंत नेहमी सरकारचीच बाजू उचलली पाहिजे असें कुठेंहि सूचित केलेले नव्हतें तसें असतें तर मी नेमणुकीला नकारच दिला असता किंबहुना नियुक्त सदस्यांपैकी, सोलापूरचे रावबहादुर जी के साठे, पुण्याचे बी एस कामत व मी स्वत असे आम्हीं तिघेजण सरकारी धोरणाच्या कट्टर टीकाकारांपैकी होतों सर्वसाधारणपणें आम्ही लोकमताचे प्रतिनिधि सर फिरोझशहा मेहता, चिमणलाल सेटलवाड, विठ्ठलभाई पटेल, गोकुळदास पारेख, मनमोहनदास रामजी, चुनिलाल मेहता, दिवाण बहादुर के आर गोडबोले इत्यादि मंडळीच्या सहकार्यानें काम करीत असू सरकार जर नेहमी साठे, कामत व पराजपे यांसारखे लोक नेमील असा भरवसा असेल, तर आपण तरी पुन्हा निवडून आलेल्या सभासदासाठीं आग्रह धरणार नाही असें विधान सर फिरोझशहानीं केल्याचे सागतात वस्तुत नियुक्त सभासदांच्या तीन वर्षाच्या कालखंडांत कौन्सिलामधल्या मतदान करणाऱ्या सतरांपैकी सोळा प्रसगीं मी विरोधी पक्षाच्या बाजूचे मत दिलें कौन्सिलातले माझे निकटचे स्नेही विठ्ठलभाई पटेल हे तर न चुकता प्रत्येक वेळीं सरकारच्या विरुद्ध मत देत असत सरकारनें वंशपरंपरागत वतने बंद करायचे ठरविलें त्यावेळीच काय ते विठ्ठलभाई व मी विरुद्ध बाजूंना असण्याची वेळ आली वंशपरंपरागत अशा कुठल्याच हक्काच्या मी प्रथमपासूनच विरुद्ध आहें तेव्हा या मुद्द्यावर सरकारची बाजू उचलून धरणें हे मला माझें कर्तव्य वाटलें वडिलोपार्जित हक्काविषयी तुम्हीही माझ्याइतके विरुद्ध नाहींत काय, असें मी विठ्ठलभाईना विचारले तेव्हा त्यानी माझ्याप्रमाणेच आपलें मत असल्याचें कबूल केलें असे असताना सरकारला त्यानी पाठिंबा दिला नाही याचा मला फार अचंबा वाटला तेव्हा, सरकारच्या बाजूनें मी कधीहि मत देणार नाही असा त्यानीं खुलासा केला या त्याच्या तत्वाशीं मी सहमत होऊ शकलों नाही अतिरेकी पक्षनिष्ठा मला कधीच मान्य झाली नव्हती सदसद्विवेकबुद्धीला अथवा विवेकाला न मानणाऱ्या मुद्यासाठी पक्षाच्या धोरणाला विरोध करायला माझी नेहमी तयारी असते योग्य असो वा अयोग्य, पार्टी म्हणेल ते ब्रह्मवाक्य, हा माझ्या आयुष्याचा कधीच सिद्धात नव्हता नंतरच्या काळांत सुप्रीम लेजिस्लेटिव्ह कौन्सिलच्या अध्यक्षपदावरून विठ्ठलभाईनी सरकारविरुद्ध जो एकदा एक निकाल दिला होता तो अनेकाच्या मते निव्वळ पूर्वग्रहदूषित व सरळसरळ पक्षपाती असा होता त्याना या बाबतीत नंतर छेडताच प्रेमात व राजकारणात सर्व काही माफ असें त्या निकालाचें त्यांनी समर्थन केलें.

सर फिरोझशहा मेहता १९१५ च्या नोव्हेंबर महिन्यात कालवश झाले गोखलेहि त्याच सालीं फेब्रुवारी महिन्यात वारले त्याच्या जागी सुप्रीम लेजिस्लेटिव्ह

अनुक्रम ..३८६७३.. दि. ...
क्रमांक ..७२२७.. नों. दि. २८/५/५५


कौन्सिलात, चिमणलाल सेटलवाड यांची योजना झाली आणि सेटलवाडच्या जागी मुंबई विद्यापीठाचा प्रतिनिधि म्हणून एन एम समर्थ निवडून आले कौन्सिलच्या येत्या निवडणुकीला उभे राहण्याचा माझा इरादा मी सेटलवाडला आगाऊच कळविला होता त्याप्रमाणें १९१६ साली मी निवडणूक लढविली व त्यात यश मिळवले अशा रीतीने १९२० च्या अखेरपर्यंत सात वर्षे मी मुंबई कौन्सिलचा बिनसरकारी सदस्य होतो

त्या काळामध्ये, मोर्ले मिंटो सुधारणानुसार स्थापिलेल्या कौन्सिलात, सरकारला नेहमी बहुमत मिळवता येत असे परंतु निवडून आलेले सभासद व काही सरकार नियुक्त बिनसरकारी सदस्य याना सरकारी प्रस्तावावर टीका करून काहीं विधायक सूचना करण्याची संधी मिळत असे क्वचित या सूचना स्वीकारल्याहि जात कौन्सिलचे संख्याबळ त्या मानाने कमीच होते, किंबहुना याच कारणामुळें, हल्लीपेक्षा सभासदाच्या योग्यतेचा दर्जा फार उच्च होता असें बिनधोकपणानें म्हणता येईल आजकाल लोकसभेचा पसारा मोठा असून सभासदहि निवडून आलेले आहेत निवडक लहान मतदारसंघातर्फे नव्हेत तर बहुजन समाजातर्फे लेजिस्लेचर्सच्या एकूणच खालावलेल्या पातळीविषयी हिंदी राजकारणाच्या अनेक तटस्थ समालोचकानी हळहळ व्यक्त केली आहे सध्याच्या निवडणूक पद्धतीवरचें हें टीकास्त्र नसून सर्वांना पटत असलेल्या वस्तुस्थितीचें वर्णन आहे निवडणुकामध्ये, सच्छील वर्तन, बौद्धिक पात्रता, आणि जनतेचा पाठिंबा यांची सांगड घालण्याचें कांही तंत्र शोधून काढण्यात आले तर तें देशाच्या सामाजिक जीवनाला फार फायदेशीर ठरेल

याआधीच म्हटल्याप्रमाणें, मी नियुक्त सभासद असलों तरी कौन्सिलपुढें असलेल्या सर्व प्रश्नाचा मी स्वतंत्र दृष्टिकोनातून विचार करीत असे कौन्सिलातलें माझें पहिले भाषण, जमिनीच्या साऱ्याचा कायदा दुरुस्त करण्याबाबतच्या बिलासंबंधी होते या दुरुस्तीनुसार जर एखादा जमीनदार त्याचे वारस अल्पवयी असताच मरण पावला, तर त्याच्या जिंदगीवर असलेल्या हक्कासंबंधात नेहमीचे मुदतबंदीचे नियम लागू नयेत, याचा परिणाम अल्पवयी वारसाच्या फायद्याचा व्हावयाचा असला, तरी रास्त हक्कदाराच्या हिताविरुद्ध व्हायचा होता मी या दुरुस्तीला विरोध केला, आणि सांगितले की सरकारला जर या अल्पवयी वारसाना काही मदत करावयाची असेल, तर ती दुसऱ्याच्या कायदेशीर हक्कावर गदा न आणता दुसऱ्या कोणत्यातरी प्रकारे करावी एक गर्भश्रीमंत वर्ग जतन करण्यासाठी सामान्य माणसाच्या हक्कावर गदा आणली जाऊ नये असें मी सांगितले तसेच माझा कल समाजवादाकडे असल्यामुळे सामान्य जनतेच्या न्याय्य मागण्यावर आक्रमण करून वंशपरंपरेमुळें संघन असलेल्या वर्गाला काही केल्या पोशीत राहणे हें देशाच्या दृष्टीनें हितावह नाही असे माझे मत असल्याचें मी सांगितले हिंदी कौन्सिलमधल्या एका सदस्याने असा जाहीररीत्या समाजवादी मताचा स्वीकार करण्याची ही बहुधा

पहिलीच वेळ असावी सरकारी गोटामध्ये त्यामुळे बरेंच आश्चर्य व्यक्त करण्यात आले त्याच दिवशी सायंकाळी, लल्लुभाई समळदास हे माझे सहकारी मला भेटले, तेव्हा त्यानी एक सदस्य, तोहि एक सरकारनियुक्त सदस्य, जाहीररीत्या स्वत ला समाजवादी म्हणवतो, याबद्दल अचबा प्रकट केला

विधान परिषदेत मी क्वचितप्रसगीच प्रश्न विचारीत असे एकादे खरो-खरीचे गाऱ्हाणे सरकारच्या निदर्शनास आणणे आवश्यक आहे अशी माझी खात्री झाल्याखेरीज मी प्रश्न विचारीत नसे सरकारने जरी अशा जाहीर तपासणीत टाळाटाळीची उत्तरें दिली, तरी बरेंच वेळा सबधित अधिकाऱ्याकडे, गुदरलेल्या तक्रारीवर इलाज करण्यासाठी खाजगी हुकूम रवाना होत असत उदाहरणार्थ, काही ठिकाणी सारा जमा करणारे अधिकारी खेड्यातल्या लोकावर दाब आणून, त्याना हप्त्यानें बचत सर्टिफिकेटे घ्यायला लावतात व जमिनीच्या साऱ्याचा हिस्सा म्हणून हे हप्ते कित्येकदा पुन्हा वसूल करतात, असे माझ्या कानावर आलें होते या सबधातल्या एका प्रश्नाला उत्तर देताना सरकारनें माझ्या आक्षेपाचा साफ इन्कार केला पण जेव्हा मी प्रत्यक्षातली एक नोटिसच हजर केली तेव्हा मला वाटतें या प्रकाराला तत्काळ आळा घालण्यात आला साहजिकच, मी शैक्षणिक स्वरूपाच्या बाबीबद्दलच अधिक बोलत असे शिक्षणासबधीच्या धोरणाच्या निरनिराळ्या बाजू लक्षात घेऊन त्याना अनुलक्षून काही ठरावहि मी मजूर करून घेतले अशाच एका ठरावात, पूर्ण प्राथमिक शाळामध्ये इग्रजीचे शिक्षक नेमून इग्रजी शिकण्याची ऐच्छिक तरतूद करण्यात यावी असे मी सुचविलें, त्यायोगें प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत विद्यार्थ्यांची माध्यमिक शाळेसाठी तयारी व्हावी हा उद्देश होता माझ्या सूचने-प्रमाणे काही शाळातून अशी व्यवस्था करण्यात आली आणखी एका ठरावामध्यें प्राथमिक शिक्षकाच्या ट्रेनिंग कॉलेजातून बीजगणिताचे व सस्कृतचे उच्चाटन केल्या-बद्दल मी नापसती व्यक्त केली मास्तराना केवळ शिक्षणाच्या तात्रिक बाजूचेच ज्ञान न देता, ते कॉलेजात शिकत असेपर्यंत त्याना थोडेसे उच्च सास्कृतिक शिक्षणहि दिले जावे असे मी प्रतिपादन केले या ठरावाला कौन्सिलातल्या कित्येक सभासदाचा बिनसरकारी सभासदाचाहि, पाठिबा मिळाला नाही माझे मित्र लल्लुभाई याच्या-जवळ मी याविषयी बोललों आणि सस्कृतच्या ज्ञानामुळें प्राथमिक शिक्षकाच्या कार्यक्षमतेत मौलिक भर पडेल किवा नाही या विषयी त्याचे मत विचारले आश्चर्याची गोष्ट म्हणजे, महाराष्ट्रात लोक सस्कृत शिकण्याविषयी उत्सुक असले तरी गुजराथेत ते या भाषेविषयी उदासीन आहेत असे मला त्यानी सागितले माझा ठराव नामजूर होण्याचे मुख्य कारण म्हणजे कौन्सिलातल्या गुजराथी बाधवाचा विरोध

कौन्सिलचा बिनसरकारी सभासद होतो त्या कालात सरकारचा मी दोनदा पराभव करू शकलो सबध देशामधल्या कुठल्याहि कौन्सिलात अशी गोष्ट पूर्वी कधी घडली नव्हती सरकारने मोडी लिपीचे उच्चाटन करण्याच्या धोरणाचा फेरविचार

करावा अशी माझी इच्छा होती पुणे जिल्ह्याचे, व नतर मुबई हायकोर्टाचे, न्यायाधीश सी ए किंकेड याच्या नेतृत्वाखाली काही युरोपियन अधिकाऱ्यानी यापुढे सर्व अर्ज फक्त बाळबोध लिपीमध्येच लिहिले जावेत असा हुकूम काढायला सरकारला उद्युक्त केले माझ्या मते हा मराठीवर फार मोठा घाला होता हेमाडपताच्या कारकीर्दीपासून पाच-सहाशे वर्षे महाराष्ट्रात प्रचलित असलेली ही लिपी लिहायला अधिक जलद व सोपी होती त्यामुळे, ती बद केल्याने फार मोठी गैरसोय निर्माण झाली असती मोडीच्या बाजूने मिळतील तेवढे मुद्दे मी जमविले व महाराष्ट्रामधल्या वेगवेगळ्या स्थानिक सघटनाना व व्यक्तीना मी माझ्या ठरावाच्या बाजूने सरकारला लिहिण्यासाठी उद्युक्त केले मोडीचे उच्चाटन करू इच्छिणाऱ्या सरकारी पुरस्कर्त्यांचा असा दावा होता की ही लिपी कित्येक वेळा सुवाच्य नसल्यामुळे तिच्याशी अपरिचित असलेल्या अधिकाऱ्याची त्यामुळें फार गैरसोय होते लिहिणारा निष्काळजी असेल तर बाळबोध लिपीहि तितकीच दुर्बोध होऊ शकते असे मी उत्तर दिले, व एका सरकारी नोटिशीच्या फोटोची प्रत सभागृहात वाटली ही नोटिस बाळबोधीत लिहिलेली असून त्यातले एक अक्षरहि लागत नव्हते एक मताधिक्याने माझ्या ठरावाचा जय झाला मोडीचे प्रेमामुळे कार्य कारिणीचे सदस्य एम बी चौबळ हे सरकारी प्रतिनिधी असूनहि त्यानी मतदानात तटस्थ राहण्याची खास परवानगी गव्हर्नरकडून मिळविली, हे मला कृतज्ञतेने नमूद केले पाहिजे (ते कायस्थ प्रभू समाजाचे होते मराठ्याच्या राजवटीमध्ये सर्व अधिकृत कागदपत्रें लिहिण्याचे काम या ज्ञातीकडे सोपविलेले असे) त्यानी जर सरकारच्या बाजूने मत दिले असते तर दोन्ही बाजू समतोल होऊन विधान परिषदेच्या अध्यक्षस्थानी असलेल्या गव्हर्नरच्या निर्णायक मताने आमच्या ठरावाचा पाडाव झाला असता

या ठरावाच्या मान्यतेनतर, सरकारी गोटात साहजिकच खळबळ उडाली तेव्हा सरकारने, अर्ज मोडीत आले तरी सरकारी उत्तरे बाळबोधीत गेली पाहिजेत, असा नियम काढला या माझ्या ठरावाद्वारा मोडीविषयी थोडी जागृती जरी मी उत्पन्न करू शकलो तरी आपल्या प्राथमिक शाळातून या लिपीकडे हळहळू दुर्लक्ष होत आहे असे खेदाने म्हणावे लागते सुमारे १२ वर्षांपूर्वी याबाबत मी कै बाळासाहेब खेराना पत्र लिहून शक्य असेल तेवढें करण्याचे त्याच्याकडून आश्वासन मिळवले होते काही जालीम उपाययोजना केल्याखेरीज मराठा कारकीर्दीतील ऐतिहासिक कागदपत्रें ज्या सुदर व सुलभ लिपीमध्ये लिहिलेली आहेत, त्या लिपीला पुढच्या सगळ्या पिढ्या मुकतील याची मला शका वाटत नाही मराठा इतिहासाचे सशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना मोडी जाणणारे मदतनीस मिळणे आतापासूनच अवघड झाले असल्याचे मी पाहतो

सरकारविरुद्ध मी मान्य करून घेतलेला दुसरा ठराव, सरकारी व खाजगी शाळांमधून क्रमिक पुस्तके मजूर करण्याच्या पद्धतीबाबत होता शाळानी सरकार-

मान्य यादीतूनच क्रमिक पुस्तकाची निवड केली पाहिजे असा सरकारचा हुकूम होता या हुकुमामुळे साहजिकच वशिलेबाजी व लाचलुचपत यासारखे हीन प्रकार बोकाळले शाळा चालकाना संस्थेमध्यें स्वत च्या विशिष्ट कल्पनानुसार शिक्षण देणेंहि अशक्य-प्राय झालें क्रमिक पुस्तकांवर राजकीय वा नैतिक स्वरूपाचा आक्षेप असल्यास मात्र बंदी घालण्यात यावी, त्यासाठी दुसरा कुठलाहि कौल लावण्यात येऊ नये अशी शिफारस मी माझ्या ठरावात केली अनियुक्त पुस्तकाचा वापर करणाऱ्या शाळे-विषयीचे मत सरकारने तेथे लाविलेली पुस्तके पाहून न बनविता, शाळा तपासणी करणाऱ्या अधिकाऱ्याच्या शाळेंतल्या शैक्षणिक दर्जाविषयीच्या अभिप्रायावरून ठरवावे, असें मी प्रतिपादन केले अगदीच मामुली कारणावरून सरकारने एखाद्या पुस्तकाला मान्यता न दिल्याची काही उदाहरणेंहि मी दाखवून दिली शास्त्रामधल्या प्रात्यक्षिकासाठी लागणाऱ्या नोंदवह्याचेंहि स्वरूप सरकारनें ठरविले होते स्वत च्या पसतीच्या वह्या वापरायला शाळाना परवानगी नव्हती इडियन एज्युकेशन सर्व्हिस-मधल्या कुणा एका अधिकाऱ्याने अगदी भिन्न भिन्न विषयावर लिहिलेली पुस्तके त्या खात्याने तत्परतेने नेमली असल्याचा दाखला देऊन, एक सरकारी अधिकारी स्वत च्या जबाबदाऱ्या समाधानकारकरीत्या पार पाडून, जोडीला काही लोकप्रिय कादबऱ्या लिहून शिवाय वर इतकी सगळी क्रमिक पुस्तके निर्माण करू शकतो याविषयी आश्चर्य प्रकट केले बीजगणितावरच्या एका उत्कृष्ट पुस्तकाला सरकारसमती मिळाली नव्हती, कारण काय तर त्यात भूमितिश्रेढीचे पुढील उदाहरण होते एक माणूस स्वत स्वदेशाची शपथ घेऊन दुसऱ्या दोघाना आपलें अनुकरण करायला लावतो, त्यापैकी प्रत्येक जण पुन्हा आणखी दोघाना ही शपथ घ्यायला लावतो, वगैरे वगैरे तर अमुक इतकी लोकसख्या असलेल्या देशामध्ये स्वदेशाविषयी सपूर्ण जागृती व्हायला किती वेळ लागेल ? कौन्सिलपुढें दिलेल्या दाखल्याचा बराच परिणाम झाला जे नियुक्त म्हणून सरकारचे पाठिराखे सभासद नेहमी सरकारच्या बाजूने बोलत असत त्यानाहि त्यामुळें खात्री पटली शिक्षणाधिकारी डब्ल्यू एच शार्प हे सरकारनियुक्त मेंबर असून लोकसभेमधले सर्वांत प्रभावी व तडफदार वक्ते होते तेहि याप्रसगी सरकारी बाजूचे व्यवस्थितपणे समर्थन करू शकले नाहीत एकूण चार मतानी माझा जय झाला त्यानतर प्रांतिक सरकारने, क्रमिक पुस्तकाच्या मान्यतेसबधीच्या नियमाना जबाबदार असलेल्या केन्द्र सरकारकडे हे प्रकरण पाठविले पण आजहि, चाळीस वर्षे लोटल्यानतरसुद्धा, क्रमिक पुस्तकाबाबतची परिस्थिती असमाधानकारकच राहिली आहे पाठ्यपुस्तकाना वाममार्गाने कशी मान्यता किंवा अमान्यता मिळू शकते, खात्यामधले वरिष्ठ अधिकारी स्वत अथवा मदतनीसामार्फत पाठ्यपुस्तके लिहून ती खात्यामध्ये असलेला स्वत चा वशिला वापरून पास कशी करून घेऊ शकतात, मर्जीमध्ये असलेल्या काही अधिकाऱ्याना प्रचड प्राप्ति कशी होऊ शकते आणि काही प्रकाशकावर त्याच्या पुस्तकांना मान्यता न मिळाल्यामुळे सर्वनाश होण्याची कशी

वेळ येते, यासबधीच्या बातम्यानी शैक्षणिक वातावरण कुद झालें आहे शिक्षणतज्ञ या नात्याने मला अजूनहि असे वाटते की, या सर्व दुष्टप्रवृत्तींचा नायनाट करण्याचा उत्तम मार्ग म्हणजे शिक्षणसस्थाना स्वत च्या पसतीचीं पुस्तके वापरण्याची पूर्ण मुभा देऊन या स्वातत्र्याचा दुरुपयोग करणाऱ्या कुठल्याहि शाळेवर तपासणी अधिकाऱ्याच्या सल्ल्यानुसार कडक उपाययोजना करण्याचा हक्क सरकारने स्वत कडे ठेवणे, हाच होय या ठरावावर सरकारचा पराभव झाल्यामुळें इतर प्रातात बरीच खळबळ झाली उत्तर प्रदेशामध्येंहि कौन्सिलात अशा प्रकारचा प्रयत्न करण्यात आला मात्र तो यशस्वी झाला नाही

लेजिस्लेटिव्ह कौन्सिलात माझी नेमणूक झाल्यावर थोडे दिवसानीं पुणें जिल्ह्यामधल्या घोडा या गावी असलेलें दारूचें दुकान बद करण्याच्या मोहिमेसबधी पुणे मद्यपानविरोधी सघटनेचे चिटणीस एस जी लवाटे मला येऊन भेटले घोड्यापासून पाच मैलाच्या परिसरांत असलेल्या सगळ्या खेडेगावामधून या सघटनेनें यासबधीं लोकमत घेतलें होतें प्रचड बहुमताने दुकान बद करण्याविषयी खेडुतानी कौल दिला इग्लडमध्यें, दारूच्या दुकानांच्या सख्येबाबत व स्थळाबाबतचा स्थानिक निर्णय मान्य करावा असें तेथील लिबरल पार्टीचे धोरण असल्याचे मला ठाऊक होते हेंच तत्व, आपल्या प्रातांत अबकारी खात्याच्या कारभारामध्येंहि लागू करता येईल का याविषयी मी बरेच वेळा विचार केला होता घोडे येथील दारूच्या दुकानावर बदी घालण्यासाठी झालेल्या चळवळीच्या निमित्ताने एक अभिनव प्रयोग करून पाहता येईल असें मला वाटलें तेव्हा सबधित जनतेचा कडवा विरोध लक्षात घेऊन, दुकान बद करण्यात यावें या आशयाचा जो ठराव मला मान्य करून घ्यायचा होता त्याचा मसुदा मी कौन्सिल चिटणिसाकडे धाडून दिला काही दिवसानतर लेजिस्लेटिव्ह कौन्सिलच्या चिटणीसाकडून मला उत्तर आले की गव्हर्नरला ही बाब सामान्य जनतेच्या दृष्टीने महत्वाची वाटत नसल्यामुळे ठराव अमान्य करण्यांत आला आहे मी आगाऊच हा ठराव लेजिस्लेटिव्ह कौन्सिलच्या काही बिनसरकारी सभासदाकडे त्याचा यास दुजोरा मिळावा म्हणून पाठविला होता सर फिरोझशहा मेहताच्यासकट सर्वांनी मला पाठिबा देण्याचें आश्वासन दिले असल्यामुळें, ठराव जर चर्चेसाठी घेण्यात आला तर तो मान्य होईल असा मला विश्वासहि वाटत होता परतु आता काहीच करता येण्यासारखे नव्हतें गमत म्हणजे, या गोष्टीनतर सुमारें १४ वर्षांनी, काही आठवड्यापुरता मी मॉटेग्यू सुधारणाखालीं मुबई सरकारचा अबकारी मत्री झालों तेव्हा घोडें येथील दारूदुकान प्रकरणासबधीची फाईल मी मागून घेतली तीमध्यें, या प्रश्नावर सरकारचा पाडाव होण्याची शक्यता आहे, ही आपत्ति टाळण्यासाठी ठरावच कौन्सिलपुढे येऊ न देणे हाच एकमेव मार्ग आहे अशा आशयाची कौन्सिलच्या चिटणीसाने केलेली नोद मला आढळली तिच्याखाली या वर नमूद केलेल्या कार्यकारिणीचा या सबधातला निर्णय होता दोन तीन वर्षांनतर,

हाच चिटणीस मला इग्लडात भेटला विधानपरिषदेंत चिटणीसपदीं असताना प्रत्येक प्रश्नांत आपण नेहमी जनतेचीच बाजू उचलून घरीत असू असें बेधडक विधान त्यानें माझ्यासमोर केले जेव्हा मी त्याला या प्रसगाची आठवण करून दिली तेव्हा त्याची काय मन स्थिति झाली असेल याची कल्पनाच करणे बरें

डॉ पोपट प्रभुराम वैद्य या डॉक्टराच्या सबधीं वर्तमानपत्रातून बरीच उलट-सुलट चर्चा झाली होती हे गृहस्थ आयुर्वेदिक वैद्याना पौर्वात्य औषधाची थोडी माहिती देण्यासाठी वर्ग भरवीत असत हें धद्यासबधी ठरविलेल्या सहितेविरुद्ध वर्तन आहे, असे मुबईच्या मेडिकल कौन्सिलला वाटल्यामुळें, त्याचें नाव मेडिकल रजिस्टर-मधून काढून टाकण्याची धमकी त्याला देण्यात आली हा प्रश्न विठ्ठलभाई पटेल यानी विधानपरिषदेंत उपस्थित केला डॉ पोपटसारख्या माणसाला अशा प्रकारचे कार्य चालू ठवण्याची स्वतत्रता असावी असें प्रस्थापित करणारें बिल त्यानी माडलें या-विषयी सागोपाग चर्चा करण्यासाठी सरकारने डॉ आर राव व डॉ तेमुळजी नरीमन यांची तज्ञ म्हणून नेमणूक केली कौन्सिलात या विषयावर जोराचा वाद-विवाद झाला बिलाचे अपेक्षिल्याप्रमाणे पहिलें वाचन मजूर करण्यात आले नाही डॉ नरीमन याची प्रवृत्ती, व त्यांनी देशी वैद्यकपद्धतीवर घेतलेलें तोंडसुख, यामुळे बहुतेक बिनसरकारी सदस्याना तीव्र सताप आला होता एक शेवटचा चिमटा घेण्यासाठी विठ्ठलभाईनी अशी शका प्रदर्शित केली की या मुद्द्यावर तज्ञ म्हणून सल्ला देण्यासाठी नेमलेल्या या डॉक्टराना, बिलाचा पाडाव झाल्यानतर सभागृहात बसता येतें किंवा नाही तेव्हा बिलाचा पराभव होताच या डॉक्टराचे सभासदत्व सपतें असे सभापतीना सागावे लागलें तत्काळ त्या दोघानी आपली कागदपत्रें गोळा केली, आणि सभागृहातून ते चालते झाले विठ्ठलभाईनी आपल्या सुस्पष्ट आवाजात ' साहेबजी, आवजो " असें म्हणून त्याना खोचक निरोप दिला आय एम एस चा देशी वैद्यकशास्त्राला प्रोत्साहन देण्यास फार विरोध होता या शास्त्राला कुठल्याहि प्रकारचा सरकारी पाठिंबा नव्हता आयुर्वेदिक दवाखान्यात मदत म्हणून आपल्या उत्पन्नातून काही खर्च करायला स्थानिक स्वराज्य सस्थाना परवानगी नव्हती मॉटॅग्यू चेम्सफर्ड सुधारणेनुसार जेव्हा मी मत्री झालो व वैद्यक खाते माझ्या ताब्यात आले, तेव्हां पुणे म्युनिसिपालटीला शहरामधल्या आयुर्वेदिक दवाखान्याना आर्थिक मदत देण्याची मी परवानगी दिली आज या देशी वैद्यक शास्त्राला प्रोत्साहन देण्याचें देशामधल्या प्रत्येक प्रातिक सरकारचें धोरण आहे

मी लेजिस्लेटिव्ह कौन्सिलात बिनसरकारी सदस्य होतो तेव्हा, म्युनिसिपल क्षेत्रात सबधित म्युनिसिपालिटीला सक्तीचें शिक्षण सुरू करण्याची स्वतत्रता असावी अशा आशयाचें बिल विठ्ठलभाई पटेलानी पास करून घेतले नतर अशाच आशयाचें बिल मुबई कॉर्पोरेशनसाठीहि पास करण्यात आलें पटेलच्या बिलाचा अवलब फक्त बाद्रा, धुळे, व सुरत या म्युनिसिपालिटयानी करून घेतला जेव्हां पुणे म्युनिसिपल

विभागामध्ये हे बिल लागू करण्याचा प्रश्न उपस्थित झाला तेव्हा तें फक्त मुलानाच लागू करावे की मुले मुली दोन्ही यात समाविष्ट व्हावीत याविषयी मतभेद उत्पन्न झाला आमच्यापैकी काहीचे म्हणणे असे होते की सुरुवातीला फक्त मुलाचाच प्रश्न हाती घेतला तर पुढे मुलीचा विचार करण्याची वेळ यायला फार वर्षे लागतील तेव्हा मुलामुलीना एकदमच तो कायदा लागू करणे इष्ट आहे जर मुलामुलीपैकी एकाच वर्गाला हा कायदा लागू करायचा असेल तर तो मुलीनाच प्रथम लागू करावा, कारण कुटुंबामधल्या मुली जर शाळेला जाऊ लागल्या तर मुले आपसुखच त्याच्या मागोमाग दाखल होतील असे आमचे म्हणणे होतें. या प्रकरणाबाबत पुण्यात अनेक जाहीर सभा भरल्या लोकमान्य टिळक व मी या प्रश्नाच्या विरुद्ध बाजू लढवीत होतो सर्वांत कमी विरोध असलेला मार्ग अवलबून सुरुवातीला फक्त मुलानाच नियम लावण्यात यावा असा लोकमान्याचा आग्रह होता कैक वर्षे हें प्रकरण रेंगाळत होतें अखेरीस मुले व मुली याचा एकत्रित विचार करण्यात यावा असे ठरले

त्या काळात, सुप्रीम लेजिस्लेटिव्ह कौन्सिलासाठी, मुबई विधान सभा दोन दोन प्रतिनिधी धाडीत असे त्यापैकी एक प्रतिनिधि सर इब्राहीम रहिमततुल्ला, याची जेव्हा मुबईच्या कार्यकारिणीवर नेमणूक झाली तेव्हा माझ्या काही मित्र-मडळींनी मला निवडणुकीला उभे राहण्याचा सल्ला दिला मला वाटतें जय मिळवण्यात मला फारशी अडचण पडली नसती पण ते सभासदत्व पत्करले तर लागोपाठ बरेच महिने मला पुण्याबाहेर काढावे लागले असते फर्ग्युसन कॉलेजच्या प्रिन्सिपलच्या कामातहि त्यामुळे अडथळा आला असता हे सर्व लक्षात घेऊन मी या सूचनेला नकार दिला त्या जागी विठ्ठलभाई पटेलाची नेमणूक झाली आनदाची गोष्ट म्हणजे त्यायोगें अधिक विशाल क्षेत्रात काम करण्याची त्याना सधी मिळाली पुढे तर सुप्रीम लेजिस्लेटिव्ह कौन्सिलाचे सभापती होण्यापर्यंत ते चढत गेले

१९१४ साली, स्थानिक कारभाराचा अनुभव मिळावा यासाठी मी नगर-पालिकेच्या निवडणुकीला उभा राहिलो मतदारसघ अगदी मर्यादित असून त्यात घरमालकाचाच भरणा अधिक होता सदाशिवपेठ, नारायणपेठ, भाबुर्डा इ पेठा मिळून एक विभाग बनविला होता त्या केन्द्रासाठी एकूण पाच सभासद निवडायचे होते निवडणुकीत मला सर्वांत अधिक मते मिळाली तीन वर्षांच्या एका टर्मसाठी मी नगरपालिकेचा सदस्य झालो हरि नारायण आपटे, एल आर गोखले, सरदार नवरोजी पदमजी, आणि हणमतराम रामनाथ हे त्या वेळच्या वजनदार सभासदापैकी होते निरनिराळ्या समित्याच्या अध्यक्षाच्या व सभासदत्वाच्या जागासाठी ज्या नेम-णुका होत, त्यात निरनिराळ्या खटपटीचा बराच अश असे एकूण वातावरणच दूषित होते स्कूलबोर्डाचा मी एक वर्ष अध्यक्ष व एक वर्ष सभासद होतो परतु काही विधायक कार्य करणे मला शक्य झाले नाही कारण बोर्डाच्या बैठकीमध्ये शैक्षणिक सुधारणेच्या प्रश्नापेक्षा बढत्या व नव्या नेमणुका याविषयींच अधिक चर्वितचर्वण होत असे

त्या सुमारासच, मुंबई लेजिस्लेटिव्ह कौन्सिलने टाऊन प्लॅनिंग ॲक्ट पास केला होता तो पुण्यास लागू करून शहरामधल्या कांही भागासाठी शहर नियोजनाचा आराखडा आखावा अशी सूचना नगरपालिकेला करण्यांत मी प्रमुख होतो टाऊन प्लॅनिंग ॲक्टला सर्वसाधारणपणे घरमालक वर्गाचा विरोध होता त्यामुळें आपल्या हक्कावर गदा येऊन आर्थिक बोजाहि वाढेल अशी त्याना धास्ती वाटत होती परतु नगरपालिकेने माझी सूचना मान्य केली शहर सुधारण्यासाठी या कायद्याचा शक्य तेवढा उपयोग करणे कसे हितावह ठरेल याविषयी मी भाषणा-मधून व लेखामधून बराच प्रचार केला तीन वर्षांनतर, यापुढें आपला वेळ व कर्तृत्व या क्षेत्रात घालवण्यांत फारसा अर्थ नाही असे मी ठरविले कारण तशा परिस्थितीमध्ये काही विधायक कार्य साधणे अशक्यप्राय होते तेव्हा पुन्हा निवडणुकीच्या वाटेला मी गेलो नाही व नगरपालिकेला मी कायमचा रामराम ठोकला

प्रकरण अकरावें

# मॉटेग्यू चेम्सफर्ड सुधारणा

विधान परिषदेत बिनसरकारी सदस्य म्हणून मी होतों त्या वेळचा बहुतांश भाग पहिल्या महायुद्धाच्या धामधुमीचा होता साहजिकच त्यावेळीं हिंदुस्थानच्या राजकीय उन्नतीबाबत बरीच चर्चा होत असे हे युद्ध लोकशाहीच्या रक्षणासाठीं लढलें जात आहे, असे ब्रिटिश व त्याचे अनुयायी कंठशोष करून सांगत हिंदुस्थानला अंतर्गत स्वायत्तता प्राप्त करून देण्यासाठी तत्काळ उपाययोजना केली जावी, असें अर्थातच हिंदी लोकांना वाटत असे त्याचा परिणाम म्हणून २० ऑगस्ट १९१७ रोजीं हिंदुस्थानकडे क्रमाक्रमाने स्वराज्याची जबाबदारी सोपविण्याचें ब्रिटिश सरकारचे धोरण आहे '', अशी सुप्रसिद्ध घोषणा ई एस् मॉटेग्यू याने केली मॉटेग्यू हा त्यावेळच्या उदारमतवादी सरकारने हिंदुस्थानसाठी नेमलेला सेक्रेटरी ऑफ स्टेट होता ही घोषणा जरी पूर्णपणे समाधानकारक नसली तरी लोकांनी सर्वसाधारणपणे तिचे स्वागतच केले १९१६ सालच्या अखेरीस, लखनौला काँग्रेसचें अधिवेशन भरले होते त्यावेळी, मुसलमानांना विधानसभेमध्ये काही विशेष सवलती देऊन त्यांच्यासाठी स्वतंत्र मतदारसंघहि निर्माण केले जावेत, अशी तडजोड करण्यात आली विशाल दृष्टिकोनातून देशाच्या हिताचा विचार करता, या सवलती गैरवाजवी आहेत असे आमच्यापैकी काहींना वाटले परंतु लोकमान्य टिळकांसकट जहाल व मवाळ या दोन्ही पक्षांच्या मंडळींनी हार्दिक पाठिंबा दिल्यामुळे ही तडजोड मान्य करावी लागली तत्वाचा प्रश्न उद्भवतो तेव्हा पडती बाजू घेण्याच्या या धोरणाचे दुष्परिणाम लवकरच दृष्टोत्पत्तीस येऊन शेवटी देशाची फाळणी होण्यापर्यंत मजल गेली

ऑगस्टमधल्या घोषणेनंतर काही महिन्यातच मॉन्टेग्यू हिंदुस्थानला आला त्या वेळचा व्हाइसरॉय लॉर्ड चेम्सफर्ड याच्याबरोबर देशभर हिंडून त्याने वेगवेगळ्या राजकीय संस्थांना भेटी दिल्या व निरनिराळ्या नेत्यांच्या गाठी घेऊन, राज्यसुधारणेच्या विविध अंगांवर त्यांच्याशी चर्चा केली त्या आधी लायनल कर्टिसच्या नेतृत्वा-

खाली गोल मेज गट (Round table Group) नावाच्या एका तज्ञाच्या समितीनें एक नवी राज्यपद्धति शोधून काढली होती या राज्यपद्धतीला द्विराज्य-पद्धति (Diarchy) असे नाव देण्यांत आलें शुद्ध एकतत्री राज्य (Autocracy) आणि सपूर्ण स्वायत्त सरकार या दोहोंच्या मधला हा मार्ग होता तो माँटेग्यूला जरी पटलेला दिसला, तरी देशामधल्या नेत्याना फारसा पटला नाही द्विराज्यपद्धती-नुसार सरकारचीं काही खाती विधानसभेंतील लोकनियुक्त सदस्याकडे सोपवून बाकीची नेहमी प्रमाणें कार्यकारिणीनें स्वत कडे ठेवायची होती नैसर्गिक घडामोडीत काय, किंवा समाजरचनेमध्यें काय, क्रमश उत्क्रांतीच्या तत्वाचा मी उपासक आहें त्यामुळें द्विराज्यपद्धतीमध्यें मला स्वत ला काही विशेष आक्षेपार्ह वाटले नाही अर्थांत ही व्यवस्था तात्पुरतीच असल्याची निश्चिति असावी, व निवडून आलेल्या लोकप्रतिनिधीकडे सोपविलेल्या जबाबदाऱ्याची मर्यादा सकुचित नसावी यावर माझा विशेष कटाक्ष होता जातवार मतदार सघाचे तत्व लोकशाहीच्या तत्वाच्या अगदी विरुद्ध असल्यामुळे मला मान्य होण्यासारखे नव्हते अल्पसख्याक पक्षासाठी काही काळ-पर्यन्त थोडया जागा राखून ठेवण्याची सवलत देऊ करून, प्रमाणशीर प्रतिनिधित्वाची पद्धत सुरू करण्याचा मी पुरस्कार केला याविषयी एक प्रबध लिहून मी तो जातीनें माँटेग्यूच्या हवाली केला होता या प्रबधाला पुण्याच्या डेक्कन सभेचा पाठिंबा होता माँटेग्यू व चेम्सफर्ड याच्याशी माझी यासबधात मुलाखतही झाली होती त्यावेळी मुबई इलाख्यामध्यें प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या पद्धतीनुसार निवडणुका चालविण्या-विषयीची तपशीलवार योजना मी त्याच्या हवाली केली माँटेग्यूच्या म्हणण्याप्रमाणें तो स्वत जरी या पद्धतीशी सहमत असला तरी ती स्वीकारण्याची त्याची तयारी दिसली नाही एकतर ही पद्धत फार गुतागुतीची असल्याचा लोकापवाद होता, व दुसरें म्हणजे आपल्या राजकीय पुढाऱ्याचें तिच्या तपशिलाविषयी गाढें अज्ञान होतें १९१८ मध्ये माँटेग्यू चेम्सफर्ड जाहीरनामा निघाला आणि ब्रिटिश सरकारनें केन्द्रीय सरकारचें स्वरूप होते तसेच ठेवून प्रातामध्यें द्विराज्यपद्धति सुरू करण्या-विषयीचा ठराव मान्य केला

मध्यतरी लढाई सपून रोलॅट कायदा पास करण्यात आला होता हिंदुस्थान सरकारच्या या नव्या कायद्याविरुद्ध खूप निदर्शनें करण्यात आली त्याचे सर्वात भेसूर स्वरूप जालियनवाला बागेच्या कत्तलीमध्ये निदर्शनाला आले दक्षिण आफ्रिके-मधून परतून गाधीनी नुकतेच हिंदी राजकारण सृष्टीत पदार्पण केलें होते असहकाराचें आपले नवें धोरण त्यानी लोकापुढे सविस्तर माडले याप्रमाणे माँटेग्यू चेम्सफर्ड कायदा कार्यवाहीत आणण्यासाठी एकूण वातावरण अनुकूल नव्हते देशा-मध्यें जे अल्पसख्याक उदारमतवादी होते ते या असहकार धोरणाशी सहमत नव्हते माँटेग्यू चेम्सफर्ड सुधारणा राबवून त्यायोगे काही राजकीय उन्नती होऊ शकते का, हे पाहण्याचे त्यानी ठरवले लोकमान्य टिळकानी आपल्या अखेरच्या दिवसामध्यें

असहकार धोरणाला विरोध करून प्रतिसहकाराचें (responsive co-operation) धोरण पुरस्कृत केले असल्याचें विदितच आहे परतु १ ऑगस्ट १९२० रोजी ते निवर्तल्यामुळे गाधीच्या असहकार चळवळीला मैदान मोकळें झालें नव्या कायद्यानुसार १९२० च्या शेवटीं निवडणुका घेण्यात आल्या, पण गाधीच्या शिकवणी-प्रमाणे बहुसख्य नागरिकांनी त्याच्यावर बहिष्कार घातला मुबई विधानसभेंत मुबई विद्यापीठाच्या पदवीधरांसाठीं राखून ठेवलेल्या जागेसाठी मी उभा राहिलों. माझ्या विरुद्ध उभे राहणारे माझे स्नेही जोझेफ बॅप्टिस्टा, यानी अखेर गाधीच्या धोरणाला मान देऊन निवडणुकींतून आपले अग काढून घेतल्यामुळे मी बिनविरोध निवडून आलों.

प्रकरण बारावें

# मंत्रिपद

१९१९च्या हिंदी राज्यकारभारविषयक कायद्याला अनुसरून ३ जानेवारी १९२१ रोजी, मुबई सरकारची पुनर्रचना करण्यात आली त्यावेळी राखीव खाती सभाळायला कार्यकारिणीचे चार सभासद व सोंपीव खात्याना जबाबदार असावयाला विधानपरिषदेंत निवडून आलेले तीन मत्री, अशी व्यवस्था करण्यात आली शिक्षण, वैद्यक, आरोग्य व उद्योग या खात्याचा मी मत्री होतों अगदी प्रारभापासून ते १९२३ सालच्या निवडणुकात स्वराज्य पक्षाच्या मु रा जयकराकडून पराभूत होईपर्यंत मी हे मत्रिपद सभाळले पराभव होताच मी माझा राजिनामा धाडून दिला सरकारच्या प्रमुखपदी तेव्हाचे गव्हर्नर सर जॉर्ज लॉइड होते, (पुढे ते लॉर्ड लॉइड झाले), मत्रिमडळाच्या बैठकीच्या वेळी सभापतित्व त्याच्याकडे असे मत्रिमडळात वेळोवेळी थोडाफार बदल होत राही मी होतो त्या तीन वर्षांमध्ये कुठल्या ना कुठल्या तरी वेळेला पुढील मडळी मत्रिमडळात होती

कार्यकारिणीचे सभासद सर मॉरिस हेवर्ड, (आय सी एस), सर हेन्री लॉरेन्स (आय सी एस), सर इब्राहीम रहिमततुल्ला, सर चिमणलाल सेटलवाड, सर कावसजी जहागीर, आणि सर चुनिलाल मेहता

मत्री र पु परांजपे, चुनिलाल मेहता, गुलाम हुसेन हिदायततुल्ला, हरिलाल देसाई

ही नवी द्विदल राज्यपद्धति नि:सशय अतिशय कठीण व गुतागुतीची होती ती यशस्वी करून दाखविणे हे बरेचसें गव्हर्नरच्या स्वभावावर अवलबून होते दुर्दैवाने सर जॉर्ज लॉईडला हिंदी राजकीय आकाक्षाविषयी फारशी सहानुभूति नव्हती सेक्रेटरी ऑफ स्टेट ई एस मॉटेग्यू याची सुधारणामागे जी भावना होती, ती लॉईडने प्रत्यक्षात उतरवली नाही सर जॉर्ज लाईड हे कट्टर प्रतिगामी होते उजव्या पक्षा-विषयी त्याना विलक्षण आपुलकी वाटे ब्रिटिश राजकारणात त्याचा साम्राज्य-शाहीकडे कल होता मॉटेग्यू चेम्सफर्ड सुधारणांमागची प्रगत विचारसरणी अर्थातच

त्याना रुचली नाही मॉटेग्यू व व्हाइसरॉय लॉर्ड रीडींग याच्या उदार दृष्टिकोणाशी ते मुळीच सहमत नव्हते या दोघाविषयी त्याना वाटत असलेला तिरस्कार त्याच्या खासगी संभाषणातून अनेकदा व्यक्त होई " हे दोन यहुदी " असा मोठ्या तुच्छतेने ते मॉटेग्यू व रीडिंग याचा उल्लेख करीत आय सी एस व इतर युरोपियनासाठी राखून ठेवलेल्या नोकरवर्गाचे हक्क व हितसबध याविषयी लॉईड फार दक्ष असत त्याच्या या सरक्षणामुळे व सक्रिय पाठिंब्यामुळे युरोपियन अधिकाऱ्याना त्याच्या-विषयी साहजिकच कृतज्ञता वाटत असे मात्र त्याच्या चढेलपणाचा त्यानाहि तितकाच त्रास होई कित्येकदा त्याना गव्हर्नरसाहेबाचा उद्धटपणा सहन करावा लागला आहे एका महत्वाच्या सरकारी खात्याला जबाबदार असलेल्या एका सिव्हिलिअन सेक्रेटरीचा गव्हर्नरने खाजगी मुलाखतीत एकदा असाच अपमान केला होता त्यामुळें भडकून जाऊन " मला शक्य असते तर नोकरीवर लाथ मारून आताच बाहेर पडलो असतो " असे या अधिकाऱ्याचे उद्‌गार काढले असे सागतात लॉईड अत्यत मेहनती व कर्तबगार होते हेहि तितकेच खरें कामे करून घेण्यात त्यांचा हातखडा होता व्हिक्टोरियन साम्राज्यवादाच्या चलतीच्या काळात ते उपजते, तर एक महान सुभेदार म्हणून त्यानी खात्रीने नाव मिळवले असते आता त्यांची आठवण राहिलीच तर मुबईचे एक प्रतिगामी गव्हर्नर व पुढें इजिप्तमधले प्रतिनिधी म्हणून काढली जाईल पहिल्या महायुद्धाच्या काळात, कट्टर व ताठर अशा टोरी पक्षामधला एक उगवता तारा म्हणून सगळ्याचे त्याच्याकडे डोळे लागले होते ब्रिटिश हुकुमशाही मडळी तर साम्राज्यवादाचा एक प्रभावी पुरस्कर्ता मिळाल्याच्या आनंदात होती या अपेक्षा मात्र सर लॉइडनी आपल्या पुढच्या कारकीर्दीत पूर्ण केल्या नाहीत

प्रांतीय सरकारची जरी राखीव व सोपीव अशा दोन भागामध्ये विभागणी केलेली असली तरी एक सयुक्त मडळ म्हणून प्रांतीय सरकारने कार्य करावे आणि दोन्ही खात्याशी सबधित असलेल्या प्रश्नावर एकत्रित बैठकीत चर्चा करावी अशी मॉटेग्यू चेम्सफर्ड सुधारणामागची कल्पना होती कार्यकारिणीचे सभासद व मत्री हे प्रातीय सरकारचे घटक माझे स्नेही सी वाय चिंतामणी उत्तर प्रदेशात शिक्षणमत्री होते त्याच्या प्रातात गव्हर्नर सर हारकोर्ट बटलर याने या पद्धती-नुसार पहिली दोन वर्षे राज्ययत्रणा उत्तम रीतीने चालवून दाखविली चिंतामणी व जगत् नारायण हे दोघे मत्री राखीव खात्याच्या कारभारावरहि आपल्या मताचा प्रभाव उमटवू शकत असत मद्रासमध्ये, लॉर्ड विलिंग्डनच्या अमलाखाली अशाच प्रकारची परिस्थिती होती मात्र मुबईत लॉईडने फारच निराळा पवित्रा घेतला राखीव खात्यामधल्या बाबीचा समावेश असलेली मत्रिमडळाच्या सुरुवातीच्या एका बैठकीची कार्यक्रमपत्रिका जेव्हा आमच्याकडे धाडण्यात आली, तेव्हा साहजिकच या बाबीशी सबधित असलेली कागदपत्रे पाहण्याची इच्छा आम्ही प्रकट केली परतु हक्क म्हणून आम्ही कागदपत्र मागू शकत नाही, एकाद्या विशिष्ट घटनेसबधी सविस्तर

माहिती हवीच असल्याच गव्हर्नरच्या खाजगी चिटणीसाला लिहिलें पाहिजे, असें उत्तर आम्हाला मिळाले कागदपत्रे आम्हाला, धाडायचीं किंवा नाही हें चिटणीस-महाशय ठरवणार आमचा स्वाभिमान शाबूत असल्यामुळे अशा प्रकारच्या व्यवस्थेला आम्हीं मान्यता देणें कदापि शक्य नव्हते तेव्हापासून राखीव भागात मोडणाऱ्या कुठल्याहि विषयावर मत प्रदर्शित करणें आम्ही बद केले याला फक्त एका महत्वाच्या प्रसगीच अपवाद करण्यात आला त्याविषयी पुढे सविस्तर लिहीन विधान परिषदे-मधल्या निदान सोपीव खात्यामध्यें तरी मन्त्र्याकडे सामुदायीक जबाबदारी सोप-विण्याचा गव्हर्मेंट ऑफ इडिया ॲक्टचा आदेश असावा असें सर्वांचे मत होते मला वाटते, बहुतेक प्रातात अशी वस्तुस्थिती होतीहि पण लॉईडने निराळाच दृष्टिकोण स्वीकारला

प्रत्येक मत्री हा स्वत च्या खात्यापुरता व्यक्तिश गव्हर्नरला जबाबदार आहे असे त्याने प्रतिपादन केले, आणि आपलें म्हणणे ॲक्टातील शब्दाशी विसगत नाहीं असे केन्द्रीय सरकारच्या कायदेपडिताकडून वदवून घेतलें अशा प्रकारे आम्ही एकेक स्वतत्र मत्री बनलों सोपीव खात्याच्या बाबतीत सुद्धा आमचे सयुक्त असें मत्रिमडळ राहिले नाही कायद्याच्या दृष्टीनें पाहिले तर आमची परिस्थिती फारच चमत्कारिक झाली होती खाजगीरीत्या मात्र, सर्व महत्वाच्या प्रश्नावर मी व चुनिलाल नेहमी आपसात अनौपचारिकरीत्या सल्लामसलत करीत असू

नव्या राजवटीतल्या नव्या मन्त्र्याची कामगिरी कुठल्याहि दृष्टीने सोपी नव्हती एक तर बहुतेक जणांना राज्यकारभाराचा फारसा पूर्वानुभव नव्हता कुठल्याहि प्रकारची सहानुभूति न बाळगणारा गव्हर्नर, व कोणत्याहि प्रकारें सहकार्य न करणारा श्रेष्ठ अधिकारी वर्ग याच्याबरोबर त्याना काम निभवावयाचें होते दुसरें म्हणजे ज्या निवडणुकामध्ये त्यानी विजय मिळवला होता, त्या निवडणुकावर असहकार चळवळीमुळें बहुसख्य मतदारानी बहिष्कार घातलेला होता कित्येक जण तर बिन-विरोध किंवा फार तर नाममात्र स्पर्धेनतर निवडून आले होते या मन्त्र्यापैंकी काही निव्वळ अधिकाराच्या अभिलाषेने प्रेरित होते त्याच्याविषयी जनतेला किंवा नोकर-वर्गाला आदर वाटणे दुरापास्त होतें तसेच खरी सत्ता ही मन्त्र्याच्या हातात नाही, अधिकार व प्रतिष्ठा यांचें वरदान कार्यकारिणीच्या सदस्यानाच काय ते लाभलें आहे असाहि एक समज प्रचलित होता तो अगदीच निराधार होता असे म्हणता येणार नाही विधान परिषदेचे बिनसरकारी सदस्यहि मन्त्र्याना नित्य पाठिंबा देत नसत उलट मत्री म्हणजे प्रखर व कित्येकदा गैरवाजवी टीकेच्या तोंडी देण्याच्याच पात्रतेचे आहेत अशी त्याची समजूत असे समाजकल्याणाच्या पाघरुणाखाली जे मत्री स्वत ची अथवा स्वत च्या जातभाईंची भरभराट करण्यात गुतले होते त्याचा विशेष उल्लेख करण्याचे कारण नाही आज सपूर्ण स्वातन्त्र्याच्या काळातहि अशा व्यक्ति दुर्मिळ नाहीत राखीव भागाशी झालेल्या कुठल्याहि तटाझगड्यामध्यें

विधान परिषदेचा हार्दिक पाठिंबा मिळण्याची जर मन्त्र्याला शाश्वती वाटली असती तर त्यानी जें काही कार्य केले त्यापेक्षा कितीतरी पटीनी जास्त करिता आले असते किंबहुना डोमिनियन दर्जा लवकर प्राप्त करून घेण्यासाठी द्विदल पद्धतीचा चागला उपयोग करून घेता आला असता अगदी प्रतिकूल अशा परिस्थितीत जनतेच्या कल्याणार्थ आम्ही आमच्या प्रयत्नाची शिकस्त करीत असूनसुद्धा मुबई विधान परिषदेमधला एक बिनसरकारी नियुक्त सदस्य नेहमी आमच्यावर टीका करीत असे त्याला मी याचे कारण विचारताच, सरकारवर टीका करून स्वत चे व्यक्तिमत्व प्रस्थापित करणे हा आपला मूळ हेतू असल्याचे त्याने प्राजलपणे कबूल केले, पण खरी सत्ता कार्यकारिणीच्या सभासदाकडे असल्यामुळें त्याच्यावर हल्ला करण्यापेक्षा मन्त्र्यावर रोख ठेवणे हे कमी धोक्याचे होते असे तो म्हणाला अशा परिस्थितीत, ज्याना समाजात आधीपासूनच काही स्थान होते, पण ज्याना असहकाराचा मार्ग मान्य नव्हता अशाची स्थिती अत्यत चमत्कारिक झाली

अनेक अडचणीतहि होईल तेवढें करण्याची ज्याची इच्छा होती त्याना गव्हर्नर अथवा नोकरशाहीशी वाकडे येण्याचे लक्षण दिसू लागताच राजिनामा देण्याची तयारी ठेऊनच असावे लागे आमच्यावर जरी असा प्रसग उपस्थित झाला नाही तरी एकूण परिस्थिती कार्यक्षमतेला पोषक नव्हती यात शका नाही

उच्च श्रेणीच्या सर्व्हिसेस मध्ये बहुधा युरोपियनाचा भरणा अधिक होता मत्रीमडळाची स्थापना त्यांना फारशी रुचली नाही त्याची खरी मते अधूनमधून प्रकट होत असत एकदां काही समारभासाठी मी नाशिकला जाण्याचे कबूल केले होते याच सुमारास त्या विभागाच्या कलेक्टरनें एका जाहीर भाषणात " दवाखान्यामधली एक साधी परिचारिका ही सर्व मन्त्र्याच्या पेक्षा अधिक लोकोपयोगी ठरेल " असे उद्गार काढल्याचें माझ्या कानांवर आले या समारभात माझी कलेक्टराशी गाठ पडण्याची शक्यता असल्यामुळे मी कार्यक्रम रद्द केला १९२३च्या सार्वजनिक निवडणुकामध्यें मॉंटेग्यू पडल्याची बातमी जेव्हा जाहीर झाली तेव्हा चीफ सेक्रेटरी पी जे मीड याला हर्षवायु झाला एका अर्थसमितीच्या बैठकीसाठी आम्ही जमलों असता तिथें हा 'मॉंटेग्यू पडला मॉंटेग्यू सगळयात शेवटचा' असें ओरडत आला एकदा शिक्षणाधिकाऱ्यानें गव्हर्नरकडे अशी तक्रार केली की त्याच्या खात्याचे माननीय मत्री दौऱ्यावर गेले म्हणजे खातेंप्रमुखाच्या समतीशिवायच शिक्षक मडळी व इतर कनिष्ठ अधिकारीवर्ग याच्या भेटी घेतात खुलाशासाठी जेव्हा हें प्रकरण माझ्याकडे आले तेव्हा मला स्पष्ट उत्तर देणें भाग पडलें लोकाचा मी प्रतिनिधि असल्यामुळे तक्रारी व गाऱ्हाणी ऐकणे व स्वतत्र रीत्या परिस्थितीची पहाणी करणे हे माझे कर्तव्य आहे, असे असतांना अशा प्रकारचा आक्षेप घेतला जावा हीच विलक्षण गोष्ट आहे, असे मी उलट स्पष्टपणे बजावले मात्र कुठल्याहि प्रकारचा निर्णय घेण्यापूर्वी लेखी निवेदन मागवून त्याबाबत शिक्षण खात्याचे काय मत आहे हें आधी अजमावण्याचा

माझा शिरस्ता असे, ह्याचाहि मी उल्लेख केला अखेर गव्हर्नरसाहेबांना माझें म्हणणे मान्य करावे लागले

प्रांतीय खर्चावर अर्थखात्याची बारीक नजर असे खर्चाची कुठलीहि नवी बाब प्रथम या खात्याकडून मजूर करून घ्यावी लागत असे मात्र खर्चाचा मुद्दा जोपर्यंत उपस्थित होत नाही तोपर्यंत अर्थखात्याने मन्त्र्याच्या कुठल्याहि धोरणामध्यें ढवळा-ढवळ करू नये असा आम्ही आग्रह धरीत असू सिडनहॅम कॉलेज ऑफ कॉमर्समध्ये प्रिन्सिपल ॲन्स्टीच्या मृत्यूमुळें प्रिन्सिपलपदाची जागा मोकळी झाली होती ॲन्स्टी हे इंग्रजी निबंधाचे आठवड्यांतून फक्त तीन तास घेत ज्या विषयामध्यें ते तज्ज्ञ म्हणून गणले जात त्यांपैकी कुठलाहि विषय ते कॉलेजात शिकवीत नव्हते असें नंतर मला आढळून आले तेव्हा त्यांच्या जागी आणखी एका आय ई एस मधल्या इसमाची नेमणूक करण्याची आवश्यकता नाही असें मी ठरविले, आणि प्राध्यापकवर्गापैकीं सर्वांत ज्येष्ठ असलेल्या प्रा एम एल टन्नन यांची त्या जागी नेमणूक करण्यात यावी व कामाचा जादा बोजा कमी असलेल्या प्रोफेसर मंडळींत इंग्रजी निबंधलेखन शिकवण्याचें काम वाटून देण्यात यावे अशी सूचना मांडली अभिप्रायासाठी माझी ही सूचना जेव्हा अर्थखात्याकडे गेली तेव्हा अशा प्रकारें एक युरोपिअन जागा कमी करण्यास माननीय अर्थखात्याच्या कार्यकारी सदस्याने हरकत घेतली तेव्हा अर्थखात्याला फक्त खर्चाच्या नव्या बाबींना हरकत घेता येते, धोरणासंबंधीच्या कुठल्याहि निर्णयात हस्तक्षेप करण्याचा त्या खात्याला अधिकार नाही हे मला पुन्हा एकदा निदर्शनाला आणून द्यावे लागले विशेष म्हणजे माझ्या निर्णयामुळें जादा खर्च न होता उलट बचतच होणार होती, हे माझें म्हणणे गव्हर्नरांना पटलें आणि प्रांतातल्या एका सरकारी कॉलेजातील प्रिन्सिपलपदी प्रथमच एका हिंदी माणसाची अशा रीतीने नेमणूक करण्यात आली

एकदा निर्णय पक्का होण्याआधी माझ्या खात्यामधील युरोपिअन सेक्रेटरी स्वतःची मतें कितीही जोराने मांडीत असले तरी एकदा निर्णय घेतला गेला म्हणजे तो तंतोतंत पाळण्यात त्यांच्याकडून कधी कुचराई होत नसे, हे प्रांजलपणे कबूल केलें पाहिजे मागील दाराने पळवाट काढण्याचा त्यांनी कधी प्रयत्न केला नाही आज-कालचे काही हिंदी अधिकारी अशा आडवाटेच्या मार्गांचा अवलंब करतात असे ऐकतो तेव्हांच्या या पोलादी चौकटीच्या राज्यपद्धतीमध्यें कितीहि दोष असले तरी तिच्यापासून कर्तव्यनिष्ठेचा धडा आम्ही घेण्यासारखा आहे यात शंका नाही

एकदा एका समारंभाच्या ठिकाणी माझी व गव्हर्नरची सहज गाठ पडली त्या सुमारास सर चिमणलाल सेटलवाड यांची मुंबई विद्यापीठाच्या उपकुलगुरु-पदाची मुदत संपत आली असल्यामुळें नवी नेमणूक करण्याबाबत विचार चालला होता या संबंधात माझ्याशी चर्चा करण्याची गव्हर्नरने इच्छा प्रदर्शित केली; मात्र ही नेमणूक गव्हर्नर-इन-कौन्सिलने करायची असल्यामुळें माझा सल्ला घेण्यास आपण

बांधलेले नाही असाहि खुलासा त्याने जातां जाता केला नव्या घटनेप्रमाणे गव्हर्नरला मंत्र्याचा सल्ला घेणे आवश्यक असल्याचें मला ठाऊक होते. इंटरप्रिटेशन ऑफ टर्मस् या खास कायद्यानुसार पूर्वी कोणत्याहि कायद्यांत जिथें गव्हर्नर-इन-कौन्सिल असा उल्लेख येईल तिथें "सोंपीव खात्याच्या संदर्भांत मंत्र्याचा सल्ला घेऊन गव्हर्नर असा अर्थ घेण्यात यावा" असे स्पष्टीकरण होते तेव्हा खास मेहेरबानी म्हणून माझा सल्ला घेण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही, नव्या घटनेनुसार तो घेणें भागच आहे असे मी गव्हर्नरला उत्तर दिले या उत्तरानें गव्हर्नरसाहेब गडबडले कायद्यानुसार माझें म्हणणे खरें असल्याचें लवकरच त्यांना आढळून आलें, आणि नाईलाजानें त्यांना मला बोलावणे धाडावें लागले उपकुलगुरूच्या पदावर सेटलवाडच पुन्हा नेमण्याचा गव्हर्नरचा इरादा होता या संकल्पाला मी जोरदार विरोध केला सेटल-वाडची १९२१ मध्यें कौन्सिलात नेमणूक झाली होती तेव्हा तो आधीच उपकुल-गुरुपदावर होता, व त्यानें त्या पदावर मुदत संपेपर्यंत राहण्यास कुणी हरकतहि घेतली नव्हती तरीसुद्धा कार्यकारी कौन्सिलमधल्या सदस्याला पुन्हा उपकुलगुरु नेमण्याच्या विरुद्ध मी तत्त्वत होतो सेटलवाडने कौन्सिलपदाचा राजिनामा आधीच धाडून दिला असल्याचें मग मला गव्हर्नरने खाजगी रीत्या मागितले मात्र राजिनामा स्वीकारण्याची तारीख ठरविणे हे गव्हर्नरच्या मर्जीवर त्यानें ठेवलें होते, पण तो थोड्याच अवधीत मंजूर होणार होता, हें ऐकिल्यावर माझा विरोध साहजिकच मावळला सेटलवाडच्या विरुद्ध माझी दुसरी काहीं तक्रार नव्हती इतकेच नव्हे तर त्याच्याहून अधिक लायक माणूसहि माझ्या ध्यानात नव्हता

मुंबईचे दुय्यम अध्यापन विद्यालय (सेकंडरी ट्रेनिंग कॉलेज) एल्फिन्स्टन हायस्कूलच्या इमारतीत भरत असे प्रात्यक्षिकाचें वर्ग भरविण्यास येथे योग्य अशी जागा नव्हती त्यामुळे साहजिकच विद्यार्थ्यांची कुचंबणा होई तेव्हा शाळेच्या विस्तीर्ण क्रीडांगणामध्येंच एका कोपऱ्यांत त्याकरिता एक लहानशी वेगळी इमारत बांधण्याचे शिक्षणखात्याने ठरविलें ही योजना तत्काळ शिक्षणखाते, पी डब्ल्यू डी खाते व अर्थ खाते यांच्या चाकोरीतून शिक्कामोर्तब होऊन आली आणि अंदाज-पत्रकामध्यें नियोजित खर्चाचा समावेश करण्यात आला त्यानंतर बांधकामाला सुरुवात झाली आणि इमारतहि आकार घेऊ लागली हें सर्व माझ्या विशेष निदर्श-नाला न आणताच पार पडले, कारण नित्यनेमाच्या गोष्टींमध्यें मी आवर्जून लक्ष घालण्याचें कारण नव्हते याच सुमारास काही समारंभासाठी गव्हर्नरनें एल्फिन्स्टन हायस्कूलला भेट दिली त्या वेळी नवे बांधकाम साहजिकच त्यांच्या दृष्टीस पडलें त्यांनी अशा इमारतीमुळे क्रीडांगणाचा दुरुपयोग करण्यात येत आहे या सबबीवर बांधकाम ताबडतोब थांबविण्याचा हुकूम दिला एवढेंच नव्हे तर संपूर्ण इमारत पाडून टाकण्याची मला आज्ञा केली एवढ्या प्रकारानंतर मला स्पष्ट बोलणे भाग पडले सदर योजना कायद्याच्या अक्षराबाहेर रेसभरहि गेलेली नसून इमारत पाडली

तर सार्वजनिक पैशाचा दुरुपयोग केल्याबद्दल कौन्सिलपुढें जबाब मला द्यावा लागेल असे मीं सांगितले तसे करण्याची माझी मुळीच तयारी नव्हती तसेच मंत्री स्वत मुंबईत हजर असताना, त्याला न कळवताच बांधकाम परस्पर थांबविण्याचा गव्हर्नरने हुकूम देणे म्हणजे मंत्र्याविषयी उघड उघड बेपर्वाई दर्शविणे होतें मंत्र्याची फोन-वरून गाठ घेणे त्याला सहज शक्य होतें, माझें हे समर्थन ऐकून गव्हर्नरच्या तळ-पायाची आग मस्तकाला गेली यापुढे नवीन बांधकामाच्या योजनेची पूर्वसूचना गव्हर्नरला हवी असेल तर चालू नियमात बदल करणे आवश्यक आहे असे मी त्याला सांगितले या विशिष्ट परिस्थितीत इमारत पुरी होत आली असल्यामुळें, व तिच्या पायी काही हजाराचा खर्च झाला असल्याकारणाने ती पाडणे शक्य नव्हते अखेरीस मी हा तंटा जिंकला ती इमारत अजून उभी आहे

मुंबईमधल्या सरकारी लॉ कॉलेजातून पार्ट टाइम प्राध्यापकाच्या जागांवर बहुधा मुंबईच्या उच्च न्यायालयामधल्या निवडक बॅरिस्टरांची वा वकिलांची नेमणूक होत असे ही नेमणूक मुख्य न्यायाधीश व त्याचे काही सहकारी, यांच्या सल्ल्यानुसार होई एकदां अशी नेमणूक करण्याची वेळ आली असता, सेक्रेटरीने मुंबई शहराबाहेरच्या एका वकिलाचें नाव सुचविले सदर वकील हे पूर्वी एका स्थानिक संस्थेचे अध्यक्ष होते त्या वेळी आपल्या अधिकारात त्यांनी लोकमत धाब्यावर बसविले होते विशेषत चळवळीच्या काळामध्यें काही गैरशिस्त कामात त्यांनी स्थानिक जिल्हाधिकाऱ्याला मदत केली असल्याचे सर्वांना ठाऊक होतें त्यांच्याविरुद्ध अविश्वासाचा ठराव मांडण्याची जेव्हां सभासदांनी नोटिस दिली तेव्हा स्थानिक समितीची सभाच बोलाविली नाही या त्यांच्या गुणामुळे त्यांचा त्या शहरात बराच दुर्लौकिक झाला, आणि त्यांच्या वकिलीचा धंदा बराच बसला तेव्हा आपल्या राजनिष्ठेची बक्षिसी म्हणून त्यांनी या प्राध्यापकपदावर आपणास नेमावें अशी गव्हर्नरकडे विनंती केली संबंधित कागदपत्र जेव्हा माझ्याकडे आले तेव्हा त्यांच्या अर्जाचा गव्हर्नरने जोरदार पुरस्कार केला असल्याचे मला आढळून आले तेव्हा फायलीवरच, राजकीय कृष्णकृत्याचा मोबदला म्हणून शैक्षणिक स्वरूपाच्या जागाचा अशा रीतीनें उपयोग करण्यास मीं कडकडून निषेध केला गव्हर्नरचा सहाजिकच संताप झाला पण सर्व बिंग उघड-कीला येईल या भीतीने मला विरोध करण्याच्या फंदात मात्र तो पडला नाही थोडक्याच अवधीत, याच इसमाला असिस्टंट जजची जागा दिली गेली असल्याचे माझ्या कानावर आले ही जागा सरकारच्या राखीव विभागाकडे असून तीवर नेमणूक करण्याचा अधिकार गृहखात्याकडे होता

इंडियन मेडिकल सर्व्हिसमधल्या युरोपिअन सभासदांच्या हितासाठीं गव्हर्नर सदैव जागरूक असे मी मंत्री झालो तेव्हा अमलात असलेल्या नियमाप्रमाणे प्रांताच्या मुख्य ठाण्यामध्ये सिव्हिल सर्जनच्या काही जागा, ग्रँट मेडिकल कॉलेजातल्या प्राध्यापकाच्या काही जागा व शिवाय सरकारी यंत्रणेतील काही जागा या इंडियन

मेडिकल सर्व्हिसमधल्या मडळीसाठी मुद्दाम राखून ठेवलेल्या असत लढाईची आपत्ति कोसळलीच तर सैन्यासाठी डॉक्टराचे पथक तयार असावे हा त्यामागचा हेतु होता १९१४–१८ च्या दरम्यान, लढाई चालू असताना बहुतेक युरोपियन अधिकारी लष्कराकडे रवाना झाल्याकारणाने रिकाम्या झालेल्या जागेवर हिंदी डॉक्टराची नेमणूक करण्यात आली होती पुढे लढाई सपल्यावर बाहेर गेलेल्या युरोपिअन अधिकाऱ्यापैकी बरेच जण परत आले तेव्हा त्यांची प्रातातल्या वैद्यक खात्यामध्ये तरतूद करणे भाग पडले परतु त्यांची नेमणूक नेमकी कुठें करावी हा मोठा नाजूक प्रश्न उपस्थित झाला ग्रँट मेडिकल कॉलेजातल्या प्राध्यापकाच्या जागा फार विलोभनीय मानल्या जात कारण चित्तवेधक काम, व खाजगी प्रॅक्टिस मिळण्याची मुबलक सधि, या दोन्ही गोष्टी या पदावर असलेल्या डॉक्टराना प्राप्त होत असत या जागेसाठी निवड करताना जात व रग याकडे लक्ष न देता पात्रतेवर भर देण्यात यावा असा मी आग्रह धरला कारण प्रांतामधल्या वैद्यकीय शिक्षणाचें भवितव्य अखेर शिक्षक-वर्गाच्या कुवतीवर अवलबून होतें लढाईच्या काळात जे जे हॉस्पिटलमध्यें डॉ डगन याची नेत्ररोगचिकित्सेचे प्राध्यापक व डॉ दलाल याची सेकड सर्जन म्हणून नेमणूक करण्यात आली होती हे दोघेहि डॉक्टर अत्यत निष्णात व कर्तृत्ववान होते त्याच्या जागी इडियन मेडिकल सर्व्हिसमधल्या दोघा युरोपियनाना नेमण्याची गव्हर्नरची उत्कट इच्छा होती त्यांनी सुचविलेल्या उमेदवाराची लायकी यथायथाच होती या जागेला पात्र होण्यासारखें कोणतेच वैशिष्टच त्याच्याजवळ नव्हतें लढाईच्या काळात इग्लडमध्यें भरती करणे दुरापास्त झाले असल्याकारणाने केवळ याना इडियन मेडिकल सर्व्हिसमध्यें प्रवेश मिळाला होता अशा तुटपुज्या पात्रतेच्या या गव्हर्नर-पुरस्कृत उमेदवाराना घेण्यास मी नकार दिला आणि कॉलेजच्या स्टाफवरचे दोघे हिंदी डॉक्टरच कायम करण्यात आले दुर्दैवाने डॉ दलाल नतर फार दिवस जगले नाहीत इडियन मेडिकल सर्व्हिससबधी माझी व गव्हर्नरची अनेकदा बोलणी होत असत एक अत्यत चमत्कारिक सिद्धात ते वेळोवेळी माडीत त्याचे म्हणणे असे, की निरनिराळ्या सर्व्हिसमध्ये जर युरोपियन अधिकारी राहायचे असतील तर त्याना गरज लागेल तेव्हा त्याना युरोपियन डॉक्टर्सहि उपलब्ध असणे अत्यावश्यक आहे कारण कोणत्याहि गोऱ्या इसमाला आपले पहिले मूल हिंदी डॉक्टरच्या मदतीने जगात आलेले रुचणार नाही त्याच्या या युक्तिवादाला उत्तर देताना हें म्हणणे मान्य केले तर एखाद्या गोऱ्या अधिकाऱ्याची नवी नेमणूक एखाद्या ठिकाणी झाली रे झाली की सरकारवर त्याच्या पाठोपाठ एका युरोपियन डॉक्टरचीहि तरतूद तेथें करण्याची पाळी येईल, तेव्हा युरोपियन इसमाच्या नेमणुकीसाठी एवढा सोपस्कार करणें आवश्यक असेल तर अशा चमत्कारिक अटी मान्य करण्यापेक्षा सर्व्हिसमध्ये युरोपियन माणूस नसलेलाच परवडला असे मी निक्षून सागितले जी एम कॉलेजमधल्या जागाबद्दल तट्टयानतर सुमारे एक वर्षानतर इडियन मेडिकल सर्व्हिससाठी राखून

ठेवलेल्या मुलकी जागामध्यें सेक्रेटरी ऑफ स्टेटने बरीच कपात केली आणि या प्रकरणामधली कटुता बऱ्याच अंशी कमी झाली

एके दिवशी मला अर्थखात्याचे सभासद सर हेन्री लॉरेन्स याचा तातडीचा टेलिफोन आला दुसऱ्याच दिवशी अर्थसमितीची बैठक भरणार होती त्या वेळी मी आपल्या खात्याकरिता २५,००० रुपयाच्या खर्चाच्या एका बाबीचा समावेश करावा अशी गव्हर्नरसाहेबाची इच्छा असल्याचें मला कळविण्यासाठी लॉरेन्स यानी हा टेलिफोन केला होता युरोपमध्ये एम्पायर बॉय स्काऊट्च्या सस्थेतर्फे एक जाबोरी भरणार होती हिंदी मुलाचें पथक पाठवायला एवढा खर्च येणार होता मला हा फोन येईपर्यंत या सर्व प्रकरणाविषयी मी सपूर्णपणे अधारातच होतों तसें मी सर हेन्रीना सांगताच, मी फक्त औपचारिक रीत्या समती देऊन खर्च मान्य करण्याचेच काय तें बाकी आहे असें त्यांनी मला उत्तर दिलें गव्हर्नरसाहेबानी बाकी सर्व तरतूद अगाऊच करून ठेवली होती खर्चाच्या या बाबीला माझा सपूर्ण विरोध असल्याचें मीं खडसून सागताच सर हेन्रीनी मला गव्हर्नरची गाठ घेण्याचा सल्ला दिला याच सुमारास केनियामधल्या प्रश्नावर वर्तमानपत्रातून जोरदार चर्चा चालली होती केनियाचा डोगराळ प्रदेश हा केवळ युरोपियनासाठी राखण्यात यावा, व हिंदी व आफ्रिकन लोकाची तेथून कायमची हकालपट्टी करण्यात यावी असा एक सकल्प घाटत होता त्याला साम्राज्य सरकार मान्यता देणार अशी चिन्हेहि दिसत होती या सकल्पाबद्दल हिंदुस्थानात सर्वत्र असतोष व्यक्त केला जात होता अशी ही पार्श्वभूमि असताना, साम्राज्याचा उदोउदो होईल अशी कोणतीहि गोष्ट करण्यास साहजिकच मी राजी नव्हतो दुसऱ्याच दिवशी गव्हर्नरशी माझी भेट झाली आपली योजना त्यानीं मला सविस्तर समजावून सागितली एवढ्या खर्चाला अर्थसमितीमधले बिनसरकारी सदस्य हरकत घेतील असे मी सागताच, हरकत घेतली जाणार नाही याची खबरदारी घेण्यात येईल, असे गव्हर्नरने उलट सागितलें तेव्हा सूचना माडण्याची माझी इच्छा नसल्याचे मीं स्पष्टच बोलून दाखविलें गव्हर्नरसाहेब फारच रागावले 'ह्या खर्चास मजुरी मागण्याचे तुम्ही नाकारता असें मी समजावे काय ?' असे त्यानी विचारताच मी सरळ 'हो' म्हटलें, त्यावर "आपली मुलाखत सपली" असे तुटकपणानें म्हणून त्यानी मला निरोप दिला लवकरच आपल्याला मत्रिपदातून मोकळे करण्यात येईल या अपेक्षेने मी या मुलाखतीहून परत आलो अशा प्रसगाला माझी सपूर्ण तयारी होती तसे मी माझे सहकारी चुनिलाल याजजवळ बोलूनहि दाखविले होतें अर्थसमितीच्या बैठकीच्या वेळी माझ्या माहितीशिवायच कार्यक्रमपत्रिकेमध्यें खर्चाची ही बाब तात्पुरती लिहिलेली होती, पण मी विरोध केल्यामुळे नतर ती खोडून टाकण्यात आली दोन तीन दिवसानी याच सबधात पुन्हा एकदा चर्चा करण्यासाठी गव्हर्नरने मला राजभवनात बोलावलें या खेपेला माझी स्पष्ट मतें मी त्याला ऐकविली साम्राज्यामध्यें हिंदी लोकाना

काहीच हक्क, फायदे किंवा मानाचे स्थान असल्याचे दिसून येत नसल्याकारणानें, एरवायर जाबोरीला बॉय स्काऊटसचे पथक पाठवून साम्राज्याची टिमकी वाजविण्यास हातभार लावण्याची हिंदी लोकाची इच्छा नाही तसेच ब्रिटिश वसाहतीत हिंदी लोकाना समान पातळीवर वागविण्यात येत नसल्याकारणानें साम्राज्याचे घटक म्हणवून घेणे हें हिन्दुस्थानला फारसें भूषणार्ह वाटत नाही असें मी त्याला स्वच्छ शब्दात सागितलें यावर गव्हर्नरनें एक प्रदीर्घ प्रवचनच सुरू केलें खरें म्हणजे त्याच्याबरोबर मुलाखत म्हटली की सभाषणाचा फारसा प्रश्न उद्‌भवत नसे ते स्वत च बोलत राहत महत्प्रयासाने दुसऱ्याला एकादा शब्द मध्येच घुसडावा लागे त्यानी केनियामधल्या युरोपियनाच्या धोरणासबधी आपले म्हणणे मला ऐकविण्यास सुरुवात केली गोऱ्यांना वर्णसकराची फार भीति वाटत असल्यामुळे केनियामधला डोगराळ प्रदेश स्वत साठी राखून ठेवण्याचा त्याचा प्रयत्न होता असे त्याचे म्हणणे ते अर्थातच मला मान्य होऊ शकले नाही आणि आमच्या दुसऱ्या मुलाखतीचाहि शेवट झाला आश्चर्याची गोष्ट म्हणजे गव्हर्नरनें माझ्याकडून राजिनाम्याची मागणी केली नाही हे प्रकरण जर विधान परिषदेपुढे चर्चेसाठी आले तर आपल्याला पाठिंबा मिळणार नाही असें बहुधा त्याला वाटले असावें मात्र त्याने येन केन प्रकारेण म्हणजे बहुधा खाजगी देणग्या मिळवून, इष्ट रक्कम उभी केली असल्याचे व मुबईहून एक पथक खरोखरच धाडून दिलें असल्याचें नतर माझ्या कानावर आलें

मी विधान परिषदेमध्ये बिनसरकारी सदस्य असताना इलाख्यामधल्या प्राथमिक शिक्षकाचा दर्जा व भवितव्य या विषयात बरेंच लक्ष घालीत असे लढाईमुळें राहणीच्या खर्चामध्ये बेसुमार वाढ झालेली, ज्याचा परिणाम समाजामधल्या या महत्वाच्या पण कमी वेतनश्रेणीच्या सेवकवर्गावर फार झाला सामुदायिकरीत्या विचार करण्यासाठी त्यानी अनेक सभा भरविल्या कार्यकारी मडळातील शिक्षण खात्याचे सभासद सर इब्राहिम रहिमतुल्ला याजकडे शिष्टमडळ नेमण्याचा निर्णय अखेर घेण्यात आला या शिष्टमडळाचे नेतृत्व करण्याची कामगिरी माझ्याकडे आली एकूण परिस्थितीबाबत शिक्षकवर्गाशी मी अगदी मोकळेपणानें चर्चा केली सरकारने प्राथमिक शाळाशिक्षकाच्या वेतनश्रेणीसबधी सविस्तर योजना आखण्यासाठी एक समिती नेमली या समितीवर सोलापूरचे रावबहादुर जी के साठे व मी होतों आम्हीं आखलेल्या योजनेचे साठे पराजपे योजना असे नाव पडले एकूण पाहता शिक्षकानी व जनतेनेहि तिचें स्वागतच केले परतु राज्यपद्धतीत होणार असलेला बदल, व नुकती सुरू करण्यात आलेली द्विदल राज्यपद्धती, यामुळे ही योजना प्रत्यक्षात चालू होण्याचा योग मात्र लाबणीवर पडला

१९२१ मध्ये मी मत्री झालो तेव्हा प्रथम हाती घेतलेल्या प्रश्नात साठे-परांजपे योजनेचा समावेश होता पहिल्याच शैक्षणिक अदाजपत्रकात, मी सर्व शिक्षकाना या योजनेमध्ये सुचविलेल्या वेगवेगळ्या वेतनश्रेणीतील मूळ पगार देऊ केला

सातवी पास झालेल्या परतु ट्रेनिंग न झालेल्या शिक्षकाना २५ रुपये व ट्रेनिंग कॉलेजचे तिसरें वर्ष पूर्ण केलेल्याना ५० रुपये याप्रमाणे त्यात पगार ठरविण्यात आले होते ही सपूर्ण योजना तत्काळ अमलात आणण्यास माझ्या हाती असलेला निधी पुरेसा नव्हता परतु काही वर्षातच ही योजना फलद्रूप होईल असे आश्वासन मात्र आम्ही देऊ केले दुर्दैवानें ही सपूर्ण योजना कधीच अमलात येऊ शकली नाही लढाईनतरच्या काळातली पैशाची टचाई हे त्याचे मुख्य कारण असे म्हणायला हरकत नाही १९२३ साली मी मन्त्रिपद सोडलें तेव्हापासून यासबधात फारसे काहीं साध्य झाले असल्याचे आढळून येत नाही नाही म्हणायला हा प्रश्न वेगवेगळ्या समित्याकडे सोपविला गेल्यामुळे त्या सबधात् आधीच विपूल असलेल्या वाड्मयामध्यें या समित्यानी सादर केलेल्या वृत्ताताची बरीच भर पडली आज चाळीस वर्षांनतरहि प्राथमिक शिक्षकाचा असतोष धुमसतोच आहे अगदी खालच्या श्रेणीच्या मास्तराना मिळणारा पगार व महागाईभत्ता अगदीच असमाधानकारक वाटत नाही एवढे मात्र खरें आज प्राथमिक शिक्षण सक्तीचे झाल्यामुळे व त्यामुळे प्रातातल्या प्राथमिक शाळाच्या सख्येतहि अतिशय वाढ झाली असल्यामुळें या प्रश्नाचे स्वरूप फारच गभीर व विराट झालें आहे माझ्या वेळी प्रातीय सरकारचा प्राथमिक शिक्षणावर २ कोटी रुपये खर्च होई आज हा आकडा १२ कोटीवर गेला आहे प्राथमिक शिक्षकाचे विशेषत देशातल्या खेड्यापाड्यात फार वजन व सामर्थ्य आहे हे नाकारून चालणार नाही. समाधानी व कामगार प्राथमिक शिक्षक हे प्रगतिशील व यशस्वी राज्यकारभाराचे एक आवश्यक अग आहे यात शका नाही

शिक्षकाच्या वेतनविषयक मागण्याबद्दल जरी मला सहानुभूति असली तरी त्याचबरोबर त्याच्या कर्तव्याची वारवार आठवण करून देण्याबद्दल मी नेहमी दक्ष राहत असें त्यानी स्वत उच्च नैतिक व बौद्धिक उदाहरण घालून दिले तर त्याच्या सहवासात येणाऱ्या लहानथोरासमोर उत्तम आदर्श ठेवल्याचे श्रेय त्याना मिळेल असे माझे सागणे असे गेली काही वर्षें प्राथमिक शिक्षकाच्या बौद्धिक पातळीमध्यें बरीच घट झाली असल्याचे माझ्या निदर्शनाला आले आहे ट्रेनिंग कॉलेजातून तिसऱ्या वर्षाचे उच्चाटन, शिक्षणक्रमामधून बौद्धिक स्वरूपाच्या काही विषयाची उचलबागडी व शिक्षणक्षेत्रामध्ये नवी भरती करताना दिसून येत असलेला जातीय दृष्टीकोन ही त्याची कारणे असावीत

मुबई राज्यामध्ये मत्री म्हणून सूत्रें हाती घेताच, प्राथमिक शिक्षकाच्या बाबतीत क्रातिकारक सुधारणा घडवून आणण्यासाठी जनतेची जी सतत मागणी होती तिचा प्रथम विचार करण्याचे मी योजले या प्रश्नाला आर्थिक व व्यावहारिक अशा दोन बाजू होत्या तेव्हा सर्व सबधित बाबीसबधी विचार करून या प्रश्नावर सविस्तर अहवाल तयार करण्यासाठी मी एक समिती नेमली या समितीच्या प्रमुखपदी विधानपरिषदेचे अध्यक्ष सर नारायण चदावरकर हे होते समितीने अत्यत महत्त्वाचा व मौल्यवान असा

अनुक्रम ३८६७३ वि. चरित्र
क्रमांक ७२२८ दि. २१।५।६५


वृत्तात तयार केला त्याच्याच आधारावर प्राथमिक शिक्षण सक्तीचें करण्यासबंधीचा १९२३ सालचा कायदा आंखण्यात आला त्यामध्यें, स्थानिक संस्थाना म्हणजे नगरपालिका व लोकल बोर्ड याना, आपापल्या विभागात सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरू करण्यासाठी नव्या योजना सुचविण्याचा अधिकार असावा असे मांडण्यात आलें होतें तसेच, या स्थानिक संस्थाकडून अशा प्रकारच्या योजना मागवून घेण्याचा सरकारकडेहि या कायद्याने अधिकार सोपविला गेला होता प्राथमिक शिक्षणा-साठीं उपलब्ध असलेल्या आर्थिक साधनांमध्ये भर घालण्यासाठीं काही नवीन करहि सुचविण्यात आले प्राथमिक शिक्षणासबंधीचा सर्वसाधारण कारभार सरकारच्या देखरेखीखाली या स्थानिक संस्थाच्या हाती द्यावा अशी जोरदार शिफारस या कायद्यामध्ये केलेली होती कारण जनतेचा पुरा पाठिंबा असल्याखेरीज कुठल्याहि सरकारी यत्रणेला सक्तीची अमलबजावणी करणे शक्य झाले नसते तेव्हा स्थानिक समित्याकडे सर्व शैक्षणिक अधिकार देण्यात येऊन अॅडमिनिस्ट्रेटराच्या नेमणुका करणें, शिक्षकाच्या नेमणुका व बदल्या करणे, शिक्षणाक्रमामध्यें बदल सुचविणे, इमारतीसाठी तरतूद करणें, असे निरनिराळे हक्क त्याच्याकडे सुपूर्त करण्यात आले नगरपालिकेच्या खर्चाचा निम्मा वांटा व लोकल बोर्डाच्या खर्चाचा दोन तृतीयाश वाटा सरकारने स्वत च्या अगावर घेण्याचे ठरविले मी मत्री असताना जरी हा कायदा पास झाला असला तरी तो अमलात आणण्यास आवश्यक असलेले नियम व यत्रणा याची माझ्या कारकीर्दीत तरतूद होऊ शकली नाही १९२३ च्या अखेरीस मी मन्त्रिपदापासून मुक्त झालों आणि या कायद्याची प्रत्यक्ष अमलबजावणी करण्याची जबाबदारी माझ्या नतरच्या मत्र्याच्या अगावर पडली

१९२१ सालच्या प्रारभी नव्या मत्र्यानी आपापली खाती ताब्यात घेतली, त्या वेळी असहकार चळवळीमुळें निर्माण झालेल्या असतोषानें देशातले राजकीय वातावरण तग झाले होतें असहकार चळवळीची लाट शिक्षणक्षेत्रापर्यंतहि पोहोंचली शाळाकॉलेजावर बहिष्कार घालण्याचा बराच प्रसार करण्यात आला मात्र प्रत्यक्षा-मध्यें इलाख्यातल्या कुठल्याच भागात या मोहिमेनें फार गभीर स्वरूप धारण केलें नाही काही राष्ट्रीय शाळा-कॉलेजें उघडण्यात आली खरी, पण त्याच्यात फारसा दम दिसून आला नाही अहमदाबादमध्यें मात्र काही काळ या चळवळीत बराच जोर दिसला नगरपालिकेचे मुख्य शिक्षणाधिकारी याच्या चिथावणीवरून नगरपालिके-मधल्या बहुतेक प्राथमिक शिक्षकानी आपापल्या जागाचा राजिनामा दिला परंतु राष्ट्रीय शिक्षणाचा पुरस्कार करणारी व सरकारी शाळावर बहिष्कार घालण्याचा आदेश देणारी ही चळवळ थोडक्याच अवधीत मदावली, आणि वर्षभरातच अहमदा-बादच्या शिक्षकानी पुन्हा नोकरीसाठी अर्ज केले या शिक्षकाना पुन्हा कामावर घेण्यास मी अनुमति दिली, मात्र नगरपालिकेच्या प्रमुख शिक्षणाधिकाऱ्याला पुनश्च नेमण्यास मी साफ इन्कार केला त्यानें हाताखालच्या शिक्षकाना काबूत ठेवण्याचें

आपलें कर्तव्य पार पाडले नव्हतें एवढेच नव्हे तर गैरवर्तनाला प्रोत्साहनच दिलें होते माझ्या या निर्णयामुळें जनमत माझ्याविरुद्ध फारच प्रक्षुब्ध झाले दोन वर्षांनतर मी निवडणुकीला उभा राहिलो त्या वेळी माझ्याविरुद्धच्या प्रचारात या गोष्टीचा प्रामुख्याने उल्लेख करण्यांत आला असहकार चळवळीचा माध्यमिक व उच्च शिक्षणावर झालेला परिणाम हा माझ्या मतें अगदीच य किंचित होता नाही म्हणायला उत्साहाच्या भरात काही हुशार व होतकरू मुलानी शाळा वा कॉलेजातून बाहेर पडून स्वत चे जन्माचे नुकसान मात्र करून घेतले त्यापैकी बऱ्याच जणावर पुढे पश्चात्ताप करण्याची वेळ आली असल्यास आश्चर्य नाही पुणे व अहमदाबाद येथे राष्ट्रीय विद्यालये व विश्वविद्यालयेंहि स्थापण्यात आली परतु सनातन पद्धत्यनुसार अध्यापन करणाऱ्या या सस्था, फक्त आयुर्वेदिक औषधिशास्त्र व सस्कृत या विषयाचे शिक्षण सोडल्यास, आपल्या क्षेत्रात फारशा यशस्वी ठरल्या नाहीत या विषयाचे प्राचीन पद्धत्यनुसार शिक्षण देण्याची सोय त्या वेळी मुबई विद्यापीठ व शाळाकॉलेजे याच्या कक्षेमध्यें नव्हती

महात्मा गांधीनी आपल्या कार्यामध्ये, शिक्षणाचा प्रचार करणे व अस्पृश्याची सामाजिक जीवनात उन्नति घडवून आणणे, या दोन गोष्टीवर भर दिला होता ही दोन्ही उद्दिष्टें मला प्रिय होती या सबधात प्राथमिक हालचाल म्हणून मी पुण्यातील सर्व शिक्षणसस्थामधून हरिजन विद्यार्थ्यांसाठी एक वसतिगृह सुरू केले त्याची राहण्याखाण्याची मोफत सोय करण्यात आली एवढेंच नव्हे तर त्याची फी देण्याचीसुद्धा व्यवस्था करण्यात आली शिवाय या वर्गातल्या विद्यार्थ्यांसाठी बऱ्याच शिष्यवृत्त्याहि आम्ही मुद्दाम ठेवल्या होत्या प्रातामध्यें इतरत्रहि अशाच प्रकारची वसतिगृहे चालू करण्याची माझी इच्छा होती सुरुवातीला पुण्याच्या वसतिगृहाला अनेक अडचणीना तोड द्यावे लागले खुद्द अस्पृश्याच्या वेगवेगळ्या जातीमध्यें स्पृश्यास्पृश्यतेचें विलक्षण प्रस्थ होतें महार, चाभार, ढोर व भगी या मुख्य चार जातीचे विद्यार्थी एका पगतींत जेवायला बसायला तयार नसत, किंवा कामावर ठेवलेल्या अस्पृश्य वर्गांतील गड्यानी वाढलेले अन्नहि त्याना चालत नसे तेव्हा मुद्दाम वरच्या वर्गाचे स्वयपाकी कामावर ठेवावे लागले या वसतिगृहामुळें या वर्गामधल्या बऱ्याच विद्यार्थ्यांना स्वत ची आर्थिक व सामाजिक परिस्थिति सुधारून स्वत चा उत्कर्ष करून घेणे शक्य झाले यापैकी काही विद्यार्थी तर पुढे नेते म्हणून गाजले जाता जाता त्या वेळच्या एका अजब गोष्टीचा उल्लेख करावासा वाटतो असहकार चळवळीमुळे उदयाला आलेल्या राष्ट्रीय शाळामधून प्रवेश मिळविण्यासाठी जेव्हा हरिजन मुले जात, तेव्हा त्याना सरकारी शाळेत जाण्याचा सल्ला मुकाट्याने देण्यांत येई विशेषत गुजराथमध्ये हा प्रकार फार चालत असे अस्पृश्यतानिवारण हें गांधींच्या कार्यक्रमामधले महत्त्वाचे अग असूनहि ही परिस्थिति होती हे विशेष

अस्पृश्याच्या मुलाना जरी सरकारी शाळामधून प्रवेश मिळाला तरी बाकीच्या

विद्यार्थ्यांप्रमाणें त्याना वागणूक मिळत नाही हे अनेक वेळा मी पाहिलेलें होतें वरेचदा त्यांना आपल्या सोबत्यापासून वेगळे बाहेरच्या व्हराडयामध्यें बसायला सागण्यात येई सार्वजनिक व्यवस्थेखालीं असलेल्या कुठल्याहि शाळेने विद्यार्थ्यांमध्यें त्याच्या जातीवरून कोणत्याहि प्रकारचा भेदभाव दाखविता कामा नये, सरकारी मदत अथवा मान्यता मिळत असलेल्या एखाद्या शाळेने असा पक्षपात केल्याचे दिसून आले तर तिला मिळत असलेली मदत वा मान्यता बद करण्यात येईल, अशा आशयाचा मी हुकूम काढला, त्यामुळे जनतेत बरीच खळबळ उडाली विशेषत खाजगी शाळाचे सचालक नाराज झाले फार काय, इडियन सोशल रिफॉर्मर यासारख्या पत्राचे सपादक श्री नटराजन यानी हा हुकूम शाळाना मदत म्हणून द्यावा लागणारा सरकारी पैसा वाचविण्यासाठी काढलेला आहे असे सूचित करून त्याला विरोध केला परतु आजतागायत हा हुकूम कायम आहे, आणि माझ्या माहितीप्रमाणे सरकारी वा खाजगी कुठल्याहि शाळेंत हरिजन मुलाला आता वेगळया तऱ्हेने वागवीत नाहीत जेव्हा जेव्हा एकाद्या शाळेला भेट देण्याचा मजवर प्रसग येई, तेव्हा तिथे जातिभेद पाळला जातो किंवा नाही याची मुद्दाम चौकशी केल्याशिवाय मी राहत नसे

प्रिन्स ऑफ वेल्स हे हिंदुस्थानला भेट देण्यासाठी येणार होते या भेटीला गांधी व त्याचे अनुयायी याचा विरोध होता तेव्हा साहजिकच त्या भेटीचा नियोजित कार्यक्रम हा उग्र स्वरूपाची निदर्शने न होता निर्विघ्नपणे पार पडावा अशी हिंदुस्थान सरकारची मनात इच्छा होती व्हायसरॉयच्या कार्यकारिणीचे सभासद सर तेज बहादुर सप्रू यांना याबाबत गाधीशी खाजगी रीत्या वाटाघाटी करण्यास अधिकार दिला असल्याचें त्यानी स्वत मला सागितले त्याच्यावर कोणत्याहि प्रकारचे बधन घालण्यात आलें नव्हतें एवढेंच नाही तर भारताला डोमिनियनचा दर्जा लवकर मिळेल असे आश्वासन देण्याचा अधिकारहि त्याना देण्यात आला होता परतु त्या वेळी तुरुगांत असलेल्या अल्ली बधूना मुक्त केल्याखेरीज कोणत्याहि प्रकारें वाटाघाटी करण्यास आपण तयार नाही असे गाधींनी स्पष्टपणे सागितले त्याची अट सरकारला मान्य झाली नाहीं आणि या वाटाघाटी सुरू होण्यापूर्वीच फिसकटल्या गाधींनी जर अधिक तडजोडीचे धोरण स्वीकारले असते तर स्वातत्र्य किंवा गांधीच्या शब्दात बोलायचे म्हणजे "स्वातन्त्र्याचा तथ्याश" अधिक लवकर व शाततेच्या मार्गाने प्राप्त झाला असता असे अनेकदा माझ्या मनात येते

१९२१ साली प्रिन्स ऑफ वेल्सने मुबईला भेट दिल्यामुळें विरोधकानी निदर्शने केली व काही थोडया प्रमाणात सार्वजनिक अशातता फैलावली प्रिन्स ऑफ वेल्सचा मुबईत मुक्काम असेपर्यंत त्यांच्या तैनातीला चुनिलाल मेहता व गुलाम हुसेन हिदायततुल्ला या मत्र्यांची नेमणूक केली होती पुण्याच्या त्याच्या एक दिवसाच्या भेटीच्या वेळेस त्याच्याबरोबर असण्याची माझ्याकडे कामगिरी होती पुण्यात त्यांनी शिवाजीच्या पुतळ्याचें उद्घाटन केले व शनवारवाडयानजीकच्या नदीवरच्या

नव्या पुलाच्या पायाचा दगड बसविला पुण्यामधल्या त्यांच्या वास्तव्यांत म्हणण्या-सारखी प्रति-निदर्शने वा गैरशिस्त प्रकार दिसून आले नाहीत मुबईस परत गेल्यावर थोड्याच दिवसांत हिंदुस्थानातील इतर भागाना भेटी देण्यासाठी प्रिन्स ऑफ वेल्स निघून गेले एकूण पाहता त्याचा दौरा यशस्वी झाला असें म्हणायला हरकत नाहीं. खेळीमेळीची वागणूक व आढ्यतेचा अभाव यामुळें त्यानीं लोकाना आपलेसे करून घेतलें जेव्हा अखेर त्यानी हिंदुस्थानचा किनारा सोडला, तेव्हा लोकानी त्याच्या-बद्दलचा आदरभाव मोकळ्या मनाने प्रकट केला

प्रिन्स ऑफ वेल्सच्या भेटीनतर सुमारें एक दोन महिन्यातच असहकार चळवळीच्या सबधात चौरीचौरा येथें कांही दुर्घटना घडल्या, आणि गाधीनी चळवळ थांबविण्याचा निर्णय घेतला असहकाराच्या व अहिंसेच्या आद्य पुरस्कर्त्यानेंच माघार घेतली हें पाहून गाधीभक्त रुष्ट झाले आणि गाधीचा प्रभाव कमजोर होण्याची काही काळ लक्षणे दिसू लागली याच सुमारास केन्द्रीय सरकारच्या अनुमतीनें, मुबई सरकारने गाधीना अटक करण्याचे ठरविले या गोष्टीला कार्यकारिणीच्या सभा-सदाबरोबरच मन्त्र्याचीहि समती असावी अशी गव्हर्नराची इच्छा होती त्यानी मन्त्रिमडळाची एक सभा बोलावली व या धोरणास पाठिंबा देण्याची मन्त्र्याना विनती केली चुनिलाल व मी या सकल्पाच्या विरुद्ध होतों व तसें आम्ही स्पष्टपणें सागितलें व्यावहारिक दृष्टिकोणातून पाहिले असताहि हा मार्ग हितावह नाही, गाधीना कैद करणे म्हणजे चौरीचौरा प्रकरणानतर घसरलेली त्याची लोकप्रियता त्याना पुन्हा मिळवून देण्यासारखे आहे असें आम्ही सागितलें तिसरे मत्री हिदायततुल्ला यानी मात्र कार्यकारिणीचे सभासद व गव्हर्नर याना पाठिंबा दिला गव्हर्नर आम्हा दोघावर फार नाराज झाले अखेरचें मत देण्याअगोदर बाहेर जाऊन पुन्हा या प्रश्नावर आपसात चर्चा करून येण्यास त्यानी आम्हाला सागितले आम्ही आमचें म्हणणे सोडलें नाही. एवढेंच नव्हे, तर तें त्याना लेखी सादर केलें या प्रसगी त्याना पाठिंबा दिला नसल्याचा राग त्यानें पुढें कायम मनात बाळगला असे वाटतें ही बाब सरकारच्या राखीव विभागात मोडत असल्यामुळें आम्हाला अधिक काहीच करता येण्यासारखें नव्हतें गाधीना अटक करण्याचा हुकूम देणाऱ्यातच आमचाहि लोक समावेश करीत दोन वर्षांनतरच्या माझ्या निवडणूक प्रचार मोहिमेच्या वेळी माझ्याविरुद्ध या गोष्टीचा वारवार उल्लेख करण्यात येई परतु गुप्ततेची शपथ घेतली असल्यामुळे मन्त्रिमडळात घडलेला खरा प्रकार जाहीर रीत्या मला कधीच सांगता आला नाही

त्या काळामध्ये मेडिकल, एजीनियरिंग व ॲग्रिकल्चर या विषयाच्या शिक्षणा-साठी फक्त एकेकच कॉलेज आमच्या प्रातात होतें त्याशिवाय मेडिकल शाळा तीन होत्या, एक पुण्याला, एक अहमदाबादला व एक सिंध-हैदराबादला पुणे व कराची येथे सिव्हिल एजीनिअरिंगचे डिप्लोमाचे वर्गहि होते या सर्व सस्था सरकारी होत्या उपलब्ध साधने व शिक्षकवर्गाची सख्या, या दोन गोष्टी लक्षात घेता या कॉलेजातून अगदी

थोड्याच विद्यार्थ्यांना प्रवेश देणे शक्य होई त्यामुळे प्रवेश मिळविण्यासाठी खूप स्पर्धा चाले या संबंधात लाचलुचपतीचे प्रकार सर्रास चालतात अशा अफवा ऐकू येत प्रत्यक्ष काय वस्तुस्थिति होती याचा अंदाज लावणें अशक्य आहे मात्र पूर्वीच्या विद्यापीठ परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे विद्यार्थ्यांची योग्यता पाहून मगच त्याला घेण्यात यावें असा हुकूम मी काढला प्रत्येक कॉलेजातल्या दहा टक्के जागा मागासलेल्या-साठी व दहा टक्के मुसलमानासाठी राखून ठेवल्या त्या वर्गांतील लोकांच्या मागणीला उत्तर म्हणून ही सवलत दिली होती मात्र या वर्गांमधूनहि विद्यार्थी घेताना त्याना सुद्धा लायकीचे तत्त्व आपसात लागू केले पाहिजे असा नियम मी घालून दिला त्या नंतर राखीव जागासाठी जोरदार मागणी करणारा विधान परिषदेचा एक सभासद मला भेटला या व्यवस्थेमुळे त्याचे आता समाधान झाले असेल अशा कल्पनेने मी त्याच्याजवळ बातचीत केली, तेव्हा आश्चर्याची गोष्ट म्हणजे हा गृहस्थ अद्याप नाखूषच असल्याचे आढळून आले त्याचे कारण असे की एंजीनिअरिंग कॉलेजात प्रवेश मिळविण्यासाठी अर्ज केलेल्या त्याच्या चिरंजिवांना शेवटी जागा मिळालीच नव्हती एकूण जागापैकी दहा टक्के जागा मागासलेल्या वर्गांसाठी राखण्यात आल्याचें मी त्याच्या निदर्शनाला आणले तेव्हा हा सर्व खटाटोप त्यानी जरी वरवर लोक-कल्याणार्थ केलेला दिसला तरी खरा येन केन प्रकारेण आपल्या मुलाला प्रवेश मिळवून देण्यासाठी तो केलेला होता हे स्पष्ट झाले

प्रवेशसंख्या वाढविण्यासाठी मेडिकल कॉलेजाकडे सतत मागणी करण्यात येई. परंतु उपलब्ध साधनें व प्रात्यक्षिक शिक्षणासाठी मिळणाऱ्या रुग्णांच्या खाटा, यावर हा आकडा अर्थातच अवलंबून ठेवावा लागे सूतिकाशास्त्राच्या प्रात्यक्षिक शिक्षणा-साठी बाळंतिणीच्या खाटा मिळण्यास विशेष अडचण पडे ब्रिटिश मेडिकल कौन्सिलने हिंदुस्थानमधल्या मेडिकल कॉलेजातल्या शिक्षणसाधनाची व सोयींची पाहणी करण्या-साठी व त्यावर अहवाल सादर करण्यासाठी एक प्रतिनिधि पाठवला होता बाळं-तिणीच्या खाटा मिळणे फार कठीण आहे असें त्यालाहि आढळून आले कारण बाळंतपणाच्या वेळेस पुरुष विद्यार्थी हजर असण्यास बहुतेक हिंदी स्त्रिया हरकत घेत असत तेव्हा विद्यार्थ्यांना इतर खाजगी व नगरपालिकेच्या दवाखान्यांमधल्या बाळंतपणाच्या केसेस मिळवून देण्याची सोय करण्यात आली व हा प्रश्न सोडविण्यात आला गेल्या चाळीस वर्षांत प्रांतामधल्या मेडिकल कॉलेजाची संख्या बरीच वाढली आहे पण देशात पाश्चिमात्य वैद्यकीची लोकप्रियता वाढल्यामुळें या कॉलेजात प्रवेश मिळवू इच्छिणाऱ्याची मागणी अजूनहि पुरी करता येत नाही

सर विश्वेश्वरअय्या यांच्या अध्यक्षतेखाली, तांत्रिक शिक्षणाचा प्रश्न हाती घेण्यासाठी एक समिति नेमण्यात आली होती परंतु मुंबईच्या व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल इन्स्टिटयूटला सरकारची सढळ मदत देण्यात येत असली तरी या संबंधात त्याखेरीज फारशी प्रगति करण्यात आली नाही

१९२३ मध्यें, मुंबईच्या जे जे हॉस्पिटलमध्यें गंभीर स्वरूपाची समस्या निर्माण झाली असल्याची बातमी मला सर्जन जनरलनें कळविली आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यातच दवाखान्यातल्या रुग्णाच्या जेवणासाठी मजूर झालेली रक्कम संपत आली होती वर्षाअखेरपर्यंत हॉस्पिटल सुरळीतपणें चालायचें असेल तर तडकाफडकी काहीतरी उपाययोजना करणें आवश्यक होतें अपघात किंवा तत्सम गंभीर केसेस दाखल करून घेण्यासाठी हॉस्पिटल तर सतत उघडें ठेवणे अपरिहार्य होते तेव्हा दवाखान्याच्या इतर विभागातून घेण्यात येणाऱ्या रुग्णाच्या संख्येवर मर्यादा घालावी, व बरे होण्याच्या मार्गावर असलेल्या रोग्याना योग्य ती दक्षता घेऊन अगदी पूर्ण बरे होण्याच्या आधी जाऊ द्यावे, असें सर्जन जनरलानी सुचविलें यामुळे लोकात मात्र बराच असतोष निर्माण झाला कर्णोपकर्णी अफवाचें पीक निघाल्यामुळें सर फिरोझ सेठना यानी मुबई नगरपालिकेंत या प्रश्नाला तोंड फोडले वेळे आधीच जाऊ दिलेले दोन रुग्ण दगावले असल्याची एक वदता उठली होती अवेळीं सोडण्यात आलेल्या रोग्यामध्यें एकहि मृत्युमुखी पडला नसल्याचें जरी सरकारनें जनतेसमोर सविस्तर पुराव्यानिशी सिद्ध केले, तरी लोकामधला असतोष दीर्घ काळ धुमसतच राहिला

मला असलेल्या अनेक डोकेदुख्यापैकी सर्वांत तापदायक म्हणजे सरकारी नोकराच्या नेमणुका करण्याची कामगिरी त्या काळामध्ये पब्लिक सर्व्हिस कमिशन नव्हतें हिंदुस्थानातल्या वेगवेगळ्या सर्व्हिसेसमधून नेमणूक करण्याचे काम सेक्रेटरी ऑफ स्टेट हा, पुष्कळदा स्थानिक सरकारच्या सल्यानुसार करी इतर कमी दर्जाच्या नोकरांच्या नेमणुका स्थानिक सरकार करी बहुधा या नेमणुका निवड समितीच्या आदेशानुसार करण्यात येत सरकारी सभासदाकडे खास शिफारसी करून त्याच्यावर वजन आणण्याचा प्रयत्न करण्याचे प्रकार आजच्याप्रमाणे तेव्हांही सर्रास चालत. माझ्या कर्तव्याचा हा भाग मला मनापासून अप्रिय वाटे जेव्हा मी एक जागा भरतो, तेव्हा मी शभर शत्रू व एक कृतघ्न माणूस उत्पन्न करतों" या चौदाव्या लुईच्या शब्दाची प्रचीति मला पुरेपूर आली माझ्या दौऱ्यांमध्ये, व विशेषत निवडणूक प्रचार मोहिमेमध्यें मला सर्वांत अधिक जाच झाला असेल तर मी केलेल्या या किंवा त्या नेमणकीबद्दल मला विचारण्यात आलेल्या जाबाचा जातीयवाद, व्यक्तिगत पक्षपात, एकाद्या विशिष्ट पक्षाशी सहानभूति, असे कितीतरी आरोप माझ्यावर करण्यात आले सुदैवाने पैशाच्या बाबतीचा आरोप मात्र माझ्यावर कधी करण्यात आला नाही निवडसमिती अथवा खातेप्रमुख यांनी केलेल्या शिफारसीत मी बहुधा ढवळाढवळ केल्याचे मला स्मरत नाही एक दोन बाबतीत मात्र अपुऱ्या विचारानी निर्णय घेण्यात आला असल्याची खात्री झाल्यावरून मी मध्यें पडलो होतों पैकी एका केसमध्ये सर्वांत लायक उमेदवाराला त्याचे व्यक्तिमत्त्व उठावदार नाहीं या सबबीवरून नाकारण्यात येणार होते अनुभव व शैक्षणिक लायकी लक्षात घेता, या

जागेसाठी तोच सर्वांत लायक इसम होता ही गोष्ट निर्विवाद होती आपल्या कॉलेजचे जुने प्रिन्सिपल हे मंत्री असूनहि आपल्याला काही खास सवलत मिळत नाही अशी फर्ग्युसनच्या जुन्या विद्यार्थ्यांची कुरकुर मी ऐकली आहे अशा प्रकारच्या नेमणुका करण्याचे काम आता मंत्र्याच्या अथवा सरकारच्या कक्षेबाहेर ठेवण्यात आले असून निःपक्षपाती अशा पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या हातात सोपविण्यात आले आहे, ही अत्यंत समाधानाची गोष्ट आहे मात्र अजूनहि गैर प्रकार चालू असल्याचे कानावर येतेच विशेषत वैद्यकीय सर्टिफिकेट देण्याच्या व कमिशनच्या अधिकाराबाहेर तात्पुरत्या जागा निर्माण करण्याच्या संबधात अशा बऱ्याच तक्रारी ऐकू येतात माझ्यावर आरोप करणारे लोक, माझ्या जागी असते तर कसे वागले असते याची अटकळ करणे कठीण नाही

मंत्रिपदावर असताना मी संपूर्ण इलाख्याचा दोनदा दौरा काढला बहुतेक सर्व जिल्ह्यांची प्रमुख ठाणी व इतर अनेक लहान गावें मी हिंडून आलो या दौऱ्यामुळें वस्तुस्थितीची प्रत्यक्ष पहाणी करायला मला संधि मिळत असे शिवाय जनतेचें प्रत्येक खरे व कल्पित गाऱ्हाणे ऐकण्याचा मोका मिळे मला भेटणाऱ्या मंडळींना माझ्या खात्यापुरती सरकारच्या वेगवेगळ्या धोरणामागे असलेली कारणे व मला तोंड द्याव्या लागणाऱ्या आर्थिक व इतर अडचणी याची कल्पना देण्याचा मी प्रयत्न करी सरकारी मंन्थामधला गैरकारभार व लाचलुचपतीचा प्रघात या विषयीच्या असंख्य तक्रारी माझ्या कानावर येत परंतु तक्रारी करणारांना त्याचें म्हणणें लेखी सादर करून त्याचें समर्थन करण्याची तयारी बाळगण्यास सांगितलें कीं बहुधा प्रकरण तिथेंच संपत असे अधिकारावर असलेल्या कुणाहि व्यक्तीला निव्वळ अफवाच्या जोरावर दाद घेता येत नाहीं काही दखल घेतली जावी अशी अपेक्षा करणाऱ्या मंडळींनी, त्यांचे आरोप हे निराधार किंवा पोकळ असल्याचें किंवा वैयक्तिक द्वेषापोटी करण्यात आले असल्याचे सिद्ध झाले तर त्याचे परिणाम भोगण्यास तयार असलें पाहिजे नंतर त्यानी कचरता कामा नये अशाच प्रकारे, शस्त्रक्रियेच्या टेबलावर असलेल्या असहाय्य रुग्णांकडून सरकारी डॉक्टर पैसे उकळतात, तसेच परिचारिका व इस्पितळातील इतर नोकर रोग्यासाठी असलेले दूध व इतर खाद्यपदार्थ आपणच बळकावून बसतात, अशा तक्रारी अधूनमधून माझ्याकडे येत मात्र हे आरोप धीटपणाने सिद्ध करायची व त्यामागे कदाचित् उलट अब्रूनुकसानीची फिर्याद स्वत वर ओढवून घेण्याची कुणीहि तयारी दर्शविली नाही अशा परिस्थितीत कितीही सदिच्छु मंत्री मंत्री असला तरी त्याला देखील दाद घेणे शक्य होत नाही

१९२१ साली गांधींना अटक झाल्यापासून असहकार चळवळ मंदावत गेली. सरकारी शाळाकॉलेजांना पुन्हां लोकाश्रय मिळू लागला ज्या थोड्या वकिलांनी धंदा बंद केला होता, ते पुन्हा कोर्टांत जाऊ लागले बाहेरून सरकारला विरोध करण्यापेक्षा कौन्सिलातच राहून केला तर तो अधिक परिणामी होईल असे चळवळीतल्या

बहुतेक नेत्याना कळून चुकलें किंबहुना याच उद्देशानें कॉंग्रेस पक्षामधल्या एका वजनदार गटाने सी आर दास यांच्या नेतृत्वाखाली स्वराज्य पक्ष स्थापन केला. मुबई इलाख्यामध्ये तर स्वराज्य पक्ष हा कॉंग्रेसची एक महत्त्वाची शाखाच बनला आगामी निवडणुका लढविण्याचा चग या गटाने बाधला होता पहिल्यानें तर जुन्या धर्तीवर राज्य चालविणे हें अशक्य, निदान अवघड तरी, करून सोडण्याचाच त्याचा इरादा होता, व बहुमत मिळाले तरी मत्रिपद स्वीकारण्यास त्याच्यापैकीं कुणी राजी नव्हते

१९२३ च्या उत्तरार्धात माझी बहुतेक शक्ति निवडणूक मोहिमेसाठी खर्ची पडली स्वराज्य पक्षाने माझ्याविरुद्ध एक जबरदस्त उमेदवार उभा केला तो म्हणजे कॉंग्रेस पक्षामधले एक प्रमुख नेते मु रा जयकर मुबईमध्ये फार मोठ्या प्रमाणावर त्याची वकिली होती, आणि सबध इलाख्याभर धद्याच्या व इतर सबधातल्या त्याच्या असख्य ओळखीपाळखी होत्या देशातले एक अत्यत प्रभावी वक्ते म्हणून त्याचें नाव होते तेव्हा या निवडणुकीत अगदी वजनदार अशा प्रतिस्पर्ध्याशी मला सामना द्यायचा होता अगदी अनुकूल काळांतसुद्धा कोणच्याहि मत्र्याला जनतेतील काही वर्गाचा आपणावर रोष ओढवून घेणे हें क्रमप्राप्तच असते निवडणूक मोहिमेसाठी कारवारपासून जाकोबाबादपर्यंत मी सपूर्ण इलाखा पालथा घातला प्रत्येक ठिकाणी मतदाराच्या भेटी घेऊन, त्याच्यापुढे माझी बाजू माडली लिबरल पक्षाचा पुरस्कर्ता म्हणून मी उभा होतों आपल्या मवाळ धोरणामुळे हा पक्ष कधीच फारसा लोकप्रिय झाला नाही मात्र बऱ्याच ठिकाणी माझ्या जुन्या विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहान मला मदत केली जयकर बहुधा मी दिलेल्या भाषणाचा व मी घेतलेल्या सभाचा परिणाम कमी करण्यासाठी माझ्या पाठोपाठ हिडत प्रभावी व्यक्तिमत्त्व व वक्तव्य या दोन्ही गोष्टीमुळे लोकावर त्याची छाप पडे कुठल्याहि प्रकारची कटुता वा लाथाळी याचा उभयपक्षी या चुरशीमध्यें सपूर्ण अभाव होता निवडणूकीनतरहि आमचा स्नेह कायम टिकला जयकरानी हा सामना जिंकला मला वाटते महाराष्ट्रात मला बहुमत मिळून सिंध व कर्नाटकात जयकराच्या इतकीच मतें मला पडली असावीत गुजराथेत मात्र माझ्या विरुद्ध विशेष दुराग्रह असल्याकारणाने व मुबईत जयकराचे अनेक लागे-बाधे व अनुयायी असल्याकारणाने या दोन्ही ठिकाणी त्याना प्रचड बहुमत मिळाले एकूण मतदान १०,००० होऊन २००० मतानी जयकराची सरशी झाली मला यात काहीच आश्चर्य वाटले नाही देशामध्ये इतर ठिकाणीहि, लिबरल पक्षाच्या बहुतेक मत्र्याची माझ्यासारखीच गत झाली होती स्वराज्य पक्षाच्या विरोधकानी त्याना ठिकठिकाणी हरविले निकाल जाहीर होतांक्षणीच मी गव्हर्नरकडे माझा राजिनामा धाडून दिला त्यानतर एका आठवड्यातच मला अधिकारपदातून मोकळे करण्यात आले व मी पूर्वीचेच काम परत चालू करण्यासाठी फर्ग्युसन कॉलेजात दाखल झालो. गव्हर्नरकडून नेमणूक करून घेऊन विधान परिषदेमध्ये मागील दाराने घुसण्याचा

मी कधीच प्रयत्न केला नाही हे जाता जाता नमूद करावेसे वाटते किंबहुना निवड-पूर्वीच अगदी सरळसरळ पराभूत झालो असल्याकारणाने सभासदत्व पुढे चालू ठेवणे मला इष्ट वाटत नसल्याचे मी चुनिलाल मेहतांना गव्हर्नरच्या कानावर घालायला सांगितले

## प्रकरण तेरावे

# समित्या ( कमिट्या )

जानेवारी १९२४ मध्यें मी पुनरपि फर्ग्युसन कॉलेजच्या प्रिन्सिपॉलचें काम हातीं घेतले खरे, परतु हिंदुस्थान सरकारने आणि मुबई सरकारनें अनेक समित्यावर माझी नेमणूक केल्यामुळे कॉलेजच्या कामाला मला सर्वस्वीं वाहून घेता येईना समित्याच्या कामात माझा बराचसा वेळ खर्च होई आणि १९२४ च्या अखेरीस जेव्हा कर विवेचन समितीवर (Taxation Enquairy Committee) जेव्हा माझी नेमणूक झाली आणि वर्षभर मला पुण्याबाहेर रहावें लागेल असें दिसले तेव्हा प्रिन्सिपलपदाचा मी राजिनामा दिला एक वर्षानतर १९२६ मध्यें मी फिरून गणिताचा प्राध्यापक म्हणून काम करू लागलों परतु १९२७ मध्यें मुबई सरकारच्या मत्रिमडळात नेमला गेल्यानें मी डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा राजिनामा दिला. कारण आजीव सभासदाच्या शपथेप्रमाणे सोसायटीच्या सेवेचीं माझीं २० वर्षे पूर्ण झाली होती

म्यूडिमन कमिटीवरचे माझे पहिलें काम ही कमिटी मॉटेग्यु-चेल्म्स्फर्ड सुधारणाच्या तीन वर्षांच्या कारकीर्दीचा आढावा घेण्याकरता व त्यात सुधारणा सुचविण्याकरिता नेमली होती कमिटीचे नऊ सभासद होते आणि व्हाइसरॉयच्या एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलचे सभासद सर अलेक्झाडर म्युडिमन हे कमिटीचे अध्यक्ष होते सर तेजबहादुर सप्रू, सर शिवस्वामी अय्यर, एम ए जीना आणि मी लोकमताचे प्रतिनिधित्व करीत असू, व्हाइसरॉयच्या एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलचे शिक्षण सभासद सर महमद शफी आणि बरद्वानचे महाराजाधिराज हे दोघे साधारणपणे ब्रिटिश सरकारची बाजू घेत अध्यक्षाव्यतिरिक्त आणखी दोन सरकारी अधिकारी कमिटीचे सभासद होते वेगवेगळ्या प्रातातून मत्री या नात्यानें कार्य केलेल्या लोकाच्या आणि इतर सार्वजनिक कार्यकर्त्यांच्या साक्षी कमिटीने घेतल्या कमिटीच्या बहुसख्य सभासदाच्या अहवालावर फक्त पाच जणांच्या सह्या होत्या आणि अल्पसख्याकाच्या अहवालावर आम्ही चौघानी सह्या केल्या होत्या आमचा अल्पसख्याकाच्या अहवाल

सर तेजबहादूर सप्रू यानी तयार केला होता आणि हिंदी मताची यथार्थ भूमिका त्यात फार उत्कृष्टपणे मांडली होती कमिटीपुढें आलेल्या सभासदापैकी सी वाय. चितामणी याची प्रभावी साक्ष आणि लाला हरकिसन लाल यांची महत्त्वपूर्ण कबुली माझ्या चागली स्मरणात आहे सर हार्कोर्ट बटलर हे यू पी चे गव्हर्नर असताना मंत्रिमंडळ एकजुटीनें चागले काम करू शकले, असे चितामणी याचें म्हणणे पडले, तर लाला हरकिशन लाल याची अशी तक्रार होती की मंत्रिमंडळातील सर्व सभासद सरकारच्या बाजूचे अथवा प्रतिगामी वृत्तीचे असल्यामुळें आपण एकटे काही करू शकलो नाही त्या वेळी पंजाबमधल्या एका मुसलमान जमीनदाराने मला दोन रुपड्याच्या वकीलापुढें साक्ष द्यायची नाही ' असे म्हणून सर शिवस्वामी अय्यर याचा उपमर्द केलेला मला चांगला आठवतो कमिटीच्या अधिकृत वृत्तान्तांत ह्या प्रसगाची नोंद बगळण्यात आली असली तरी आम्हा सर्वावर त्याचा इतका परिणाम झाला की तदनंतर त्या जमीनदाराची साक्ष आम्हीं घेतली नाही

त्या कमिटीच्या बहुसंख्य अथवा अल्पसंख्य अहवालातील शिफारशींची तपशील वार चर्चा करणे आता व्यर्थ आहे कारण त्यानतर झालेल्या राजकीय घटनामुळें मॉंटेग्यु-चेम्सफर्ड राजवटीचे नि·पक्ष विवेचन अशक्य होऊन बसले शिवाय हिंदु-स्थानच्या राजकीय प्रगती-नौकेने अगदी निराळाच मार्ग देखील स्वीकारला होता

हिंदुस्थानचा सहायक आणि प्रादेशिक सेनाचा प्रसार आणि वृद्धि करण्याचा विचार करण्यासाठी सरकारने जनरल शे याच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमली होती त्या शे कमिटी वरही सभासद या नात्याने मी काम केले आपला देश सदोदित आत्मसरक्षणक्षम असला पाहिजे असा माझा नेहमीच आग्रह होता, आणि कित्येक वर्षे सक्तीच्या लष्करी शिक्षणाचा मी पुरस्कार करीत होतों फार काय, १९१३ साली न्यू स्टेट्समन हे लडन येथे नवीनच भारदस्त साप्ताहिक सुरू झालें होतें, त्यात युरोपिअन अँग्लोइंडियन आणि काही पारशी लोकाप्रमाणे सर्व भारतीयानाही स्वयसेवक दलात प्रवेश मिळावा असा जारीचा पुरस्कार त्या साप्ताहिकात एक लेख लिहून मी केला होता पहिल्या महायुद्धापूर्वी लॉर्ड रॉबर्टस् याच्या इग्लडमधील सक्तीच्या लष्करी भरतीच्या प्रचाराचा हिंदी मनावर झालेल्या परिणामाचा या लेखांत मी विचार केला होता, आणि हिंदुस्थानातील अफाट मनुष्यबल परकीय आक्रमणाविरुद्ध आणि अतस्थ दगेधोप्याना तोंड देण्यासाठी कारणी लावावें असा दावा मांडला होता हिंदी सैन्यात तेव्हां सुशिक्षित भारतीयाना अधिकाराच्या वरच्या जागा दिल्या जात नसत त्याची भरती फक्त साधे शिपाई म्हणून होत असे आणि फार तर व्हाइसरॉय कमिशन मिळालेले जमादार अथवा सुभेदार येवढ्याच हुद्या-पर्यंत त्यांची बढती होऊ शकत असे सुशिक्षित हिंदी लोकाना देशाच्या सरक्षण खात्यात सपूर्ण मज्जाव होता दुर्दैवाने त्या वेळी हिंदी पुढाऱ्याचे लक्ष राज्यघटना, कारभार आणि सनदी नोकरवर्गामधील हिंदी लोकाचा प्रवेश यावरच केंद्रित

झाले असल्यामुळें देशाच्या सरक्षणाविषयीच्या प्रश्नात ते फारसे मन घालीत नसत हे कदाचित् स्वाभाविक ही म्हणता येईल कारण त्यावेळी लष्कर अथवा स्वदेश-सरक्षण या क्षेत्रातून भारतीयाना अगदी अलिप्त ठेवलेले होते सर शिवस्वामी अय्यर ह्या जवळ जवळ एकमेव पुढाऱ्याने मात्र वेळोवेळी प्रसिद्ध झालेल्या सरकारी वाङमया-वरून या विषयाचा सखोल अभ्यास केला होता

सैन्यसरक्षणादि विषयासबधी सुशिक्षित भारतीयाच्या मनात आस्था आणि कळकळ निर्माण करण्याचे कटाक्षाने टाळल्याचे परिणाम, पहिल्या महायुद्धात, मोठ्या प्रमाणांत सैन्याच्या सर्व दलातून भरती करण्याची जरुरी पडली तेव्हा, दिसून आले भरती करणाऱ्या अधिकाऱ्याना हिंदी पुढाऱ्याकडून पुरेसें सहकार्य मिळाले नाही आणि त्यामुळे सैन्य भरती करणे काहीसे कठीण होऊन बसले, युद्ध परिस्थित्य-नुरूप अखिल देशाचे बळ तत्काळ केंद्रित करणे अशक्य झाले काही थोड्या हिंदी लोकाना सैन्यात खास कमिशन देण्यात आले पण त्यासबधी नियमबद्ध अशी कायमची पद्धत नव्हती युद्ध सपत आले तेव्हा सरकारी चक्रें हालू लागली आणि सॅण्डहर्स्ट येथे, अथवा हिंदुस्थानात तसेच एखादें कॉलेज काढून तेथे, सैनिकी शिक्षण घेतल्यावर सैन्यातील वरच्या अधिकाऱ्याच्या जागावर भारतीयाची नेमणूक करण्या-सबधीचा विचार करण्याकरिता एक समिती नेमली गेली या धोरणाचा प्रारभ म्हणून सरकारने दर सहा महिन्याने दहा दहा निवडक तरुणाना सॅण्डहर्स्ट येथें शिक्षणा-करिता पाठवायचे ठरवले हा कार्यक्रम फारसा यशस्वी झाला नाही कॉलेजातील विद्यार्थ्यांना काही प्रमाणात लष्करी शिक्षण देण्याची घोषणा सरकारने केली आणि १९१८ मध्यें इडियन डिफेन्स फोर्सची ऐच्छिक धर्तीवर स्थापना केली या इडियन डिफेन्स फोर्सची घटना आणि तीत दाखल झालेल्याची सख्या असावयास पाहिजे तशी नव्हती तरी पण योग्य दिशेने टाकलेले हे एक पाऊल होते आणि मी त्याचे स्वागत करून माझ्या कॉलेजातील विद्यार्थ्यांना या तुटपुज्या का होईना पण देशहित-कारक योजनेचा फायदा घेण्यास उत्तेजन देत असे लोकमान्य टिळकानीहि या योजनेला हार्दिक पाठिबा दिला हें सागावयास मला अत्यानद होतो मुबई यूनिव्हर्सिटीच्या सेनेटमध्ये लष्करी शिक्षण हे सक्तीचे करावे आणि प्रकृतिविषयक सबळ कारण असल्याखेरीज हे शिक्षण घेतल्यावरच विद्यार्थ्यांना डिग्री दिली जावी असा मी विद्यापीठाच्या सेनेटपुढें ठराव आणला होता, पण एकच मताने तो अमान्य झाला. हें शिक्षण विद्यार्थ्यांना देण्याचा आग्रह धरण्यात माझे दोन हेतु होते सुशिक्षिताना स्वदेशसरक्षणासबधी जागृत करणे हा एक आणि विद्यार्थ्यांमध्ये शिस्तीची जाणीव व शारीरिक मेहनतीची सवय करून देणे हा दुसरा आजही अशा तऱ्हेचें सक्तीचें लष्करी शिक्षण सर्व कॉलेजातील विद्यार्थ्यास दिले जावे, किंवा तें नाही तर कोणतें तरी त्याना देशसेवेचे कार्य सक्तीने करावयास लावावे असें माझें मत आहे कारण हा पदवीधर पुढे आपल्या लहानमोठ्या क्षेत्रात पुढारी व्हावयाचा आहे

मागे उल्लेख केलेल्या जनरल शे याच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या सहायक आणि प्रादेशिक सेना समितीमध्ये सर शिवस्वामी अय्यर, अलिगडचे डॉ हैदर आणि मी सभासद होतो या समितीमध्ये कॉलेजातील विद्यार्थ्यांच्या बावतीत सक्तीच्या लष्करी शिक्षणाचा मी पाठपुरावा केला, पण माझी भूमिका पूर्णपणे मान्य झाली नाही तरीहि समितीने खाली दिल्याप्रमाणें आपले मत व्यक्त केलें आहे

युनिव्हर्सिटी ट्रेनिंग कोर ' ही योजना देशाच्या लष्कराचा पाया समजली जावी आणि तिच्या वाढीवर कोणतीही कृत्रिम मर्यादा घातली जाऊ नये, आणि जेथे या तऱ्हेच्या ट्रेनिंग कोर नसतील अशा प्रत्येक विद्यापीठात ह्या पद्धतीची सेना-उभारण्याम व तिची सर्वांगीण प्रगति करण्यास उत्तेजन दिले जावे अशी शिफारसही समिति करीत आहे प्रतिपादन केलेल्या या सामान्य तत्त्वाप्रमाणे दलात विद्यार्थ्यांची भरती होण्यासाठी कोणत्याहि प्रकारें सक्ती केली जाऊ नये, परतु जर एखाद्या विद्यापीठाला शिस्त आणि सर्वसाधारण नियम म्हणून सर्व विद्यार्थ्यांना युनिव्हर्सिटी ट्रेनिंग कोर मध्ये दाखल होण्याची सक्ती करावीशी वाटली तर करण्यास मुभा ठेवण्यात यावी असे समितीला वाटते

समितीच्या ह्या शिफारशी फारशा फलद्रूप झाल्या नाहीत ह्या समितीवर काम केल्याने मला मात्र लष्करी योजनाची आणि स्वदेशसरक्षणाच्या प्रश्नाची बरीचशी कल्पना आली

१९२४ मध्यें मुबई युनिव्हर्सिटीची सुधारणा करण्याचा विचार करण्यासाठी मुबई सरकारने सर चिमणलाल सेटलवाड कमिटी नेमली होती तिचा मी सभासद होतों या समितीच्या पुष्कळ सभाना मी हजर राहिलो पण जेव्हा कर विवेचन समितीवर माझी नेमणूक झाली तेव्हा या कमिटीच्या सभाना उपस्थित रहाणे मला अशक्य झाले आणि मीं तिचा राजिनामा दिला परतु समितीवर काम करीत असताना पुणे येथे युनिव्हर्सिटी काढण्यासाठी मी पुष्कळ आग्रह धरला आणि तेथें पुण्यापुरतीच (युनिटरी) युनिव्हर्सिटी काढण्यासाठी एक तपशीलवार योजनाही मी सादर केली होती समितीला माझा दृष्टिकोन मान्य झाला नाही आणि तिने महाराष्ट्रातील पुण्याबाहेरची कॉलेजेंही या पुणे युनिव्हर्सिटीच्या कक्षेत आणून मुबई युनिव्हर्सिटीचा भार हलका करावा अशी शिफारस केली या सेटलवाड कमिटीच्या शिफारसी कार्यान्वित झाल्या नाहीत १५ वर्षांच्या अवधीनतर नामदार जयकराच्या अध्यक्षते-खाली दुसरी एक समिति नेमली जाऊन तिने पुणें विद्यापीठाचा पाया घातला. यासबधी पुढे सविस्तर माहिती येईलच

मत्रिपद सोडल्यापासून ज्या अनेक कमिटयावर सभासद या नात्याने मी काम केलें त्या सर्वांत महत्त्वाची कमिटी सर चार्लस टॉडहटर याच्या अध्यक्षतेखाली नेमलेली कर विवेचन कमिटी (Taxation Enquiry Committee) ही होती सर पर्सी टॉमसन, बरद्वानचे महाराजाधिराज, डॉ हैदर आणि सरदार जोगिंद्रसिंग

हे या कमिटीचे इतर सभासद होते ह्या कमिटीने सर्व प्रातातून दौरे केले, वेगवेगळ्या देशातील प्रचलित आणि सभाव्य कर योजनाचा तिने अभ्यास केला मध्यवर्ती आणि प्रातीय सरकारें यांमध्यें कराचे कसें विभाजन व्हावे याचाही विचार करून कर वसुली योग्य प्रकारे कशी करता येईल व तिच्या मार्गांत काय काय अडचणी येतील याचेंही परिशीलन केलें स्वाभाविकच मध्यवर्ती आणि प्रातीय सरकारें याना कमिटीचा अहवाल हा एक प्रकारे सदर्भ ग्रथ व्हावा अशी अपेक्षा होती प्रत्येक कर विषयक प्रश्नाची सर्व सभासदांना जरी माहिती होती तरी आम्हापैकी प्रत्येकाला काही विशिष्ट कराचा खास अभ्यास करून कमिटीपुढें तत्सबधी शिफारसी करण्याचे काम दिले होते मृत्यू-कर आणि बारसा कर याचा या योजनेनुसार मी विशेष अभ्यास केला फार पूर्वीपासून या दोन्ही करांचे महत्त्व माझ्या ध्यानात आले होतें कार्यक्षम सरकारी यत्रणा अस्तित्वात असेल तरच अर्थप्राप्ति आणि अर्थवितरण व्यवस्थित होऊ शकतें असे मी मानतो देशाची सपत्ति उत्तरोत्तर वाढावी याकरितां सर्व प्रकारच्या सवलती आणि उत्तेजन द्यावे हें जरी खरे असलें तरी एखाद्या विशिष्ट वर्गालाच काही एक काम व श्रम न करता जीवनातील उत्तमोत्तम उपभोग केवळ जन्माच्या आधारावर घेण्याला सरकारने मदत करणें बरोबर नाही, म्हणूनच व्यवहारातील प्रत्येक बाबतीत बारसाहक्काच्या आत्यतिक अमलबजावणीला मी सतत विरोध करीत आलों आहें सपत्तीची प्राप्ति आणि साठा करण्यामागे सत्ता आणि उपभोग स्वत करिता प्राप्त करून घेण्याचा माणसाचा हेतु तर असतोच, पण आपल्या बायका-मुलानाही ती मिळवून देण्याचा उद्देश असतो मान आणि पैसा मिळवण्यासाठी मनष्याला जर बिकट परिस्थितीशी फार झगडावे लागले असेल तर आपल्या मुलावर तरी तसा प्रसग येऊ नये याकरिता तो झटत असतो खाऊन पिऊन सुखी असलेल्या गृहस्थाचीं मुले सुखवस्तु परिस्थितीत वाढलेली असतात, आणि त्याला अचानक मृत्यू येऊन ही परिस्थिति जर पालटली तर त्याच्या मुलाचे जितके हाल होतील तितके हाल सुखवस्तु परिस्थितीला नेहमीच अपरिचित असलेल्या मुलाचे कवीच होणार नाहीत तेव्हा मृत्यूनतर मनुष्याच्या इस्टेटीचा काही भाग त्याच्यावर प्रत्यक्ष-पणे अवलबून असलेल्या मडळीना मिळावा हें रास्त आहे परतु काहीही कष्ट न करता अशा सुलभ प्रकारे पैसा हाती येण्याची जर खात्री असेल तर समाजात बाडगुळा-प्रमाणें ऐतखाऊ माणसे निर्माण होण्याची भीति असते आपल्या घराण्याला नावलौकिक मिळवून देऊन तें कायमचे प्रस्थापित करणे ही एक प्रशसनीय महत्त्वा-कांक्षा असून आयुष्यांत परिश्रम करण्याला तें एक मोठें विलोभन आहे, असा दावा केला जातो, पण अशा प्रकारे सहजरीत्या हाती आलेला पैसा तो कमावण्या-करिता किती परिश्रम पडतात याची मुळीच जाणीव नसलेल्या मडळीच्या हातून सहज रीत्या उधळला जातो असे निदान हिंदुस्थानात तरी अनेक वेळा दिसून आले आहे तीन पिढ्यानतर हाती फिरून झोळी अशा प्रकारची इग्रजी म्हण हिंदुस्थानला

विशेष लागू पडते पुरातन काळीसुद्धा जेव्हा शूर योध्यानी लहान मोठे प्रात जिकून तेथे आपापली राज्ये स्थापन केली तेथेही त्याचे वशज राज्यावर फार दिवस टिकले नाहीत, असेच आढळून येते शिवाय आळशी किंवा कुचकामी लोक केवळ जन्माच्या जोगवर आयुष्याचा उपभोग घेताना आणि इतर कष्टाळू लोक जीवनातील विकट परिस्थितीशी झगडताना पाहिले म्हणजे साहाजिकच अनेकाच्या मनात हेवा व असतोष निर्माण होतो या विषमतेचा विचार करता असे वाटते की कर योजनेचा मूळ उद्देश जरी सरकारचा राज्यकारभार सुव्यवस्थितपणें चालवण्याकरिता अर्थ-प्राप्ति करून देणे हा असला तरी ते करतांना सरकारने समाजव्यवस्थेकडेही लक्ष पुरवले पाहिजे आणि ज्या योगें प्रत्येक नागरिकाला त्याची कुवत, लायकी आणि श्रम याचा योग्य मोबदला मिळेल आणि आळसात, आरामात आणि कदाचित् व्यसनातही कोणालाच आयुष्य कठता येणार नाही अशी व्यवस्था कराच्या साधनाने करतां आलीं तर ती करणे योग्य आहे त्यासाठी वाढत्या श्रेणीचे मत्युकरांची वसुली करणें हा सुयत्रित कर योजनाचा एक महत्त्वाचा घटक असणें अवश्य आहे

तसे पाहिले तर मृत्युकर हा अलिकडेच प्रचारात आला आहे सर्वप्रथम इग्लडमध्ये सर विल्यम हारकर्ट हे प्रागतिक पक्षाचे अर्थमत्री असताना तो मागील शतकाच्या शेवटच्या दशकात जारी करण्यात आला, परतु आजमितीला बहुसख्य राष्ट्रामध्ये अर्थव्यवस्थेचा तो एक महत्त्वाचा भाग झाला आहे मध्यवर्ती सरकार आणि प्रातिक सरकारे यामध्ये प्राप्तिकराप्रमाणे मृत्युकराच्या विभाजनाचाही विचार आमच्या कमिटीला करावा लागला आणि त्याबाबत काही प्रातसरकारें सपत्तीचे उत्पादन ज्या प्रातात होते तेथे कर बसवावा असा आग्रह धरीत तर, इतर प्रातसरकारे सपत्ती ज्याच्या खिशात जाते तो मालक ज्या प्राताचा नागरिक असेल त्या प्रातात करवसुली व्हावी असा दावा करीत, हे आणि तत्सम प्रश्न दीर्घ कालपर्यंत सर्व सयुक्त राज्यघटनामध्ये चर्चिले जाणारच

करव्यवस्था न्याय्य आणि व्यवहारी आहे किंवा नाही एवढेच फक्त कर विवेचन समितीला विचारात घ्यायचे होते करवसुलीच्या प्रत्यक्ष विनियोगाशी तिला काही कर्तव्य नव्हते परतु करयोजनेविषयीच्या माझ्या मतासबधी गैरसमज होऊ नये म्हणून अहवालास मी जी पुस्ती जोडली होती ती बव्हशाने खाली दिली आहे लोकानुवर्ती सरकारनें कर व्यवस्थेसबधी काय धोरण बाळगावे याविषयीचे माझे विचार या पुस्तीमध्ये माडले आहेत

कर बसविणे ही कल्पनाच वाईट आहे हे अनेक ठिकाणी माडलेले मत मला ग्राह्य नाही एक तर आर्थिक विषमता अशत तरी दूर करण्याची प्रबळ शक्ति कर-योजनेंत आहे दुसरे असे की सर्वांत गरीब वर्गातील लोकही आपल्या मिळकतीचा बराचसा भाग निरुपयोगी किंवा दुरुपयोगी रीतीने खर्च करतात आणि म्हणून सरकारनें ह्या उधळपट्टीतील काही भाग काढून घेऊन त्याच लोकाच्या कल्याणार्थ

तो खर्च करावा हे उचित होय ह्या आणि इतर कारणास्तव योग्य विनियोग करणारी करयोजना ही आपत्ति न होता कल्याणकारी शक्ति होऊ शकेल करासबधीच्या प्रश्नाचाच फक्त कमिटीने विचार करावा असा निर्बंध कमिटीपुढे येणाऱ्या कामकाजावर साहजिकच होता वसूल केलेल्या रकमेच्या विनियोगाचा विचार जर कमिटीला करावयाचा असता तर मध्यवर्ती, प्रातिक आणि स्थानिक सरकाराच्या कारभाराचे अनेक प्रश्नही तिच्या कक्षेत आले असते तेव्हा असे दिसून येईल की, कमिटीच्या शिफारसी जर अमलात आणावयाच्या असतील तर विशिष्ट प्रकारचा आणि विवक्षित मर्यादेपर्यंत खर्च करण्याच्या योग्यायोग्यतेसबधी स्वतत्र निर्णय पहिल्याने घेतला पाहिजे कमिटीच्या अहवालानुसार केवळ वसुली शक्य आहे, म्हणून ती वसुली कोणी, कशी व कशाकरिता खर्च केली जाईल याचा विचार केल्याशिवाय कर बसवणे अयोग्य होईल या दुसऱ्या मुद्यासबधी विशेष आग्रहाने मला असें मागावयाचें आहे की खजिना भरलेला असताना साधारणपणें सर्व राज्यकर्ते आणि विशेषत बेजबाबदार किंवा अशत जबाबदार राज्यकर्ते, याचे काटकसरीने राज्यकारभार करण्याकडे लक्ष नसते, आणि म्हणून खर्चाच्या विनियोगासबधी लोकप्रतिनिधींची मान्यता असल्याखेरीज अर्थप्राप्तीच्या नवीन योजना जारी केल्या जाऊ नयेत उलटपक्षी जेथे सपूर्णपणे जबाबदार राज्यपद्धति आहे आणि राज्यकर्त्यांच्या कर्तव्यासबधीच्या नवीन विचारप्रवाहानुसार जेथे अनेक योजना पुढे येतात, त्यांच्या अमलबजावणीकरिता अर्थयोजना करणे उचित आहे अशा योजनामध्ये मी पुढील कार्याचा समावेश करीन देशातील नैसर्गिक सपत्तीचा उपयोग करून पाणीपुरवठा आणि जलविद्युत् योजना करणे, सर्वांच्या शिक्षणाची पुरेशी सोय, दळणवळणाची सुलभता, जनतेच्या आरोग्याची आणि तिला वेळेवर वैद्यकी सहाय्य मिळविण्याची व्यवस्था करणे, म्हाताऱ्याना वृत्ति, गरिबाना मदत आणि त्याच्याकरिता योग्य वसतिस्थाने, बेकाराना सहाय्य, कलाना उत्तेजन, शास्त्रीय सशोधन, हिंदुस्थानात देखील ही सर्व कार्ये आता राज्यकर्त्यांच्या कर्तव्यातच हळूहळू मोडू लागली आहेत शिवाय उद्योगधद्याची वाढ देखील हल्लीच्या भाडवलशाही पद्धतीनेच चालू राहील असे नाही सपन्न वर्गाकडून जादा कर घेऊन या क्षेत्रात सरकार स्वत च अधिकाधिक जबाबदारी पत्करील हेही शक्य आहे

या सर्व विवेचनानुसार सहाजिकच मला वाटते कीं अशा जबाबदार राजवटीत मी निर्देशिलेल्या कार्यासबधी भविष्य काळात इतक्या प्रचड घडामोडी होतील की या समितीच्या सदस्याना आजच्या राजवटीत त्याची कल्पनाही येणार नाही. उदाहरणार्थ बगालमधील कायमधारा पद्धतीचा फेरविचार करणें लावणीवर टाकून कर बसविला न आल्यामुळें बुडणाऱ्या विपुल उत्पन्नावर आता फार दिवस पाणी सोडता येणार नाही माझी दुसरी अशी अटकळ आहे की प्रचलित सरकार हाताळू शकत नाही अशा सामाजिक आणि धार्मिक रूढी सबधीच्या क्षेत्रातही जनतेला

जबाबदार असणारे सरकार हस्तक्षेप करू शकेल उदाहरणार्थ ते विवाह नोंदणी सक्तीची करू शकेल, किंवा दत्तविधानावर वाढत्या श्रेणीत कर बसवू शकेल इतकेच काय पण वारसा हक्काच्या कायद्यातही आमूलाग्र बदल करून जमिनीचे जे तुकडे पडत आहेत त्यावर बंधन घालील मृताच्या एकंदर जिंदगीवरही ते चढत्या श्रेणीने कर बसवू शकेल असा माझा होरा आहे शिवाय हिंदुस्थानच्या राजकीय आणि आर्थिक स्वायत्ततेबाबत समाधानकारक परिस्थिती असेल तर मृताच्या इस्टेटीवर जे शुल्क द्यावे लागते ( Probate duty ) त्याबद्दल ज्या शिफारसी कमिटीनें केल्या आहेत त्याचेंही क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढवता येईल पाश्चात्य देशात ज्या प्रमाणात त्या वसूल केल्या जातात त्या प्रमाणात हिंदुस्थानात सुरवातीस त्या लागू करणे शक्य नाही हे उघड आहे, प्रारंभ हळू हळू झाला पाहिजे आणि म्हणूनच माझ्या सहकाऱ्याच्या शिफारसीना मी संमति दिली आहे, परंतु त्या शिफारसींचे क्षेत्र भविष्यकालात पुष्कळ वाढवले पाहिजे, आणि तसे करण्यास वास्तविक काही अडचणी येतील असें मला वाटत नाही '

कर विवेचन समितीचा अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर पुण्यात मृत्युकरावर मी एक सार्वजनिक व्याख्यान दिले कर बसवण्याच्या नवीन युक्त्या सरकारला शिकवल्याचा काही मंडळींनी माझ्यावर आरोप केला त्यासंबंधीची एक आठवण सांगतो विधान सभेच्या निवडणुकीत मला नेहमी पाठिंबा देणाऱ्या एका सद्‌गृहस्थानें त्या भाषणानंतर मृत्युकर बसवण्याची सरकारला मी सूचना केल्यामुळें यापुढे मला मत देण्याचे त्याने नाकारले निवडणुकीत मी यशस्वी झालो आणि जेव्हा त्या गृहस्थाने माझे अभिनंदन केले तेव्हा ' तुम्ही विरुद्ध मत दिलेत तरी " असें म्हटल्याशिवाय मला राहवले नाही

या सर्व समित्यावर केलेलें काम हें एक सार्वजनिक प्रश्नाविषयीचे शिक्षणच होते आणि त्या वेळी अभ्यास केलेल्या विषयाचे तपशील व बारकावे आज जरी ध्यानात राहिले नसले तरी या सर्व अनुभवाचा मला फार फायदा झाला आहे

१९२५ च्या अखेरीस कर विवेचन समितीचे काम संपवून मी फर्ग्युसन कॉलेज-मध्यें परत आलो १९२३ मध्ये माझा पराभव करून विधानसभेवर निवडून आलेले श्री जयकर यानी काँग्रेस आणि स्वराज्यपक्ष यामध्यें उद्‌भवलेल्या धोरणासंबंधीच्या मतभेदामुळें विधानसभेचा राजिनामा दिला तदनंतर झालेली पोट-निवडणूक छोट्याशा प्रचारानंतर मी जिंकली त्यावेळीं मुंबईचे डॉ गोपाळराव देशमुख हे माझे प्रतिस्पर्धी होते १९२६ मध्यें मी कौन्सिलचा एक लोकनियुक्त बिनसरकारी सभासद होतो सार्वत्रिक निवडणूक वर्षाअखेर व्हावयाची होती आणि ती लढवण्याचे मी ठरवले यावेळी डॉ देशमुख आणि श्री जोसेफ बाप्टिस्टा हे माझे प्रतिस्पर्धी होते अखिल प्रांतात मी दौरे केले १९२३ सालच्या निवडणुकीत माझ्या मंत्रिपदाच्या कारकीर्दीसंबंधी जे आक्षेप माझ्याविरुद्ध घेतले गेले तेच याही वेळी केले गेले परंतु

या खेपेस मतदारावर त्याचा फारसा परिणाम झालेला दिसला नाही एकूण फारसें अवघड न जाता मी निवडून आलो, आणि माझ्या दोन्ही प्रतिस्पर्ध्यांच्या संयुक्त मतापेक्षा मला अधिक मतें पडली

विधानसभेच्या चार निवडणुका मी लढवल्या व तीनदा विजयी झालो या चारही निवडणुका मिळून मला सुमारें रु १२,००० खर्च आला तरीही पात्र पण गरीब उमेदवाराला निवडणूक लढवणे हे खर्चाच्या दृष्टीने अतिशय जड जाते असे म्हटल्याशिवाय मला रहावत नाही मी असे ऐकतों की इलेक्शन ऑफिसरला खर्चाचा हिशोब देताना रु १०,००० इतकाच खर्च जरी कायद्याने मान्य असला तरी कित्येक यशस्वी उमेदवाराना चाळीस ते पन्नास हजारापर्यंत खर्च करावा लागला आहे लोकशाही पद्धतीचे हे एक अपरिहार्य परतु अनिष्ट अग आहे हें खरे इग्लडमध्यें असे म्हणतात की पार्लमेंटच्या निवडणुकीतील प्रत्येक उमेदवाराला प्रत्येक मतदाराला दोन पत्रिका पोष्टाने फुकट पाठवण्याची सोय आहे अशा प्रकारची सवलत पुढें मागें कदाचित् आपल्या देशातही दिली जाईल परतु हल्लींच्या परिस्थितीत हाही उपाय फारसा परिणामकारक होणार नाही कारण बहुसख्य मतदार अद्याप निरक्षर आहेत प्रत्येक मतदार विभागातील मतदाराची सख्या, त्याचे अक्षरशत्रुत्व, राजकीय प्रश्नासबधीचें त्याचे अज्ञान, आणि निवडणुकीकरता होणारा अवाढव्य खर्च यामुळें यशस्वी उमेदवाराचा एकदर दर्जा खालावला हे नि सशय परतु अप्रत्यक्ष निवडणुकाची पद्धति प्रचारात आणली तर बहुधा याहून भिन्न आणि आजच्यापेक्षां अधिकच अनिष्ट परिणाम भोगावे लागतील आता सार्वत्रिक मतदानाचा हक्क दिला जाऊन त्यानुसार दोन तीन निवडणुकाही झाल्यानतर मतदानाच्या मर्यादित पद्धतीचा किंवा शिक्षिताना मतदानाचे विशेष हक्क देण्याचा कोणी विचारही करणार नाही तसेच उमेदवारावर शिक्षणाचे किंवा सार्वत्रिक कार्यातील अनुभवाचे बधन लादणेही आता व्यवहार्य होईल असे वाटत नाहीं तेव्हा आतां असे म्हणणे भाग पडते की लोकशाहींतील अनेक फायद्याकडे पाहून त्याचा मोबदला म्हणूनच लोकशाहीतील अनेक दोष सहन करीत राहिले पाहिजे

प्रत्येक निवडणुकीत उमेदवारास कित्येक मनोरजक अनुभव येतात, त्यातील एक दोनच सागतो दोनशेच मतदार असलेल्या मुबई सेनेटच्या मर्यादित सस्थेची निवडणूक मी प्रथम लढवली श्री एच जे भाभा, मिर्झा महमद अली खान आणि वर्तमान सभासद श्री एन एम समर्थ आणि मी असे आम्ही चार उमेदवार होतो. टपालानें मत द्यावयाचें होते आणि ज्या दिवशी मतपत्रिकाचे रजिस्टर टपाल घरोघर पोहोंचले त्या दिवशी काही उमेदवार मतदाराकडे जाऊन, त्यानीं जरी दुसऱ्याला मत देण्याचे अभिवचन दिले होते तरी, आपल्यालाच मत देण्याचा आग्रह करीत होते असे माझ्या कानी आलें एकदोन मतदारानी तर आर्थिक लभ्याश असेल तरच मत तुम्हास मिळेल असेही सूचित केले अर्थात् अशा प्रकारें मत नको असल्याचें मी

धिक्कारपूर्वक सांगितले या निवडणुकीत मला ४८, भाभा व मिर्झा यांना प्रत्येकी ४० आणि समर्थांना ३६ मतें पडली निकाल जाहीर झाला तेव्हा सुमारें ७० सभा-सभासदांनी माझे अभिनंदन करून मलाच मत दिले असल्याचे सांगितले, अर्थात् २०–२५ सभासद तरी असत्य बोलत होते हें निश्चित. या निवडणुकीबाबत डेक्कन कॉलेजचा प्रिन्सिपल याच्याशी झालेल्या भेटीची आठवण होते युनिव्हर्सिटीबद्दल त्याला एकदर तुच्छता वाटे, आणि आपण निवडणुकीत कधीच मतदान करीत नसल्याचें त्यानें सांगितले थोडासा हिरमुसला होऊन मी परत निघालों तेव्हां आपल्या विशिष्ट पद्धतीने तो म्हणाला, " परांजपे, मी मत् देणार नाही याचे मला वाईट वाटते पण निवडणूक तुम्ही जर एकच मताने हरलात तर मात्र मी आत्महत्या करीन " मी यशस्वी झालों तेव्हा पत्र लिहून त्याचें आत्महत्येच्या संकटातून वाचल्याबद्दल अभिनंदन करावेसे वाटले

१९२३ सालच्या निवडणुकीत एका मतदाराचे नाव दोन केंद्रात होते, आणि भडोच येथील केन्द्रात मतदान केल्यानंतर मोटारने अंकलेश्वर येथें जाऊन फिरून मत दिल्याचे त्याने मला सांगितले मी आभार मानीन अशी त्याची अपेक्षा होती परंतु मी त्याचे करणे बरोबर नव्हतें असेच त्याला लिहिले त्या निवडणुकीत जर एकाच मताने मी निवडून आलो असतों तर मी काय केलें असते कोण जाणें राजिनामा देणें हेच योग्य झाले नसते का ? पण सुदैवाने तसे संकट ओढवलेच नाही या निवडणूक प्रचारात सुरतेस पदवीधराच्या सभेंत असहकारितेच्या चळवळीचे सहाजिकच मी विवेचन करीत होतो, कारण स्वराज्य पक्षीयातील आणि माझ्यातील मतभेदापैकी तो एक महत्वाचा मुद्दा होता त्यावेळी "श्री" ( Mr ) गांधींची मतें अव्यवहार्य आहेत असें मी प्रतिपादीत असतांना बऱ्याचशा लोकांनी ओरडा करून गांधींच्या पाठीमागे त्यावेळी नुकतीच रूढ होत असलेली "महात्मा" ही उपाधी गांधींचें नाव घेतेवेळी मी लावावी असा आग्रह धरला त्यावेळी मी त्यांना सांगितले की कोणत्याही क्षेत्रांत महात्म्याचे अस्तित्व मानावयास मी तयार नाही, आणि राजकीय क्षेत्रांत तर नाहीच नाही, शिवाय बुद्धिवादी दृष्टिकोनातून गांधींचीं मते मला पडताळायची आहेत आणि जर त्यांना महात्मा असे संबोधलें किंवा मानले तर त्यांची मते महापवित्र आणि वादातीत अशी मानावी लागतील, आणि टीका करणे शक्य होणार नाही सभेतील मंडळीची मते मिळावीत म्हणून कोणाचेही "बाबावाक्यम् प्रमाणम्" मानायला मी तयार नाही, आणि विचारपूर्वक बनलेल्या माझ्या मतावर पाणी सोडायलाही तयार नाही या निर्भीड उत्तराने सभा शांत झाली परंतु बऱ्याचशा मतांना मात्र मी मुकलो असेन याच निवडणुकीच्या वेळी निदान एका ठिकाणी तरी जयकर ब्राह्मण नाहीत म्हणून त्यांना मत द्यावे असा प्रचार झाला होता, परंतु एकंदर काही अनुचित प्रकार न घडता निवडणूक पार पडली आणि जेव्हा जयकर निवडून आल्याचे जाहीर झाले तेव्हा मी त्यांचे हार्दिक अभिनंदन केले, आणि त्या दिवशी संध्याकाळी त्यांचे येथेच भोजनास गेलो

प्रकरण चौदावें

# इन्डिया कौन्सिल

१९२६ च्या निवडणुकीनतर १९२७ च्या सुरुवातीस मत्री म्हणून माझी फिरून नेमणूक झाली परतु ह्या वेळेस माझ्याकडे अबकारी, जगल, सहकार, शेतकी इत्यादि खाती होती श्री गुलाम हुसेन हिदायतुल्ला आणि रावसाहेब हरिलाल देसाई हे दुसरे दोन मत्री असून रावसाहेब देसाई हे शिक्षणमत्री होते माझ्या नव्या खात्यांची मला केवळ तात्विक माहिती होती, आणि शेतकी हा विषय वगळला तर इतर कोणत्याच खात्याशी माझा वैयक्तिक सबध कधी आलेला नव्हता अबकारी खात्यात लाचलुचपन फार बोकाळली आहे असा प्रवाद होता आणि दारूबदीच्या धोरणाकडे जनता फार झपाट्याने झुकू लागली होती

माझ्या खात्यातील प्रश्न मला हळू हळू परिचित होऊ लागले होते, इतक्यात लडनमधील सेक्रेटरी ऑफ स्टेटच्या कौन्सिलवर श्री समर्थ त्याच्या निधनामुळें रिकाम्या झालेल्या जागेवर जाता का असे मला विचारण्यात आले या सूचनेचा प्रथम मी सपशेल अव्हेर केला, कारण इडिया कौन्सिलवर नेमणूक म्हणजे जवळ जवळ एक फुकट पगारी कार्यशून्य नेमणूक असून सर्व सत्ता सेक्रेटरी ऑफ स्टेट आणि त्याचा अडर सेक्रेटरी याचे हाती असे गव्हर्नरने मला भेटीस बोलावलें आणि ही नेमणूक स्वीकारण्याची फिरून गळ घातली माझे मत मी स्पष्टपणे माडलें परतु पार्लमेंटरी अडर सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इडिया, अर्ल विंटरटन, हा अवचित त्यावेळी तेथे होता आणि त्यानें हिंदुस्थानच्या कारभारांत इडिया कौन्सिल हा एक महत्वाचा घटक असल्याचे सांगून माझें मत वळविण्याचा प्रयत्न केला मन्त्रिमडळांतील माझ्या एक दोन सहकाऱ्यानी आणि त्यावेळचे लीगल रिमेंब्रन्सर आणि माझे परम स्नेही श्री बालकराम यांनीही या जागेचा स्वीकार करण्याचा मला सल्ला दिला काहीशा नाखुषीनें मी तयार झालो आणि मत्री म्हणून सहा आठवडे काम केल्यानतर मी मन्त्रिपदाचा राजिनामा दिला या नेमणुकीचा स्वीकार करण्याचे खरे कारण मी माझे स्नेही बालकराम याच्याखेरीज कोणालाही सांगितले नव्हते गव्हर्नमेंट ऑफ

इंडिया अॅक्ट अमलात आल्यानंतर काही वर्षांनी त्याच्या तपासणीकरता एक स्टॅटयूटरी कमिशन नेमण्याची तरतूद त्या अॅक्टातच केली होती या कमिटीपुढे हिंदी दृष्टीकोन आग्रहाने माडून हिंदुस्थानची राजकीय प्रगति लवकर होण्यास मी हातभार लावू शकेन अशी मला उमेद होती या नव्या नेमणुकीमुळें माझ्या पगारात निम्यानें घट झाली माझी मुलगी काही महिन्यापूर्वी इग्लडमध्ये केंब्रिज येथें शिकावयास गेली होती, आणि त्यामुळेच मी ही नेमणूक स्वीकारली असे काहीं लोकाना वाटले पण वस्तुस्थिती तशी नव्हती, केंब्रिजमध्यें तिचा चागला जम बसला होता आणि तिचे व्यवस्थितपणे चालले होतें इंडिया कौन्सिलपुढें येणारे प्रश्न केवळ औपचारिक स्वरूपाचे असत, त्या सबधीचे बहुतेक निर्णय सेक्रेटरी ऑफ स्टेट आणि इंडिया ऑफीसमधील त्याचे सहकारी अधिकारी यानी आधीच घेतलेले असत आणि शिवाय इंडियन कौन्सिलमध्ये लॉर्ड मोर्ले यानी संबोधलेल्या 'सन ड्राइड ब्युरोक्रॅटस्' (उन्हाने सुकलेले युरोपिअन सेवानिवृत्त अधिकारी) याचे बहुमत होते, अशा परिस्थितीमुळे इंडिया कौन्सिलवर घालवलेली पाच वर्षे जवळ जवळ फुकट गेली असे माझें प्राजल मत आहे

इंडिया कौन्सिलचा बहुतेक कारभार वेगवेगळ्या समित्यामार्फत होई या समित्यांनी घेतलेले निर्णय दर आठवड्याच्या इंडिया कौन्सिलच्या बैठकीपुढे औपचारिकरीत्या येत असत, आणि कोणी सभासदाने हरकत न घेतल्यास ते सेक्रेटरी ऑफ स्टेट इन कौन्सिल याचेच निर्णय आहेत असे मानले जाई खुद्द इंडिया कौन्सिलच्या बैठकी काही मिनिटातच, किंबहुना काही सेकदातच समाप्त होत क्वचितच एखादा सभासद उठून समित्याच्या निर्णयाला विरोध करी तरी सुद्धा बहुमताने हे निर्णय मान्य होतच सर्व्हिसेस् आणि जनरल कमिटी, फायनान्स कमिटी आणि लायब्ररी कमिटी या कमिटयाचा मी सभासद होतो सर्व्हिसेस आणि जनरल कमिटी ही अखिल हिंदुस्थानच्या नोकरशाहीतील नोकऱ्यासबधीच्या सर्व प्रश्नाचा, विशेषत हिंदुस्थान सरकारच्या निर्णयाविरुद्ध या नोकरशाहीतील सेवकाच्या तक्रारीचा, विचार करीत असे कारण सेक्रेटरी ऑफ स्टेट-इन-कौन्सिलचा निर्णय या बाबीमध्ये कायद्याने अतिम असा मानलेला होता फायनान्स कमिटी ही पैशाची तरतूद, पैशाची नेआण आणि अदाजपत्रक याचा विचार करी सेक्रेटरी ऑफ स्टेट-इन-कौन्सिलच्या मान्यतेशिवाय हिंदुस्थानवर खर्चाचा कोणताहि बोजा टाकता येणार नाही या कलमातच इंडिया कौन्सिलची खरी सत्ता सामावली होती असे म्हणता येईल परन्तु सेक्रेटरी ऑफ स्टेट हा ब्रिटिश मत्रिमडळाचा सभासद असल्याने व इंडिया कौन्सिलचे बहुतेक सभासद सेवानिवृत्त सरकारी अधिकारी असल्यामुळें या सत्तेचा फारसा कधी उपयोग झाला नाही, तरी देखील एखादेवेळी इंडिया कौन्सिलसुद्धा हिंदुस्थानच्या तिजोरीवर नवनवीन बोजे लादून घेण्यास विरोध करी

इंडिआ कौन्सिलवरील माझ्या पाच वर्षांत वेगवेगळ्या वेळी एकदर चार

सेक्रेटरी ऑफ स्टेट झाले, लॉर्ड बर्कनहेड, लॉर्ड पील, मि बेजवुडबेन आणि सर सॅम्युएल होअर. लॉर्ड बर्कनहेड हा अत्यंत कर्तबगार असून पूर्वी तो इंग्लंडचा लॉर्ड चान्सेलर होता, आणि सेक्रेटरी ऑफ स्टेट या जागेवर त्याची नेमणूक म्हणजे त्याला खाली ढकलल्यासारखेंच पुष्कळांना वाटे आपल्या कामात तो कधी विशेष लक्ष घालतो असें दिसत नसे, आणि आपला सरकारी अंडर सेक्रेटरी सर आर्थर हर्टझल आणि दोन असिस्टंट अंडर सेक्रेटरी सर माल्कम सीटन आणि सर लुई कर्शी यांच्या सल्ल्याने तो वागे लॉर्ड विंटरटन हा पार्लमेंटरी अंडर सेक्रेटरी होता, पण त्याला विशेष महत्व नव्हते कामाबद्दल बर्कनहेड इतका बेफिकीर होता कीं इंडिया कौन्सिलच्या सभासदांची नावें सुद्धा त्याला ठाऊक नव्हती एकदा तर त्याने मला " मलिक म्हणून संबोधले, कारण त्या नावाचा इंडिया कौन्सिलचा दुसरा एक सभासद आणि मी यातील फरक त्याला माहित नव्हता इंडिया कौन्सिलवरील तिसरा हिंदी सभासद सर महमद रफीक हा तीन वर्षे कौन्सिलवर होता, आणि त्याचे निधनानंतर पंजाब-मधील श्रीमान जमीनदार सर उमर हयातखान यांची नेमणूक झाली उत्तम वकील म्हणून नावाजलेला बर्कनहेड टिपणें व्यवस्थित करून दिलेली असली म्हणजे हाऊस ऑफ लॉर्डस् मध्यें उत्कृष्ट भाषणे करीत असे

इंडिआ कौन्सिलवर मी रुजू झाल्यानंतर काही महिन्यांनी, १९२७ च्या मार्च महिन्यात ब्रिटिश मंत्रिमंडळानें सर जॉन सायमन यांचे अध्यक्षतेखाली १९१९ च्या गव्हर्मेंट ऑफ इंडिआ ॲक्टच्या अंमलबजावणीची तपासणी करण्याकरता एक सर्वस्वी ब्रिटिश सभासदांचे कमिशन नेमले हिंदुस्थानात त्यामुळें सर्वत्र असंतोष पसरला आणि बहुतेक पुढाऱ्यांनी कमिशनशी असहकार करण्याचे ठरवले या कमिशनमधून आपल्याला वगळल्यामुळें इंडिया कौन्सिलच्या सभासदांचीहि निराशा झाली प्रागतिक पक्षाचा एक सभासद या नात्यानें इंडिया कौन्सिलवर मी काम करीत असल्याने सप्रू आदि स्नेह्यांनी स्वीकारलेली भूमिका मान्य करून कमिशनपुढे साक्ष देण्याचे आमंत्रण मी नाकारलें तरीहि सर जॉन सायमन हा खाजगी रीत्या माझ्या कचेरीतील खोलीत येऊन मला भेटला आणि हिंदुस्थानातील राजकीय परिस्थिती-बद्दल प्रागतिक दृष्टीकोनातून मी त्याच्याशी पुष्कळ चर्चा केली दैनंदिन कारभारात व्यत्यय येईल इतक्या विकोपाला कलह जावे अशी जरी कदाचित् सरकारची इच्छा नसली तरी अंतस्थ कलह विशेषत हिंदु मुसलमानांत वैर फैलावण्याचें सरकारचें धोरण असल्याची सर्व हिंदी पुढाऱ्यांची खात्री झाली असल्याचें मी त्याला स्वच्छ सांगितले माझें हे विधान अर्थातच त्याला पटले नाही दोन वर्षांनंतर जेव्हा सायमन कमिशनचा अहवाल प्रसिद्ध झाला तेव्हा त्या अहवालाचा विचार करण्यासाठी इंडिया कौन्सिलची एक कमिटी नेमली होती आणि तिच्या चर्चेत मी भाग घेतला सर्वस्वी ब्रिटिश सभासदांचे कमिशन नेमल्यानंतर इंडिया कौन्सिलवरील माझ्या सभासदत्वाचा राजिनामा मी कां दिला नाही असा प्रश्न पुष्कळदा विचारण्यात येतो

परतु माझ्या एकट्याच्या राजिनाम्याने ब्रिटनमधील लोकमतावर काही परिणाम झाला नसता आणि तीन्ही हिंदी सभासदानी एकजुटीने राजिनामा देणें हें शक्य कोटीतले नव्हते शिवाय राजिनामे, असहकार इत्यादि राजकीय डावपेंचाचे प्रकार मला फारसे मान्य नाहीत राजिनाम्यासारखा निष्प्रभ मार्ग स्वीकारण्याऐवजी बिकट परिस्थितीतही माझ्या हातून जे होण्यासारखें असेल तें करणें मला जास्त श्रेयस्कर वाटते

सायमन कमिशनची नेमणूक झाल्यानतर लवकरच लॉर्ड बर्कनहेड याने सेक्रेटरी ऑफ स्टेट या जागेचा राजिनामा दिला, आणि त्याचे जागी लॉर्ड पील याची नेमणूक झाली लॉर्ड पील हा दिलदार स्वभावाचा होता, परतु त्याच्या अमदानींत-सुद्धा इडिया ऑफिसमध्यें हिंदी प्रश्न हाताळण्याच्या पद्धतीत काही फरक दिसून आला नाही इडिया कौन्सिलच्या सभासदाना कोणताहि प्रश्न पुढें आणण्याचा आग्रह धरता येत नसे त्याचें काम बहुताशी औपचारिक स्वरूपाचें होते उदा गव्हर्नर जनरलच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे पूर्वीचे गृहसभासद सर विल्यम व्हिन्सेंट यानी एकदा मला सागितलें की पूर्वी ते हिंदुस्थानात एका विशिष्ट प्रकरणामध्यें विशेष लक्ष घालून त्यानी ते सेक्रेटरी ऑफ स्टेटकडे पाठवलें होते त्याचे पुढें काय झाले हे समजण्याची त्याना इच्छा होती आणि त्यासबधीचे कागदपत्र पहावयास मिळावे अशी त्यानी विनती केली तेव्हा त्याना सागण्यात आलें की त्या विशिष्ट प्रकरणा-सबधीचे कागद त्याना दाखविण्यात येतील, परतु इडिया कौन्सिलच्या सभासदाना अशा प्रकारें कोणतेहि कागदपत्र पहावयास मागण्याचा हक्क नाही तदनतर अशा तऱ्हेचें उर्मट उत्तर मिळेल असे काहीही न करण्याचा आपण निर्धार केल्याचें त्यानी कबूल केले

इडिया कौन्सिलवर आल्यावर एक दोन महिन्यानी हिंदुस्थानातील सुप्रीम लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे माजी अध्यक्ष सर फ्रेडरिक व्हाईट यानी हिंदी प्रश्नासबधी अमेरिकेतील लोकाना जागृत करण्याकरता अमेरिकेत जाण्याची माझी तयारी आहे का असे विचारले हे आमत्रण मला स्वीकारता येईल काय असें मी पर्मनट अडर सेक्रेटरी ऑफ स्टेट याला विचारले समति बहुधा देण्यात येणार नाही असें त्याचे उत्तर आले ब्रिटिश सरकारचाच दृष्टीकोन मी अमेरिकन जनतेपुढे सदोदित माडीन असा त्याचा विश्वास नव्हता अशी माझी खात्री आहे वस्तुत सरकारच्या आशीर्वादाने ॲंग्लोइडियन लोकाच्याकरवी हिंदुस्थानांतील राजकीय चळवळी-सबधी बराचसा विरोधी प्रचार अमेरिकेत केला जात होता अशी समजूत होती या हिंदुस्थानविरोधी प्रचाराच्या यत्रणेत मी खचितच बसलो नसतो हिंदुस्थानच्या राजकीय प्रगतीला विरोध करणाऱ्या लोकाचा आशीर्वाद घेऊन प्रसिद्ध झालेले ' मदर इडिया ' हे मिस् मेयो हिचे कुविख्यात पुस्तक हे या प्रचाराचाच एक भाग होता हे निश्चित स्त्रियाचा दर्जा, अस्पृश्यता, हिंदु-मुसलमानातील तेढ इत्यादि

हिन्दुस्तानच्या राजकीय आणि सामाजिक व्यवस्थेंतील दोष अत्यंत कावेबाजपणे आणि तपशीलवारपणें दाखवून हिंदी आणि विशेषत हिंदू लोकाबद्दल वाचकाचे मन पुरतें कलुषित करण्याचें पद्धतशीर कार्य या पुस्तकानें केलें आहे आणि जाता जाता मुसलमान जमातीला श्रेष्ठ ठरवले आहे

इंडिया कौन्सिलच्या प्रत्येक सभासदाला त्याच्या नेमणुकीनंतर लवकरच राजेसाहेबाच्या भेटीचा लाभ द्यायचा असा शिरस्ता होता, आणि त्याप्रमाणे मला पाचारण करण्यात आलें हिंदी लोकानी आपल्या स्वदेशी पोषाखातच आलेले राजे-साहेब पाचवे जार्ज याना आवडते आणि ते नेहमी उभे राहूनच मुलाखत घेतात अशी अगाऊ सूचना मला मिळाली होती परंतु त्यावेळी राजेसाहेब स्वत खुर्चीवरच बसले होते आणि मलाहि त्यानी बसण्यास सांगितलें मुलाखतीला येणाऱ्या इसमाच्या कार्याची ठळक माहिती राजेसाहेबाना आधीच पुरवली जाणे सहाजिकच होते, आणि मी सीनीअर रँग्लर असल्याचें त्याना सांगण्यात आलें होतें, असें दिसले केंब्रिजमध्यें मी मिळवलेल्या या मानाबद्दल त्यानी माझें अभिनंदन केलें आणि आपण स्वत कधी केंब्रिजला गेलो नसलों तरी, आपला मोठा भाऊ तेथें होता असें सांगितले त्यांनीं केलेल्या अनेक विधानावरून मिस् मेयो हिचें पुस्तक त्यानी वाचलें असल्याचे उघड दिसले काही वर्षांपूर्वी गोखले भेटले होते तेव्हा देशातील स्त्रियाना आणि अस्पृश्य जमातीना अधिक योग्य तऱ्हेची वागणूक दिल्यास हिंदुस्थानला होमरूल देण्यास आपण तयार असल्याचें आश्वासन आपण गोखल्याना दिलें असल्याचे त्यानी सांगितले त्यावेळीं प्रसिद्ध पावलेला अफगाणिस्तानचा राजा अमानुल्ला याचा त्यानीं नंतर उल्लेख केला आणि अफगाण लोकामध्यें सामाजिक सुधारणांच्या बाबतीत तो जास्त घाई करीत आहे असें आपलें मत असल्याचें सांगितलें संभाषणाचा ओघ नंतर हैदरा-बादच्या निजामाकडे वळला आणि त्याच्या कवडीचुंबक वागणुकीबद्दलच्या अनेक वातम्या आपल्या कानी आल्या आहेत असे तें म्हणाले पधरा मिनिटें झालेल्या मुलाखतीच्या अखेरीस जाता जाता मी केंब्रिजला होतो की ऑक्सफर्डला हा प्रश्न करून राजेसाहेबांनी मला आश्चर्याचा धक्का दिला

इंडिया कौन्सिलपुढे येणारे प्रश्न फारसे महत्वाचे नसत हे पूर्वींच सांगितले आहे परंतु एकदोन प्रश्नाबाबत सरकारी धोरणाशीं माझा मतभेद झाला सँडहर्स्ट येथे शिक्षण घेतलेले जे मूठभर हिंदी कमिशन्ड ऑफिसर होते त्याची नेमणूक कोठल्या पथकात करावी यासबंधी पहिला मतभेद झाला त्याची नेमणूक काही खास वेगळ्या पथकात करावी अशी योजना केली म्हणजे ते वेगळे राहून बरोबरीच्या किंवा खालच्या दर्जाच्या ब्रिटिश ऑफिसराशी त्याचा सबध येणार नाही आणि ब्रिटिश ऑफिसराचे ते वरिष्ठ होण्याची शक्यता रहाणार नाही, हिंदी माणसाकडून हुकूम घेणें हे युरोपिअन अधिकाऱ्याना अपमानाचे वाटेल असा दावा करण्यात आला हिंदी ऑफिसराना वाळीत टाकण्याच्या या धोरणाचा मी कडकडून विरोध केला, परंतु माझा विरोध

म्हणजे एक अरण्यरुदनच होते

हिंदी आणि युरोपियन लोकांची किती किती संख्येनें आय. सी. एस मध्यें भरती करायची हे वेळोवेळी ठरवले जाई आय सी एस ची परीक्षा पास झालेल्या एका उमेदवाराचा चमत्कारिक प्रश्न कौन्सिलपुढे आला. बाप गोरा असल्यामुळे त्याचे नागरिकत्व (domicile) ब्रिटिश होते पण आई हिंदी असल्यामुळे आणि तिचा सावळा वर्ण मुलात उतरला असल्यामुळे त्याची नेमणूक कोणत्या विभागात करायची हा प्रश्न पडला हिंदी उमेदवाराच्या ठरीव संख्येंतच त्याची गणति करावी असे बहुमतवाल्या इंग्रज सभासदांनी सुचविले पण मग बाप युरोपियन असल्यामुळे हुडणावळीच्या भरपाईचा हक्क त्याला सांगता येईल का, अशी मी चौकशी करता "अलबत सांगतां येईल" असे उत्तर आलें तेव्हा हिंदी उमेदवारावर हा अन्याय होत आहे या मुद्यावर मी या नेमणुकीला कसून विरोध केला युरोपिअन उमेदवार मिळावे म्हणून बहुधा हे हुडणावळीच्या भरपाईचे आमिष ठेवलें होतें आणि जर ह्या विशिष्ट उमेदवाराला ही भरपाई द्यावयाची ठरली तर त्याची भरती युरोपियन उमेदवार म्हणूनच होणे जरूर होते कौन्सिलपुढे हा प्रश्न आला त्यावेळी लॉर्ड पीलचे जागी लेबरपक्षीय वेजवुड वेन (नंतर लॉर्ड स्टॅन्सगेट) हा सेक्रेटरी ऑफ स्टेट म्हणून आला होता पूर्वीच्या सेक्रेटरीस् ऑफ स्टेटप्रमाणे हा प्रतिगामी नव्हता, आणि माझी हरकत रास्त आहे असे त्याला दिसले व त्याच्या सूचनेवरून कौन्सिलच्या त्या सभेत हे प्रकरण तहकूब करण्यात आले माझ्या विरोधाचा अंतिम परिणाम एवढाच झाला की त्या उमेदवाराची नेमणूक हिंदी नाही व युरोपियनहि नाही असा तिसराच एक भरतीचा वर्ग निर्माण करून करण्यात आली

इंडिया ऑफीसमध्ये रुजू झाल्यानंतर दोन तीन महिन्यांनी जिनीव्हा येथील इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन किंवा आंतरराष्ट्रीय मजूरविषयक प्रश्नांचा विचार करणारी संघटना (थोडक्यांत आय एल ओ ) यामध्ये तेव्हाचे लंडन येथील हाय-कमिशनर सर अतुलचंद्र चॅटर्जी आणि सर लुई कर्शा यांचे समवेत हिंदुस्थानचे प्रतिनिधित्व करण्याबद्दल मला विचारण्यात आलें चॅटर्जी हे त्या वर्षीच्या परिषदेचे अध्यक्ष होते, आणि त्यांनी ही कामगिरी बजावताना चांगलें नाव कमावले व हिंदुस्थानलाही कीर्ती मिळवून दिली या परिषदेचें आमंत्रण स्वीकारताना माझी भूमिका मी स्पष्ट केली होती, की परिषदेंत जरी साधारणपणे मी सरकारची बाजू मांडण्यास तयार असलो तरी माझ्या प्रामाणिक मताविरुद्ध मी कांहींही बोलणार नाही गत-वर्षीच्या आय एल ओ च्या अहवालावर छोटेंसे भाषण करताना त्यामध्ये काम-गाराच्या कल्याणार्थं केलेल्या शिफारसींचे सर्वांनीच स्वागत केले पाहिजे असे मी म्हटलें, पण त्याबरोबरच या कल्याणकारी योजनांमुळें जगातील लोकसंख्या वाढून बेकारीसारख्या नवीन आपत्ती पुन पुन्हा ओढवणार नाहीत याची खबरदारी घेतली पाहिजे, नाहीतर परिषदेच्या कार्याची रोमन आणि ग्रीक लोकांच्या

हिन्दुस्तानच्या राजकीय आणि सामाजिक व्यवस्थेतील दोष अत्यंत कावेबाजपणे आणि तपशीलवारपणे दाखवून हिंदी आणि विशेषतः हिंदू लोकाबद्दल वाचकाचे मन पुरते कलुषित करण्याचें पद्धतशीर कार्य या पुस्तकाने केले आहे आणि जाता जाता मुसलमान जमातीला श्रेष्ठ ठरवले आहे

इंडिया कौन्सिलच्या प्रत्येक सभासदाला त्याच्या नेमणुकीनंतर लवकरच राजेसाहेबाच्या भेटीचा लाभ द्यायचा असा शिरस्ता होता, आणि त्याप्रमाणे मला पाचारण करण्यात आलें हिंदी लोकानी आपल्या स्वदेशी पोषाखातच आलेले राजे-साहेब पाचवे जार्ज याना आवडते आणि ते नेहमी उभे राहूनच मुलाखत घेतात अशी अगाऊ सूचना मला मिळाली होती परंतु त्यावेळी राजेसाहेब स्वतः खुर्चीवरच बसले होते आणि मलाहि त्यानी बसण्यास सांगितले मुलाखतीला येणाऱ्या इसमाच्या कार्याची ठळक माहिती राजेसाहेबाना आधीच पुरवली जाणें सहाजिकच होतें, आणि मी सीनीअर रँग्लर असल्याचे त्याना सांगण्यात आलें होते, असे दिसले केंब्रिजमध्यें मी मिळवलेल्या या मानाबद्दल त्यानी माझें अभिनंदन केलें आणि आपण स्वतः कधी केंब्रिजला गेलों नसलों तरी, आपला मोठा भाऊ तेथे होता असे सांगितले त्यानी केलेल्या अनेक विधानावरून मिस् मेयो हिचें पुस्तक त्यांनी वाचलें असल्याचे उघड दिसले काही वर्षांपूर्वी गोखले भेटले होते तेव्हा देशातील स्त्रियांना आणि अस्पृश्य जमातींना अधिक योग्य तऱ्हेची वागणूक दिल्यास हिंदुस्थानला होमरूल देण्यास आपण तयार असल्याचें आश्वासन आपण गोखल्याना दिलें असल्याचे त्यानी सांगितले त्यावेळीं प्रसिद्ध पावलेला अफगाणिस्तानचा राजा अमानुल्ला याचा त्यानी नंतर उल्लेख केला आणि अफगाण लोकामध्यें सामाजिक सुधारणाच्या बाबतीत तो जास्त घाई करीत आहे असे आपले मत असल्याचे सांगितलें संभाषणाचा ओघ नंतर हैदरा-बादच्या निजामाकडे वळला आणि त्याच्या कवडीचुंबक वागणुकीबद्दलच्या अनेक बातम्या आपल्या कानी आल्या आहेत असे ते म्हणाले पधरा मिनिटें झालेल्या मुलाखतीच्या अखेरीस जाता जाता मी केंब्रिजला होतों की ऑक्सफर्डला हा प्रश्न करून राजेसाहेबानी मला आश्चर्याचा धक्का दिला

इंडिया कौन्सिलपुढे येणारे प्रश्न फारसे महत्वाचे नसत हे पूर्वीच सांगितले आहे परंतु एकदोन प्रश्नाबाबत सरकारी धोरणाशी माझा मतभेद झाला सँडहर्स्ट येथें शिक्षण घेतलेले जे मूठभर हिंदी कमिशन्ड ऑफिसर होते त्याची नेमणूक कोठल्या पथकात करावी यासबधीं पहिला मतभेद झाला त्याची नेमणूक काही खास वेगळ्या पथकात करावी अशी योजना केली म्हणजे ते वेगळे राहून बरोबरीच्या किंवा खालच्या दर्जाच्या ब्रिटिश ऑफिसरांशी त्याचा संबंध येणार नाहीं आणि ब्रिटिश ऑफिसराचे ते वरिष्ठ होण्याची शक्यता रहाणार नाही, हिंदी माणसाकडून हुकूम घेणं हे यरोपिअन अधिकाऱ्याना अपमानाचे वाटेल असा दावा करण्यात आला हिंदी ऑफिसराना वाळीत टाकण्याच्या या धोरणाचा मी कडकडून विरोध केला, परंतु माझा विरोध

क्र. १४८६९

म्हणजे एक अरण्यरुदनच होते

हिदी आणि युरोपियन लोकांची किती-किती सख्येनें आय. सी. एस मध्ये भरती करायची हे वेळोवेळी ठरवले जाई आय सी एस ची परीक्षा पास झालेल्या एका उमेदवाराचा चमत्कारिक प्रश्न कौन्सिलपुढे आला बाप गोरा असल्यामुळें त्याचे नागरिकत्व (domicile) ब्रिटिश होते पण आई हिदी असल्यामुळे आणि तिचा सावळा वर्ण मुलात उतरला असल्यामुळे त्याची नेमणूक कोणत्या विभागात करायची हा प्रश्न पडला हिदी उमेदवाराच्या ठरीव सख्येंतच त्याची गणति करावी असें बहुमतवाल्या इग्रज सभासदानी सुचविलें पण मग बाप युरोपियन असल्यामुळें हुडणावळीच्या भरपाईचा हक्क त्याला सागता येईल का, अशी मी चौकशी करता "अलबत सागता येईल' असे उत्तर आलें तेव्हा हिदी उमेदवारावर हा अन्याय होत आहे या मुद्यावर मी या नेमणुकीला कसून विरोध केला युरोपिअन उमेदवार मिळावे म्हणून बहुधा हें हुडणावळीच्या भरपाईचे आमिष ठेवलें होते आणि जर ह्या विशिष्ट उमेदवाराला ही भरपाई द्यावयाची ठरली तर त्याची भरती युरोपियन उमेदवार म्हणूनच होणे जरुर होते कौन्सिलपुढे हा प्रश्न आला त्यावेळी लॉर्ड पीलचे जागीं लेबरपक्षीय वेजवुड बेन (नतर लॉर्ड स्टॅन्सगेट) हा सेक्रेटरी ऑफ स्टेट म्हणून आला होता पूर्वीच्या सेक्रेटरीस् ऑफ स्टेटप्रमाणे हा प्रतिगामी नव्हता, आणि माझी हरकत रास्त आहे असें त्याला दिसले व त्याच्या सूचनेवरून कौन्सिलच्या त्या सभेत हे प्रकरण तहकूब करण्यात आले माझ्या विरोधाचा अतिम परिणाम एवढाच झाला की त्या उमेदवाराची नेमणूक हिदी नाही व युरोपियनहि नाहीं असा तिसराच एक भरतीचा वर्ग निर्माण करून करण्यात आली

इडिया ऑफीसमध्ये रुजू झाल्यानतर दोन तीन महिन्यानी जिनीव्हा येथील इटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन किंवा आतरराष्ट्रीय मजूरविषयक प्रश्नाचा विचार करणारी सघटना (थोडक्यांत आय एल ओ ) यामध्यें तेव्हाचे लडन येथील हाय-कमिशनर सर अतुलचद्र चॅटर्जी आणि सर लुई कर्शा याचे समवेत हिंदुस्थानचें प्रतिनिधित्व करण्याबद्दल मला विचारण्यात आले चॅटर्जी हे त्या वर्षीच्या परिषदेचे अध्यक्ष होते, आणि त्यानी ही कामगिरी बजावताना चागलें नाव कमावले व हिंदुस्थानलाही कीर्ती मिळवून दिली या परिषदेचें आमत्रण स्वीकारताना माझी भूमिका मी स्पष्ट केली होती, की परिषदेत जरी साधारणपणे मी सरकारची बाजू माडण्यास तयार असलो तरी माझ्या प्रामाणिक मताविरुद्ध मी काहींही बोलणार नाही गत-वर्षींच्या आय एल ओ च्या अहवालावर छोटेंसे भाषण करताना त्यामध्यें काम-गाराच्या कल्याणार्थ केलेल्या शिफारसींचे सर्वांनीच स्वागत केलें पाहिजे असे मी म्हटले, पण त्याबरोबरच या कल्याणकारी योजनामुळें जगातील लोकसख्या वाढून बेकारीसारख्या नवीन आपत्ती पुन पुन्हा ओढवणार नाहीत याची खबरदारी घेतली पाहिजे, नाहीतर परिषदेच्या कार्याची रोमन आणि ग्रीक लोकाच्या

पुराणातील सिसिफससारखी* अवस्था होईल असें बजाविलें

कामगाराची परिस्थिती सुधारण्याचें आणि एकदर जगाचें लक्ष या प्रश्नाकडे वेधण्याचें मोठें कार्य आय् एल ओ नें केलेलें आहे कायदेशीर समति दिली नसली तर आय एल ओ नें मान्य केलेले ठराव वेगवेगळ्या देशाना बधनकारक नसून केवळ शिफारसीवजाच असतात, या ठरावांना समति देण्याबाबत हिंदुस्थानचा क्रमाक वर लागेल जरी प्रत्यक्ष समति नसली तरीहि प्रत्येक देशाच्या राज्यकर्त्यांनी ह्या ठरावाचा विचार करून शक्य तोंपर्यंत ते अमलात आणावे अशी अपेक्षा असते ह्या ठरावासबधी काही कारवाई केली असेल तर ती काय केली याचा अहवाल प्रतिवर्षी वेगवेगळ्या राष्ट्राना आय एल ओ ला द्यावा लागतो चार वर्षे या परिषदात मी हिंदुस्थान सरकारचा प्रतिनिधी होतों लीग ऑफ नेशन्स्च्या एका कमिटीवर मी काम केलें, आणि नवीनच स्थापन झालेल्या व रोम येथें मुख्य कचेरी असलेल्या आतरराष्ट्रीय शैक्षणिक चित्रपट परिषदेचाही सभासद होतों या सर्व सस्थावर सभासद या नात्याने काम केल्यामळे जगातील वेगवेगळ्या प्रतिनिधींशीं माझा सबध आला आणि एक प्रकारच्या अमोल शिक्षणाचा मला लाभ झाला

सिनेमॅटोग्रॅफिक कॉन्फरन्सच्या सुरुवातीच्या अधिवेशनाची मला चागली आठवण आहे, तिचे उद्घाटन मुस्सोलिनीनें केलें, आणि त्यावेळी इटलीचा राजा ॲलबर्ट हा व्यासपीठाच्या खालीं बसला होता, खुर्ची मात्र सोनेरी होती दुसऱ्या एका खेपेस मी तेथे असताना इटलीच्या तथाकथित निवडणुका चालू होत्या रोममध्ये सि ( Si ),, म्हणजे होय, या एकाच शब्दाच्या मोठमोठ्या अक्षरात लिहिलेल्या जाहिराती सर्वत्र दिसत होत्या आणि जनतेला ठरीव उमेदवाराना पाठिंबा देण्यास सागत होत्या. विरोधी पक्षाचे कोणी उमेदवारच नव्हते, आणि शेकडा ९९ मतानें सरकारी यादीतील सर्व उमेदवार निवडून आले हुकूमशाही राजवटीत देशाची काय परिस्थिती होते याची चागली कल्पना वेळोवेळी रोमला गेल्यामुळें मला झाली मोकळेपणानें बोलण्याची प्रत्येकाला धास्ती वाटे कारण जवळ कोण हेर असेल आणि तो केव्हा पोलिसाला काय माहिती देईल याचा भरवसा नसे हॉटेलमध्यें परदेशी लोकसुद्धा जर मुस्सोलिनी-विषयी बोलू लागले तर त्याना तसे न करण्याची हळूच विनती केली जाई

पहिल्या महायुद्धानतर लीग ऑफ नेशन्सच्या समवेत इटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन ही सस्था अस्तित्वात आली, आणि दुसऱ्या महायुद्धानतर लीग ऑफ नेशन्स जरी नामशेष झाली असली तरी इटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन आजही उपयुक्त कार्य करीत आहे अमेरिका हा देश सभासद न झाल्यामुळें लीग ऑफ नेशन्समध्यें जी उणीव होती ती इटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशनमध्यें नव्हती.

---

* सिसिफस यावर ज्युपिटर याचा रोष होता. एक मोठा धोंडा ढकलीत तो एका डोंगराच्या शिखरावर नेण्याचें काम शिक्षा म्हणून त्याला सागण्यात आलें होतें, परतु दगड आतां शिखरावर पोंचणार इतक्यांत तो धडपडत पुन्हां खालीं येई

अखिल जगातील कामगाराच्या कल्याणाचा ती विचार करते आणि प्रत्येक राष्ट्रातील सरकार, उद्योगपती आणि सघटित कामगार याचे प्रतिनिधी तिच्या वार्षिक परिषदाचे वेळी सभासद असतात भाषणे बहुधा इग्रजी अथवा फ्रेंचमधून होतात, आणि इतर भाषातून त्याची तात्काळ भाषातरें करण्याची पद्धत तेथे शोधून काढलेली आहे मला वाटतें हीच पद्धत युनायटेड नेशन्सच्या आणि इतर आतरराष्ट्रीय सस्थाच्या सभाचे-वेळी आता प्रचलित आहे मी तेथें असताना फ्रान्सचा आलबेर थॉमस (Albert Thomas) हा इटर नॅशनल लेबर ऑर्गनायझेशनचा डायरेक्टर होता इग्लड, फ्रान्स आणि अमेरिका ह्या तीन राष्ट्राचें सस्थेत जास्त वजन होते सस्थेच्या सचिवा-लयात सर्व देशांचे अधिकारी होते, परतु वरील तीन राष्ट्रातील स्त्रीपुरुषाचाच भरणा जास्त होता आय एल ओ च्या गव्हर्निंग बॉडीवर उद्योगधद्यात पुढारलेल्या सहा राष्ट्राचे कायम सभासद असत आणि हिंदुस्थान त्या सहापैकी एक राष्ट्र होतें प्रतिवर्षी परिषदेचे वेळी इतर सभासद निवडण्यांत येत माझे स्नेही, श्री ना म जोशी, हे कित्येक वर्षं गव्हर्निंग बॉडीवर हिंदुस्थानचे प्रतिनिधी होते, आणि कामगाराविषयी वाटणाऱ्या जिव्हाळ्यामुळें आणि कामगार प्रश्नासबधी असलेल्या सखोल ज्ञानामुळें त्याचेबद्दल सर्वांना फार आदर वाटे या सुमारास आय एल ओ करता भव्य इमारत उभारण्यात आली तेथें आतरराष्ट्रीय कामगाराच्या प्रश्नासबधी सतत कार्य चालू असते लीग ऑफ नेशन्सकरता अशीच, अथवा याहूनही सुदर इमारत जिनीव्हा येथे बाधली होती, परतु आता तिचा उपयोग त्या कार्याकरता होत नाही, कारण तिची वारस युनायटेड नेशन्स या सस्थेचे कार्यालय न्यूयॉर्क येथें नेले गेलें आहे

लडनला गेल्यावर लवकरच नॅशनल लिबरल क्लब, ईस्ट इडिया असोसिएशन आणि रॉयल इन्स्टिटयूट फॉर इटरनॅशनल अॅफेअर्स या तीन्ही सस्थाचा मी सभासद झालों आणि अद्यापहि आहे नॅशनल लिबरल क्लबमध्यें बिलिअर्ड आणि ब्रिज खेळण्याव्यतिरिक्त क्लबच्या वाङ्मय आणि राजकारण मडळानी प्रख्यात प्रागतिक पुढाऱ्याची घडवून आणलेली अनेक भाषणें ऐकण्याची सधि मला मिळाली पन्नास वर्षांपूर्वी इतराच्या मदतीनें दादाभाई नौरोजीनी स्थापन केलेल्या ईस्ट इडिया असोसिएशनमध्यें हिंदुस्थानच्या राज्यकारभारातून सेवानिवृत्त झालेले कित्येक मोठे अधिकारी हिंदुस्थानसबधीचें धोरण आणि राज्यकारभार यावरील वेगवेगळ्या दृष्टीकोनातून लिहिलेले आपले विचार वाचून दाखवीत बहुतेककरून ब्रिटिश सत्तेचें समर्थनच यावेळी केले जाई, परतु काही कारणानिमित्त इग्लडमध्ये आलेल्या अनेक हिंदी पुढाऱ्यानाही आपले राष्ट्रीय विचार माडण्यासाठी ही सस्था पाचारण करी सर फ्रँक ब्राऊन हा या सस्थेचा उत्साही चिटणीस होता, आणि सस्थेचे इतर पदाधिकारी बहुधा हिंदुस्थान सरकारचे सेवानिवृत्त वरिष्ठ अधिकारी, हिंदी सस्थानाचे अधिपती अथवा इतर शिष्ट व्यक्ती असत एशियन रिव्ह्यू या नावाने हल्ली ओळखलें

पुराणातील सिसिफससारखी* अवस्था होईल असे बजाविले

कामगाराची परिस्थिती सुधारण्याचे आणि एकदर जगाचें लक्ष या प्रश्नाकडे वेधण्याचें मोठें कार्य आय् एल ओ नें केलेले आहे कायदेशीर समति दिली नसली तर आय एल ओ ने मान्य केलेले ठराव वेगवेगळया देशाना बधनकारक नसून केवळ शिफारसीवजाच असतात, या ठरावाना समति देण्याबाबत हिंदुस्थानचा क्रमाक वर लागेल जरी प्रत्यक्ष समति नसली तरीहि प्रत्येक देशाच्या राज्यकर्त्यांनी ह्या ठरावाचा विचार करून शक्य तोपर्यंत ते अमलात आणावे अशी अपेक्षा असते ह्या ठरावासबधी कांही कारवाई केली असेल तर ती काय केली याचा अहवाल प्रतिवर्षी वेगवेगळया राष्ट्राना आय एल ओ ला द्यावा लागतो चार वर्षे या परिषदात मी हिंदुस्थान सरकारचा प्रतिनिधी होतों लीग ऑफ नेशन्स्च्या एका कमिटीवर मी काम केलें, आणि नवीनच स्थापन झालेल्या व रोम येथें मुख्य कचेरी असलेल्या आतरराष्ट्रीय शैक्षणिक चित्रपट परिषदेचाही सभासद होतो या सर्व संस्थावर सभासद या नात्याने काम केल्यामळें जगातील वेगवेगळया प्रतिनिधीशी माझा सबध आला आणि एक प्रकारच्या अमोल शिक्षणाचा मला लाभ झाला

सिनेमॅटोग्रॅफिक कॉन्फरन्सच्या सुरुवातीच्या अधिवेशनाची मला चांगली आठवण आहे, तिचे उद्घाटन मुस्सोलिनीने केले, आणि त्यावेळी इटलीचा राजा ॲलबर्ट हा व्यासपीठाच्या खाली बसला होता, खुर्ची मात्र सोनेरी होती दुसऱ्या एका खेपेस मी तेथें असताना इटलीच्या तथाकथित निवडणुका चालू होत्या रोममध्यें सि ( Si ),, म्हणजे होय, या एकाच शब्दाच्या मोठमोठ्या अक्षरांत लिहिलेल्या जाहिराती सर्वत्र दिसत होत्या आणि जनतेला ठरीव उमेदवाराना पाठिंबा देण्यास सागत होत्या विरोधी पक्षाचे कोणी उमेदवारच नव्हते, आणि शेकडा ९९ मताने सरकारी यादीतील सर्व उमेदवार निवडून आले हुकूमशाही राजवटीत देशाची काय परिस्थिती होते याची चागली कल्पना वेळोवेळी रोमला गेल्यामुळें मला झाली मोकळेपणाने बोलण्याची प्रत्येकाला धास्ती वाटे कारण जवळ कोण हेर असेल आणि तो केव्हा पोलिसाला काय माहिती देईल याचा भरवसा नसे हॉटेलमध्ये परदेशी लोकसुद्धा जर मुस्सोलिनी-विषयी बोलू लागले तर त्याना तसे न करण्याची हळूच विनती केली जाई

पहिल्या महायुद्धानतर लीग ऑफ नेशन्सच्या समवेत इटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन ही सस्था अस्तित्वात आली, आणि दुसऱ्या महायुद्धानतर लीग ऑफ नेशन्स जरी नामशेष झाली असली तरी इटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन आजही उपयुक्त कार्य करीत आहे अमेरिका हा देश सभासद न झाल्यामुळें लीग ऑफ नेशन्समध्यें जी उणीव होती ती इटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशनमध्यें नव्हती

* सिसिफस यावर ज्युपिटर याचा रोष होता एक मोठा धोंडा ढकलीत तो एका डोंगराच्या शिखरावर नेण्याचें काम शिक्षा म्हणून त्याला सांगण्यात आलें होतें, परतु दगड आता शिखरावर पोंचणार इतक्यांत तो धडपडत पुन्हां खाली येई.

अखिल जगातील कामगाराच्या कल्याणाचा ती विचार करते आणि प्रत्येक राष्ट्रातील सरकार, उद्योगपती आणि संघटित कामगार यांचे प्रतिनिधी तिच्या वार्षिक परिषदांचे वेळी सभासद असतात भाषणें बहुधा इंग्रजी अथवा फ्रेंचमधून होतात, आणि इतर भाषांतून त्यांची तात्काळ भाषांतरें करण्याची पद्धत तेथें शोधून काढलेली आहे मला वाटते हीच पद्धत युनायटेड नेशन्सच्या आणि इतर आंतरराष्ट्रीय संस्थांच्या सभांचे-वेळी आता प्रचलित आहे मी तेथे असताना फ्रान्सचा आलबेर थॉमस (Albert Thomas) हा इंटर नॅशनल लेबर ऑर्गनायझेशनचा डायरेक्टर होता इंग्लंड, फ्रान्स आणि अमेरिका ह्या तीन राष्ट्रांचें संस्थेंत जास्त वजन होतें संस्थेच्या सचिवा-लयांत सर्व देशांचे अधिकारी होते, परंतु वरील तीन राष्ट्रांतील स्त्रीपुरुषांचाच भरणा जास्त होता आय एल ओ च्या गव्हर्निंग बॉडीवर उद्योगधंद्यांत पुढारलेल्या सहा राष्ट्रांचे कायम सभासद असत आणि हिंदुस्थान त्या सहांपैकी एक राष्ट्र होतें प्रतिवर्षी परिषदेचे वेळी इतर सभासद निवडण्यात येत माझे स्नेही, श्री ना म जोशी, हे कित्येक वर्षे गव्हर्निंग बॉडीवर हिंदुस्थानचे प्रतिनिधी होते, आणि कामगारांविषयी वाटणाऱ्या जिव्हाळ्यामुळे आणि कामगार प्रश्नांसबंधी असलेल्या सखोल ज्ञानामुळे त्यांचेबद्दल सर्वांना फार आदर वाटे या सुमारास आय एल ओ करतां भव्य इमारत उभारण्यांत आली तेथें आंतरराष्ट्रीय कामगारांच्या प्रश्नांसबंधीं सतत कार्य चालू असतें लीग ऑफ नेशन्सकरता अशीच, अथवा याहूनही सुंदर इमारत जिनीव्हा येथे बांधली होती, परंतु आता तिचा उपयोग त्या कार्याकरता होत नाहीं, कारण तिची वारस युनायटेड नेशन्स या संस्थेचे कार्यालय न्यूयॉर्क येथें नेले गेले आहे

लंडनला गेल्यावर लवकरच नॅशनल लिबरल क्लब, ईस्ट इंडिया असोसिएशन आणि रॉयल इन्स्टिटयूट फॉर इंटरनॅशनल अॅफेअर्स् या तीन्ही संस्थांचा मी सभासद झालो आणि अद्यापहि आहे नॅशनल लिबरल क्लबमध्ये बिलिअर्ड आणि ब्रिज खेळण्याव्यतिरिक्त क्लबच्या वाङ्मय आणि राजकारण मंडळांनी प्रख्यात प्रागतिक पुढाऱ्यांची घडवून आणलेली अनेक भाषणे ऐकण्याची संधि मला मिळाली पन्नास वर्षांपूर्वी इतरांच्या मदतीनें दादाभाई नौरोजींनी स्थापन केलेल्या ईस्ट इंडिया असोसिएशनमध्यें हिंदुस्थानच्या राज्यकारभारांतून सेवानिवृत्त झालेले कित्येक मोठे अधिकारी हिंदुस्थानसंबंधीचे धोरण आणि राज्यकारभार यांवरील वेगवेगळया दृष्टीकोनातून लिहिलेले आपले विचार वाचून दाखवीत बहुतेककरून ब्रिटिश सत्तेचें समर्थनच यावेळी केले जाई, परंतु काही कारणानिमित्त इंग्लंडमध्ये आलेल्या अनेक हिंदी पुढाऱ्यानाही आपले राष्ट्रीय विचार मांडण्यासाठी ही संस्था पाचारण करी सर फ्रँक ब्राऊन हा या संस्थेचा उत्साही चिटणीस होता, आणि संस्थेचे इतर पदाधिकारी बहुधा हिंदुस्थान सरकारचे सेवानिवृत्त वरिष्ठ अधिकारी, हिंदी संस्थानांचे अधिपती अथवा इतर शिष्ट व्यक्ती असत एशियन रिव्ह्यू या नावाने हल्ली ओळखलें

जाणारे एक मासिक ही संस्था चालवते रॉयल इन्स्टिटयूट फॉर इंटरनॅशनल अॅफेअरस् ही आंतरराष्ट्रीय प्रश्नाचा सर्वस्वी नि पक्षपाताने विचार करणारी एक बिनसरकारी संस्था आहे, आणि चॅथम हाऊस हें तिचे लोकप्रिय अभिधान आहे या संस्थेंत अनेक प्रसंगी आंतरराष्ट्रीय महत्वाच्या प्रश्नावर जगातील सुविख्यात व्यक्ति आपले विचार व्यक्त करीत संस्थेच्या "इंटरनॅशनल अफेअरस्" या नियतकालिकात यापैकी कित्येक भाषणें प्रसिद्ध करण्यात येतात ही भाषणें फार माहितीपूर्ण व सुश्राव्य असत आणि मी लंडनमध्यें असताना ती कधीही चुकवली नाहीत चॅथम हाऊसचे ब्रिटिश कॉमनवेल्थमधील तत्सम संस्थाशी संबंध आहेत आणि दिल्लीत सप्रू हाऊसमध्यें मुख्य कचेरी असलेली इंडियन कौन्सिल ऑफ वर्ल्ड अफेअर्स् ही तशीच एक हिंदी संस्था आहे आंतरराष्ट्रीय प्रश्नाच्या अभ्यासाकरता चॅथम हाऊस स्वतः सर्व सोयी उपलब्ध करून देतें आणि तेथील वाचनालय त्या दृष्टीने फार उपयोगी आहे

इंग्लंडमध्यें असताना हिंदी दृष्टीकोन ब्रिटिश जनतेसमोर मांडण्याची संधी मी कधी दवडली नाही विशेषत मिस् मेयोचें "मदर इंडिया' हें हिंदुस्थानची एकच बाजू रंगविणारें पुस्तक असल्याची टीका मी डेली मेलमध्ये लेख लिहून केली होती

एकदा सर रेजिनल्ड क्रॅडक यानें लंडन टाइम्समध्यें पत्र लिहून मराठ्यावर खाली दिल्याप्रमाणे निष्कारण कोरडे ओढले होते.

"नागपूर प्रांतावर अनेक वर्षे राज्य केलेल्या गोंड घराण्याला मराठ्यांनी जेव्हा पदच्युत केले तेव्हा जरूर होती तोपर्यंत गौंड राजाच्या राजकीय शिक्क्याचा उपयोग करणे त्याना फायद्याचे वाटले ब्रिटिश सरकारशीसुद्धा अशाच प्रकारें वागण्याचा हे राष्ट्रीयवादी हिंदी लोक विचार करतात'

टाइम्सला मी थोडक्यांत पुढें दिल्याप्रमाणे पत्र लिहिले

सर रेजिनाल्ड क्रॅडक याच्या डोळ्यात मराठे फार खुपतात हे उघड आहे मराठ्याबद्दल त्याला जर इतका तीव्र संताप वाटत नसता तर त्याचा उल्लेखहि करण्याची जरूरी नव्हती, कारण उदाहरणच द्यायचें होतें तर खुद्द ब्रिटिशाचेंच देता आले असते क्लाइव्हनें त्याना बंगालची दिवाणी मिळवून दिली आणि सुरवातीस ईस्ट इंडिया कंपनीने ती खरोखर वस्तुत राबवली परंतु काही काळ नावाला कागदोपत्रीं कायदेशीर भाषेत मोगल साम्राज्याचाच एक भाग (De Jure) म्हणून या स्वरूपात ती राहिली किंवा त्यापेक्षाहि वऱ्हाडचे त्याला अगदी अलिकडचेंहि उदाहरण देता आले असते वऱ्हाड हा जरी नावापुरता निजामच्या राज्याचा एक भाग मानला जात होता तरी सर रेजिनॉल्ड क्रॅडॉक हा स्वत च मध्यप्रदेशाचा चीफ कमिशनर या नात्याने त्या वऱ्हाडचा कारभार अनेक वर्षे पहात होता"

परदेशात, विशेष इंग्लंडमध्यें, विद्यार्जन करणाऱ्या हिंदी विद्यार्थ्यांसंबंधी

मला फार आस्था वाटत असे, आणि वेगवेगळ्या समारभात त्याच्या गांठीभेटी होत असत सामान्य शिक्षणाच्या सर्व सोयीसवलती हिंदुस्थानातच उपलब्ध असल्या पाहिजेत, आणि हिंदुस्थानात मिळू शकणार नाहीं अशा उच्च शिक्षणाकरता आणि सशोधनाकरतांच केवळ हिंदी विद्यार्थ्यांनी परदेशी जावे असा माझा नेहमीच आग्रह असे विशेषत इग्लडमध्यें इन्स ऑफ कोर्टमधून बॅरिस्टरीचें शिक्षण घेण्याकरता हिंदी लोकानी इग्लडमध्ये जाण्याचे व ते शिक्षण घेतल्यानतर हिंदी कायदाव्यवस्थेंत त्याना विशेष सवलती देण्याचे प्रयोजन नाही असें माझे मत आहे सुदैवाने स्वातत्र्य-प्राप्तीनतर या सवलती वहुतेक रद्द करण्यांत आल्या आहेत आपल्या देशात मिळू शकणारें सर्व शिक्षण आत्मसात् केल्यानतरच हिंदी लोकानीं शिक्षणाकरता परदेशी जावे असें मी सदैव प्रतिपादीत आलो आहें सधी मिळेल तेव्हा प्रत्येक वेळी ब्रिटिश जीवनातले चागले आणि ग्राह्य असेंच विशेषेकरून अभ्यासावे आणि मिस् मेयोने आपल्या कुप्रसिद्ध पुस्तकात हिंदुस्थानच्या बाबतीत जसें केले आहे, तसे आपण इग्लडच्या बाबतीत त्या देशातील फक्त घाणेरड्या बाबीकडे लक्ष देऊन करू नये असें मी हिंदी विद्यार्थ्यांना परोपरीने सागत आलों आहें अनेक ब्रिटिश विचाराचा आणि आचाराचा आपण अगीकार केला आहे इग्लडमधील राजकारण केवळ हाऊस ऑफ कॉमन्समध्यें शिजत नाही, लोकाचे मत बनविणें, पक्षाची सघटना करणें आणि त्याकरता अनेक लोकानी रोज झटणे हे राजकारणाचे खरे कार्य आहे इग्लडमध्यें विद्यार्जन करणारे आपले काही विद्यार्थी पुढें स्थानिक अथवा म्युनिसिपल कारभारात भाग घेऊ पहातील त्यानी इग्लडमध्ये हा कारभार कसा केला जातो, रहदारीची व्यवस्था कशी ठेवली जाते, आरोग्याच्या योजना कशा अमलात आणल्या जातात आणि प्रत्येक नागरिकाला आपल्या हक्काची तशीच जबाबदारीचीही कशी जाणीव असते ह्याचेहि निरीक्षण करावें

प्रमाणशीर प्रतिनिधित्वाविषयी ( Proportional representation ) मला नेहमीच जिव्हाळा असे, आणि हिदुस्थानच्या जातिबद्ध प्रतिनिधित्वाच्या प्रश्नाला या योजनेने उत्तर मिळणे शक्य आहे असे मला वाटे स्वातत्र्यानतर जवळ जवळ हे जातिबद्ध प्रतिनिधित्व नाहीसे झालें आहे १९१६ मध्ये मॉटेग्यू जेव्हा हिदुस्थानात आला होता त्या वेळी यासबधी एक तपशीलवार योजना मी त्याला सादर केली होती हे मी मागे सांगितलेलेच आहे इडिया ऑफिसमध्यें असताना तेथील प्रपोरशनल रिप्रेझेंटेशन सोसायटीची माहिती काढून त्या सस्थेचे उत्साही चिटणीस जॉन एच् हम्फ्रेज याच्याशी मी सबध जोडले लहान असून देखील ही सस्था फार मोठे कार्य करीत आहे इग्लडच्या पार्लमेंटाची प्रतिनिधित्वाची पद्धत बदलण्यात अद्याप तिला यश आले नाही तरी जनतेला या प्रश्नाचे शिक्षण देण्याचे उत्कृष्ट कार्य ती करीत आहे आणि Single transferable vote ( एकच फिरतें मत ) ची पद्धत अनेक खाजगी सस्थामध्ये व कित्येक स्थानिक स्वराज्य सस्थामध्यें

रूढ करण्याचें श्रेय तिला मिळाले आहे ब्रिटिश कॉमनवेल्थमधील दोन राष्ट्रात प्रमाणशीर प्रतिनिधित्वाची पद्धत चालू आहे ऑस्ट्रेलियामधील टास्मेनिया या राज्यात ही पद्धत अमलात आल्याला तीस वर्षे होऊन गेली, आणि ती बदलण्याचे तेथील पुष्कळ प्रयत्न विफल झाले आयर्लंडचे स्वतंत्र राज्य स्थापन झालें तेव्हा प्रमाणशीर प्रतिनिधित्वाची योजनाच त्यात सामील करण्यात आली, आणि ती आता तेथील राज्यशासनेचा एक घटकच झाली आहे डी व्हॅलेराच्या सरकारने अलिकडे 'एक सदस्य-मतदार-सघाचा" अवलब करण्याचा केलेला प्रयत्न आणि 'शर्यतीत पहिला येईल तो विजयी ही प्रथा पुन्हा प्रचारात आणण्याकरितां केलेली खटपट मनोरजक आहे त्याकरता आयरिश पार्लमेंटमध्ये आणलेला प्रस्ताव डी व्हॅलेराचे तेथें बहुमत असल्यामूळें आयरिश पार्लमेंटमध्यें मान्यही झाला होता परतु आयरिश घटनेप्रमाणे जेव्हा या प्रश्नावर सार्वमत घ्यावे लागले त्यावेळी जनतेने प्रचलित पद्धतीत फेरफार करण्याचे नाकारलें आणि आयर्लंडमध्यें अद्याप प्रमाणशीर प्रतिनिधित्वच अमलात आहे

ही पद्धत गुतागुतीची आहे, हिंदुस्थानातील बहुसख्य मतदार निरक्षर आहेत, आणि ही पद्धत अमलात आली तर अनेक राजकीय पक्ष निर्माण होतील अशी भीति अनेकाना वाटते, आणि म्हणून मतदानाच्या या पद्धतीला हिंदुस्थानात विरोध होतो या आक्षेपात, विशेषत मतदार निरक्षर आहेत या आरोपात, थोडेबहुत तथ्य असल्यामुळे हिंदुस्थानात सुरवातीला मतदाराला एकच मत असलेल्या बहुसदस्य मतदार सघ या पद्धतीचा किंवा क्युम्युलेटिव्ह (बहुसदस्य मतदार सघ, व प्रत्येक मतदाराला तितकीच मते पण ती वाटेल तशी वाटून देणे) पद्धतीचा अवलब करावा असा पुरस्कार मी करीत आलों आहें यापैकी कोणत्याही पद्धतीने सर्व महत्वाच्या अल्पसख्य पक्षाना योग्य प्रतिनिधित्व खात्रीने मिळेल

मी इग्लडमध्यें असताना माझी मुलगी केंब्रिज येथे तीन वर्षे विद्याभ्यास करीत होती तेथील जुन्या ओळखीना मी फिरून उजाळा दिला पूर्व परिचयाच्या अनेक ठिकाणी जाण्यात आणि माझ्या सेट जॉन्स कॉलेजने आपली उच्च परपरा कायम राखल्याचें पाहून मला अत्यत समाधान झाले १९४५ मध्ये या कॉलेजने मला सन्माननीय सदस्य ( Honorary fellow ) नेमून माझा फार बहुमान केला

१९०४ पासून बुद्धिवादी प्रकाशन सस्था ( Rationalist press association. ) या सस्थेचा मी सभासद होतो, आणि १९२२ मध्यें तिचा आजीव सभासद झालो इडिया ऑफिसमध्यें असतांना या सस्थेशी मी जवळचे सबध जोडले आणि ब्रिटनमध्ये बुद्धिवादाचा प्रचार करीत असताना हिंदुस्थानातहि तसाच प्रचार करण्याकडे लक्ष पुरवावे अशी सूचना त्या सस्थेला केली त्याकरता सुरवात म्हणून बुद्धिवादासबधी सस्थेने सोपें व प्राथमिक स्वरूपाचें एक पुस्तक प्रसिद्ध करावे असे मी सुचविले व सस्थेच्या कौन्सिलने मलाच तसे एक पुस्तक लिहिण्यास सागितलें, आणि

मीतभीतच मी ती विनती मान्य केली, कारण संस्कृत साहित्याचा किंवा भारतीय तत्वज्ञानाचा मी तज्ञ नाही The crux of the Indian problem ( हिंदच्या समस्येचें मूळ) हें छोटेंसे पुस्तक मी १९३१ मध्ये लिहिलें आणि आर पी ए नें ते प्रकाशित केले त्यातील मुख्य आशय असा कीं जातीय तेढीसारख्या गंभीर समस्या व इतर हिंदुस्थानातील बरेचसे प्रश्न तेथील जनतेवर धर्माचा जो दृढ पगडा बसलेला आहे त्यामुळेंच उद्भवतात आणि कित्येक वेळा तर हा धर्म म्हणजे रूढ आणि भोळसट आचाराचे दिखाऊ पालन यापेक्षा दुसरें काही नाही बुद्धिवादी दृष्टीकोनातून प्रत्येक प्रश्नाचा विचार करण्याची सवय भारतीयानी जडवून घेतली नाही तर देशाची प्रगती मदगतीनेच होत राहील आणि ती होणेही बिकट होईल बुद्धिवादाचें साधें प्राथमिक विवेचन या दृष्टीनें हें पुस्तक थोडेंफार यशस्वी झाले अर्थात् सनातनी आणि बऱ्याच प्रतिगामी समाजामध्यें त्यावर वारवार टीका झाली बुद्धिवादाचा मोठ्या प्रमाणावर आणि हेतुपुरःसर स्वीकार केल्याने देशातील अनेक बिकट समस्या सुटतील असे मला अजूनही वाटते

१९३१ सालच्या अखेरीस पहिली गोलमेज परिषद (Round table conference) झाली इंडिया कौन्सिलच्या सभासदाचा या कॉन्फरन्सशी औपचारिक दृष्टीने काही संबध नव्हता आणि इंग्लडच्या राजेसाहेबानी केलेल्या परिषदेच्या उद्घाटनाच्या वेळी आणि बंकिगहॅम पॅलेसमध्यें परिषदेच्या सभासदाना दिलेल्या उपहारप्रसंगी तेवढा मी हजर होतो या उपहारप्रसगी गाधी हजर होते आणि सर्वांचें लक्ष त्याचेकडे वेधले होते शास्त्री, सप्रू, विठ्ठलभाई पटेल इत्यादि माझे स्नेही असलेले परिषदेचे सभासद मला खाजगीरीत्या भेटले काँग्रसचे आणि अस्पृश्य समजलेल्या वर्गाचे प्रतिनिधित्व एकट्या गाधीनी करावे हे आपल्याला बरोबर वाटत नाही, परतु त्याच्या आग्रही स्वभावामुळें आम्हाला मान तुकवावी लागते अशी कबुली विठ्ठलभाई पटेल यानी माझेजवळ दिली होती कॉन्फरन्सचें हे अधिवेशन फारसे कार्य करू शकले नाही असे दिसले

माझ्या नेमणकीच्या पाच वर्षाच्या शेवटी मी तीन महिने हक्काची रजा घेतली आणि १ जानेवारी १९३२ रोजी इंग्लड सोडून २० जानेवारीला मुबईला आलों पूर्वींच सांगितल्याप्रमाणें माझ्या आयुष्यांतील ही पाच वर्षें फुकट गेली असेच म्हटले पाहिजे परतु काम एकदा स्वीकारल्यानतर मुदत सपेपर्यंत राजिनामा देण्यास सबळ कारण नव्हतें

प्रकरण पंधरावें

# लखनौ

इंग्लंडहून परतल्यावर पुण्यामधले जुने ऋणानुबंध पुन्हा प्रस्थापित करण्याच्या उद्योगाला मी लागलों १९३२ च्या जूनमध्यें फर्ग्युसन कॉलेजात विनावेतन शिकविण्याचे काम मी अंगिकारले, पण त्यानंतर लवकरच मला लखनौ विद्यापीठाकडून उपकुलगुरुची जागा स्वीकारण्यासंबंधी विचारणा करण्यात आली श्री जगत्-नारायण यांनी राजिनामा दिल्यामुळें ही जागा रिकामी झाली होती लखनौला माझे स्नेही डॉ एस् एस् साने हे रसायनशास्त्राचे रीडर होते उन्हाळ्याच्या सुट्टीत त्यांची व माझी गाठ पडली असल्यामुळें मी तात्पुरता मोकळा होतो, हें त्यांना ठाऊक होते त्यांच्याच सांगण्यावरून बहुधा मला ही विनंती करण्यात आली असावी मला बोलाविण्याचा निर्णय हा विद्यापीठाच्या कार्यकारिणीने जवळ जवळ एकमताने घेतला आहे, व माझें नाव कुठल्याहि एका विशिष्ट गटानें अथवा पक्षानें सुचविलेलें नाही, याची खात्री करून घेतल्यानंतरच मी माझा होकार कळविला आणि सप्टेंबरात त्या जागेवर रुजू झालों उपकुलगुरूच्या पदाची मुदत तीन वर्षांची होती १९३५ मध्यें माझी पुन्हा निवडणूक झाली तेव्हा एकूण सहा वर्षें माझें लखनौला वास्तव्य होते माझे काम मला रुचणारे व पुण्यामधल्या अनुभवाशी सुसंगत असेंच होते या सहा वर्षांच्या काळात, विद्यापीठाच्या परिसरामधलें वातावरण एकूण शांत राहिले व विद्यापीठाची भरभराटच होत गेली असें मोठ्या समाधानाने म्हणावेंसे वाटते

लखनौला जाण्याच्या या आमंत्रणामुळें माझ्या एका जुन्या आठवणीला उजाळा मिळाला हिंदु व मुसलमान यांच्यामधल्या करारास मान्यता देणारें ऐतिहासिक महत्वाचें कॉंग्रेसचें अधिवेशन १९१६ च्या डिसेंबरमध्ये लखनौला भरले होते या अधिवेशनास प्रा एच जी लिमये, डॉ पी डी गुणे व प्रिन्सिपल जे आर घारपुरे या माझ्या पुण्याच्या सहकाऱ्यांबरोबर मी एक प्रतिनिधि म्हणून उपस्थित होतो विषयनियामक समितीच्या निवडणुकासाठी मवाळ पक्षाने माझे नाव सुचविले होते माझ्या विरुद्ध साताऱ्याचे आर. पी करंदीकर हे मुंबईच्या जहाल पक्षाचे उमेदवार

होते मी पराभूत झालों परतु अध्यक्ष श्री अंबिकाचरण मुजुमदार यानी त्याच्या स्वत च्या नियुक्त उमेदवारात माझा समावेश केला या अधिवेशनात मान्य करण्यात आलेली हिंदुमुसलमानामधील तडजोड मला फारशी आवडली नाही कारण ती स्वीकारणे म्हणजे मुसलमानासाठी स्वतंत्र मतदारसघ स्थापणे व त्याना त्याच्या सख्येच्या प्रमाणापेक्षा जादा प्रतिनिधित्व देणे या दोन तत्वाचा कायम स्वीकार करण्या-सारखे होतें जनमतप्रवाह मात्र निर्विवाद या तडजोडीच्या बाजूचा होता त्याच्या प्रचड जयघोषांत आमचे दुबळे आवाज म्हणजे दर्यांमे खसखस असेच दिसले

असो मला सागायची आहे ती हकीकत जरा खाजगी स्वरूपाची आहे लखनौला आमची राहण्याची सोय तबूमधून करण्यात आली होती हवा विलक्षण थड असे आम्ही बहुतेकजण सकाळीच दाढी करीत असू परतु माझे स्नेही प्रा लिमये याचे न्हाव्याशिवाय भागत नसे छावणीमध्ये तर न्हावी नव्हता लिमयाना एका वडचा व्यक्तीला भेटायला जायचे होते तीन चार दिवसाचे खुट वाढलेले, अशा अवस्थमध्ये कसें जावे या फिकीरींत ते पडले अखेर मी त्याच्या मदतीला धावून गेलो स्मश्रूकामाचा मला थोडासा अनुभव असल्याचे सागून त्यांची दाढी करून देण्याची मी हमी घेतली माझे मित्र बालकराम व मी जेव्हा केंब्रिजमध्यें शिकत होतो, तेव्हा दुसऱ्यांची दाढी आपणास करिता येईल का हें पहाण्याचें आम्ही दोघानी ठरविले, आणि पहिला प्रयोग एकमेकावर करण्याचें ठरवून, या प्रकरणात जर एकाने दुसऱ्यास कापले तर दड म्हणून इंग्लडमध्यें गोळा करण्यात येत असलेल्या दुष्काळ फडाला त्यानें एक पौड द्यायचा असा करार आम्ही केला परिणामी हा फड दोन पौडानी वाढला त्यानतर माझ्या बऱ्याच मित्रावर निरनिराळ्या कारणानीं हात चालवून पाहण्याचा प्रसग आला त्यांत सुप्रसिद्ध मराठी नाटककार गोविंद बल्लाळ देवल, प्रो राजवाडे व अण्णा कर्वे ही मडळी होती प्रा लिमयाची दाढी करण्यात मी गुतलों असता, माझ्या आगमनाची वार्ता कळल्यामुळे, सीनियर रँग्लर कसा दिसतो हे पाहण्यास उत्सुक असलेले तिथल्या कॅनिंग कॉलेजचे काही विद्यार्थी सरळ तबूमध्यें न विचारिता आले गणिताहून कांहीशा भिन्न अशा या उद्योगात मला मग्न झालेला पाहून त्याना काय वाटले असेल तें सागता येत नाही मी जेव्हां उपकुलगुरु म्हणून पुन्हा लखनौला परत आलों तेव्हा हा प्रसग त्याच्यापैकी किती जणाना आठवला असेल कुणास ठाऊक

लखनौ विद्यापीठ हें सॅडलर कमिशनने शिफारस केलेल्या नव्या पद्धतीच्या विद्यापीठापैकी एक आहे या पद्धतीनुसार, आर्ट्स् व सायन्स या दोन्ही शाखाचा इटरपर्यंतचा अभ्यासक्रम हा एका शालात माध्यमिक व इटरमीडिएट परीक्षा घेणाऱ्या बोर्डाकडे सोंपविण्यात आला होता त्याच्यातर्फेच शालात व इटर-मीडिएट परीक्षा घेतल्या जात इटर उत्तीर्ण झाल्यावरच विद्यार्थ्यांना विद्यापीठांत प्रवेश मिळे बी ए वा बी एस्सी चा अभ्यासक्रम दोन वर्षांचा, व ऑनर्सचा तीन

वर्षांचा होता पदवीनंतर दोन वर्षांनी एम ए वा एम एस्सी. होता येई लखनौचे मेडिकल कॉलेज हे सरकारच्या आर्थिक मदतीनें विद्यापीठच चालवीत होते या कॉलेजात प्रवेश मिळविण्यासाठी इटर सायन्स उत्तीर्ण झाल्यानतरहि विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परीक्षा द्यावी लागे, कारण प्रवेश इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची सख्या बेसुमार असे माझ्या काळात आर्ट्स्, सायन्स, मेडीसन, लॉ व कॉमर्स या विषयाचे वर्ग विद्यापीठातर्फे घेतले जात मुलीसाठी बी ए व बी एस्सी चे वर्ग मात्र एका मिशनरी सस्थेने (इझाबेला थोबर्न कॉलेज) चालविले होते अलाहाबाद विद्यापीठ हें ज्याप्रमाणें अलाहाबाद शहरापुरतेच होते, त्याप्रमाणे लखनौ विद्यापीठ लखनौशहरापुरतेच होते उत्तर प्रदेशात बनारस व अलिगड या शहरींहि एकस्थानी विद्यापीठे आहेत इतर ठिकाणची सर्व महाविद्यालयें ही मुख्यत्वे विद्यालयासघी ( Affiliating ) स्वरूपाच्या अशा आग्रा विद्यापीठाशी सलग्न आहेत आमच्या वेळच्यापेक्षा विद्यार्थ्यांच्या सख्येत बेसुमार वाढ झाल्याकारणाने लखनौमधल्या काही कॉलेजांना आर्ट्स् व सायन्सचा पुरा अभ्यासक्रम शिकविण्याची मान्यता आतां देण्यात आली आहे माझ्या वेळी, मुलींच्या विद्यालयातल्या शिक्षकाचा अपवाद वगळल्यास, विद्यापीठाच्या सेवेतले सर्व शिक्षक हे प्राध्यापक, रीडर, लेक्चरर व डेमॉन्स्ट्रेटर या श्रेणीमध्ये विभागलेले असत त्याच्यापैकी काहीं जण हे पूर्वी अलाहाबाद विद्यापीठाशी त्यावेळी सलग्न असलेल्या जुन्या कॅनिग कॉलेजातले होते

या शिक्षकवर्गामधले बरेचजण आपापल्या विषयात गाढे तज्ञ होते बिरबल सहानी–(वनस्पतिशास्त्र), बाल–(प्राणीशास्त्र) सिद्धात–(इग्रजी), वली महमद–(विज्ञान), मॅकमोहन–(रसायनशास्त्र), सेन गुप्ता–(प्रायोगिक मानसशास्त्र), राधा कुमुद मुखर्जी– (भारतीय इतिहास), राधा कमल मुखर्जी– (अर्थशास्त्र), स्ट्रॅग–(गणित), अय्यर– (सस्कृत), बरिज– (जीवनशास्त्र), स्प्रॉट– (रोगचिकित्सा), व्यास–(वैद्यक), निगम (शस्त्रक्रिया), दासगुप्ता (वणिज्य), ही कांही विशेष उल्लेखनीय नावे म्हणता येतील

निरनिराळे शास्त्रीय विषय शिकविण्यासाठी असलेल्या प्रयोगशाळा या सर्वसाधारणपणे साधनसपन्न होत्या परतु भौतिक शास्त्राच्या विद्यार्थ्यांची सख्या फार वाढल्यामुळें शिक्षणाची नीट व्यवस्था करणे हे काहीसे अवघड होऊन बसे सर्व विभागातून बऱ्याच मोठ्या प्रमाणावर सशोधनकार्य चाले माझ्याच कारकीर्दीत प्रा बिरबल सहानीची रॉयल सोसायटीचे फेलो (एफ आर एस ) म्हणून निवड करण्यात आली प्राचीन भूगर्भशास्त्र ( Palaeontology ) या विषयामधली महान अधिकारी व्यक्ति म्हणून त्यानी जगन्मान्यता मिळवली मृत्यूनतर, त्यानी ठेवलेली देणगी व राज्य व केंद्र सरकारची अनुदाने यांच्या सहाय्यानें लखनौला 'बिरबल सहानी इन्स्टिटयूट' ही त्याच्या विषयाला वाहिलेली अखिल भारतीय सस्था स्थापन करण्यात आली आहे

विद्यापीठाची चार-पाच वसतिगृहे होती त्यातून व शहरामधल्या वेगवेगळ्या भागामध्यें खाजगी घरातून विद्यार्थी रहात आय टी कॉलेजमध्यें शिकत नसलेल्या, परतु विद्यापीठाच्या नित्याच्या वर्गांना येणाऱ्या, पदवीधर व पदवीपूर्व विद्यार्थिनी-साठी माझ्या सागण्यावरून एक लहानसे वसतिगृह उघडण्यात आले लखनौमधल्या विद्यार्थ्यांच्या रहाणीचा एकूण दर्जा हा पुण्यामधल्या व महाराष्ट्रामधल्या विद्यार्थ्यांच्या मानानें बराच वरचा होता हा बहुधा लखनौच्या जुन्या नवाबी जमान्याचा परिणाम असावा फुटबॉल, हॉकी व टेनिस हे मुलाचे विशेष आवडते खेळ होते पुण्यामुबईला असलेली क्रिकेटची लोकप्रियता मात्र लखनौला दिसून आली नाही प्रत्येक वसति-गृहाचें स्वत चे असें एक युनियन असे याशिवाय एक विद्यापीठ युनियनही होते, मात्र वार्षिक निवडणुकाचा काळ सोडला, तर या विद्यापीठ युनियनविषयी विद्यार्थी बरेचसे उदासच असत या युनियनमध्यें क्वचितच वादविवाद सभा भरवल्या जात विविध विषयावरची मान्यवर व्यक्तीची व्याख्यानेंहि पुण्याइतकी मोठ्या प्रमाणावर होत नसत मी येण्याआधीच्या काळात, सधाच्या निवडणुका जातीयतेच्या तत्वावर लढविल्या जात सख्येने एकूण विद्यार्थ्यांच्या एक चतुर्थांश असलेले मुसलमान विद्यार्थी या निवडणुकातून बहुधा अपेशी ठरत मी अधिकारावर येण्याअगोदरच काही जागांसाठी निदान काही नियमित वर्षे केवळ मुसलमान विद्यार्थीच निवडावयाचे असा एक नियम मान्य करण्यात आला होता या निवडणुकीच्या सबधात माझा एक मजेशीर अनुभव सागतों मुसलमानासाठी राखून ठेविलेल्या एका जागेसाठी एकदा एक शीख विद्यार्थी उभा राहिला नावे नोंदविण्याच्या दिवशीच सकाळी आपण धर्मांतर करून घेतले असे त्यानें सागितलें यासबधी माझ्याकडे तक्रार येताच मी चौकशी केली तेव्हा त्याने धर्मांतराचे नुसते नाटक रचले असून इतकी वर्षे सुरळित-पणे चाललेली ही प्रथा उलथून पाडण्याचा त्याचा डाव होता असे आम्हाला आढळून आलें धर्मांतरासाठी आवश्यक असलेला एकहि धर्मविधी त्याने पार पाडला नव्हता या प्रकरणात मी फारच कडक धोरण स्वीकारले नाही तर विद्यापीठात उग्र स्वरूपाचे जातीय दगे झाले असते या शीख मुलाला मी विद्यापीठातून काढून टाकले पुढें त्याने आपल्या वर्तनाबद्दल दिलगिरी प्रदर्शित केली तेव्हा मात्र त्याला मी माफी केली

सर्वसामान्यपणे, लखनौमधल्या विद्यार्थ्यांची बौद्धिक पातळी मला पुण्या-मुबईच्या मुलापेक्षा म्हणण्यासारखी वेगळी वाटली नाही शिस्तीसबधीचे त्याचें वर्तन मात्र, निदान त्या काळात तरी, पुण्याहून कांहीसे मागासलेले वाटले एक प्रसग मला अगदी ठळकपणे आठवतो त्यावरून माझ्या म्हणण्याची प्रचीति येईल शहरा-मधल्या सर्व चित्रपटगृहातून विद्यार्थ्यांना निम्म्या दरात प्रवेश मिळे एकदां दोघे-जण तिकिटविक्रीच्या ठिकाणी गेले व सवलतीच्या दरात तिकिटे मागू लागले तिकिट विक्रेत्याला या दोघापैकी एक जण विद्यार्थी नाही असा सशय आला व त्याने त्याला कमी दरांत तिकिट देण्यास नकार दिला सपूर्ण वस्तुस्थिती माहित नसतानाच

विद्यार्थी जगताचा अपमान झाला आहे अशी समजूत त्यानी करून घेतली व विद्यार्थ्यांचा जमाव खवळून गेला व त्यानें चित्रपटगृहामधल्या सामानाची मोडतोड केली चौकशीअती तो इसम खरोखरच विद्यार्थी नसल्याचें आढळून आलें परतु आपली चूक कबूल करण्याचा मोठेपणा विद्यार्थ्यांमध्ये नव्हता तेव्हा विद्यापीठाच्या वतीने चित्रपटगृहाचे नकसान झाल्याबद्दल चालकाजवळ मला दिलगिरी प्रदर्शित करावी लागली कांही वर्षांमागें केंब्रिजमध्यें घडलेली अशीच एक घटना मी विद्यार्थ्यांना सागितली विद्यार्थिनीना डिग्री देण्याबद्दलच्या सूचनेमुळें विद्यार्थ्यांमध्ये बराच प्रक्षोभ निर्माण झाला होता बहुतेक पुरुष विद्यार्थी सूचनेला प्रतिकूल होते शहरामधल्या एका स्त्रियांच्या कॉलेजसमोर त्यानी निदर्शने केली व तिथे बरीच नासधूसहि केली परतु दुसऱ्याच दिवशी जबाबदार विद्यार्थी नेत्यानी—यांत प्रत्येक विद्यापीठ सघटनेचे विद्यार्थी-अध्यक्षहि होते—झाल्या प्रकाराबद्दल खेद व्यक्त करणारे व विद्यार्थ्यांनी केलेल्या नुकसानीची भरपाई करण्याकरिता वर्गणी मागणारें एक पत्रक काढलें विद्यार्थ्यांनी आपसामधूनच आवश्यक रक्कम जमा केली व या प्रकरणावर सुखासमाधानाने पडदा पडला, या घटनेवरून सर्व सबधित मडळींच्या थोर स्वभावाची उत्तम साक्ष पटते शिस्तीसबधी या सर्व बाबतीत उपकुलगुरूकडे सर्वाधिकार असत त्यामुळें मी घेतलेल्या निर्णयामध्ये विद्यापीठाच्या कार्यकारिणीला ढवळाढवळ करता येत नसे कॉलेजच्या व विद्यापीठाच्या परीक्षामध्यें अप्रामाणिकपणा केल्याची उदाहरणे बरेच वेळा माझ्याकडे येत त्याच्या सत्यतेविषयी खात्री पटली, कीं विद्यापीठ परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्याला दोन वर्षें व कॉलेजच्या परीक्षेला बसलेल्यास एक वर्ष मी कॉलेजातून काढून टाकीत असे अशा वेळी माझ्यावर प्रचड दडपण आणण्याचा प्रयत्न होई गमत म्हणजे कित्येक फार मोठ्या लोकाकडूनहि असा प्रयत्न केला जाई पण मी कधीच बधलो नाही

लखनौ हे पूर्वीच्या अयोध्या राज्याचे राजधानीचें शहर होते हें राज्य खालसा झाले, पण उर्दू सस्कृतीचे माहेरघर म्हणून लखनौची ख्याती आजहि कायम आहे अवधच्या मोठमोठ्या तालुकदाराचे हें प्रमुख ठाणे आहे हे तालुकदार फार मोठे जमीनदार आहेत मात्र अलिकडच्या कूळ कायद्यामुळें बरेच जणाचे उत्पन्न खूपच घटले असावे महाराष्ट्रातील कित्येक सस्थानिकाच्या उत्पन्नापेक्षाहि त्याचे वार्षिक उत्पन्न अधिक असे लखनौचे वातावरण खानदानी होते उच्च वर्गीय लोकाच्या वागण्यातली डौलदार आदब आपल्या मराठी माणसाच्या रोखठोक व ओबडधोबड वागणुकीच्या बरोबर उलट आहे लखनवी रहाणीमध्ये श्रीमती व ऐष याची झळक दिसून येते विद्यापीठातील जीवनावर त्याचा परिणाम झाल्यास नवल नाही ब्रिटिशाच्या राजवटीच्या काळात, तालुकदार मडळी सरकारी दाबाखाली सहज वाकली जात सरकारपुरस्कृत अशा कोणत्याहि योजनेला त्याच्याकडून भरपूर पाठिंबा मिळे बडाच्या वेळच्या व नतरच्या काळामधला व्हाइसरॉय कॅनिंग याचें स्मारक म्हणून

बांधलेले कॅनिंग कॉलेज, व पाचव्या जॉर्जच्या स्मृतिनिमित्त बांधलेले किंग जॉर्ज मेडिकल कॉलेज, या दोन्ही संस्थाना तालुकदाराकडून सढळ हस्ते देणग्या मिळाल्या सरकारनेहि विपुल मदत केली विद्यापीठाची स्थापना होताच ही दोन्ही कॉलेजे त्यात सामील करण्यात आली

लखनौ विद्यापीठाकडे शिक्षण देणे व परीक्षा चालविणे हीं नित्याची कर्तव्यें तर होतींच, पण त्यांच्या जोडीला किंग जॉर्ज मेडिकल कॉलेजाशी संलग्न असलेले एक मोठें हॉस्पिटलहि चालवायचे काम होते किंबहुना उपकुलगुरूच्या कामाचा निदान निम्मा भाग या हॉस्पिटलच्या व कॉलेजच्या कारभारासंबंधी असे हें हॉस्पिटल अत्यंत सुसज्ज होते कर्नल स्कॉटच्या नेतृत्वाखाली असलेला रोगशास्त्र विभाग व डॉ बरिजच्या नेतृत्वाखाली असलेला जीवनशास्त्र विभाग, हे विशेषच परिपूर्ण होते कॉलेजचा शिक्षकवर्ग अध्यापन व संशोधन कार्य करीत असे त्याबरोबरच खाजगी धंदा करण्याचीहि त्याना परवानगी होती फक्त जीवनशास्त्राच्या व शरीरशास्त्राच्या प्राध्यापकाना ही सवलत नव्हती हे सर्व लोक प्रांतामधले अग्रगण्य शस्त्रक्रिया तज्ञ व वैद्य असल्यामुळें त्याचा खाजगी धंदा फार जोरात चाले त्यामुळें नित्याच्या शैक्षणिक कार्याकडे त्यानी दुर्लक्ष केल्याच्या आमच्याकडे वारंवार तक्रारी येत या तक्रारीची दखल उपकुलगुरूला व विद्यापीठाच्या अधिकारी वर्गाला घ्यावी लागे मला वाटतें—शैक्षणिक स्वरूपाच्या इतर हॉस्पिटलामधूनहि अशा प्रकारच्या तक्रारी दुर्मिळ नसाव्यात यावर मला एकच उपाय दिसतो, तो म्हणजे या शिक्षकाना पूर्णकामी अधिकारी नेमून त्याना खासगी व्यवसाय चालविण्यास मनाई करणें मात्र त्याबद्दल त्याना विद्यापीठामधल्या इतर अधिकाऱ्याच्या मानानें फार मोठा पगार द्यावा लागेल

लखनौला मला एक गोष्ट विशेष जाणवली असेल तर ती म्हणजे पक्षबाजी व गटबाजीचा सुकाळ विद्यापीठाच्या हिताला त्यामुळे बाधा येई एखादी नेमणूक करण्याच्या वेळेस तर या राजकारणाला ऊत येत असे पुष्कळ वेळा इतर गोष्टींनाच प्रामुख्य मिळून गुणाची योग्य किंमत केली जात नसे माणूस कुठून आला यालाच महत्व दिलें जाई उत्तर प्रदेश, अवध वा इतर ठिकाणाहून आलेल्या इसमाला त्याच्या प्रांताप्रमाणे महत्व मिळे अर्जदाराची जातहि मुद्दाम लक्षात घेतली जाई या सर्व भानगडीमुळें कित्येक वेळा सर्वांत लायक उमेदवार अपेशी ठरे, व परिणामी विद्यापीठाचा तोटा होई एका विशिष्ट उदाहरणामध्ये सर्वांत उत्तम उमेदवाराला, त्याचा बाप विद्यापीठात लेक्चरर असूनसुद्धा, केवळ तो मूळचा बिहारमधला आहे या सबबीवरून दूर सारण्यात आलें निवडणुका व नेमणुका करण्याच्या प्रसंगी शिक्षकांचा जातीय अभिमान विशेष उफाळून येत असे त्याच्या आपसातल्या भांडणामुळें वातावरण कित्येकदा दूषित होऊन जाई या पक्षाच्या राजकारणापासून मी अगदी अलिप्त रहात असे तंटा उपस्थित झालाच, तर तो सोडविण्यासाठी स्वतंत्र समिती नेमून तिचा निर्णय मान्य करण्याची मी प्रथा पाडली आंतरराष्ट्रीय कीर्तीचे काही

थोर लोकहि बरेच वेळा आपली शक्ति या पक्षीय राजकारणामध्ये खर्चे करीत ही खेदाची गोष्ट म्हटली पाहिजे लखनौ विद्यापीठाबद्दलचे माझें हे विवेचन देशामधल्या अनेक विद्यापीठानाही लागू पडतें शिक्षक जेव्हा मनापासून स्वत ला शिक्षणाच्या व सशोधनाच्या कार्याला वाहून घेतील राजकीय अथवा गटाच्या चळवळीपासून अलिप्त राहतील, व शैक्षणिक बाबीकडे केवळ व्यक्तिनिष्ठ दृष्टिकोनातून पाहण्याचे कटाक्षाने टाळतील, तेव्हाच खरोखर शिक्षणाची व विशेषत विद्यापीठ शिक्षणाची त्वरित प्रगति होईल

लखनौ विद्यापीठाचे आर्ट्स् व सायन्स विभाग व मेडिकल कॉलेज, याना विस्तृत आवारे आहेत जुन्या कॅनिंग कॉलेजाकडून व मेडिकल कॉलेजाकडून हा त्याला वारसा मिळाला प्रांतीय सरकारनेंहि विद्यापीठाला भरपूर प्रमाणात पैशाची मदत केली माझ्या राजवटीत, विद्यापीठाचा पैशाचा कारभार, श्री एस एम हबिबुल्ला यानी फार यशस्वी रीत्या सभाळला माझ्यानतरची तीन वर्षे ते उपकुल-गुरु होते त्याच्या कुशल व्यवस्थेखाली वाचनालयाच्या भव्य अशा इमारतीसाठी पैशाची तरतूद करण्यात आली इमारतीच्या बाधकामाचा आराखडा, सुप्रसिद्ध ग्रथपाल डॉ वलि महमद यांनी तयार केला होता विद्यापीठाच्या जिमखान्यासाठीहि एक इमारत बांधून झाली व विद्यापीठ युनिअनसाठी खास इमारत बाधण्याची योजना करण्यात आली

शिक्षणमत्री श्री जे पी श्रीवास्तव यानी विद्यापीठाला क्रीडागणासाठी गोम-तीच्या तीरावरची बरीचशी सरकारी जागा दिली त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्या-साठी श्रीवास्तवाना एक बहुमानाची पदवी देण्याची कल्पना कार्यकारिणीमधल्या काही मडळींनी काढली पण श्रीवास्तवाच्या काही राजकीय प्रतिस्पर्ध्यांनी या कल्पनेला विरोध केला मी स्वत मात्र पदवी देण्यास अनुकूल होतो, व त्याप्रमाणे ती त्यांना बहाल करण्यात आली त्याच सुमारास, राजेसाहेबाच्या दर वाढदिवशी देण्यात येत असलेल्या सन्मानाच्या पदव्याच्या यादीमध्यें या वर्षी मला सी आय ई ही पदवी देण्यात यावी असें नामदार मत्र्यानी प्राताच्या गव्हर्नरला मागितले असल्याचें माझ्या कानावर आले त्याबरोबरच मत्र्याच्या व माझ्या मधल्या देवघेवीच्या करारावाचाच हा एक भाग आहे असें कांही लोकानी उठवल्याचेंहि मला ऐकू आलें तेव्हा विद्यापीठामधली माझी कर्तव्ये करण्यात माझा काहीं स्वार्थ आहे अशी लोकाची गैर-समजूत होऊ नये यासाठी मी गव्हर्नरला खाजगी पत्र लिहून माझे नाव या सन्माना-साठी न सुचविण्याची विनती केली तुम्हाला त्यायोगें अडचण अथवा सकोच होणार असेल तर तुमचे नाव सुचविले जाणार नाही अशा अर्थाचे गव्हर्नरकडून मोठें दिलदार उत्तर आले एकदोन वर्षांनतर, राजाच्या राज्यारोहणाच्या वेळेस मी सर ही पदवी स्वीकारीन काय असे एका मोठ्या सरकारी अधिकाऱ्याने मला गव्हर्नरच्या वतीने विचारले तेव्हा आधीच्या प्रसगाबद्दल माहिती सागून मी त्याला सकल्पित विचार

सोडून देण्याची विनती केली प्रत्यक्षात काही वर्षांनंतर लढाईच्या काळात १९४२ साली मला सरकी बहाल करण्यात आली १९१६ साली मला जें कैसर इ हिंदचें सुवर्णपदक मिळाले ते अगदी अकल्पितपणेच तारीख एक जानेवारीच्या भल्या पहाटे मला दिल्लीहून अभिनंदनाची तार आली मला तिचा काहीच उलगडा होईना दुपारी जेव्हा मी दैनिकामध्ये बातमी वाचली तेव्हा कुठें हें रहस्य उकललें

लखनौला असताना दिल्ली येथील पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या मुलाखत समितीचा सभासद होण्याचा मजवर दोनदा प्रसंग आला प्रत्येक वेळी कामानिमित्त दोन तीन आठवडे मला दिल्लीला रहावें लागले रंगून विद्यापीठाची पुनर्रचना करण्याच्या कामी नेमलेल्या समितीवर तज्ञ सल्लागार म्हणूनहि मी काम केले या सबंधात मी तीन आठवडे रंगूनमध्यें होतो तेव्हा ब्रह्मी जीवन मला जवळून पाहायला मिळाले रंगून विद्यापीठाचे आवार रमणीय असून त्याच्या विस्ताराला अजूनहि मुबलक वाव आहे आमच्या समितीच्या वाटाघाटीमधून फारसें काहीं निष्पन्न झाले नाही कारण ब्रह्मदेशाला स्वातंत्र्य प्राप्त करून देणारे फेरबदल ब्रह्मी राज्यघटनेमध्ये तेव्हाच करण्यात आले रंगूनमधल्या माझ्या वास्तव्याच्या फार सुखद आठवणी माझ्या सदैव ध्यानात आहेत जीवनाकडे पाहण्याचा ब्रह्मी लोकांचा आनंदी दृष्टिकोण व सर्व क्षेत्रात स्त्रिया घेत असलेला पुढाकार, या दोन गोष्टी माझ्या मनावर विशेष ठसल्या १९२६ मध्यें पूर्वीं एकदां करविवेचन समितीचा सभासद असताना मी रंगूनला गेलो होतों, त्यावेळच्या झालेल्या माझ्या कल्पनांना या दुसऱ्या भेटीनें उजाळा मिळाला ब्रह्मदेशचें सृष्टिसौंदर्य व वनश्री मला कित्येकदा माझ्या कोंकणची आठवण करून देत माझ्यावर जर हिंदुस्थान सोडून परक्या देशामध्ये कायमचे वास्तव्य करण्याची पाळी आली तर मी ब्रह्मदेश वा न्यूझिलंड यापैकी एकाची खात्रीने निवड करीन

पुण्याहून आलेल्या माणसाला लखनौचे हवामान हें उन्हाळ्यात फार उष्ण व हिवाळ्यांत फार थंड वाटल्यास नवल नाहीं जून व जुलैमध्यें तर प्रत्येकजण शक्य तो शहराच्या बाहेर पळ काढण्याचा प्रयत्न करी ही वेळ विद्यापीठाच्या सुट्टीचीच असल्यामुळे माझ्या बऱ्याचशा उन्हाळी सुट्ट्या मी पुण्याला घालविल्या १९३४ मध्यें मी डॉ साने व त्यांच्या कुटुंबियाबरोबर काश्मीरला भेट दिली काश्मीरचे सृष्टि-सौंदर्य अवर्णनीय आहे यात शंका नाही पण तेथील लोकांची रहाणी मात्र फार मागासलेली वाटली झेलम नदीवर आम्ही हाऊस बोटीमध्यें राहिलो होतों या वेळी पेहलगाम व गुलमर्ग आम्ही पाहिली दुसऱ्या एका सुट्टीचें दोन महिने मी मसुरीला घालविले थंड हवेच्या या रमणीय ठिकाणाने मला अक्षरश भुरळ पाडली विद्या-पीठामध्यें असताना मी तिकडील कित्येक ठिकाणांना भेट दिली, व एकदा खेड्यातील रहाणी कशी असते हें पहाण्याकरिता एका तालुकदाराबरोबर त्याचे एक खेडें पहा-वयास गेलों होतों या खेड्यातील ब्राह्मणाच्या घराची दशा मागासलेल्या वर्गाच्या

घराहून वाईट असलेली पाहून मला आश्चर्य वाटले दक्षिण हिंदुस्थानातील ब्राह्मणाना समाजात जी प्रतिष्ठा तेथील भागात असते, ती या खेड्यात मला आढळून आली नाही ही ब्राह्मणमडळी क्वचितच शिक्षणाच्या फदात पडत, वेदाभ्यासाविषयीहि ते अगदी उदासीन दिसले काहीना तर गायत्री मत्र देखील मुखोद्गत नव्हता

प्रकरण सोळावें

# दुसरें जागतिक युद्ध-राजकीय मतें

१९३८ साली मी लखनौ सोडून पुण्याला आलो, आणि जुन्या ओळखींना उजळा देण्याच्या उद्योगाला लागलो १९३९ मध्ये दुसऱ्या महायुद्धाला सुरुवात झाली, आणि देशात बरीच राजकीय चळवळ सुरू झाली तिचें पर्यवसान १९४७ साली आपल्याला स्वातंत्र्य मिळवण्यात झालें पहिल्या युद्धाच्या वेळेप्रमाणेच या युद्धाच्या वेळेसहि माझे मत हिंदुस्थाननें ब्रिटिश सरकारची बाजू उचलून धरावी असेच होते बहुतेक उदारमतवादी मंडळींचे हेच म्हणणे होते मात्र त्याचबरोबर ब्रिटिशांनीं धैर्यानें पुढें येऊन लोकांच्या राजकीय आकांक्षा अर्ध्याअधिक तरी पुऱ्या कराव्यात असा आग्रह मी धरला होता जर्मनी व तिचे पित्ते, यांच्यापेक्षां ब्रिटन आणि दोस्त राष्ट्रांची बाजू अधिक न्याय्य आहे, असे माझें स्पष्ट मत होते राजकीय व औद्योगिक विकासाच्या कालामध्ये हिंदुस्थानला एखाद्या पाश्चात्य राष्ट्राच्या आधाराची आवश्यकता असलीच तर एखाद्या कायझर वा हिटलर यांच्यासारख्या दंडुकेशाही राष्ट्राला जाऊन मिळण्यापेक्षा इंग्लंडसारख्या लोकशाही देशाच्या सहवासातच राहिलेले बरे असे माझे म्हणणे इटली व जर्मनीमध्ये हुकमशाही राजवटीची थोडीबहुत चुणुक मला पाहायला मिळाली होती, त्यामुळें लढाईत जर जर्मनी व मदतनीस तिची राष्ट्रें विजयी झाली तर हिंदुस्थानची स्थिती जास्त वाईट होऊन त्याचा भविष्यकाल अधिकच अनिश्चित होईल याबद्दल मला जरा संदेह नव्हता

पहिल्या महायुद्धात टिळकांचे व दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी गांधींचे व कॉंग्रेसचे पुढारीपण मानणाऱ्या जनतेला माझे म्हणणे पटलें नाही, तरीहि माझी मते जाहीरपणे मांडून सरकारच्या युद्धकालीन भूमिकेला पाठिंबा देण्याची जनतेला विनंती करण्यास मी कधींहि कचरलो नाही त्याचबरोबर हिंदी लोकांच्या आकांक्षा निम्म्याहून तरी अधिक पूर्ण करण्याची मी ब्रिटिश राजकर्त्यांनाहि गळ घालीत असे पहिल्या महा-युद्धाच्या वेळी मॉंटेग्यूंनी आपल्या हातून होईल तितका प्रयत्न केला, पण जालियनवाला बागेची दुर्घटना व तीनंतर सरकारने स्वीकारलेले उग्र धोरण यामुळें त्यांच्या प्रयत्नांना

मुळीच यश आले नाही दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी तर देश प्रक्षोभक चळवळीच्या तडाख्यात सापडला होता "इंग्लंडची अडचण हीच हिंदुस्थानची संधी" हें बऱ्याच पुढाऱ्याचे ब्रीदवाक्य बनले होते उलट इंग्रज राजकर्त्यांनीं हिंदुमुस्लिमात फूट पाडून हिंदी एकजूट होणून पाडण्याची शिकस्त केली

हिंदी जनतेने युद्धकाळात योग्य धोरण स्वीकारावे म्हणून माझी मतें समजावून देण्याची मी पराकाष्ठा केली उदाहरणार्थ, दुसऱ्या महायुद्धाचें रणशिंग वाजताच मी पुढील निवेदन प्रसिद्ध केले

"जर्मनीनें बेल्जियम व नेदर्लंडस्वर निष्कारण स्वारी केल्यामुळें लढाईला अधिक गंभीर स्वरूप प्राप्त झालें आहे हिटलरला यश मिळाले तर युरोप वा आशिया खंडात कुठेंहि नावालादेखील स्वातंत्र्य वर्तमान वा भविष्यकाळांत टिकण्याची आशा उरणार नाही हिटलरच्या घातक दडपशाहीला इंग्लंडचा बळी पडला तर हिंदुस्थानला आपल्या भावी आकांक्षांना तिलांजली द्यावी लागेल या प्रसंगीं दोस्त राष्ट्रांना शक्य तेवढी मदत करण्याची मी सर्वांना, व विशेषत साक्षरांना कळकळीची विनंती करतो ब्रिटनच्याच नेतृत्वाखाली आपापल्या देशाच्या उज्ज्वल भविष्यकालीन आकांक्षाबद्दल निर्धास्त राहता येईल हिंदुस्थानमधील सर्वांत प्रभावी राजकीय पक्ष असलेली कॉंग्रेस, ही वस्तुस्थितीची खरी पारख करून आपलें नैतिक व आर्थिक पाठबळ इंग्लंडलाच देईल असा मला विश्वास वाटतो त्यायोगें हिंदुस्थानला, किंबहुना संपूर्ण मानवतेलाच, शांतता व प्रगती, याविषयी निर्धास्त राहता येईल"

सरकारच्या युद्धसंबंधित प्रयत्नांना हातभार लावण्यासाठी, मी पुणें विभागात बऱ्याच सभा घेतल्या तरुणांना सैन्यात भरती होण्याचा मी आग्रह करीत असे. तत्कालीन युद्धाला त्यायोगें मदत झाली असती हे तर खरेंच पण लढाईच्या धामधुमीनतरच्या अपेक्षित उज्ज्वल कालात देशाला त्याचा खरा उपयोग होईल अशी माझी खात्री होती सैन्याच्या (Commissioned Ranks) अधिकारी श्रेणीत प्रवेश मिळविण्यासाठी मी शिकलेल्या तरुणास प्रोत्साहन देत असे त्यासाठी ज्या विशेष परीक्षा असत त्याची तयारी करून घेण्यासाठी पुण्याच्या महाराष्ट्रमंडळात एक सैन्यपूर्व शिक्षण देणारी संस्था ( Maharashtra Militarisation Board) काढण्यात आली होती या शाखेच्या कामी मी मदत करीत असें तसेच 'बर्लिनचें बातमीपत्र या सदराखाली दर पंधरवड्याला लढाईचा वृत्तांत सादर करण्याची कामगिरी मी आकाशवाणीच्या आमंत्रणावरून पत्करली होती इटली हिटलरच्या बाजूने रणांगणात प्रवेश करणार, असे दिसू लागले त्या सुमारास मी त्या देशाविषयी एक भाषण रेडिओवरून केलें होते या भाषणाचा त्यावेळीं बराच बोलबाला झाला

राजकीय बाबींमध्यें असहकाराच्या शस्त्राचा सर्रास वापर करणे मला कधीच पसंत नव्हते हा बाण जरी तात्पुरता लागू पडला, तरी देशाच्या चारित्र्यावर त्याचा कायमचा घातक परिणाम झाल्याखेरीज राहाणार नाही, असे माझे स्पष्ट मत आहे

असहकार चळवळ व स्वातंत्र्यप्राप्तीमधला तिचा वाटा, याविषयी येथे विस्तारानें लिहिण्याची आवश्यकता नाही माझ्या मतें, संपूर्ण श्रेय या चळवळीकडे जात नाही लढाईमुळें जागतिक विचारात क्रांती घडली होती लोकांच्या वाढत्या आकांक्षा व असंतोष लक्षात घेता, हिंदुस्थानवरची आपली सत्ता आता फार दिवस टिकू शकणार नाही याची ब्रिटनला जाणीव होऊं लागली होती इकडे देशामधील लोकजागृती वाढतच होती संरक्षक दलातील हिंदी सैनिकांना आपल्या हक्काची जाणीव होऊं लागली होती अमेरिकन आणि विशेषत ब्रिटिश मुत्सद्यावर रूझवेल्टच्या, अप्रत्यक्ष का होईना पण मूक, दडपणाचा प्रभाव पडला होता आणि त्यातून लढाई संपताच ब्रिटनमध्ये कामगारपक्ष अधिकारावर आला होता या सर्व गोष्टी आपापल्या परीने आपले स्वप्न साकार करण्यास कारणीभूत ठरल्या या महत्वपूर्ण घटनेत प्रत्येक गोष्टीनें नेमका केवढ्या प्रमाणात हातभार लावला, हें पुढील इतिहासकारच ठरवतील

काँग्रेसच्या धोरणामुळें झालेल्या काही दुष्परिणामाकडे कानाडोळा करून चालणार नाही यापैकी प्रकर्षाने जाणवणारी दुर्घटना म्हणजे आपल्या देशाची हिंदुस्थान व पाकिस्तान अशा दोन राष्ट्रात करण्यात आलेली फाळणी प्रत्येक पुढाऱ्याने जर जातीयवादाचा प्रश्न मुत्सद्देगिरीनें हाताळला असता, तर कदाचित् अशी वेळ आलीच नसती फाळणीनंतर झालेली हिंदुमुसलमानाची भयंकर कत्तल कदाचित् टळली असती दुसरी दुर्दैवाची गोष्ट म्हणजे असहकार चळवळीचे दुष्परिणाम व अशा चळवळीबद्दल लोकाची बनलेली एकूण विचारधारणा, यामुळें आपल्या देशाच्या राजकीय प्रगतीमध्ये अजून बरीच वर्षे तरी अडथळा उत्पन्न होत राहील. ब्रिटिश सरकारविरुद्ध उपसलेल्या असहकार शस्त्राचा वापर लोक आपल्या स्वत -च्याच सरकारविरुद्ध करण्यास कमी करीत नाहींत स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचा काळ हा नाना प्रकारच्या चळवळींनीं व्यापला आहे या चळवळीतूनहि, लोकशाहीच्या तत्वाला बाधक असलेले किती मार्ग सर्रास अवलंबिण्यात आले, याची गणना करिता येणार नाही अगदी क्षुल्लक कारण मिळताच संप, उपोषणे, निदर्शनें, मोर्चे, सभात्याग इत्यादि तंत्राचा वापर करण्यात येतो असहकार चळवळीतील नेत्याच्या चिथावणीचा परिणाम एकूण विद्यार्थीवर्गाची शिस्त ढासळण्यात झाला आहे एकाद्या पक्षाच्या अथवा गटाच्या खऱ्या वा काल्पनिक गाऱ्हाण्याची दाद मागताना तर या पद्धतीचा सर्रास अवलंब केला जातो त्यामुळे शांततेने राज्ययंत्रणा चालवणें मात्र कठीण होऊन बसले आहे जनतेने ब्रिटिशाविरुद्ध स्वीकारलेलें सरकार-विरोधी धोरण, आज स्वातंत्र्यप्राप्तीनंतरहि कायमच टिकून राहिले आहे

अन्याय करणाऱ्याच्या सदसद्विवेकबुद्धीला पाझर फुटण्याची शक्यता असेल तरच असहकाराचे अथवा अहिंसक विरोधाचे शस्त्र वापरायला काढण्यात काहीतरी तथ्य आहे पण जर जुलूम करणाऱ्याला नीतितत्वाची चाड नसेल व कोणत्याहि

परिस्थितीमध्यें आपलें दडपशाहीचें धोरण चालू ठेवण्याचा त्यानें चग बाधला असेल तर असहकाराचा वा अहिंसक विरोधाचा तिथें पाड लागणार नाही, हे उघड आहे उदाहरणार्थ, जर्मनीमधल्या यहुदी लोकानी हिटलरच्या 'यहुदी निर्मूलन' धोरणाविरुद्ध या तत्वाचा अवलब केला असता तर आज एकहि ज्यू शिल्लक राहिला नसता स्वत होऊन हजर होणाऱ्या प्रत्येक यहुद्याला विषारी वायूनें अथवा अन्य भेसूर मार्गांनी ठार करण्याचा हिटलरनें विडा उचलला होता मला वाटतें की दक्षिण आफ्रिकेतहि, सर्व प्रकारें चिरडलेल्या आफ्रिकन लोकानी जर असहकार पुकारला असता तर तीच गत त्याचीहि झाली असती सेसिल ऱ्होडस व त्याचे सहकारी, किंवा त्यापेक्षा, नतर अस्तित्वात आलेल्या मालान व फेरवुर्ड या राजकर्त्यांनी, जागतिक मताचें त्याच्यावर थोडेंसे बधन घडले नसते तर, असख्य नीग्रो लोकाचा सहार करण्यास मागेंपुढे पाहिले नसते घबराट वा तात्कालिक अनिवार स्थितीत ब्रिटिशहि क्वचित् प्रसगी जालियनवाला बागेप्रमाणे कत्तल करण्यास उद्युक्त झाले असले तरी पुनश्च गेलेला तोल सावरण्यास त्याना फारसा वेळ लागत नाही असहकार चळवळीच्या यशाचें बरेचसे श्रेय ब्रिटिशाच्या या स्वभावविशेषाकडे जाते

लढाईत ब्रिटिशाना मदत करण्याचा मी आपल्या लोकाना सल्ला देत असे खरा, पण त्याचबरोबर तितक्याच तत्परतेने मी ब्रिटिश राज्यकर्त्यांचे दोष दाखवून देत असे हिंदुस्थानला आपल्या स्वत च्या सरक्षणापुरतें देखील लष्करी दृष्टीने त्यानी तयार ठेवले नव्हतें इग्रज लोकाचा वर्णश्रेष्ठत्वाचा अहकार त्याच्या वागण्यात नेहमी दिसून येत असे हिंदुस्थानच्या औद्योगिक प्रगतीकडे तर त्यानी मुळीच लक्ष दिलेलें नव्हते ब्रिटिश लोकाच्या उद्योगधद्याचा उत्कर्ष डोळ्यापुढे ठेवून हिंदुस्थानचे आर्थिक धोरण आखण्यात येई देशामधील शिक्षणाकडेहि ब्रिटिशानी कानाडोळाच केला होता हिंदुमुस्लिम, ब्राह्मण ब्राह्मणेतर व स्पृष्टास्पृष्ट, याच्यामधला भेद त्यानी बुद्धचा वाढीस लावला हें तर विदितच आहे या सर्व गोष्टीचा मी पुन पुन्हा उल्लेख करीत असे तथापि, त्यावेळी प्राधान्य कोणत्या प्रश्नाला द्यायचे हेच महत्वाचें होते. हिंदुस्थानला स्वातत्र्य मिळण्याआधी हिटलरचा बिमोड करणें हें माझ्या मते अधिक निकडीचे कार्य होते ब्रिटन व अमेरिकेच्या लोकशाही राष्ट्रावर जर हिटलरने मात केली असती, तर हिंदुस्थानला इतर वसाहतीचा दर्जा (Dominion status) कधीच प्राप्त झाला नसता अशा प्रकारची मते सामान्यपणें अप्रिय असतात याची मला जाणीव होती पण अप्रियतेच्या भीतीमुळें मी माझी स्पष्ट मते बोलून दाखविण्यास कधीहि कचरलो नाही स्वातत्र्यप्राप्तिपूर्व काळाचा राजकीय इतिहास नमूद करण्याचा माझा येथे उद्देश नाही, त्या काळात उदारमतवादी पक्षाची जी थोडकी मडळी शिल्लक होती, त्याची प्रामाणिक मते बुद्धिवादी दृष्टिकोनातून प्राजलपणे माडण्याचा हा अल्पसा प्रयत्न आहे

—

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम .. ३८६७३ .. वि: चरित्र
क्रमांक २२२८ .. नों दि: २०।६।६५

प्रकरण सतरावें

# ऑस्ट्रेलिया

लढाई संपण्याच्या सुमारास हिंदुस्थानसरकारमधल्या हिंदी सभासदांचे महत्व वाढू लागले युद्धकाळातील बिकट परिस्थिति याला कारणीभूत असावी जुना जमाना लवकरच नाहीसा होणार याची राज्यकर्त्यांना जाणीव होऊ लागली होती युद्धपूर्व काळात फक्त ब्रिटिशांसाठी राखून ठेवलेल्या परराष्ट्र खात्याची दारे हळूहळू हिंदी लोकांना खुली होऊ लागली कित्येक वर्षांपासून इंग्लंडात एक इंडियन हाय-कमिशनर (हिंदुस्थानचा प्रतिनिधि अथवा वकील) असे हिंदुस्थानच्या हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी दक्षिण आफ्रिका व सिलोन या देशांतहि हिंदुस्थानचा एक प्रतिनिधि नेमलेला असे अशाच प्रकारच्या आणखी नेमणुका करण्याचें ठरलें ऑस्ट्रेलियाला धाडण्यासाठी हिंदी प्रतिनिधीची नवी नेमणूक करण्याचा जेव्हा विचार चालू झाला, तेव्हा मी ती जागा स्वीकारीन काय असे डॉ ना भा खऱ्यांनी मला विचारले डॉ खरे तेव्हा गव्हर्नर जनरलच्या कौन्सिलात सभासद होते हे नवे काम मी आतापर्यंत केलेल्या कार्यापेक्षा फारच भिन्न स्वरूपाचे असल्यामुळें मला तें एक आव्हानच वाटलें तसेंच या निमित्ताने एका नव्या क्षेत्राच्या रूपाने देशाची सेवा करण्याची संधी मला मिळणार होती तेव्हां मी माझे नाव व्हाईसरॉयकडे पाठविण्यास अनुमति दिली डॉ खऱ्यांनी जेव्हा लॉर्ड वेव्हेलकडे माझी शिफारस केली, तेव्हा मी या कामगिरीसाठी, फार वृद्ध व जीर्ण-माझें वय अडसष्ट वर्षांचे असल्यामुळे,–होणार अशी वेव्हेलनी शंका प्रदर्शित केली यावर खऱ्यांनी मला दिल्लीला जाऊन व्हाइसरॉयची प्रत्यक्ष भेट घेण्याचा सल्ला दिला पाच मिनिटांच्या अवकाशांतच लॉर्ड वेव्हेलने माझी नेमणूक मंजूर केली प्रत्यक्ष भेटीमध्ये माझी प्रकृती व उत्साह याबद्दलच्या त्यांच्या कुशंकांचे निर्मूलन झाले असावे अशा प्रकारे, माझ्या आयुष्यात एक नवीन दालन उघडले गेले १९४४ ते १९४७ च्या दरम्यानची, ऑस्ट्रेलियात घालवलेली, तीन वर्षे मला अत्यंत आल्हाददायक व समाधानकारक अशी वाटली

मीच ऑस्ट्रेलियांतला पहिला हिंदी वकील असल्यामुळें कचेरीची सर्व व्यवस्था

आम्हाला अगदी सुरुवातीपासून करावयाची होती हें काम माझे सेक्रेटरी श्री के आर. दामले यानी उत्कृष्टपणे पार पाडले गेल्याबरोबर आम्हाला रहायला स्वतःची अशी जागा नव्हतीं तीं मिळेपर्यंत पहिले काही महिने आम्हीं हॉटेलात काढले नतर मग तीन शय्यागृहे असलेले एक घर हिंदी वकीलासाठी विकत घेण्यात आले कचेरी-साठीहि जागा भाड्यानें घेण्यात आली माझ्या माहितीप्रमाणे कचेरी अजूनहि याच जागेत आहे सरकार लवकरच एक कायमची व सोईची अशी वकिलातीकरिता इमारत बाधून देईल अशी मी आशा करतो वकिलाच्या सेक्रेटरीसाठी व हिंदी वकिलातीमधील इतर हिंदी नोकरवर्गासाठीहि घरे बांधणे आवश्यक आहे

ऑस्ट्रेलियन कॉमनवेल्थ सरकारची राजधानी असलेले कॅनबेरा हे अगदी लहानसें शहर आहे नवीन व काहीसें कृत्रिम कॉमनवेल्थची राजधानी होण्याच्या एकाच उद्देशानें या शहराची स्थापना केली गेली सिडने व मेलबेर्न या ऑस्ट्रेलियातील दोन प्रमुख शहरात राजधानी पदासाठीं बरीच वर्षे चुरस चालू होती त्या चुरशीचा शेवट करायला हा एकच मार्ग होता कॅनबेरा शहराच्या मूळ योजनेमध्ये बऱ्याच विस्तृत अशा जागेत सुमारे एक लाख लोकवस्ती व्हावी असा अदाज आहे सडका, वृक्षशृगारित असे रस्ते, बाजारपेठा व सार्वजनिक इमारती, या गोष्टीचीहि योजने-मध्ये तरतूद आहे मात्र त्यापैकी फारच थोड्या प्रत्यक्षात अजून उतरल्या आहेत इतर राजधान्यातून आढळतात तशा भव्य व टोलेजग इमारती कॅनबेरामध्ये दिसून आल्या नाहीत कॉमनवेल्थ सरकारचे कार्यालय, व विधिमडळगृह (Parliament House) जरी आपले नेहमीचे काम चालविण्यास सपूर्णपणें समर्थ असली तरी ती शिल्पशास्त्राच्या दृष्टीने सौंदर्याच्या कसोटीला उतरणार नाहीत खास कॅनबेराला एक युद्धस्मारक आहे त्यात युद्धकालीन वस्तूचा अपूर्व असा सग्रह असून दोन्ही लढायामधील ऑस्ट्रेलियाच्या कामगिरीचा, सविस्तर वृत्तात येथे सापडतो मी निघून आल्यानतर एक राष्ट्रीय विद्यापीठ कॅनबेराला स्थापन करण्यात आले आहे भौतिक शास्त्रें, वैद्यक, अर्थशास्त्र व इतर विषयामध्यें उच्च दर्जाचे सशोधन कार्य करण्यास येथे मुबलक सोयी आहेत शास्त्रीय व औद्योगिक सशोधन परिषदेचे (Council of Scientific and Industrial Research) प्रमुख केंद्रहि याच शहरामध्ये आहे ही सस्था फारच कर्तृत्ववान् असून शेतकी व उद्योगधद्याची भरभराट व्हावी यासाठी हरप्रकारें मदत व प्रोत्साहन देत असते कॅनबेरापासून काहीं मैलाच्या अतरावर राष्ट्रीय वेधशाळा आहे मी निघून आल्यानतर कांही वर्षांनी या वेधशाळेला आग लागल्याचे मला कळलें ऑस्ट्रेलियाची राजधानी केवळ ५० वर्षे वयाची आहे काळाच्या प्रवाहाबरोबर आकारमान, सौंदर्य व महत्व या सर्वच दृष्टीनी तिची सर्वांगीण वाढ होईल यात शका नाही कॅनबेराची हवा मला आवडली बहुतेक लोक जरी मेलबेर्न वा सिडने अधिक पसत करीत असले तरी मी कॅनबेराच्या आमच्या मुक्कामावर खुष होतों या शहरातील सामाजिक जीवनावर

तिथल्या सरकारी वातावरणाची फार छाप पडली आहे म्हणण्यासारखे उद्योगधंदे या ठिकाणी दिसत नाहीत कॅनबेरामध्ये एक रोटरी क्लब आहे मला या क्लबचा सन्माननीय सभासद करून घेतले होतें शहरात असलो म्हणजे मी नियमितपणें त्याच्या सभाना जात असे राष्ट्रीय व आतर्राष्ट्रीय प्रश्नाची चर्चा करण्यासाठी एक सघहि कॅनबेरामध्ये स्थापण्यात आला होता

हिंदी वकिलाला कामाचा फारसा ताण नव्हता आस्ट्रेलिया व हिंदुस्थान दोन देशाच्या दरम्यान कोणतीहि बिकट राजकीय समस्या उभी नव्हती गहू व इतर खाद्यपदार्थांचा साठा हिंदुस्थानला धाडण्याची व्यवस्था करणें, हे आमच्या प्रारभीच्या कर्तव्यापैकी एक महत्वाचे कर्तव्य होते आमच्या गरजा पुरविण्याचा ऑस्ट्रेलियन सरकारने आटोकाट प्रयत्न केला ऑस्ट्रेलियाच्या " श्वेत ऑस्ट्रेलिया " या धोरणाबद्दल हिंदुस्थानात बरीच चिंता व्यक्त केली जाते (या धोरणानुसार कृष्णवर्णीयाना ऑस्ट्रेलियात कायमचे स्थायिक होता येत नाही ) साहजिकच हिंदी लोकाची मते यामुळे दुखावली जाऊन त्याच्यात असतोष पसरल्यास नवल नाही परतु प्रत्येक देशाला आपल्या लोकसमाजाचे स्वरूप काय असावे हें ठरविण्याचा अधिकार असावा हे तत्व आज जगात सर्वत्र मान्य झालें असल्यामुळें या धोरणाचा अधिकृत रीत्या निषेध करणे कठीण आहे इतर काही देशानीहि परकीयाच्या आयाती-सबधी अशाच प्रकारचे नियम केले आहेत सबधित देशातील लोकमतामध्यें बदल झाला तरच देशाच्या धोरणात फरक करता येईल वाढता आतर्देशीय व्यापार, सास्कृतिक देवाणघेवाण, व वाढते प्रवासी दळणवळण या गोष्टीच्या द्वारा वेगवेगळ्या देशामध्यें परस्पर स्नेहभाव निर्माण करणे हाच त्यासाठी उत्तम मार्ग होय

१९ व्या शतकाच्या मध्याला, ऑस्ट्रेलियाच्या दुर्गम वाळवटी प्रदेशात सोनें सापडले त्या वेळी बरेच हिंदी लोक या देशात आले वाळवटी भागामध्ये खाण-कामगाराना नेऊन पोहोचविण्यासाठी हिंदुस्थानमधल्या वायव्य प्रातामधून बरेच उट व उट हाकणारे ऑस्ट्रेलियाला आणण्यात आले सुरुवातीला या हिंदी लोकाना बरेचदा अफगाण म्हणून ओळखण्यात येई या लोकाच्या पाठोपाठ फेरीवाले व इतर धदेवाले लोक आले त्यापैकी काहीनी शेतकी पत्करली परतु ऑस्ट्रेलियामधला हिंदी लोकाचा आकडा ५००० च्या वर कधीच गेला नसावा (गेल्या चाळीस पन्नासवर्षां-पासून कुठल्याहि हिंदी इसमास ऑस्ट्रेलियात नव्याने स्थायिक होण्याची परवानगी नाही ) त्यामुळे त्य देशातील हिंदी रहिवाशाची सख्या बरीच रोडावली आहे मला काही म्हातारे लोक भेटले मायदेशाला जाऊन आपले घर पाहून येण्याची मनातली उत्कट इच्छा त्यानी मजजवळ बोलून दाखविली बरेच जणानी ऑस्ट्रेलियातच लग्ने केली आहेत ऑस्ट्रेलियन लोकाच्यात ते आता पूर्णपणे सामावले आहेत ज्या थोड्या हिंदी लोकानी ऑस्ट्रेलियांत कायमचे वास्तव्य केलें आहे त्याच्यावर कुठल्याहि प्रकारची विशेष बधने नाहीत इतर ऑस्ट्रेलियन नागरिकाप्रमाणे त्यानाहि सर्व

हक्क आहेत, व त्यांच्यावर सर्व प्रकारच्या जबाबदाऱ्याही आहेत

"श्वेत ऑस्ट्रेलिया' चें शस्त्र ऑस्ट्रेलियाने हिन्दुस्थानविरुद्ध उपसलें नव्हते पूर्वीच्या काळात या खंडाच्या उत्तरेला असलेल्या काही बेटांमधून बरेचसे आदिवासी लोक मजूर म्हणून उत्तर ऑस्ट्रेलियात आणले गेले पुढे सोने सापडल्यावर अनेक चिनी लोक या सपन्न देशात आले हे बाहेरून आलेले लोक ऑस्ट्रेलियन रहाणीच्या दर्जाला साजेल असे वागत नसत ऑस्ट्रेलियन कामगारापेक्षा कमी पगार स्वीकारण्याची त्याची तयारी असे समाजात त्यांना सामावून घेणे शक्य नव्हते तसेच या मडळीत व ऑस्ट्रेलियन लोकात अधूनमधून चकमकी उडत तेव्हा या परक्या पाहुण्याना परत स्वदेशी धाडण्यात यावे व आणखी लोक येऊ नयेत यासाठी काही कायदा करण्यात यावा अशी सगळीकडून जोराची मागणी झाली तेव्हां मुळात ही उपाययोजना हिंदी लोकाच्याविरुद्ध नसली तरी कृष्णवर्णीय लोकांत, त्याची गणना होत असल्यामुळे श्वेत ऑस्ट्रेलिया तत्व त्यानाहि लागू पडते ऑस्ट्रेलियन रहाणीचा दर्जा बाहेरून येणाऱ्या या लोकाच्या मानाने फारच वरच्या दर्जाचा आहे, हें कबूल केले पाहिजे तसेंच बाहेरच्या लोकाची बेसुमार आवक झाली तर ऑस्ट्रेलियन कामगाराला मिळणाऱ्या उच्च वेतनमानावर परिणाम झाल्याशिवाय रहाणार नाही, हेंहि तितकेच खरें

या प्रकरणामधला ऑस्ट्रेलियन दृष्टिकोण जरी सहज समजण्यासारखा असला, तरी श्वेतेतर या नुसत्या शब्दप्रयोगामध्यें सूचित असलेला अर्थ काळ्या लोकाना अपमानकारक वाटल्यास नवल नाही अमेरिका व कॅनडासारख्या देशामधून एका ठराविक सख्येच्या पलीकडे परकीयाना येण्यास बदी करतात ऑस्ट्रेलियानें जर आपण होऊन अशा प्रकारचे धोरण स्वीकारले तर त्याच्या सध्याच्या श्वेत ऑस्ट्रेलिया तत्वामधली कटुता नष्ट होईल खरें पाहता उच्च वर्गामधल्या लोकाची मर्यादित सख्या देशात येऊ देण्यास हरकत नसावी कारण अशा लोकाची रहाणी ऑस्ट्रेलियन रहाणीपेक्षा मूलत भिन्न नसते ऑस्ट्रेलियन रहाणी अगवळणी पडायला त्याना काहीच अडचण भासणार नाही या सबबात हिंदुस्थानला अधिकृतरीत्या काहीहि करता येण्यासारखें नाही खाजगी सभाषणातून मात्र या विषयावरचे आमचे स्पष्ट विचार बोलून दाखविण्याची एकहि सधी आम्ही कधी दवडली नाहीं

हिंदी लोकानी ऑस्ट्रेलियात कायमची वसाहत करण्यासबधीच्या प्रश्नाला केवळ तात्विक व भावनात्मक दृष्टचा महत्व आहे ऑस्ट्रेलियाने जरी हिंदी लोकाना आपली दारे खुली केली तरी हिंदुस्थानचा वाढत्या लोकसख्येचा प्रश्न त्यामुळें सुटणार नाही ऑस्ट्रेलियाच्या सध्याच्या एक कोटी लोकसख्येमध्यें दरवर्षी केवळ ५०,००० परकीयाना निर्धोकपणे व सुलभ रीतीने सामावून घेणे शक्य आहे असे ऑस्ट्रेलियन तज्ञाचे मत आहे मग हे परकीय लोक काळे असोत वा युरोपमधले गोरे असोत ५०,००० लोक सगळेच्या सगळे हिंदी आहेत असें धरून चालले तरी तेवढ्याने

हिंदुस्थानच्या लोकसंख्येचा प्रश्न म्हणण्यासारखा हलका होणार नाही प्रवाशांना व विद्यार्थ्यांना ऑस्ट्रेलियाला भेट देता यावी यासाठी हल्ली हरप्रकारची सवलत दिली जाते त्या देशात घाऊक व्यापार करणाऱ्या व्यापारी पेढ्यांना काही अटींवर आपले प्रतिनिधी पाठविण्याची परवानगी मिळाली आहे माझ्या वेळेला असलेल्या काही अटी मात्र काहीशा कठिण होत्या हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळाल्यामुळें हा प्रश्न आता तितका बिकट वाटण्याचे कारण नाही मला ठिकठिकाणी हिंदी लोक भेटत असत कुठल्याहि प्रकारें गैरसोय होत असल्याची त्यांनी तक्रार केली नाहीं मूळ पंजाबातल्या जालंदरहून आलेली काही मंडळी क्वीन्सलँण्डमध्यें चांगल्या प्रकारे शेतकीचा धंदा चालवीत असलेली मला आढळली सिडनेला आयुर्वेदिक किंवा युनानी वैद्यकी करणारे दोघे तिथे हिंदी इसम भेटले अॅडलेडलाहि वैद्यकी करणारा एक ८० वर्षांवरचा गृहस्थ होता मूळचा तो अफगाणिस्तानचा रहिवाशी या इसमाने शहरामधल्या इतर डॉक्टरांचा रोष आपणावर ओढवून घेतला होता सर्वमान्य वैद्यकशास्त्राच्या तत्वांना अनुसरून तो वागत नाही या सबबीखालीं त्याला या डॉक्टरांनी कोर्टांत खेचून नेले होते पण त्याच्या उपचारांनी गुण आलेल्या मंडळीत प्रांतामधली काही बेंडेच असल्यामुळे त्याची शिक्षा टळली

आधीच म्हटल्याप्रमाणे हिंदुस्थान व ऑस्ट्रेलिया या दोन देशांच्या दरम्यान राजकीय महत्वाचे अथवा इतर स्वरूपाचे असे प्रश्न जवळजवळ नव्हतेच ऑस्ट्रेलियनांना हिंदुस्थानचा अधिक निकटचा परिचय करून देणें, हें हिंदी वकिलाचे व वकिलातीचें मुख्य कर्तव्य होते ऑस्ट्रेलियन वृत्तपत्रें हिंदुस्थानकडे जवळ जवळ दुर्लक्षच करीत त्यामुळें ऑस्ट्रेलियामधील वेगवेगळ्या प्रांतांतल्या लोकांना भेटण्याची एकहि संधी मी दवडीत नसें प्रत्येक प्रांतामध्यें मी दोनदा तरी जाऊन आलों ज्या ज्या ठिकाणांना मी भेटी दिल्या त्या त्या ठिकाणच्या स्थानिक अधिकाऱ्यांनी मला तेथील महत्वाची स्थळे व वैशिष्टयें दाखविण्याची उत्तम व्यवस्था केली होती स्थानिक संघटनांनी माझ्यासाठी घडवून आणलेल्या स्वागत समारंभामधून मी बरेच वेळां व्याख्याने दिली आहेत ऑस्ट्रेलियामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी रोटरी क्लबाच्या सभांतूनहि मी बोलत असे हिंदुस्थानविषयी आपुलकी निर्माण करण्यासाठी माझा अव्याहत प्रयत्न चालू होता औद्योगिक व इतर क्षेत्रांमध्यें ऑस्ट्रेलियानें प्रचंड प्रगतीचा आढावा घेण्याचीहि मी प्रयत्न केला सुरुवातीला केवळ मेंढ्याची व गुरांची निपज व शेतकी, यावर अवलंबून असलेला हा देश औद्योगिक क्षेत्रांतहि आज झपाट्यानें पुढे जात आहे कॉमनवेल्थ सरकार व प्रांतसरकार त्यासाठी हरप्रकारें मदत करतात अवघ्या १५० वर्षांच्या काळांत, काही हजार आदिवासींची वस्ती असलेल्या ओसाड वाळवंटातून आजचा संपन्न ऑस्ट्रेलिया कसा निर्माण झाला याचा हिंदी लोकांनी अवश्य अभ्यास करावा आंतरराष्ट्रीय परिषदांमधून आज ऑस्ट्रेलियाच्या मतांना किंमत आहे या देशात अनेक नवीन उद्योगधंदे उदयाला

येत आहेत, व इतर देशाच्या औद्योगिक संस्था व पेढ्या ऑस्ट्रेलियन शहरातून आपल्या शाखा उघडण्याच्या उद्योगात आहेत

सुरुवातीला ऑस्ट्रेलियाचे आर्थिक जीवन मेंढ्या व गायी याच्यावर अवलबून असे ऑस्ट्रेलियन माणूस मेंढीच्या पाठीवर जगतो असे गमतीनें म्हणतात श्रेष्ठ दर्जाची लोकर ही अजूनही ऑस्ट्रेलियाच्या उत्पन्नाची सर्वांत महत्वाची बाब आहे परतु आता औद्योगिक उत्पादनापासूनची प्राप्ती लोकरीपासूनच्या प्राप्तीच्याहि पुढें गेलेली आहे ऑस्ट्रेलियात दरवर्षी १० लाख किंमतीचे सोने खाणीतून काढले जातें गहू व इतर धान्यांचे उत्पन्न पावसावर अवलबून असल्याकारणाने सालोसाल कम जास्त असते शेतात पिकणाऱ्या मालाची किंमत जवळजवळ ३०० लाख ऑस्ट्रेलियन पौंड इतकी असते गहू, सातू, जोंधळा, मका, भात व ऊस ही ऑस्ट्रेलियाची मुख्य पिके भात सोडून इतर सर्व धान्यप्रकार देशामध्यें सर्वत्र आढळतात क्वीन्सलँड व न्यू साऊथ वेल्समधल्या काहीं ठिकाणीं ऊस पिकतो भाताची लागवड मुख्यत्वें मरे नदीच्या खोऱ्यात व थोड्या प्रमाणात अलिकडे नॉर्दर्न टेरिटरीमध्यें करतात

फळफळावळ मुबलक प्रमाणात सर्वत्र होते ऑस्ट्रेलियाच्या आर्थिक उत्पन्नात ताज्या व सुक्या फळाच्या निर्यातीमुळें बरीच भर पडते मरे धरण योजनेने जादूची काडी फिरवल्याप्रमाणे विस्तीर्ण वाळवटी प्रदेशाचे सुवर्णभूमीत रूपातर झाले आहे मनुष्यबळाच्या कमतरतेमुळें, शेती यात्रिक बलावर चालते नागरण्यालायक नसलेल्या जमिनीत मेंढ्याची पैदास करतात हजारो एकर पसरलेली एकेक मेंढवाडी ही एक प्रेक्षणीय बाब आहे पाण्याच्या तुटवड्यामुळें एका एकरामागें फक्त एक मेंढी व चार पाच एकरामागे फक्त एक गाय, अशी परिस्थिती ऑस्ट्रेलियात आढळते या देशात सुमारें १२० लक्ष मेंढ्या आहेत

बारा वर्षांपूर्वी ऑस्ट्रेलियाची लोकसख्या ८०,००,००० होती तिच्यात वाढ होऊन आज ती १०,०००,००० झाली आहे निम्याहून अधिक लोकवस्ती सिडनी, मेलबोर्न ब्रिजबेन, अँडिलेड, पर्थ व होबार्ट या प्राताच्या राजधान्यांमध्येच एकत्रित झालेली दिसते बहुसख्य लोक किनाऱ्यालगतच्या पट्ट्यातून राहतात या देशाचा बराचसा भाग अगदी कमी पावसाच्या अशा वाळवटी प्रदेशाने व्यापला आहे या वाळवटी पठारातल्या लोकाना पाण्याचा प्रश्न सतत भेडसावत असतो मेंढ्या पाळण्याखेरीज त्याना दुसरा धदा करणे शक्य नाहीं कांही भागांत आर्टीशिअन विहीरींचें क्वचित् मचूळ असे पाणी मिळू शकते

कित्येकदा या ओसाड एकाकी प्रदेशातून फिरताना, कधीकाळी पडणाऱ्या पावसाचे पाणी जमवून साठविण्यासाठी म्हणून बाधलेल्या प्रचड टाक्या पहायला मिळतात घराना लागूनच त्या बाधलेल्या असतात अवर्षणाच्या प्रदीर्घ काळात या टाक्यातील पाण्याचा उपयोग होतो मरे नदीचे खोरें सोडले, तर पाटबधाऱ्याची योजना इतरत्र कुठेंच आढळून येत नाही नाही म्हणायला मी आल्यानतर सुरू

करण्यात आलेली स्नोई नदीच्या धरणाची अजस्र योजना आता पुरी होत आली आहे या योजनेमुळे व्हिक्टोरिया व न्यू साऊथ वेल्समधल्या बऱ्याच मोठ्या भागाना विजेचा व शेतीच्या पाण्याचा पुरवठा होईल किनाऱ्यालगतचा पट्टा वगळला तर देशातल्या इतर भागात अगदी तुरळक लोकवस्ती आढळते कधी कधी वीस वीस मैल गेले तरी माणसाचा चेहरा पाह्यला मिळत नाही ऑस्ट्रेलियातले रस्ते बहुतेक चागल्या अवस्थेत असतात मात्र अतरे प्रचड असल्याकारणाने, आगगाड्याची वाहतूक निदान माझ्यावेळी तरी असावी तितकी कार्यक्षम व सुनियत्रित वाटली नाही तसेच प्रत्येक प्राताचे वैशिष्टच वेगळे राखण्याच्या इच्छेमुळे निरनिराळ्या प्रातातील आगगाड्याच्या रुळामधले अतर सारखे नाही, त्यामुळें प्रात बदलला म्हणजे बरेच वेळा गाड्या बदलणे भाग पडते वेगवेगळ्या शहरामधली हवाई वाहतूक पद्धतशीरपणें चालते

ऑस्ट्रेलियन लोक स्वावलबी, आदरातिथ्य करणारे व अत्यत अनौपचारिक वागणुकीचे असतात दाट वस्तीच्या किनाऱ्यालगतच्या प्राताबाहेर त्याना स्वत च्या कर्तृत्वावरच विसबावे लागतें मदत लागल्यास ती सहजी मिळू शकत नाही या लोकाची शिक्षणपद्धती सुद्धा त्याना अधिक स्वावलवी बनविण्याच्या दृष्टीनें आखण्यात आलेली आहे प्राथमिक शाळा शिक्षण सर्वत्र एकच आहे आडवाटेच्या ठिकाणी अवघी दहा मुलें जमली तरी शाळा काढण्यात येते अशा शाळासाठी शिक्षक मिळणे मात्र फार अवघड होऊन बसते वीस अथवा अधिक मैल दूर अतरावर राहणाऱ्या मुलाना आणण्यासाठीं काही शाळा बसेस ठेवतात याशिवाय कांही प्रातानी टपालाच्या शाळा काढल्या आहेत राजधानीच्या शहरामध्यें त्याकरिता एक मोठी यत्रणा स्थापिलेली आहे शाळा नसलेल्या ठिकाणच्या मुलाना दर आठवड्याला वेगवेगळ्या विषयावरची सविस्तर माहिती टपालाने धाडली जाते मुलें नेमलेला अभ्यास नियमित-पणे करून तो मुख्य कचेरीकडे पाठवतात या पत्रव्यवहारास टपालखर्च पडत नाही मुलांचा अभ्यास व गृहपाठ तपासून परत धाडला जातो ही पद्धती यशस्वी होण्या-साठी मुलाचे पालक साक्षर असणे मात्र आवश्यक आहे ऑस्ट्रेलियामध्यें ती पूर्णपणे यशस्वी झालेली मला आढळली टपालशाळेच्या विद्यार्थ्यांनी परीक्षातून आपली कर्तबगारी दाखवून दिलेली आहे मुख्य म्हणजे नियमितपणे शाळेंत जाऊ न शकणारी अपग वा इतर अभागी मुले या पद्धतीचा पूर्ण फायदा घेऊ शकतात बहुविध शिक्षण देणाऱ्या बऱ्याच शाळा या देशांत निघाल्या आहेत एके ठिकाणी शिक्षकानी व विद्यार्थ्यांनीं स्वत जमीन सपाट करून शाळेची इमारत उभी केली होती

माध्यमिक अभ्यासक्रम होईपर्यतचे शिक्षण सक्तीचें असते सरकारी शाळाच्या शिवाय, धार्मिक सघानी चालविलेल्या शिक्षणसस्था ऑस्ट्रेलियात बऱ्याच आहेत त्यापैकी रोमन कॅथलिकानी स्थापन केलेल्या शाळा विशेष महत्वाच्या सरकार या शाळाना जरी इमारती बाधण्यासाठी अधूनमधून मदत देत असले, तरी चालू खर्चा-

साठी अनुदान मात्र देत नाही त्यामुळे या शाळा कायम आर्थिक विवचनेत असतात सरकारी शाळातून कोणत्याहि प्रकारचें धार्मिक शिक्षण दिलें जात नाही, परतु आपल्या पथातील मुलावर योग्य धार्मिक सस्कार व्हावे या हेतूनें रोमन कॅथलिक व इतर काही धर्मपथानीं स्वतत्र शाळा काढल्या आहेत सरकारने अशा शाळाना अनुदान द्यावे की नाही, या मुद्यावर काही प्रातामध्यें सध्या बराच वादविवाद चालला आहे

प्रत्येक प्रातामध्यें एक तरी विद्यापीठ आहेच अलिकडे न्यू साऊथ वेल्स व व्हिक्टोरियामध्ये दोन तीन नवीन विद्यापीठें स्थापन करण्यात आली आहेत बऱ्याच विद्यापीठातून पदवीपूर्व वर्गांत विद्यार्थ्यांची विलक्षण गर्दी झालेली दिसून येते शिक्षणाची पातळी आपल्याकडील वरच्या दर्जाच्या विद्यापीठातून असते त्याहून फारशी भिन्न वाटली नाही वेस्टर्न ऑस्ट्रेलियाच्या विद्यापीठाचे वैशिष्ट्य असे की तेथें विद्यार्थ्यांकडून शिक्षणासाठी पैसा घेतला जात नाही कॅनबेरामध्यें अगदी अलिकडे स्थापन झालेली नॅशनल युनिव्हर्सिटी केवळ सशोधनाला वाहिलेली आहे इतर विद्यापीठातून तसेच कौन्सिल ऑफ साएंटिफिक ॲण्ड इन्डस्ट्रियल ऑर्गनायझेशन (सी एस आय आर ओ) मधूनहि सशोधनाचे बरेच काम चालते हिंदुस्थानचे पहिले दोन तीन विद्यार्थी मी तेथे असतानाच भूगर्भशास्त्राच्या अभ्यासासाठी आले होते मला वाटते कोलबो योजना व इतर योजनामुळे आता आपले बरेच विद्यार्थी ऑस्ट्रेलियात शिकत आहेत निरनिराळ्या विषयात सशोधन करण्यासाची इच्छा असलेल्या बुद्धिवान हिंदी विद्यार्थ्यांना ऑस्ट्रेलियामध्यें खूपच वाव आहे मात्र त्याची बुद्धी तल्लख असायला हवी व प्रसगी खडतर जीवन जगण्यास त्याची तयारी असली पाहिजे

ऑस्ट्रेलियनांना मोकळ्या हवेचें अतिशय आकर्षण आहे सर्व प्रकारचे खेळ त्याना मनापासून आवडतात क्रिकेट व लॉन टेनिस या खेळावरचे त्याचें प्रभुत्व तर निर्विवाद आहेच, पण पोहणे व इतर मर्दानी व्यायामाची त्याना तितकीच आवड आहे व्हिक्टोरियामध्ये फुटबॉल या खेळाचा एक वेगळाच प्रकार प्रचलित आहे या प्रकारचा खेळ पूर्वी कुठल्याहि देशात मी पाहिला नाही अर्थात नेहमीचे सॉकर व रगर हे फुटबॉलचे प्रकारहि सर्रास त्या प्रातातहि खेळले जातात हॉकीमध्येसुद्धा प्रगती करण्याची या लोकाची धडपड चालली असून काही वर्षांतच ते भारताला प्रबळ प्रतिस्पर्धी ठरतील असा रग दिसतो अगदी आडवळणाच्या ठिकाणी देखील 'बोलिंग'च्या हिरवळी आढळतात हा खेळ जुन्या पिढीला विशेष प्रिय आहे बिलियर्डमध्यें लिंडमचा हात धरणारा कुणी नाही बिलियर्ड्स्चे खाजगी टेबल घरी असलेल्या माझ्या एका मित्राकडे एकदा मी गेलो असता तिथें माझी व लिंडमची गांठ पडली बिलियर्डस व स्कटरमधल्या असामान्य कौशल्याची एक चुणूक दाखविण्याची त्याला आग्रह केल्यावर त्याने काही विशेष अवघड शॉट्स् आम्हाला

दाखविले एकादा विशिष्ट शॉट पाहण्याची इच्छा आहे कां, असे त्याने मला विचारताच मी त्याला टेबलावर कुठेहि चेंडू ठेवून एकाच टोल्यामध्ये दहा गुण मिळवून दाखवायला सांगितले या शॉटमध्ये तांबडा चेंडू पहिल्याने मारून कॅनन करावी लागेल व सर्व चेंडू पॉकेटमध्यें घालवावे लागतील त्याने दोन तीन मिनिटें विचार केला आणि पहिल्याच फटक्यात पुन्हां एकदा आपल्या कौशल्याची कमाल करून दाखविली हा शॉट पूर्वी कुणीच करून दाखवायला सांगितला नव्हता असे म्हणून त्यानें माझा गौरव केला

जवळजवळ कुठलाच ऑस्ट्रेलियन शनिवारी किंवा रविवारी काम करीत नाही प्रत्येकजण घराबाहेर पडतो व खेळ, सहल किंवा समुद्रस्नान यासारख्या उद्योगात रमून जातो ऑस्ट्रेलियन माणसाच्या खेळाच्या आवडीला तिथले समशीतोष्ण हवामान पोषक असेच आहे उत्तम हवेमुळे बाराहि महिने खुल्या हवेंतले खेळ खेळता येतात, मोकळ्या व विस्तृत जागांनाहि तोटा नाही पहिल्या वसाहतवाल्याची धाडसी वृत्ती अजूनहि सर्वत्र आढळते या सर्व गोष्टीमुळें क्रीडाक्षेत्रात आज हा देश अग्रगण्य आहे

खेळाच्या या आवडीबरोबरच ऑस्ट्रेलियन लोकांना जुगाराचा जबर शौक आहे घोड्याच्या शर्यती त्यांना विशेष प्रिय शनिवारी खेळाच्या मैदानावर न गेलेली मंडळी हमखास घोड्याच्या शर्यतीत कोणत्या ना कोणत्या रीतीने गुतलेली दिसायची देशभर ठिकठिकाणी पसरलेल्या असख्य शर्यतीच्या मैदानातून घोड्यावर पैसे लावणाऱ्या शौकिनांची गर्दी उसळलेली असते काही असामी तर घरीच टेलिफोन-वरून शर्यतीचा वृत्तांत एकतात व घरबसल्या थेट रेसकोर्सवर अथवा बुकमेकराच्या मार्फत आपल्या पसतीच्या घोड्यावर पैसे लावतात 'मेलबोर्न" कप हा तर एक राष्ट्रीय सणच असतो इग्लडच्या डार्बी या शर्यतीशीच याची तुलना होऊ शकेल या प्रसगी प्रत्येकजण घोड्यावर पैसे लावतो अगदी लहान मुले मुली देखील कुठला घोडा जिंकेल यावर छोट्या छोट्या पैजा मारताना दिसतात नेहमीच्या या घोड्याच्या शर्यतीखेरीज बरेच ठिकाणी घोड्याच्या छोट्या छोट्या गाड्याच्या शर्यतीहि होतात या शर्यती बहुधा रात्री विजेच्या दिव्याच्या प्रकाशात चालतात कुत्र्याच्या शर्यतीहि ऑस्ट्रेलियात प्रिय आहेत या सर्व गोष्टीमुळें जुगाराविषयीच्या सार्वत्रिक व्यसनाला उत्तेजन मिळते

ऑस्ट्रेलियन माणूस घोड्याला आपला जिवलग मित्र समजतो अतिशय उत्तम घोड्याची या देशात पैदास होते गायी, मेंढ्या व घोडी प्रारभीच्या वसाहत-वाल्याच्याबरोबर इग्लडहून ऑस्ट्रेलियात आली ऑस्ट्रेलिया त्यांना चांगलाच मानवला मेंढ्याची व गाईगुराची पैदास करणाऱ्या ज्या प्रचड वाड्या देशभर पसरल्या आहेत, त्यावर देखरेख करण्यासाठी घोड्यासारखें अन्य साधन नाही या उपयुक्त जनावराबरोबरच, प्रारभीच्या रहिवाशानीं आपल्याबरोबर ससा आणला या

लहानग्या प्राण्याचा ऑस्ट्रेलियात उत्तम जम बसला पाहता पाहता त्याची प्रजा इतकी वाढली की त्यामुळे ऑस्ट्रेलियाला एक बेसुमार नवीन डोकेदुखीच निर्माण झाली शेतातून व मळ्यातून ससे इतके नुसकान करतात की त्याच्या उपद्रवाला आवर घालणे ही राष्ट्रापुढे एक समस्या होऊन बसली आहे रात्री मोटार हाकताना, रस्त्यावरून सैरावैरा धावणारे कित्येक ससे चेंगरले जातात शहराबाहेरच्या रस्त्यानीं सकाळी फिरायला जाताना असें अनेक मेलेले ससे मला आढळत असत देशात फिरत असताना कधीकधीं केंगारू अथवा त्याच्याच जातीचे वॉलबी हे लहान जनावर बघायला मिळे ऑस्ट्रेलियांत खास आढळणारी इतर जनावरे म्हणजे कोआला बेअर व प्लॅटिपस प्लॅटिपस या प्राण्याने प्राणिशास्त्रज्ञाचे लक्ष वेधून घेतलें आहे युरोपियन वसाहत-वाले येण्याआधीच्या काळात ऑस्ट्रेलियात मोठे सस्तन प्राणी जवळ जवळ नव्हतेच कांगारूखेरीज या देशामधले दुसरे मूळचें जनावर म्हणजे डिंगो डिंगो हा कुत्र्याचा जातभाई असून त्याचें वैशिष्ट्य म्हणजे त्याला भुकतां येत नाही मेंढ्या पाळणाऱ्यांना त्याने चांगलेच पीडले आहे

ऑस्ट्रेलियात वस्ती करण्याच्या इराद्याने आलेल्या लोकाना हा देश मेंढ-पाळीसाठी उत्कृष्ट असल्याचे आढळून आले येथें आता जगातील उत्तम लोकर तयार होते मेंढपाळांनी मोठमोठे देशाचे भाग साफ करून घेतले मोठमोठाली झाडे तोडणे हें फार कष्टाचे काम होते शिवाय त्यासाठी पुरेसें मनुष्यबळ नव्हते तेव्हा झाडाच्या बुध्याशी त्याच्या सालीचे वाटोळे पट्टे कापून काढण्याची पद्धत त्यानी अमलात आणली त्यायोगे झाडांना जीवनरसाचा पुरवठा बंद पडून कांही महिन्यांतच मरून जात या प्रदेशातून फिरताना सालीत खाचा पडलेल्या झाडाचे असंख्य वाळलेले खुट दृष्टीस पडतात इतक्या मोठ्या प्रमाणात करण्यात आलेली झाडाची ही हानी जरी तात्कालिक लाभदायक ठरली असली तरी परिणामी देशाच्या एकूण अर्थव्यवस्थेवर व हवामानावर तिचा दुष्परिणाम झाल्याशिवाय राहिला नाही बऱ्याच प्रातानी आता प्रचंड खर्च झाला तरी वृक्षारोपण करायला सुरुवात केली आहे, व पुन्हा देशात जंगले उत्पन्न करण्याची मोठी मोहिम सुरू केली आहे परिणाम काय होईल हे विचारात न घेताच, निसर्गक्रमात मानवाने ढवळाढवळ केली की कसे दुष्परिणाम होतात याचे हें एक उत्तम उदाहरण आहे

देशाचा बराच भाग जरी वृक्षहीन असला तरी कांही प्रदेश दाट जंगलानी व्यापला आहे वेस्टर्न ऑस्ट्रेलियात मी अशी काही जंगले पाहिली तेथे २०० फूट अथवा त्याहूनहि अधिक उंचीची झाडे आहेत ऑस्ट्रेलियाचे मूळ झाड म्हणजे निलगिरी (यूकॅलिप्टस) व त्याच्या पोटजाती या पोटजातीचे ऑस्ट्रेलियात चारशेंच्यावर प्रकार आढळतात इतर परदेशी झाडेंहि इथे आणण्यात आली आहेत क्वीन्स-लंडच्या उत्तर भागात वड, आंबा, ताड ही झाडें दिसतात ती हिंदुस्थान व इतर उष्ण कटिबंधातील देशातून आली हे उघड आहे दक्षिणेतील प्रांतामध्यें व टॅस्मे-

नियात युरोपात होणाऱ्या वनस्पति सर्वत्र उगवतात युरोपमधून मुद्दाम आणवलेली फळझाडें तर इथें चागलीच फोफावली देशाच्या सपत्तीत आज त्याचा बराच मोठा वाटा झाला आहे

१७७० साली कॅप्टन कुकने ऑस्ट्रेलियाचा शोध लावला या देशाची वाढ सुरुवातीला मदगतीनें झाली वसाहतीच्या राज्यकारभाराची पद्धती विशेष नियत्रित नव्हती, कारण इग्लड व ऑस्ट्रेलियामधले प्रचड अतर तोडायला सहज काही महिने लागत प्रथम ऑस्ट्रेलियाच्या आग्नेय भागात काही प्रमाणात सुव्यवस्था स्थापन झाली हद्दपारीची शिक्षा झालेल्या इग्लिश गुन्हेगाराना सुरुवातीला अमेरिकेत पाठवीत असत पण अमेरिकेच्या स्वातत्र्ययुद्धानतर त्याची ऑस्ट्रेलियाला पाठवणी करण्यांत येऊ लागली इग्लडमध्यें अगदी क्षुल्लक गुन्ह्यानाहि फाशी अथवा हद्द-पारीची शिक्षा त्यावेळी ठोठावण्यात येत असे या अतिरेकी कायद्यामुळें इतर दृष्टीनी चागली वर्तणूक असलेले बरेच कैदी ऑस्ट्रेलियाला धाडण्यात आले या विस्तीर्ण मोकळ्या देशात नवे जीवन सुरू करण्याची त्याना सुसधी मिळाली असें म्हणतात की ऑस्ट्रेलियामधल्या उज्वल भविष्याची वर्णनें ऐकून बऱ्याच जणाना तिकडे जाण्याचा लोभ सुटला व आपली मोफत रवानगी व्हावी एवढ्यासाठी त्यानी मामुली गुन्हे करायला कमी केलें नाही राजकीय अपराधासाठी शिक्षा झालेले काही आयरिश लोकहि ऑस्ट्रेलियात पाठविण्यात आले होते ही सर्व मडळी एकत्र मिळाली व त्यानी एका नव्या राष्ट्राची निर्मिती केली, व हळूहळू इग्लडची त्यावरची सत्ता नावापुरतीच राहू लागली

अशा रीतीनें तेथें स्वराज्याची बीजें रुजली, व पाहतां पाहता लोकसत्ताक राजकीय सस्था उदयाला येऊ लागल्या दळणवळणाच्या अनेक अडचणीमुळें वेग-वेगळ्या प्रातानी आपली स्वतत्र सरकारें स्थापिली अधिकृत रीत्या मान्यता मिळणारा न्यू साऊथ वेल्स हा पहिला प्रात कालातरानें व्हिक्टोरिया व क्वीन्सलड त्याच्यातून अलग झाले साऊथ ऑस्ट्रेलिया व टॅस्मेनिया हे नतर स्वतत्र प्रात झाले, वेस्टर्न ऑस्ट्रेलियाचा इतिहास मात्र काहींसा निराळा आहे, कारण पहिल्यापासूनच विस्तीर्ण अशा वृक्षहीन वाळवटामुळें तो बाकीच्या प्रातापासून अलग राहिला आश्चर्याची गोष्ट म्हणजे न्यूझीलड हा देश कांही काळ न्यू साऊथ वेल्सच्या सरकारी नियत्रणा-खाली होता पण या देशाचा कारभार चालवायला वार्षिक ५०० पौंडाचा बोजा आपल्यावर पडत असल्यामुळे त्याच्यासाठी काहीतरी वेगळी व्यवस्था करा असे न्यूसाऊथ वेल्सच्या सरकारनें इग्लडमधल्या वसाहतखात्याला सागितलें अशा प्रकारे न्यूझीलड प्रथम एक स्वतत्र वसाहत व नतर राष्ट्र म्हणून उदयाला आले न्यू साऊथ वेल्स, क्वीन्सलड, व्हिक्टोरिया, साऊथ ऑस्ट्रेलिया, टॅसमेनिया हें पाच प्रात प्रथम एकमेकाशी निगडित नव्हते १९ व्या शतकाच्या शेवटच्या दशकात त्याना एकत्र आणण्यासाठी चळवळ सुरू झाली निरनिराळ्या प्रांताच्या प्रतिनिधीनी

प्रदीर्घ वाटाघाटी केल्या अखेर ऑस्ट्रेलियन कॉमनवेल्थचे केंद्र सरकार असावे व सहाहि प्रांत केंद्र सरकारचे घटक असावेत असा ठराव मान्य करण्यात आला ही योजना स्वीकारणारा कायदा ब्रिटिश पार्लमेंटने पास केला व १ जानेवारी १९०१ रोजी ऑस्ट्रेलिया संघराष्ट्र प्रस्थापित झालें वेस्टर्न ऑस्ट्रेलिया सुरुवातीला अलिप्त होता पण पुढे त्यानेहि संघामध्यें सामील होण्यास संमती दिली त्याबद्दल मोबदला म्हणून कॉमनवेल्थने "नूल आर्बर प्लेन"च्या निर्जन वाळवटातून जाणारा आग-गाडीचा रस्ता बांधून देण्याचें मान्य केले साऊथ ऑस्ट्रेलिया व वेस्टर्न ऑस्ट्रेलिया यांना सांधणारा हा लोहमार्ग हजार मैलाहून अधिक लांबीचा आहे

राज्यघटनेप्रमाणे कॉमनवेल्थ सरकारचे व प्रांतीय सरकारचे हक्क ठरवून दिलेले आहेत वेगवेगळ्या प्रांताची अर्थसाधनें त्यांच्या सर्व गरजा भागविण्यास पुरेशी नाहीत काही प्रांतांना आर्थिक सहाय्य देणें केंद्र सरकारला भाग पडतें संरक्षण, परराष्ट्रीय संबंध, जकात व इतर महत्वाची खाती तसेच उत्पन्नाच्या मोठमोठ्या बाबी ताब्यात असल्यामुळें केन्द्र सरकारला बहुतेक सर्व प्रांतावर नेहमीच हुकमत गाजविता येते इतर संघराष्ट्राप्रमाणेच ऑस्ट्रेलियातहि केन्द्रसरकार अधिकाधिक प्रबळ होत चालले आहे व त्याप्रमाणानेच संघातील घटक राज्यें कमजोर होत आहेत दोन्ही जागतिक युद्धामुळें विविध प्रांतामधली एकीची भावना अधिकच बळकट झाली अवाढव्य क्षेत्रविस्तार व अफाट अंतरे यांतूनसुद्धां या देशानें ऐक्याचा पाया उत्तम टिकवला आहे प्रत्येक प्रांताला जरी आपल्या स्वतःच्या वैशिष्ट्याचा अभिमान असला, तरी तो राष्ट्रीय एकीला बाधक ठरत नाही पहिल्या महायुद्धात, डब्ल्यू एम ह्यूजच्या (याला सर्व लोक प्रेमाने बिली ह्यूज असे म्हणत) नेतृत्वाखाली या देशानें आंतरराष्ट्रीय क्षेत्रात बरेच वजन मिळविलें मायदेशाशी त्याचे संबंध याच काळात अधिक दृढ झालेले दिसले दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी मात्र अमेरिकन आरमारा-मुळेंच ऑस्ट्रेलियाचे जपानी हल्ल्यापासून संरक्षण झालें तेव्हापासून ऑस्ट्रेलियाच्या दृष्टीने अमेरिकेचे महत्व बरेच वाढले आज ऑस्ट्रेलिया व इंग्लंड या दोन देशामधला स्नेहाचा दुवा कायम राहिला असला तरी राजकीय दृष्ट्या हा देश अमेरिकेच्या बाजूला जाऊ लागत आहे यात शंका नाही

प्रत्येक ऑस्ट्रेलियन प्रांताचें स्वतःचे असे काही वैशिष्टय आहे क्वीन्सलंड तर उष्ण कटिबंधातल्या प्रदेशाची आठवण करून देतो तेथील हवामान व वनस्पति बऱ्याच अंशी हिंदुस्थानसारखी आहेत अर्ध्या लाखाहून अधिक लोकवस्ती असलेल्या ब्रिसबेनला या प्रांताची राजधानी आहे क्वीन्सलंडमध्ये समुद्रालगतच्या भागाच्या पश्चिमेस फार मोठा प्रदेश आहे त्याचा अजून पूर्णपणे विकास झालेला नाही त्या भागामध्यें असलेल्या मुबलक नैसर्गिक संपत्तीचा योग्य उपयोग करून घेतला तर क्वीन्सलंडच्या संपत्तीत निःसशय मोठी भर पडेल या प्रांताच्या किनाऱ्यावर बरीच लहान पण संपन्न गावे वसली आहेत मी एकदा क्वीन्सलंडच्या अंतर्भागामध्यें

असलेल्या माऊट आयझाला भेट दिली होती तिथे चालू असलेले प्रचंड खाणकाम मला पाह्यला मिळाले या प्रातांत किनारपट्टीमध्ये उसाची मोठ्या प्रमाणावर लागवड होते कापणीच्या दिवसामध्यें बरेंच हिंदी मजूर शेतावर काम करून पैसे कमावतात किनाऱ्यापासून काही मैलावर महासागरात सुप्रसिद्ध ग्रेट बॅरिअर रीफ पसरले आहे लाखो वर्षांच्या कालात प्रवाळकीटकानी बनविलेल्या लहान लहान बेटापासून हें रीफ तयार झाले आहे

मी ब्रिजबेनला गेलो त्यावेळी सर लेस्ली विल्सन क्वीन्सलडचे गव्हर्नर होते ते मुबईचे गव्हर्नर असतानाची आमची ओळख मुबई-पुण्यामधल्या पाच वर्षातील मुक्कामाच्या अनेक सुखकारक आठवणी त्याच्या स्मरणात होत्या दहा वर्षाहून अधिक काळ त्यानी क्वीन्सलडचा गव्हर्नर म्हणून काम पाहिले सेवानिवृत्त झाल्या-नतर अगदी अलिकडेच त्यानी इहलोकीची यात्रा सपविली ऑस्ट्रेलियात प्राताच्या मुख्य मत्र्याना प्रेमिअर म्हणतात प्राइमनिनिस्टर हे नामाभिधान केवळ कॉमनवेल्थ मत्रिमडळाच्या मुख्यासाठी राखून ठेवलेले आहे क्वीन्सलडचा प्रेमिअर लहानपणी एका दुकानात पार्सले बाधणारा पोऱ्या होता पुढे तो मजूर पक्षाच्या मत्रिमडळाचा प्रमुख झाला घटनेत सागितल्याप्रमाणे प्रातीय विधिमडळात दोन शाखा असतात विधानसभेतील सभासद विधान परिषदेची निवड करतात पण काही वर्षापूर्वी विधानपरिषदेसाठी सदस्य मुळी निवडून द्यायचेच नाहीत, असा लोकसभेने निर्णय घेतला तेव्हापासून एकाच गृहावर या प्राताचे काम चाललें अहे

कॉमनवेल्थचा सर्वांत जुना, सपन्न व भरभराटीचा प्रात न्यू साऊथवेल्स व्हिक्टो-रिया वगळला तर इतर सर्व प्राताच्या मानानें याचा कितीतरी आधिक विकास झाला आहे या प्राताची राजधानी सिडने हे एक दोन लाख वस्तीचे अद्यावत शहर आहे ते समुद्रकाठी वसलें असून अनेक उपसागर व भुशिरें यामुळे, त्याचा किनारा दतूर बनला आहे प्रसिद्ध "हार्बर ब्रिज" हा पूल म्हणजे सिड्नेचे खास वैशिष्टय ऑस्ट्रे-लियाचे बहुतेक सर्व औद्योगिक व व्यापारी धदे सिड्ने व मेलबोर्न्ला केन्द्रित झाले आहत या शहराखेरीज न्यू साऊथ वेल्सचे आणखी एक उद्योगप्रधान व समृद्ध शहर म्हणजे न्यूकासल येथे प्रचड लोखडी व पोलादी कारखाने आहेत ऑस्ट्रेलिया मधील सर्वांत महत्वाची औद्योगिक सस्था म्हणजे ब्रोकन हिल प्रोप्रायटरी या सस्थेच्या शाखा न्यू साऊथ वेल्स व इतर प्रातातून अनेक ठिकाणी पसरल्या आहेत दुसऱ्या महायुद्धात नार्दर्न टेरिटरीमधल्या डार्विन शहरावर जपान्यानी बॉम्ब हल्ल केला व या शहराचे बरेंच नुकसान केले पण जपानी लढाऊ जहाजानी बॉम्ब टाकलेले सिडने हे ऑस्ट्रेलियातील एकमेव शहर

टॅजमेनियाच्या खालोखाल सर्वांत लहान प्रात व्हिक्टोरिया स्वतत्र प्रात होऊन व्हिक्टोरियाला शभरच वर्षे झाली असली तरी त्याने न्यू साऊथ वेल्स इतकीच प्रगती केली आहे मेलबर्न या सुदर आखीव शहरी या प्राताची राजधानी आहे

मेलबर्नची लोकसख्या १६ लाखाहून अधिक असेल सिडनेपेक्षा मेलबर्नची बौद्धिक पातळी वरच्या दर्जाची वाटते उद्योगधद्यात तर मेलबर्न सिडनेच्या मागें नाहीच राज्य स्थापन झाल्यानतरच्या वर्षांत केन्द्र सरकारच्या कचेऱ्या काहीं सिडनेला व बऱ्याच मेलबर्नला तात्पुरत्या स्थापन झाल्या त्यापैकीं काही 'अजून मेलबर्नमध्ये आहेत ऑस्ट्रेलियाचा सध्याचा पतप्रधान आर. जी मेंझीज हा याच प्राताचा आहे व्हिक्टोरियामध्ये न्यू साऊथ वेल्सप्रमाणें कोळशाच्या खाणी नाहीत जमिनीच्या वरच्या थरात मोठ्या प्रमाणात कच्चा कोळसा मात्र सापडतो सर्पणासाठी त्यापासून विटा तयार करतात मेलबर्न व व्हिक्टोरियांतील इतर ठिकाणीं गॅस व वीज निर्माण करण्यासाठी या कोळशाचा अधिकाधिक उपयोग करण्यात येत आहे मी ऑस्ट्रेलिया सोडल्यानतर तिथे स्नोई नदीची प्रचड धरण योजना हाती घेण्यात आली आहे तीमुळें व्हिक्टोरिया व न्यू साऊथ वेल्सला जलविद्युत शक्तीचा स्वस्त प्रमाणात पुरवठा होईल सर्व प्रातीय राजधान्यातून क्रिकेटची उत्कृष्ट मैदाने आहेत, पण त्यातहि मेलबर्नचे क्रिकेट मैदान हे विशेष प्रख्यात प्रत्येक प्रातातील राजधानीमध्यें वजनदार वृत्तपत्रें प्रसिद्ध होतात आश्चर्याची गोष्ट म्हणजे पुरातन सस्काराचा अजूनहि जबर पगडा असल्यामुळे मेलबर्नमध्यें रविवारी मात्र वर्तमानपत्रे बद असतात निदान मी असेपर्यंत तरी वस्तुस्थिती तशी होती सिडनीहून विमानानें येणाऱ्या वर्तमानपत्रासाठी लोक तिष्ठत बसलेले असत मेलबर्नजवळ एक प्राणीसग्रहालय आहे तिथें प्लॅटिपस व ऑस्ट्रेलियातील इतर प्राणी पहावयास मिळतात मेलबर्नमधल्या एका सार्वजनिक बागेत ऑस्ट्रेलियाचा शोध लावणाऱ्या कॅप्टन कुकची मूळची झोपडी पुन्हा बाधण्यात आली आहे या झोपडीचा एकेक दगड स्कॉटलडहून आणण्यात आला ऐतिहासिक दृष्टचा फारच महत्वाचे असें हें ठिकाण आहे शहरामधले युद्धस्मारक हे मेलबर्नचें महत्व वाढवणारे आणखी एक प्रेक्षणीय स्थळ मानले जातें

ऑस्ट्रेलियन कॉमनवेल्थचा सर्वांत लहान प्रात म्हणजे चार लाखाची वस्ती असलेले टॅस्मेनिया बेट तेथील हवामान हे कांहीसें इग्लडप्रमाणेच आहे या बेटात जगलसपत्ती बरीच आहे विद्युतशक्ती मोठ्या प्रमाणावर उत्पन्न करण्यास तिथें अनुकूल परिस्थिती आढळते होबार्ट हें टॅस्मेनियाचे मुख्य शहर त्याची लोकवस्ती लाखाहून थोडी अधिकच आहे या शहराजवळ वर्तमानपत्रे छापण्याच्या कागदाचे कारखाने फार मोठ्या प्रमाणावर चालतात उत्तरेला कागद कारखाने आहेत टॅस्मेनियामध्यें (Proportional Representation by Single transferable Vote) फिरत्या मताची प्रमाणबद्ध प्रतिनिधित्व मतदानपद्धती प्रचारात आहे किंबहुना हे लोक या पद्धतीचे आद्य पुरस्कर्ते असून ही पद्धत त्याना सपूर्णपणे समाधानकारक वाटत आहे मीहि या मतदानपद्धतीचा एक कट्टा पुरस्कर्ता असल्याचें प्रातीय मन्त्रिमडळाने माझ्या साठी केलेल्या स्वागतसमारभाच्या वेळी मी सागितले

वरील दोन्ही प्रातांच्या मानाने साऊथ ऑस्ट्रेलिया हा प्रांत मोठा आहे मात्र त्याच्या उत्तरेकडील बराच मोठा भाग ओसाड वाळवटाने व्यापला आहे अलिकडे या ओसाड जमिनीवर ब्रिटननें अणूबाँब चाचणीचे प्रयोग केले होते ॲडिलेडभोवती वेगवेगळ्या महत्वाच्या उद्योगधद्याचें कडेच आहे या शहरापासून दोन तीन मैलावर असलेल्या टेकडीवरून रात्री ॲडिलेडचे अवर्णनीय दृश्य दिसते आयर्न नॉब नावाच्या एका टेकडीवर मी गेलों होतो उत्तम अशा अशोधित लोखडापासून ही टेकडी बनली आहे साऊथ ऑस्ट्रेलियामध्यें काहीं ठिकाणी बऱ्याच जर्मन लोकानी कायमची वस्ती केली आहे या मडळीनी द्राक्षाची लागवड व दारू करण्याचा घदा ऑस्ट्रेलियात सुरू केला एक दोन गावे तर जर्मनच असावीत असा भास होतो या ठिकाणी दुकानावरच्या पाट्या सुद्धा जर्मन भाषेंत आहेत हे परदेशी लोक मात्र ऑस्ट्रेलियनाच्यात पूर्णपणे मिसळून गेलेले दिसतात लढाई चालू असताना आपल्या मायदेशाशी त्यानी राजकीय सबध ठेवले नाहीत त्याचे मूळ सांस्कृतिक सबध मात्र अबाधित राहिले साऊथ ऑस्ट्रेलियाचे मुख्य मत्री उदारमतवादी पक्षाचे श्री प्लेफर्ड हे होते ससदेमध्यें त्याच्या पक्षाचे अगदी जेमतेमच बहुमत होते एकदा तर पक्षातील एका सदस्याच्या मृत्यूमुळें हे बहुमत अक्षरश शून्यावर घसरले श्री प्लेफर्ड याची लोकप्रियता मात्र अफाट होती त्याचे सरकारहि अत्यत कार्यतत्पर असें होतें मी एकदां मेलबर्न ते ॲडिलेड पर्यंत मोटारने प्रवास केला अत्यत सुपीक व नुकतेच विकास पावलेल्या मरे नदीच्या खोऱ्यांतून आम्हाला जावे लागलें या भागात मुबलक फळबागा आहेत फळे डब्यातून सीलबद करण्याचा व त्यांचा मुरबा करण्याचा धदा जोरात चालतो

दक्षिण ऑस्ट्रेलियाच्या पश्चिमेस शेंकडों मैल पसरलेलें प्रचड नल आर्बर (वृक्षहीन) वाळवट आहे या वाळवटावरून विमानाने सुमारे सात आठ तासाचा प्रवास केला की वेस्ट ऑस्ट्रेलिया लागते या प्रातावें क्षेत्रफळ फारच मोठे आहे पण फक्त पश्चिम व नैर्ऋत्येकडच्या काही भागातून वस्ती व प्रगति झालेली दिसते पर्थ ही या प्रांताची राजधानी आहे तिथली लोकवस्ती साडेतीन लाखाहून जास्त असावी मी पाहिलेल्या ऑस्ट्रेलियन शहरात पर्थ सर्वांत सुदर आहे असे मी म्हणेन स्वॉन नावाच्या रुद नदीकाठी तें वसले आहे वेस्टर्न ऑस्ट्रेलियाच्या फुलाची जी सर्वत्र ख्याती आहे, ती यथार्थच आहे पर्थपासून काही मैलावर फ्री मँटल बदर आहे युरोप वा आशियांतून येणाऱ्या सर्व बोटी प्रथम या बदराला लागतात मी प्रथम ऑस्ट्रेलियात गेलो त्यावेळी कर्टिन हे पतप्रधान होते ते मूळ या गांवचे पर्थ व फ्री मॅण्टलच्या वाढीसाठी त्यांनी पुष्कळच कार्य केले ऑस्ट्रेलियाच्या नैर्ऋत्य कोपऱ्यात उच उच वृक्षाची घनदाट जगलें आढळतात ही झाडे बहुतेक सगळी निलगिरी जातीची आहेत पर्थच्या पूर्वेस ४०० मैल सोन्याच्या खाणी आहेत सोन्याच्या खाणीचे प्रमुख गाव कॅलगूर्लि पर्थपासून प्रचड नळ जोडून या गांवाला पाणी पुरवण्याची सोय केलेली आहे व्हिक्टोरिया व इतर प्रातातील एके काळी सोनें उपलब्ध असलेली

गावें मी पाहिली सोन्याचा साठा सपल्यावर ही गावें ओसाड पडली त्याना आलेली अवकळा पाहिली की हळहळ वाटल्याशिवाय रहात नाही सोन्याच्या खाणी निकामी झाल्यावर सुद्धां नवे औद्योगिक केन्द्र म्हणून प्रसिद्धी पावलेले एकच गाव माझ्या पाहण्यात आले

ऑस्ट्रेलियन कॉमनवेल्थच्या (प्रातसघ) या सहा प्राताखेरीज, ऑस्ट्रेलियन कॅपिटल टेरिटरी (कॅनबेरा व सभोंवतालचा प्रदेश) व नार्दर्न टेरिटरी हा प्रचड वाळवटी पट्टा हे भाग ऑस्ट्रेलियामध्यें समाविष्ट आहेत नॉर्दर्न टेरिटरी हा कॉमन-वेल्थ सरकारच्या प्रत्यक्ष देखरेखीखालीं आहे या प्रातांतलें मुख्य शहर डार्विन येथे पश्चिमेकडून येणारी सर्व विमानें प्रथम थाबतात नॉर्दर्न टेरिटरीच्या मध्यावर ॲलिस स्प्रिंग्स नामक एक हिरवळीचे स्थान आहे अलिकडे या प्रातांत काही ठिकाणी भातशेतीचा प्रयोग करून पाहण्यात आला पाणी उपलब्ध झाले, तर भाताच्या उत्पन्नाला या प्रातांत उज्वल भवितव्य आहे

ऑस्ट्रेलियामधल्या माझ्या वकीलपदाच्या तिसऱ्या वर्षामध्ये हिंदुस्थान सरकारने मला फीजी बेटांना भेट देऊन तिथे मुख्यत्वें उसाच्या मळ्यावर काम करीत असलेल्या हिंदी रहिवाश्याच्या परिस्थितीसबधी निवेदन तयार करण्यास सांगितले माझ्याबरोबर माझे सेक्रेटरी श्री दामले आले होते माझ्या इग्रजी भाषणाचा उत्कृष्ट हिंदी अनुवाद ते ठिकठिकाणच्या हिंदी जमावापुढें सादर करीत फीजी बेट म्हणजे अनेक लहान मोठ्या बेटांचा समूह, त्यापैकी थोड्याच बेटांतून वस्ती झालेली दिसते व्हिटी लेव्हू हे मुख्य बेट याच बेटात सूवा हे प्रसिद्ध शहर आहे वनवा लेव्हू हे दुसरे मोठें बेट, या दोन बेटांत लोकवस्तीचें प्रमाण बऱ्यापैकी आहे फीजी बेटात त्यावेळी सुमारे १५०,००० मूळ फीजी लोक, व तेवढेच हिंदी रहिवाशी असावेत तिथले हिंदी हे शभर वर्षांपूर्वी करारबद्ध मजूर म्हणून आणलेल्या लोकाचे वशज बेटांतील युरोपिअन व इतर मिळून पाच-सहा हजार सहज असतील त्यांपैकी बहुतेकजण सरकारी नोकर अथवा कलोनियल शुगर रिफाइनिंग कपनीत कामाला आहेत या बेटाचा सर्व व्यवहार या कपनीच्या ताब्यात आहे असे म्हटले तरी हरकत नाही इथल्या कायद्यानुसार हिंदी लोकाना जमीन विकत घेता येत नाहीं बहुतेक जमीन ही तिथल्या मूळ रहिवाशाच्या अथवा सी एस् आर. च्या मालकीची आहे बहुतेक हिंदीलोक कपनीचे भाडेकरू म्हणून राहतात तेथील हवामान समशीतोष्ण आहे बेटाचे सर्व अर्थजीवन ऊसाच्या लागवडीवर अवलबून असतें ही लागवड फारच सुनियत्रित असून कारखान्यात ऊस पोहोचविण्यासाठी तात्पुरते आगगाडीचे रूळ टाकण्यात येतात बेटातच उसापासून कच्ची साखर तयार करण्यात येतें, पुढे ती शुद्धीकरणासाठी ऑस्ट्रेलियाला धाडतात मुख्य बेटाच्या उत्तरेस असलेली एक लहानशी सोन्याची खाण सोडली तर इथे म्हणण्यासारखे दुसरे उद्योगधदे नाहीत थोड्या प्रमाणात अननसाची लागवड तेवढी केली जाते या बेटावर मी बरीच नारळीची झाडे पाहिली.

आमच्या कोकणात माडाची केवढी काळजी घेतली जाते इथल्या मडळीची या फलदाई झाडाविषयीची बेपर्वा पाहून मला फार वैषम्य वाटले फीजीत आब्याचीं झाडेहि बरीच दिसली पण ती एका प्रकारची उपद्रवी झाडे यापेक्षा कुणी त्याना अधिक किंमत देत नाही त्याची निगा तर मुळीच राखली जात नाही हिंदुस्थानात विपुल प्रमाणात आढळणाऱ्या निरनिराळ्या मूल्यवान जाती वाढविण्याचा प्रयत्न इथली मडळी मुळीच करीत नाही या बेटावर असतानाच आम्हाला पडित मदन मोहन मालवीय व श्री श्रीनिवास शास्त्री या दोघाच्या निधनाची दु खद वार्ता कळली

मूळचे फीजीअन लोक सशक्त व बांधेसूद आहेत पण चमत्कारिक सामाजिक रूढीमुळें त्याच्या प्रगतीमध्यें बाध आला आहे उदाहरणार्थ एकाच मिळवत्या माणसाने सपूर्ण कुटुबास पोसावे अशी तिथें अपेक्षा असते त्यांमुळें हे लोक कामसू नसल्यास नवल नाही त्याचे नेते बेटामध्यें सर्वत्र पसरले आहेत त्यापैकी दोघाच्या उदार आदरातिथ्याचा लाभ घेण्याचा मला योग आला मैत्रीचे चिन्ह म्हणून त्यानी मला तबुवा ही भेट दिली तबुवा झोपडीबाहेर टागणे म्हणजे अबाधित मैत्रीची घोषणा करण्यासारखेच आहे फिजीयन लोकाचा एक खास समारभ असतो त्यावेळी काही ठराविक मत्रविधीच्या सोहळ्यात विशिष्ट वनस्पतीच्या पानापासून यागोना नावाचे पेय तयार करतात, व उपस्थित मडळी ते मोठ्या आवडीने सेवन करतात हें पेय फार अमली व उत्साहजनक असते असे मला सागण्यात आले त्याची चव मात्र मला मुळीच आवडली नाही या मूळ फिजियन लोकाच्या मानाने हिंदी लोकसख्येची वाढ झपाट्याने होत आहे त्यामुळे या दोन वर्गांत थोडेफार वितुष्ट निर्माण झाले आहे ब्रिटिश राजकर्त्यांच्या ते पथ्यावरच पडले असावे गावातील व शहरातील बहुतेक फुटकळ व्यापार हिंदी लोकाच्या हातात आहे, तर घाऊक व्यापार सी एस आर नें ताब्यात घेतला आहे हिंदी लोकानी आपल्या गैरसोयी व तक्रारी आमच्या कानावर घातल्या आणखी लोकानी तिथें हिंदुस्थानातून यावे अशी या मडळीची इच्छा दिसली नाही जमीनीवर त्यांना मालकी मिळण्याविषयीचे निर्बंध व शैक्षणिक सोयींची कमतरता, या त्याच्या मुख्य अडचणी होत्या

न्यूझीलड सरकारचे व माझे जरी अधिकृत राजकीय सबध नसले तरी १९४७ मध्ये या (डोमिनीकन) राज्याला एक महिनाभराची भेट मी दिली मी परत आल्यावर ऑस्ट्रेलियाला पाठवलेला हिंदी वकील हा या देशात सुद्धा हिंदुस्थानचा प्रतिनिधि म्हणून काम पाहतो असे समजते न्यूझीलड ऑस्ट्रेलियापासून सुमारे १५०० ते १८०० मैल अतरावर आहे या दोन राष्ट्राच्या दरम्यानची आगबोट वाहतूक जरी त्या काळात सुनियत्रित अथवा सोईस्कर नसली तरी विमानवाहतूक मात्र चोख होती उत्तर बेट व दक्षिण बेट मिळून न्यूझीलडचे राज्य बनले आहे उत्तर बेटातली ऑकलड व वेलिंग्टन (राजधानी) आणि दक्षिण बेटातलीं क्राइस्टचर्च

व डनीडन, अशी चार मोठी शहरें या देशात आहेत न्यूझीलडची लोकसख्या अदाजें २० लाख असून त्यापैकी सुमारें १५०,००० हे तिथले मूळ मावरी लोक, व बाकीचे बहुसख्य युरोपातून येऊन स्थाइक झालेले गोरे व त्याचे वशज आहेत हा देश सम-शीतोष्ण कटिबधात अगदी खालच्या बाजूला असल्यामुळें, तेथील हवा ऑस्ट्रेलिया-पेक्षा पुष्कळच थड असते दक्षिण बेटातील डनीडन शहरी, तिथले लोक व हवा या दोन्ही गोष्टीमुळें पुष्कळदा स्कॉटलडची आठवण होते न्यूझीलडमध्ये ऑस्ट्रेलिया-प्रमाणें वाळवटें नाहीत सपूर्ण निसर्गश्री झाडाफळानी सपन्न व अतिशय रम्य अशी आहे किंबहुना, या प्रदेशाला भूमिवरचे नदनवन म्हटले तरी ती अतिशयोक्ति होणार नाही

न्यूझीलडची निसर्गजन्य वैशिष्टये म्हणजे उत्तर बेटातल्या रोटारुअजवळचे गरम पाण्याचे झरे व कारजी, आणि दक्षिण बेटातील बर्फाच्छादित दक्षिण ॲल्पस् पर्वतराई रोटारुआच्या आसपासची बरीच जमीन गरम असून, ठराविक मार्गावरूनच मोठ्या सावधगिरीने चालावे लागते पुष्कळ ठिकाणी तर जमिनीत खड्डे खणून त्यावर अन्न शिजवितात कित्येक फूट उच गरम पाणी उडविणारी कारजी, तसेंच कधी कधीं उडणारी कारजी, मोठी मजेदार दिसतात वायटोमो हें गाव तेथील गुहामुळें एक मोठेंच आकर्षण बनले आहे दोन गुहा स्टॅलेक्टाइट व स्टॅलेकमाइटच्या प्रचड रचनांनी व्यापल्या आहेत काहीं ठिकाणी जमिनीत खोलवर असलेल्या मोठमोठ्या पोकळ्यातून स्टेलेकटाइट व स्टॅलेगमाइट जोडले गेल्यामुळे अक्षरश खांब तयार झाले आहेत पण वायटोमोमधील सर्वांत विलक्षण गोष्ट म्हणजे काजव्याची गुहा या विस्तीर्ण गुहेमधून एक ओढा झुळझुळत गेला आहे येथें प्रकाशणारे लाखो काजवे, अविस्मरणीय सौंदर्याचा साक्षात्कारच घडवितात अगदी लहान असे हे कीटक गुहेच्या छपराला चिकटून बसतात व आपल्या शरीरातून लोंबकळणाऱ्या चिकट ततूच्या द्वारे बारीक किडे भक्ष्यासाठी पकडतात इग्लडमधील वा हिंदुस्थानातील काजव्याप्रमाणेच याच्या शरीरातून उजेड बाहेर पडतो मात्र जरासुद्धा आवाज झाला तरी लगेच हा प्रकाश नाहीसा होतो या गुहेंतील भूगर्भ ओढ्यातून आम्हाला बोटीमधून नेण्यात आले तेव्हा पाहिलेला देखावा केवळ स्वर्गीय होता काही ठिकाणी कढत चिखल कायम रटरटत असतो हा चिखल विशिष्ट रोगावर गुणकारी असतो असें म्हणतात अशा ठिकाणी बरेच मावरी वाटाडे असतात त्यापैकी चागली माहितगार असलेली रगी नावाची एक वाटाडी मला आठवते ही बाई प्रथम शिक्षिका व नतर परिचारिका होती पुढें ती अधिकृत वाटाडी म्हणून काम करू लागली. रोटारूआला भेट देणाऱ्या प्रत्येकास रगीची माहिती झाल्याखेरीज रहात नसे एका खानदानी मावरी घराण्यात रगीचा जन्म झाला तिच्या घरीं आम्हांला अनेक मावरी चीजा पाहायला मिळाल्या बर्फाच्या पांघरुणाखाली दडलेला दक्षिण ॲल्पस् व माऊट कुक यांचें असे एक वेगळेंच वैशिष्टय आहे हिमनद्याची भव्यताहि स्फूर्तिदायक वाटते

दक्षिण व उत्तर या दोन्ही बेटाचा पूर्व किनारा फारच रम्य आहे तिथली टुमदार छोटीं गावें पाहून तर तिथेंच स्थाईक होण्याचा मोह पडतो

दुग्धव्यवसाय व मेंढया पाळणे हे न्यूझीलडचे प्रमुख धदे तिथल्या लोकाना पुरेल एवढा गहू न्यूझीलडमध्ये पिकत नसल्यामुळे ऑस्ट्रेलियातून थोडा मागवावा लागतो तेथील दुग्धव्यवसाय फार सुनियंत्रित आहे ऑस्ट्रेलिया न्यूझीलडमधल्या दुग्ध-केंद्राना भेट दिली म्हणजे पुष्कळ शिकायला मिळते ह्या देशात मुबलक जगले आहेत सरकार जगलाची उत्तम निगा राखते न्यूझीलडमधील लोक सर्व साधारणपणें अतिशय सुखी व समृद्ध असतात प्रत्येक पुरोगामी चळवळीत न्यूझीलड सरकार पुढाकार घेतें त्याची समाजवादी राज्यपद्धती सर्व जगाला आदर्श अशी आहे किंबहुना, प्रसूतिपूर्व सल्ला, प्रत्येक प्रकारच्या दुखण्यासाठी मोफत रुग्णालये व औषधोपचार, फुकट शिक्षण, बेकाराना अनुदान, म्हातारपणी तनखा अशी हरप्रकारची सोय करून सरकार प्रत्येक नागरिकाला त्याच्या जन्मापासून ते दफनापर्यंत नाना तऱ्हेनें मदत करते त्याची शिक्षणपद्धतीहि कार्यक्षम आहे मला विशेष जाणवलेली गोष्ट म्हणजे या देशांत प्रत्येक शाळकरी मुलाच्या दाताविषयी घेण्यांत येणारी काळजी वेलिंग्टन-मधला दाताचा दवाखाना मोठा विलक्षण आहे येथें सर्व मुलांचे दात वेळोवेळी तपासले जाऊन मोफत उपचार केला जातो दतशास्त्राच्या परिचारिकानाहि येथें शिक्षण मिळते न्यूझीलडच्या शिक्षणव्यवस्थेत या परिचारिकाचा समावेश आहे एका मोठ्या दालनामध्यें दाताच्या शस्त्रक्रियेसाठी असलेल्या खुर्च्यांतून मुले बसतात परिचारिका या मुलावर उपचार करावयास शिकतात दोन वर्षांचा त्याचा शिक्षण-क्रम पुरा होईपर्यंत त्याना ठराविक वेतन दिलें जाते शिक्षण अर्थातच फुकट असतें मात्र ते पूर्ण झाल्यानतर दोन तीन वर्षे सरकारी नोकरी करण्याची जबाबदारी त्याना स्वीकारावी लागते

न्यूझीलडमध्ये विद्यापीठ एकच असून त्याच्याशी सलग्न असलेली विद्यालयें चारी मुख्य शहरातून वसली आहेत वैद्यकीय विद्यालय डनीडनला असलें तरी इतर शहरांतूनहि रुग्णशय्येजवळील शिक्षणाची सोय केलेली आहे मी तिथें असताना, वैद्यकीय शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या माजी सैनिकासाठी एक वेगळे वैद्यक केंद्र सुरू करण्याचा ठराव आला होता याला बराच विरोध झाला कारण एक प्रतिस्पर्धी वैद्यक विद्यालय काढण्यासाठी चचुप्रवेश म्हणून ही नवी योजना आखण्यात आली असावी अशी भीति लोकाना वाटली डनीडनच्या एका डॉक्टराबरोबर बोलताना मला या विरोधाचा उलगडा लागला न्यूझीलडच्या बेताच्या लोकसख्येला दरवर्षी फार तर ४० किंवा ५० नव्या डॉक्टराना सामावून घेता येणें शक्य आहे दोन वैद्यकीय शाळा चालविणे या देशाला झेपण्यासारखे नाही याहून अधिक डॉक्टर तयार झाले तर देशात त्याचा अवास्तव भरणा होईल

ऑस्ट्रेलियनाच्या प्रमाणेच न्यूझीलडर्सना मर्दानी व मैदानी खेळाची आवड

आहे त्याच्यातील रगबी फुटबॉल विशेष लोकप्रिय आहे न्यूझीलडच्या रगर सघात नेहमी काही थोडे मावरी लोक असतातच दक्षिण आफ्रिकेच्या दौऱ्यासाठी निमत्रण केलेल्या सघामध्ये मावरी लोक असण्यास दक्षिण आफ्रिकेत हरकत घेण्यात आली तीमुळे न्यूझीलडमध्ये बराच असतोष पसरला या देशात क्रिकेट बरेच खेळतात पण ऑस्ट्रेलियाचा या खेळातला दर्जा मात्र अजून या लोकाना प्राप्त झाला नाही दक्षिण ॲल्प्समध्ये हिवाळी खेळ विशेष लोकप्रिय आहेत

न्यूझीलडात मजूरपक्ष सत्तारूढ होता या पक्षाचे मागील पतप्रधान पिटर फ्रेझर याच्या मृत्यूनतर नॅश त्याच्या जागीं आले न्यूझीलडमधल्या मुक्कामात सिडनी हॉलड याच्या शेतावर मी गेलो होतो ही भेट फारच मनोरजक झाली मी तेथून निघाल्यानतर अल्पावधीतच हॉलड पतप्रधान झाले कॅनबेरामध्ये, न्यूझीलडचे वकील जे बार्कले, त्याची पत्नी मिसेस बार्कले व मुख्य सेक्रेटरी मिस मॅकेझी या मडळीशी आमचा विशेष घनिष्ठ सबध होता त्यानीच आम्हाला न्यूझीलडच्या लोकाच्या ओळखी सागितल्या व तिथला आमचा कार्यक्रम आखण्यास मदत केली

मला वाटते, न्यूझीलडचे खास वैशिष्ट्य म्हणजे तिथल्या लोकानी मूळच्या मावरी रहिवाशाना समाजात दिलेलें स्थान ऑस्ट्रेलियामधले मूळ रहिवाशी आता नामशेष होत चालले आहेत पण न्यूझीलडमध्ये मात्र मावरी लोक समाजरचने-मधले फार महत्वाचे घटक बनले आहेत वर्णभेदाचा मागमूसहि मला न्यूझीलडात आढळला नाही किंबहुना या लोकाविरुद्ध कुणी शब्दसुद्धा उचारलेला माझ्या कानावर आला नाही उलट मावरी शौर्याचा, पराक्रमाचा व बुद्धिमत्तेचा मोठ्या गौरवाने उल्लेख केला जातो मन्त्रिमडळात बहुधा एकतरी मावरी मत्री असतोच एकदा तर हगामी पतप्रधान मावरी होता पूर्वीच्या दिवसात मावरी व गोरे याच्यांत चकमकी उडत त्यात कित्येकदा गोरेच अपयशी ठरत पण या वितुष्टाचा आता पुसटसुद्धा मागमूस उरलेला नाही सुमारे एक शतकापूर्वी ब्रिटिश सरकारने मावरी लोकाबरोबर वाईटागीचा करार केला या करारात मावरी लोकांची भूमिका स्पष्ट करून देण्यात आली मावरी माणसाला कुणीहि, कुठल्याहि स्वरूपात दारू विकतां कामा नये, असें करारामध्ये एक कलम होते सर्व शाळामधून मावरी मुले इतर मुलाप्रमाणेच शिकतात त्याना कुठल्याहि प्रकारे वेगळे वागविले जात नाही मावरी लोक हे पैश्याच्या व काटकसरीच्या बाबतीत काहीसे बेफिकीर वृत्तीचे आहेत मात्र काहीनी आपला चागला जम बसवला आहे गोऱ्यानी या लोकाच्या स्वस्त मजुरीचा व निढळाच्या घामाचा गैरफायदा घेतला नाही मावरी खेड्याची योग्य काळजी घेतली जाते त्याच्या उत्कर्षासाठी सरकार बराच पैसाहि खर्च करते शभर वर्षांपूर्वी नागर कसा वापरायचा याविषयी अज्ञ असलेल्या या नरभक्षक अडाणी लोकांनी आज आधुनिक सस्कृतीची मूलतत्वें आत्मसात केली आहेत मागासलेल्या जमातीना कसे वागवावे याचा आदर्श न्यूझीलडनें सर्व जगासमोर माडला आहे सुमारें ५०

वर्षांपूर्वी मावरी लोकाची सख्या रोडावू लागली होती पण आता ती वाढत चालली असून, तिचा आकडा १५०,००० च्या आसपास आहे न्यूझीलडच्या ससदेमध्ये चार मावरी प्रतिनिधी आहेत युरोपियन व मावरी लोकाच्यात क्वचित बेटी व्यवहारहि होतात जातीयतेचा या देशात खरोखरच अभाव आहे

न्यूझीलडमध्ये कायमचे वास्तव्य केलेले काही हिंदी लोक मला भेटले अमे सुमारे १५०० लोक तिथे असावेत त्यापैकी बरेच जण फळाचा व्यापार करतात काहीच्या फळबागाहि आहेत हे लोक मला सुखी व समृद्ध असलेले दिसले स्थाइकते-विषयीचे नवे कायदे अमलांत येण्याअगोदरच ही मडळी इकडे आली असल्यामुळें इतर न्यूझीलडर्सप्रमाणेंच त्यानाहि सर्व हक्क आहेत स्थाइकतेविषयीचे इथले कायदे हे तत्वत श्वेत ऑस्ट्रेलिया धोरणासारखे नाहीत पण कुठल्याहि हिंदी माणसाला सरकारची खास परवानगी काढल्याशिवाय या देशात कायमची वस्ती करता येत नाही जवळच असलेल्या फीजी बेटांतूनहि बरेच हिंदी लोक न्यूझीलडमध्ये आले आहेत उच्च शिक्षणासाठी ते या देशात येतात दुय्यम शाळातून व विद्यालयातून हे विद्यार्थी शिक्षण घेताना आढळतात

न्यूझीलडचे लोक उदार व आदरातिथ्यशील आहेत हिंदी लोकानी त्याच्याशीं अधिक चागले सबध प्रस्थापित केले पाहिजेत या देशाला प्रदीर्घ भेट दिली तर नुसते सृष्टिसौदर्य पाहूनच मन तृप्त होईल समाजसुधारणची आच असलेल्या प्रयोगप्रिय मडळीना तर हे प्रगतिशील व समृद्ध राष्ट्र म्हणजे एक अवाढव्य प्रयोगशाळाच भासेल

लढाई चालू असतांना जरी मी ऑस्ट्रेलियाला गेलो होतों, तरी नतर आठ महिन्यातच ती सपुष्टात आली नतरच्या तिथल्या तीन वर्षांवर त्या भयानक यादवीची छाया तेवढी राहिली होती या वर्षांच्या दरम्यानच इडोनेशियन्स व त्याचे डच राज्यकर्ते याच्यात झगडा झाला ऑस्ट्रेलियात त्यावेळी बरेच इडोनेशियन लोक होते हे लोक आपला हक्क सांगत असलेल्या न्यूगिनी प्राताच्या काही भागावर जरी ऑस्ट्रेलियन लोकाचा अमल असला तरी एकूण पाहता डच-इडोनेशियन प्रकरणात ऑस्ट्रेलियन सहानुभूति इडोनिशियनाच्याच बाजूला झुकली होती

१५ ऑगस्ट १९४७ रोजी हिंदुस्थानला स्वातत्र्य मिळण्यात ज्या घटनाचे पर्यवसान झाले, त्या आमच्याहि दृष्टीनें फार महत्वाच्या होत्या सर्व साधारणपणे ऑस्ट्रेलियनाना हिंदी आकांक्षाविषयी सहानुभूतीच वाटत होती सरकारने व जनतेने आमच्या स्वातत्र्यप्राप्तीचे हार्दिक स्वागतच केले जगी समारभ घडवून हा अपूर्व प्रसग साजरा करतांना व त्यावेळी भारतीय वकीलाच्या निवासस्थानावरचा यूनियन जॅक खाली उतरवून त्याच्या जागी भारताचा झेडा उच फडकवताना मला व माझ्या कचेरीतील इतर सहकाऱ्याना खरोखर धन्यता वाटली कॅनबेरामधील सर्व प्रतिष्ठित लोकाना आम्ही उपहार दिला रात्रीच्या भोजन समारभास ऑस्ट्रेलियन मत्रिमळातले बरेच मत्री उपस्थित होते त्यावेळी सरकारी प्रतिनिधीनी आस्थापूर्वक भाषणे केली

स्वातंत्र्य मिळणार असल्याची पहिली अधिकृत वार्ता मी ॲडिलेडला असताना मला कळली याचा उल्लेख करावासा वाटतो स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जवाहरलाल नेहरूंना लिहिलेल्या अभिनंदनपर पत्रामध्ये, त्यांची ऑस्ट्रेलियाला दुसरा वकील नेमण्याची इच्छा असल्यास मी तिळमात्र हरकत घेणार नाही असें कळविलें होते परदेशामध्ये असलेल्या हिंदुस्थानच्या प्रतिनिधीवर पंतप्रधान व परराष्ट्रखात्याचा संपूर्ण विश्वास व पाठिंबा असणें अत्यावश्यक असतें असें मी पत्रात लिहलें होतें हिंदी वकील बदलण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाहीं असें परराष्ट्र खात्याच्या चिटणीसाने मला उलट कळविले माझी तीन वर्षांची मुदत नोव्हेंबर १९४७ मध्ये संपुष्टात आली त्या महिन्याच्या अखेरीस मी ऑस्ट्रेलिया सोडला व डिसेंबरच्या प्रारंभास हिंदुस्थानच्या किनाऱ्याला लागलों

ऑस्ट्रेलियातील माझ्या वास्तव्याचे सिंहावलोकन करताना मला नेहमीच आनंद होतो तेथें मला पुष्कळच नवा अनुभव मिळाला सतत परिश्रम व उत्साह याच्या जोरावर एक नवोदित उत्साही राष्ट्र कशी भराभर प्रगती करू शकतें हे पहावयास मिळालें हिंदुस्थानच्या मागें जरी काही हजार वर्षांचा इतिहास उभा असला तरी संपूर्ण अधुनिकतेची दीक्षा त्यानें अगदी अलिकडेच घेतली आहे तेव्हा अशा बाबतीमध्यें इंग्लंड, जर्मनी वा अमेरिकेपेक्षां, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड व तत्सम नव्या राष्ट्रांचीं उदाहरणेंच आपल्या योजनाकारांना अधिक स्फूर्ति देऊ शकतील अतिशय अनौपचारिक, अगत्यशील व खिलाडू वृत्तीच्या ऑस्ट्रेलियनाबद्दल माझ्या मनांत फार आपलेपणाची व आदराची भावना आहे व्यापारी तसेच सांस्कृतिक क्षेत्रामध्यें या लोकांशीं आपण अधिक निकटचे संबंध जोडले पाहिजेत असे माझे आग्रहाचे सांगणें आहे

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८६८३ दि: २४।१०।...
क्रमांक . ७२२७....... कॉ दि: २४।१०।५५

प्रकरण अठरावें

# पुणें विद्यापीठ

१९४७ मध्ये पुण्याला परतल्यावर, जुने ऋणानुबंध असलेल्या अनेक संस्थामधून मी पुनश्च जाऊ लागलो मात्र सत्तरी ओलांडली असल्यामुळें, मी नव्याने सुरू करावें असे कोणतेंहि कार्य माझ्या डोळ्यासमोर नव्हतें जयकर-समितीचा मी सभासद होतोच ही समिती पुण्याला विद्यापीठ स्थापन करण्याविषयीच्या योजनेचा विचार करीत होती इतर कैक योजनाप्रमाणें, ही योजनाही बारगळेल असे सर्वांना वाटत होते पण मुंबई राज्याचे त्यावेळचे मुख्यमंत्री व शिक्षणमंत्री, श्री बा ग खेर, यांनी या योजनेकडे जातीने लक्ष देऊन पुणे विद्यापीठाचा कायदा पास करून घेतला काहीं प्राथमिक तयारीनंतर, दिनांक १० फेब्रुवारी १९४८ रोजी पुणे विद्यापीठ स्थापन झाले, व माननीय डॉ मु रा जयकर हे पहिले उपकुलगुरु झाले सरकारनें विद्यापीठ कोर्टावर माझी नेमणूक केली, व विद्यापीठाच्या कार्यांत मला शक्य असेल तेवढें लक्ष मी घालू लागलो परंतु अनेकजणांनी वेळोवेळी आग्रह केला तरी कार्य-कारिणीच्या जागेसाठी मी उभा राहिलों नाही

पुणे विद्यापीठाच्या कार्याच्या दोन बाजू आहेत बऱ्याच शिक्षणसंस्था त्याच्याशी संलग्न आहेत, आणि खुद्द विद्यापीठहि शिक्षण देण्याचे कार्य करते पुणे शहराच्या परिसरांतील विद्यालयीन शिक्षणाची सर्व सूत्रे पुणे विद्यापीठाने हाती घ्यावी व महाविद्यालयानी त्याला या बाबतीत संपूर्ण सहकार्य द्यावें असे ठरले मुंबई राज्यातील इतर दहाबारा जिल्ह्यामध्यें असलेली विद्यालयें पुणे विद्यापीठाला जोडण्यात आली व मुंबई विद्यापीठाशी असलेला त्यांचा संबंध एक दोन वर्षांनी नाहींसा झाला अर्थातच संक्रमणाच्या काळापुरती काही व्यवस्था करावी लागली पुणें शहरापुरतें स्वतंत्र विद्यापीठ असावयास हवे असें मी वीस वर्षांपूर्वीं सेटलवाड समितीत असताना आग्रहाने सांगितले होते जयकर समितीमध्येंहि मी त्याचा पुन्हा पुरस्कार केला पण व्यर्थ पुणे विद्यापीठाने पुण्यातील सर्व महाविद्यालये असतील त्या स्थितीत, त्यांच्या शिक्षकवर्गासह आपल्या ताब्यात घ्यावीत असें माझें मत होतें विद्यापीठ

शिक्षणाचा पाया भक्कम होण्यास त्यायोगे मदत झाली असती जवळ जवळ शभर वर्षापूर्वी मद्रास, कलकत्ता व मुबई येथें लडन विद्यापीठाच्या धर्तीवर, अनेक सस्थाचा समावेश असणारी, विद्यापीठे स्थापन करण्यात आली मला वाटतें, बहुसख्य हिंदी शिक्षणतज्ञाना या पद्धतीने मारून टाकले आहे एक बडोदा विद्यापीठ सोडले तर मुबई राज्यातील इतर सान्या विद्यापीठानी या पद्धतीचेच अनुकरण केलेले दिसते गुतागुतीची यत्रणा व शिक्षण, परीक्षा आणि सशोधनकार्य याची उच्च पातळी टिकविण्यातील अडचणी, हे या पद्धतीचे अवगुण आहेत पुणें शहरातील महाविद्यालयें ही सर्वत्र विखुरलेली असल्यामुळें, एकअगी ( Unitary ) विद्यापीठाच्या मार्गात अनेक अडचणी उभ्या राहतील याची मला पूर्ण कल्पना होती पण वेगवेगळ्या विद्यालयाकडे वेगवेगळ्या शाखा सोपवून या अडचणी समाधानकारकपणें दूर करता आल्या असत्या असो 'आत्याबाईला मिशा असत्या तर ' असे म्हणून हळहळत बसण्यात अर्थ नाही दुहेरी अगाचें पुणें विद्यापीठ आज अस्तित्वात आहे एवढें खरे

राजभवनाची विस्तीर्ण जागा आणि तीमध्यें असलेल्या इमारतीचें अनुदान देऊन, मुख्यमत्री श्री खेर यानी विद्यापीठाची सुरुवात तर फार उत्तम रीतीनें केली त्यामुळे विद्यापीठाला उत्तम आवार मिळाले एवढेंच नव्हे तर वाढीसाठी भरपूर जागा ही मिळाली विद्यापीठाच्या परिसरानजीकच राज्यपालासाठी एक छोटे निवास-स्थान बाधले आहे गेल्या दहाबारा वर्षांत, आपला वाढता व्याप सभाळण्यासाठी विद्यापीठानें बऱ्याच नवीन इमारती उठवल्या नवनवीन इमारतीच्या योजना अजूनहि आखल्या जात असून त्यापैकी बऱ्याचशा पुऱ्या झाल्या आहेत

पहिले उपकुलगरु डॉ जयकर यानी विद्यापीठाच्या शासनपद्धतीबाबतचे कायदे व नियम आखून सुरवातीची मोठीच जबाबदारी पार पाडली पहिली एक दोन वर्षे जयकराच्या हातात पूर्ण सत्ता होती तिचा सदुपयोग करून त्यानी विद्या-पीठाचे गाडें मार्गाला लावले आज अस्तित्वात असलेल्या विद्यापीठाचे स्वरूप जयकराच्या मूळ सकल्पाला अनुसरून आहे अर्थातच बऱ्याच बाबतीत हळूहळू बदलहि होत चालले आहेत असले बदल होणे कुठल्याहि वाढत्या जिवत सस्थेमध्यें होणे अटळ आहे डॉ जयकराना 'पुणे विद्यापीठाचे जनक' म्हणून सबोधणे अगदी यथार्थ आहे पुणे विद्यापीठाने आपल्या नव्या वाचनालयाला त्याचे नाव देऊन औचित्य साधले आहे यात शका नाही

विद्यापीठ स्थापन झाल्यावर तीन किंवा चार वर्षांतच, सर परशुरामभाऊ विद्यालयाने पुढें येऊन विद्यापीठाच्या उपयोगासाठी आपल्या सर्व इमारती देऊ करण्याची इच्छा दर्शविली विद्यापीठाने तात्काळ साहित्य विभागाचे बी ए पर्यंत संपूर्ण अध्यापन या विद्यालयात चालू करण्याचा बेत आखला साहित्याचे वर्ग चाल-विण्याचा इतर तीन विद्यालयाचा हक्क अर्थातच हिरावला जाऊन त्याच्या व्यवस्थापक-

वर्गात असंतोष पसरला शिक्षकवर्गहि खवळला शिक्षणपद्धतीत अधिक कार्यक्षमता, अथवा शिस्तीचे संगोपन, यांपैकी काहीच या नव्या योजनेमुळें साध्य झालें नाही असे सर्वांचें मत पडले शिक्षणाचा दर्जा जर उंचावला असता, तर आमच्यापैकीं बऱ्याच जणानी साहित्यविभागाच्या एकत्रीकरणाची ही योजना मान्य केलीहि असती पण प्रत्यक्षात, शिक्षणाची पातळी बरीच खालावलेली आढळली एकत्रीकरण उलथून पाडण्याचे अनेक प्रयत्न करण्यात आले, पण याबाबत चर्चा करू देण्यासहि जयकर तयार नव्हते अनेकाच्या म्हणण्याप्रमाणे उपकुलगुरुच्या अधिकाराचा त्यांनी याप्रसगी गैरवाजवी उपयोग केला आपल्या बऱ्याच अनुयायाशी व बहुसख्य कॉलेज शिक्षक व व्यवस्थापक याच्याशी त्याचे वितुष्ट आले, व त्याच्या कारकीर्दीच्या उत्तरार्धावर या वितुष्टामुळे कृष्णछाया पसरली

आपली दुसरी कारकीर्द संपण्याच्या सुमारास, प्रकृती अस्वास्थ्यामुळें पुन्हां निवडणुकीस उभें न राहण्याचा निर्णय आपण घेतला आहे, असे जयकरानी आपल्या काही स्नेह्याजवळ बोलून दाखविले तेव्हा उपकुलगुरूपदासाठी माझे नाव सुचविले जाण्यास माझी संमती आहे काय, असे मला विद्यापीठातील काही प्रतिष्ठित सदस्यानी विचारलें डॉ जयकर पुन्हा उभे राहणार नसल्याची खात्री करून घेतल्यानंतर मी संमती दिली पण बऱ्याच नाखुषीनें व साशकतेने मी तेव्हा जवळ जवळ ८० वर्षांचा होतो, माझी प्रकृती उत्तम असली तरी दप्तरातील जबाबदाऱ्या व कर्तव्ये मी जोमाने पार पाडीनच असा मला मुळीच आत्मविश्वास वाटत नव्हता, तथापि या पदासाठीं तीन नावामध्यें कार्यकारिणीने माझे नांव सुचविले आणि कोर्टाच्या बैठकीच्या वेळी बाकीच्या दोघांनी आपली नावे मागें घेतल्यामुळे मी या पदावर बिनविरोध निवडून आलों अशा रितीने, १८ एप्रिल १९५६ रोजी मी विद्यापीठाचा उपकुलगुरु झालो उपकुलगुरूच्या अशा प्रकारच्या बिनविरोध निवडणुकीवर विद्यापीठ कोर्टातील कायदेबाज सदस्यानी वेळोवेळी हल्ला चढविला आहे अशा निवडणुकीमुळे मतदानाच्या आपल्या हक्कावर गदा येते असे त्याचे म्हणणें माझ्या मताप्रमाणे मात्र जवळ जवळ सर्वांना मान्य असलेल्या व्यक्तीची नेमणूक करणें हें उद्दिष्ट असावे खाजगी चर्चा करून अशी व्यक्ती निवडता आली तर फारच उत्तम सर्वसाधारणपणें एकमत झाले नाहीच तर कोणता मार्ग अवलबावा, याचा काय तो कायद्यामध्ये उल्लेख आहे योग्य व्यक्तीची निवड व्हावी यासाठी कार्यकारिणी मंडळ वा कोर्ट यातील लोकानी मते द्यावयाची असतात मतदान हेंच उद्दिष्ट नसून योग्य व्यक्तीची निवड करण्याचा तो एक मार्ग आहे, हे ध्यानात ठेवलें पाहिजे या निवडणुकीतहि पक्षीय राजकारण व त्याच्या पाठोपाठ येणाऱ्या भानगडी व कारवाया याचा शिरकाव झाला तर त्याच्यासारखी खेदाची गोष्ट नाही विद्यापीठ कायद्यानुसार विद्यापीठाचे बहुतेक कारभारविषयक अधिकार कार्यकारिणीच्या हातात आहेत. विद्यापीठाचें कामकाज समाधानकारकरीत्या चालवायचें असेल तर उपकुलगुरू

ह्या कार्यकारिणीमधील एखाद्या पक्षाचा नेता असून चालणार नाही

सुदैवाने कार्यकारिणीमधले बहुतेक सर्व सदस्य माझ्या चागल्या परिचयाचे होते कित्येक तर माझे स्वत चे, अथवा माझ्या विद्यार्थ्यांचे, विद्यार्थीच होते तेव्हा एखाद्या मुद्यावर मतभेद झाला तरी माझ्या हातून अन्याय घडणार नाही याची त्यांना पूर्ण खात्री होती वेगवेगळ्या समित्याचे सदस्य प्रत्येक प्रश्नासबधातील माझी मतें काळजीपूर्वक अभ्यासत असत त्यामुळें मतभेत झाला तरी कडवटपणा उरत नसे १९५६ ते १९५९ च्या दरम्यानच्या, उपकुलगुरुपदाच्या कारकीर्दीत मला प्रत्येक गोटातून जें सहकार्य मिळत राहिले, त्याची सुखद आठवण मी विसरणार नाहीं पहिल्या कांही महिन्यात मी जरा अधिक काम केले त्याचा परिणाम माझ्या प्रकृतीवर झाला "मायास्थेनिया ग्राव्हिस हे दुखणे मला जडले असल्याचे वैद्यानी निदान केले सुदैवाने योग्य उपचारानी गुण येऊन मी माझी कारकीर्द बरीच समाधानकारक रीत्या पार पाडू शकलो माझ्या मनात, पुण्याबाहेरच्या सर्व विद्यालय केन्द्राना भेट द्यायची होती, ते मात्र जमले नाही, दुसऱ्यादा उपकुलगुरुपद स्वीकारायचे नाही असे ठरवून १ जून १९५९ रोजी मी अधिकारसूत्रे खाली ठेवली माझी कारकीर्द अधिकृतरीत्या १८ एप्रिललाच सपली होती, परतु माझ्यानतरचे उपकुलगुरु प्रा डी जी कर्वे, काही कारणामुळे सहा आठवडे येऊ शकले नाहीत

मी उपकुलगुरु असताना, सर्वांचें लक्ष वेधणारा प्रश्न, पदवीपूर्व आर्ट्स् शिक्षणाचे केन्द्रीकरण" हा होता या प्रश्नाचा पुनर्विचार करण्यास मी मान्यता दिल्यावर, या प्रश्नाचा सागोपाग विचार करण्यासाठी विद्यापीठ कोर्ट व कार्यकारिणीने तीन ख्यातनाम शिक्षणतज्ञाची समिती नेमण्याचे ठरविले न्यायमूर्ती पी बी गजेन्द्रगडकर, नागपूरचे डॉ नियोगी व त्यावेळचे मुबई विद्यापीठाचे रेक्टर व मध्याचे नव मराठवाडा विद्यापीठाचे उपकुलगुरु श्री डोंगरकेरी, या तिघाची समिती नेमण्यात आली या त्रयीनी बहुमोल अहवाल सादर केला तो या प्रश्नावर तोड म्हणून सर्वसाधारणपणे सर्वांना मान्य झाला

गजेन्द्रगडकर समितीच्या निर्णयाप्रमाणे, काही अटी घालून पुण्यातील विद्यालयाना आर्टचें शिक्षण देण्याची परवानगी मिळाली आवश्यक शिक्षकवृंद व शिकविले जाणारे विषय घेणारे पुरेसे विद्यार्थी असणे, अर्थातच क्रमप्राप्तच होते शक्य तिथे शिक्षणसाधने वाया जाऊ नयेत याबद्दलहि कटाक्ष पाळणे आवश्यक होते या अखेरच्या उपायामुळें, विद्यापीठात आता शाततेचे वातावरण प्रस्थापित झाल्रें आहे असे मला वाटते

विद्यापीठाच्या प्रथम पदवीच्या शिक्षणावर जर दुसऱ्या कुठल्या बदलाचा परिणाम झाला असेल तर तो पदवीपूर्व शिक्षणाच्या एका वर्षानतरच्या त्रैवार्षिक शिक्षणक्रमाचा महाविद्यालयातील सपूर्ण पहिलें वर्ष हे शिक्षणाच्या दृष्टीनें पाहिल्यास माध्यमिक शालेय दर्जाचेच असतें, तेव्हा शाळाकडे या शिक्षणाची जबाबदारी पार

पाडण्याइतपत साधने व शिक्षणवर्ग असल्यास ते खुशाल त्याच्याकडेच सुपूर्द करावें असे विद्यापीठ अनुदानमडळाचे व काही शिक्षणसंस्थाचे मत होते आतापर्यंत कोणत्याहि शाळेला हा वरचा दर्जा प्राप्त झालेला नाही अशा प्रकारच्या सूचना माडल्या गेल्या आहेत, तेव्हा आता चारपाच वर्षांच्या अवधीतच हा बदल घडून येईल अशी आशा करण्यास हरकत नाही तोंपर्यंत सध्याच्या विद्यालयातूनच पदवी-पूर्व शिक्षण देण्यात येईल व वर्षाअखेर विद्यापीठातर्फे या मुलाची परीक्षा घेतली जाईल याप्रमाणें तत्काळ झालेला मुख्य हा बदल की आता पहिल्या वर्षाची परीक्षा विद्यालयीन न राहतां विद्यापीठामार्फत घेतली जाणार आहे मुबई विद्यापीठाची पहिल्या वर्गाची परीक्षा विद्यालयाकडे सोपविण्याची योजना जवळ जवळ ४० वर्षापूर्वी आखण्यात आली होती या योजनेला मी उत्साहाने पाठिंबा दिला होता विद्यालयें ह्या आह्वानाचा स्वीकार करतील व विद्यापीठाच्या औपचारिक परीक्षा-पद्धतीमधले काही अपरिहार्य दोष टाळून आपापल्या मुलाच्या परीक्षा चोखपणे व प्रामाणिकपणें चालवतील असे मला वाटले होते पण दुर्दैवाने बहुतेक विद्यालयानी अपेक्षापूर्ती तर केली नाहीच, पण या योजनेचा पार बोजवारा मात्र उडवून टाकला पहिल्या वर्षाच्या परीक्षा विद्यालयाच्या ताब्यात येण्यापूर्वी उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण ४० ते ५० टक्के असायचें, ते आता अचानकपणें कित्येक विद्यालयातून ९० च्याहि वर गेले या बदलानतरच्या पहिल्याच अहवालात तेव्हाचे शिक्षणाधिकारी डब्ल्यू एच शार्प यानी आपल्या विनोदबुद्धीला अनुसरून " नेटिव्ह संस्थानातील बहुतेक विद्यालयानी अगदी शेलके विद्यार्थी मिळवून त्यांपैकी बहुतेकाना उत्तीर्ण केलेले दिसते " असे विधान केलें होतें त्या वेळचा सावळा गोधळ आता बराच सुधारला असून मुबई विद्यापीठानेहि प्रथमवर्ष विद्यालयीन परीक्षा स्वत च्या ताब्यात घेण्याचे ठरविलें आहे

पूर्वीच्या इटरमीडिएटची परीक्षा आता बद झाली असून त्याऐवजी तीन वर्षांचा पदवीक्रम आंखण्यात आला आहे तात्त्विक दृष्टचा, या अभ्यासक्रमातील निरनिराळ्या विषयाच्या परीक्षा तीन वर्षांच्या काळात केव्हाहि दिलेल्या चालत असल्या तरी प्रत्यक्षात या परीक्षा काही विशिष्ट क्रमानेंच द्याव्या लागतात एकाद्या विषयात विद्यार्थी अनुत्तीर्ण झाला, तरी त्याला आता मागे रहावे लागणार नाही त्याने नियमानुसार जे विषय घेतले असतील, त्या सर्व विषयात तो उत्तीर्ण झाला कीं त्याला पदवी मिळेल एकाद्याच विषयाचें अति गहन अध्ययन व बाकीच्या विषयांकडे दुर्लक्ष करण्याविरुद्ध या अभ्यासक्रमात व्यवस्था केलेली असून सर्वसामान्य स्वरूपाचे काही विषय सक्तीचे केले आहेत एंजिनिअरिंग व मेडिकल कॉलेजसारख्या व्यावसायिक विद्यालयात जाऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रथम त्रैवार्षिक पदवी-क्रमाच्या पहिल्या वर्षाच्या शेवटी काही विशिष्ट विषयात पात्र व्हावें लागते त्याशिवाय त्याना प्रवेश मिळत नाही तीन वर्षांचा पदवीक्रम नुकताच सुरू करण्यात

हा कार्यकारिणीमधील एखाद्या पक्षाचा नेता असून चालणार नाही

सुदैवानें कार्यकारिणीमधले बहुतेक सर्व सदस्य माझ्या चागल्या परिचयाचे होते कित्येक तर माझे स्वत चे, अथवा माझ्या विद्यार्थ्यांचे, विद्यार्थीच होते तेव्हा एखाद्या मुद्यावर मतभेद झाला तरी माझ्या हातून अन्याय घडणार नाही याची त्याना पूर्ण खात्री होती वेगवेगळ्या समित्याचे सदस्य प्रत्येक प्रश्नासबधातील माझी मतें काळजीपूर्वक अभ्यासत असच त्यामुळें मतभेत झाला तरी कडवटपणा उरत नसे १९५६ ते १९५९ च्या दरम्यानच्या, उपकुलगुरुपदाच्या कारकीर्दीत मला प्रत्येक गोटातून जें सहकार्य मिळत राहिलें, त्याची सुखद आठवण मी विसरणार नाही पहिल्या काही महिन्यात मी जरा अधिक काम केले त्याचा परिणाम माझ्या प्रकृतीवर झाला " मायास्थेनिया ग्राव्हिस हें दुखणें मला जडले असल्याचे वैद्यानी निदान केले सुदैवाने योग्य उपचारानी गुण येऊन मी माझी कारकीर्द बरीच समाधानकारक रीत्या पार पाडू शकलो माझ्या मनात, पुण्याबाहेरच्या सर्व विद्यालय केन्द्राना भेट द्यायची होती, ते मात्र जमले नाही, दुसऱ्यादा उपकुलगुरुपद स्वीकारायचे नाही असे ठरवून १ जून १९५९ रोजी मी अधिकारसूत्रे खाली ठेवली माझी कारकीर्द अधिकृतरीत्या १८ एप्रिललाच सपली होती, परतु माझ्यानतरचे उपकुलगुरु प्रा डी जी कर्वे, कांही कारणामुळे सहा आठवडे येऊ शकले नाहीत

मी उपकुलगुरु असताना, सर्वांचें लक्ष वेधणारा प्रश्न, " पदवीपूर्व आर्ट्स् शिक्षणाचे केन्द्रीकरण ' हा होता या प्रश्नाचा पुर्नविचार करण्यास मी मान्यता दिल्यावर, या प्रश्नाचा सागोपांग विचार करण्यासाठी विद्यापीठ कोर्ट व कार्यकारिणीने तीन ख्यातनाम शिक्षणतज्ञाची समिती नेमण्याचे ठरविले न्यायमूर्ती पी बी गजेन्द्रगडकर, नागपूरचे डॉ नियोगी व त्यावेळचे मुबई विद्यापीठाचे रेक्टर व सध्याचे नव मराठवाडा विद्यापीठाचे उपकुलगुरु श्री डोगरकेरी, या तिघाची समिती नेमण्यात आली या त्रयींनी बहुमोल अहवाल सादर केला तो या प्रश्नावर तोड म्हणून सर्वसाधारणपणे सर्वांना मान्य झाला

गजेन्द्रगडकर समितीच्या निर्णयाप्रमाणें, काही अटी घालून पुण्यातील विद्यालयाना आर्टचे शिक्षण देण्याची परवानगी मिळाली आवश्यक शिक्षकवृद व शिकविले जाणारे विषय घेणारे पुरेसे विद्यार्थी असणे, अर्थातच क्रमप्राप्तच होते शक्य तिथे शिक्षणसाधने वाया जाऊ नयेत याबद्दलहि कटाक्ष पाळणें आवश्यक होते या अखेरच्या उपायामुळे, विद्यापीठात आता शाततेचें वातावरण प्रस्थापित झाले आहे असे मला वाटते

विद्यापीठाच्या प्रथम पदवीच्या शिक्षणावर जर दुसऱ्या कुठल्या बदलाचा परिणाम झाला असेल तर तो पदवीपूर्व शिक्षणाच्या एका वर्षानतरच्या त्रैवार्षिक शिक्षणक्रमाचा महाविद्यालयातील सपूर्ण पहिले वर्ष हें शिक्षणाच्या दृष्टीने पाहिल्यास माध्यमिक शालेय दर्जाचेच असतें, तेव्हा शाळाकडे या शिक्षणाची जबाबदारी पार

पाडण्याइतपत साधने व शिक्षणवर्ग असल्यास ते खुशाल त्याच्याकडेच सुपूर्द करावे असे विद्यापीठ अनुदानमडळाचे व काही शिक्षणसस्थाचें मत होते आतापर्यंत कोणत्याहि गाळेला हा वरचा दर्जा प्राप्त झालेला नाही अशा प्रकारच्या सूचना माडल्या गेल्या आहेत, तेव्हां आता चारपांच वर्षांच्या अवधीतच हा बदल घडून येईल अशी आशा करण्यास हरकत नाही तोपर्यंत सध्याच्या विद्यालयातूनच पदवी-पूर्व शिक्षण देण्यांत येईल व वर्षाअखेर विद्यापीठातर्फे या मुलाची परीक्षा घेतली जाईल याप्रमाणे तत्काळ झालेला मुख्य हा बदल की आता पहिल्या वर्षाची परीक्षा विद्यालयीन न राहता विद्यापीठामार्फत घेतली जाणार आहे मुबई विद्यापीठाची पहिल्या वर्गाची परीक्षा विद्यालयाकडे सोपविण्याची योजना जवळ जवळ ४० वर्षापूर्वी आखण्यात आली होती या योजनेला मी उत्साहानें पाठिंवा दिला होता विद्यालये ह्या आह्वानाचा स्वीकार करतील व विद्यापीठाच्या औपचारिक परीक्षा-पद्धतीमधले काही अपरिहार्य दोष टाळून आपापल्या मुलाच्या परीक्षा चोखपणे व प्रामाणिकपणे चालवतील असें मला वाटले होतें पण दुर्दैवानें बहुतेक विद्यालयानी अपेक्षापूर्ती तर केली नाहीच, पण या योजनेचा पार बोजवारा मात्र उडवून टाकला पहिल्या वर्षाच्या परीक्षा विद्यालयाच्या ताब्यात येण्यापूर्वी उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण ४० ते ५० टक्के असायचे, ते आता अचानकपणे कित्येक विद्यालयातून ९० च्याहि वर गेले या बदलानतरच्या पहिल्याच अहवालात तेव्हाचे शिक्षणाधिकारी डब्ल्यू एच शार्प यानी आपल्या विनोदबुद्धीला अनुसरून ' नेटिव्ह सस्थानातील बहुतेक विद्यालयांनी अगदी शेलके विद्यार्थी मिळवून त्यापैकी बहुतेकांना उत्तीर्ण केलेले दिसतें " असें विधान केले होतें त्या वेळचा सांवळा गोंधळ आता बराच सुधारला असून मुबई विद्यापीठानेंहि प्रथमवर्ष विद्यालयीन परीक्षा स्वत च्या ताब्यात घेण्याचे ठरविले आहे

पूर्वीच्या इटरमीडिएटची परीक्षा आता बद झाली असून त्याऐवजी तीन वर्षांचा पदवीक्रम आखण्यात आला आहे तात्त्विक दृष्ट्या, या अभ्यासक्रमांतील निरनिराळ्या विषयाच्या परीक्षा तीन वर्षांच्या काळात केव्हाहि दिलेल्या चालत असल्या तरी प्रत्यक्षात या परीक्षा काही विशिष्ट क्रमानेंच द्याव्या लागतात एकाद्या विषयात विद्यार्थी अनुत्तीर्ण झाला, तरी त्याला आता मागे रहावे लागणार नाही त्याने नियमानुसार जे विषय घेतले असतील, त्या सर्व विषयात तो उत्तीर्ण झाला की त्याला पदवी मिळेल एकाद्याच विषयाचे अति गहन अध्ययन व बाकीच्या विषयाकडे दुर्लक्ष करण्याविरुद्ध या अभ्यासक्रमात व्यवस्था केलेली असून सर्वसामान्य स्वरूपाचे काही विषय सक्तीचे केले आहेत एजिनिअरिंग व मेडिकल कॉलेजसारख्या व्यावसायिक विद्यालयांत जाऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रथम त्रैवार्षिक पदवी-क्रमाच्या पहिल्या वर्षाच्या शेवटी काही विशिष्ट विषयात पात्र व्हावे लागते त्याशिवाय त्याना प्रवेश मिळत नाही तीन वर्षांचा पदवीक्रम नुकताच सुरू करण्यांत

आला असून त्याचें यश आजमावायला काही अवधी लागेल मात्र त्यायोगे कार्यक्षमतेला बाधा न येता विद्यार्थ्यांवरचा भार हलका होईल व सध्यापेक्षा अधिक सुशिक्षित विद्यार्थी पिढी निर्माण होईल अशी अपेक्षा आहे

विद्यापीठामधील व विद्यालयातील शिक्षकांच्या वेतनश्रेणीचा प्रश्न फारच महत्वाचा आहे शिक्षणक्षेत्रातून त्यासबधात अव्याहत चर्चा चालू असते ज्या जयकर समितीच्या अहवालावर पुणें विद्यापीठ कायद्याची उभारणी झाली आहे, त्या अहवालामध्यें स्वार्थत्यागाच्या तत्त्वावर विशेष भर दिलेला आढळतो त्याग हा तर महाराष्ट्राच्या व पुण्याच्या शिक्षणसस्थाचा आत्मा आहे पुणें विद्यापीठाच्या व त्या अनुषगानें विद्यालयाच्याहि शिक्षकवर्गाची वेतनश्रेणी इतर विद्यापीठाच्या व विद्यालयाच्या मानानें बरीच कमी असावी अशी जयकर समितीच्या अहवालांत शिफारस केली होती मी त्याला कडाडून विरोध केला स्वार्थत्याग जर सपूर्णपणें स्वयस्फूर्त असेल, तर तो निश्चित स्वागतार्हच आहे, पण कोणत्याहि सस्थेवर विशेषत विद्यापीठासारख्या सस्थेवर तो बाहेरून लादला जाऊ नये असे माझें म्हणणें होतें पुणे विद्यापीठाची वेतनश्रेणी साधारणपणे इतर विद्यापीठाच्या बरोबरीने असावी असा मी आग्रह धरला पण समितीमध्यें बहुमताने शिक्षकाची वेतनश्रेणी अतिशय कमी ठेवण्यात आली व त्यायोगें पुण्याला कर्तबगार शिक्षक मिळवणें वा असलेले टिकवणे कठीण होऊन बसलें दहा वर्षापूर्वी, विद्यापीठ प्राध्यापकाच्या पगाराची श्रेणी वाढविण्यास मदत व्हावी म्हणून सरकारनें मदत देऊ केली होती, पण स्वार्थत्यागाच्या तत्त्वाशी ती विसगत आहे या सबबीवर कार्यकारिणीने ती नाकारली विद्यापीठाचा शिक्षकवर्ग व विद्यालयाचा शिक्षकवर्ग याच्या पगारातले अतर फारच वाढेल अशी सबबहि कार्यकारिणीनें पुढें केली होती या निर्णयामुळें विद्यापीठाच्या प्राध्यापकवर्गात फारच असतोष पसरला मी उपकुलगुरु असतांना हा प्रश्न जेव्हा पुन्हा उद्भवला तेव्हा सरकारची मदत स्वीकारून, वेतनश्रेणीच्या बाबतीत पुणे विद्यापीठाला इतर विद्यापीठाच्या ओळीत आणून बसविण्याचा मी कार्यकारिणीला सल्ला दिला त्याबरोबरच विद्यालयातील प्राध्यापकाचेहि त्याच प्रमाणात पगार वाढावेत, यासाठी खटपट करण्याची शिफारस केली विद्यापीठामध्ये व बहुतेक विद्यालयातून ही सुधारणा आतां लागू करण्यांत आली आहे मिळणाऱ्या वेतनावर दोन्हीकडचा शिक्षकवर्ग आता सामान्यपणे सतुष्ट झाला असेल अशी आशा करण्यास हरकत नाही शिक्षकवर्गाशी बोलण्याची सधि मला जेव्हा जेव्हा मिळे, तेव्हा तेव्हा नोकरीमधील गैरसोयींचे नुसते रडगाणे गात न बसता कार्याला वाहून घेऊन विद्यार्थ्यांच्या प्रगतीबाबत अधिक लक्ष घालण्याचा व स्वत ची कार्यक्षमता वाढविण्याचा सल्ला मी त्याना देत असें अलीकडे करण्यात आलेल्या उपक्रमाचा योग्य परिणाम होऊन पुणे विद्यापीठातील शिक्षणाचा दर्जा सुधारण्यास त्यामुळे मदत होईल अशी मी आशा करतो

प्रकरण एकोणिसावे

# अंदमानची सफर

१ जून १९५९ रोजीं, उपकुलगुरुपदाचा कारभार मी प्रा डी जी कर्वे याच्या हाती सुपूर्द केला तेव्हापासून या पुस्तकाच्या लिखाणाखेरीज मला नियमित असे काहीच काम राहिले नाही पुण्यांमध्ये दीर्घकाळ राहिल्यामुळे शहरातल्या बऱ्याच सार्वजनिक सस्थाशी माझा सबध जडला आहे त्यातील काही सस्थात मी पदाधिकारीही आहे वृत्तपत्रे व विचारप्रवर्तक वाङ्मय स्वत वाचण्यात अथवा विद्यार्थ्याकडून वाचून घेण्यात माझा बराच वेळ जातो १९६० च्या सुरुवातीला माझे स्नेही जस्टिस ढवळे याच्या समवेत मी अदमान व निकोबार बेटाना भेट दिली त्या मनोरजक सफरीची माहिती द्यावीशी वाटते अदमान हें नाव नुसते उच्चारलें तरी डोळ्यापुढे एक भयानक चित्र उभें राहते हद्दपारीची शिक्षा झालेल्या हिंदी गुन्हेगारांना या बेटावर काळ्या पाण्यासाठी धाडण्याची प्रथा एक शतकाहूनहि अधिक काळ चालू होती इथे त्याना अतिशय कठोरपणे वागविण्यात येई प्रत्यक्षात या बेटांचे दर्शन घडल्े की मात्र आधीचे चित्र पार पुसले जाते घनदाट जगलें, एक सबध आरमार जिथे नांगर टाकून तळ देऊ शकेल अशी डौलदार बदरे, व नारळीची झाडे जिकडे तिकडे असलेले सपाटाकार निकोबार, या सर्व गोष्टीनी निर्माण केलेला देखावा एकदा पाहिला की विसरला जाणार नाही या बेटाचे लष्करी व आर्थिक महत्व अतिशय आहे हिंदुस्थान सरकारनें त्याच्याकडे अवश्य लक्ष पुरवावें त्याच्या विकासासाठी जो खर्च करावा लागेल त्याची दामदुपटीने परतफेड होईल यात शका नाही येथें पाऊस जरी जास्त जोराचा असला तरी एकूण हवामान समतोल आहे योग्य योजनाबद्ध सुधारणा केल्या व दळणवळणाचे मार्ग चागले केले तर अल्प खर्चातच या बेटाचें हिंदी लोकासाठी सुदर विश्रातिस्थानात रूपातर करता येईल आपल्या नैसर्गिक वनजन्य वा इतर प्रकारच्या उत्पन्नावर फारसा ताण न पडता अदमान बेटाना सध्याच्या ५०,००० ऐवजी १,५०,००० लोक सामावून घेणे सहज शक्य होईल

अंदमानात आता फारसे आदिवासी लोक उरले नाहीत नाना धर्मांचे व

जातीचे हिंदी लोक इथें गुण्यागोविंदाने एकत्र नांदताना दिसतात हिंदी हीच त्यांच्या भाषेचें माध्यम आहे पूर्व पाकिस्तानातून आलेले हिंदी निर्वासित व देशातील इतर ठिकाणच्या लोकांनी तेथें वसाहत करावी यासाठी अंदमान स्थानिक सरकारचे हरप्रकारें प्रयत्न चालू आहेत सुरुवातीला कष्ट सोसण्याची तयारी असलेल्या धाडशी लोकांना या बेटांत नशीब काढायला पुष्कळच वाव आहे किंबहुना बंगालच्या उप-सागरामध्यें एक छोटासा हिंदुस्थान निर्माण करण्याची त्यांना उत्तम संधी आहे अंदमानहून १५० मैलांवर असलेली निकोबार बेटें मात्र तिथल्या दणकट अशा मूळ आदिवासी लोकांचा नेता बिशप जॉन रिचर्डसन, याच्या नेतृत्वाखाली झपाट्याने प्रगती करीत आहेत अंदमान बेटें हे ज्याप्रमाणे वनस्पतिशास्त्र व जंगलशास्त्र याच्या विद्यार्थ्याला नंदनवन भासेल, त्याप्रमाणे हिंदुस्थानातील लोकांहून बऱ्याच बाबतींत अगदी भिन्न असलेल्या लोकांनी गजबजलेले निकोबार बेट हे समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यालाहि अपूर्वाईचे वाटेल या बेटांतील सुप्त साधनसंपत्तीचा अर्जून पूर्णपणे तलास लावण्यात आलेला नाही या संपत्तीची पूर्णपणें माहिती मिळवणें इष्ट ठरेल अंदमानला ऐतिहासिक महत्व देखील आहे बऱ्याच राजकीय कैद्यांनी आपल्या आयुष्याचा मोठा भाग इथें हद्दपारीची सजा भोगण्यात घालविला पोर्ट ब्लेअर-मधील सेल्युलर तुरुंग हा गतकाळाची साक्ष देतो एक लहानशी मध्यवर्ती इमारत वगळून हा लवकरच नामशेष करण्यात येणार आहे दुसऱ्या महायुद्धाच्या काळात जपान्यांनी या बेटांत तीन वर्षें वास्तव्य केले त्यांच्या मुक्कामाच्या काळात तिथें प्रत्यक्ष राहिलेल्या लोकांकडून त्यांनी तेथील लोकांशी केलेल्या क्रूर वर्तनाच्या कथा अद्यापहि ऐकायला मिळतात

कोणत्याहि दृष्टीकोनातून पाहताना, मग ती आर्थिक, भौगोलिक, लष्करी, शास्त्रीय अथवा ऐतिहासिक असो, या बेटाची हिंदुस्थानला अधिक निकटची माहिती होणें आवश्यक आहे असें म्हणावे लागेल, व केंद्र सरकारनेंहि या बेटांच्यासंबंधी अधिक उदार धोरण स्वीकारले पाहिजे मी माझ्या उभ्या आयुष्यात या बेटातल्या-पेक्षा अधिक आल्हाददायक सुटी घालविली नाही असेच मी म्हणेन

## प्रकरण विसावें

# ग्रामसुधारणा

मी नऊ वर्षांचा असताना मुर्डी सोडली पण मुर्डीची व माझी कायमची फारकत होऊ दिली नाही मी दरवर्षी निदान चार पाच दिवस तरी गावी जाऊन रहात असें नातेवाइकाच्या व मित्राच्या गाठी भेटी होत आजूबाजूच्या खेड्यातून माझ्या ओळखी पाळखी खूप आहेत यामुळें आपल्या गावाच्या गरजा काय काय आहेत याची मला पूर्ण जाणीव होई त्या गरजा भागवण्याचा माझा अव्याहत प्रयत्न चालू असे या भागातील पहिली निकडीची गरज म्हणजे चागल्या दळणवळणाच्या साधनाची मुबईहून जाणारी बोट दापोली तालुक्यातल्या लोकाच्या सोईकरता हर्णै बदर घेते रत्नागिरी जिल्ह्यातून रोजगाराला मुबईला किंवा दुसऱ्या मोठ्या शहरांत जाणाऱ्या लोकाचा दळणवळणाचा तो एकच मार्ग, आणि तोही पावसाळ्यात चार महिने बद असावयाचा हर्णै बदर आमच्या मुर्डीपासून आणखी तीन मैल आम्हाला मुबईचा प्रवास म्हणजे एक मोठे दिव्यच होऊन बसले होतें माझ्या लहानपणी मुबईहून निघणारी बोट सध्याकाळी सहा वाजता हर्णै बदराला लागावयाची, व मुबईला परत जाणारी मोठ्या पहाटे तीन वाजता धक्का नसल्यामुळें बोटीवर चढणे म्हणजे एक सर्कशीतला खेळच होता आधी अपरात्री पाण्यातून चालत बारक्या होडीत चढावयाचें, मग तींतून मचव्यात, मचव्यातून दूर उभी असलेली बोट गाठायची बोट हालत असली तर वर चढणे म्हणजे जिवावरच बेतायचे येथपर्यंत मजल गाठल्यावर जागा नाही म्हणून प्रवासी कितीतरी वेळेला परत गेले आहेत बिचाऱ्यावर तोच प्रसग दुसऱ्या दिवशी पुन्हा ओढवून घ्यावा लागे १८८८ सालीं मी पहिल्यानें मुबईला जावयाला निघालों तेव्हा माझी लागोपाठ दोनदा परत पाठवणी झाली मी लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्ये असताना व आधीसुद्धा हर्णैच्या धक्क्याबाबत सरकारला वारवार सूचना करीत असे आता धक्का झाल्यामुळें लोकाची गैरसोय बरीचशी दूर झाली आहे माझ्या लहानपणी पावसाळ्यात मुबईशी व बाहेरच्या जगाशी सबध ठेवणे फारच जिकिरीचें असे १८९६ साली मी

केम्ब्रिजला जाण्यापूर्वी माझ्या घरच्या मडळींचा निरोप घ्यावयाला म्हणून निघालों. पावसाळ्याचे दिवस होते मला पोहोंचायला तब्बल चार दिवस लागले मुबई सोडली ती लहान बोटीतून, मग टांगा, बैलगाडी, घोडा व डोली, जे सांपडेल ते वाहन करून सरते शेवटी अखेरचा टप्पा पायपीट करून गाठावा लागला वाटेंत असख्य नाले ओढे त्याना पाणी आलेले एक पाऊल देखील पुढे सरकणे अशक्य, अशा परि- परिस्थितीत अगदी अनोळखी लोकांच्यावर पाहुणचार लादावा लागला तो निराळाच पावसाळ्यात पोस्टाला सुद्धा चार दिवस लागतात गेल्या वीस वर्षांत मोटार बस मुळे हा प्रवास बराचसा सोयीचा झाला आहे रस्ते मात्र फारसे चागले नाहीत बराचसा पैसा खर्च केल्याशिवाय रत्नागिरी जिल्ह्याची सुधारणा होणार नाही रत्नागिरी हा महाराष्ट्रातला एक उपेक्षित जिल्हा आहे

मुर्डी व आजर्ल्यातील अतर जेमतेम मैलभर असेल आजर्ल्याहून हर्णैला तरीतून जावे लागते आमच्या गावातून आजर्ल्याला जायला जवळची अशी पाय- वाट आहे ती खाजणातून जाते भरतीच्या वेळेला ही वाट सहाजीकच बद होते नेहमींचा रस्ता शेताच्या कडेकडेनी बाधावरून जात असे त्याला मध्येंच एक ओढा ओलाडावा लागावयाचा पावसाळ्यात या ओढ्याला पूर हा कायमचा असावयाचाच पचवीस वर्षांपूर्वीची गोष्ट मुर्डीला गेलो असताना या ओढ्याच्या कडेकडेनीं गेलेली पाऊलवाट वाहून गेलेली आढळली ती दुरुस्त करण्याबाद्दल अधिकाऱ्याना विनती केली दरम्यान गावकऱ्यानी वर्गणी जमवून स्वत:च गाडी रस्ता करण्याचें ठरविले मीही त्याला थोडा हातभार लावला दोन हजार रुपये वर्गणी जमली व डिस्ट्रिक्ट लोकलबोर्डाला रस्ता तयार करण्याबद्दल अर्ज केला रस्ता खाजगी जमिनीतून जाणार होता काहीनी जमिनी विनामूल्य दिल्या, काहीनी मामुली किंमत घेतली, पण एक गृहस्थ जमीन साफ देणार नाही म्हणून अडून बसले या गृहस्थाकडून असल्या कार्या- मध्ये अडथळा यईल ही कल्पना कोणाला शिवलीसुद्धा नव्हती ते अडाणी नव्हते चागले शिकलेसवरलेले एक सेवानिवृत्त सरकारी शिक्षणाधिकारी होते या प्रकरणाबाबत मी रत्नागिरीच्या कलेक्टराना एक पत्र लिहिले साहेबमजकुरानी जातीने मुर्डीला भेट दिली. तेव्हा या महाभागानी शेतीच्या जमिनीवर बिगरपरवानगी घर उभारलें आहे असे कलेक्टरसाहेबांना आढळून आले रस्त्याकरता जागा द्या नाही तर कायदेशीर इलाज केला जाईल असे त्या गृहस्थाला बजावल्याबरोबर रस्त्याचा प्रश्न तावडतोब सुटला पचवीस वर्षापूर्वी मी या रस्त्याचे उद्‌घाटन केले आजूबाजूच्या खेड्यातून बरेचसे लोक समारंभास आले होते आम्ही तो रस्ता लोकलबोर्डाच्या ताब्यात दिला आहे

आपल्या खेड्यांतून बाहेर जाऊन नाव व पैसा कमावल्यावर परत आपल्या गावात येऊन स्थाईक होणारे असे फारच थोडे लोक आहेत बर, जे कांही परत येतात ते गावाकरता काही करतील किंवा गावकऱ्याना चार हिताच्या गोष्टी

सागतील असे मुळीच होत नाही, ते उलट गावातल्या पक्षीय भानगडीत पडतात व गावकऱ्यांना मोठे वाईट उदाहरण घालून देतात, ही फार खेदाची गोष्ट आहे

आमच्या मुर्डीला प्राथमिक किंवा वैदिक कोठलीही शाळा नव्हती सकाळी व दुपारी दोन्हीही वेळेला मुलाना आजर्ल्याच्या शाळेंत जावें लागे त्याना दररोज चार मैलाची चाल पडावयाची ब्राह्मणाची मुले निम्मी प्राथमिक व निम्मी वैदिक शाळेंत जात असत वैदिक शाळेचा वेद शिकवण्याबद्दल फार मोठा लौकिक होता मुर्डी व आजर्ल्यांतील ब्राह्मणेतर मुले फारच क्वचित प्राथमिक शाळेंत जात माझ्या वर्गांत एकच ब्राह्मणेतर मुलगा होता वैदिक शिक्षण आता कोणीही घेत नाहीं शमर वर्षें वैदिक शाळा चालविणाऱ्या घराण्यातील मुले सुद्धा आधुनिक शिक्षण घेण्याकरता दुसऱ्या शाळातून जाऊ लागली, म्हणून आंजर्ल्याची वैदिक शाळा बद पडली माझ्या लहानपणी आजर्लें व मुर्डी मिळून निदान पन्नास तरी वेदपठन करणारे दशग्रथी ब्राह्मण असत कित्येकाना काशीक्षेत्रात देखील मोठ्या सन्मानाने वागवीत आता दोन्हीही गावात वैदिक पडित फारसे सापडणार नाहीत सध्या वैदिक ज्ञानाचा चरितार्थ चालवण्याकरता काहीं एक उपयोग होत नाही आणि वेदविद्या म्हणजे दैवी विद्या ही भावना आधुनिक शिक्षणाने पार नाहीशी होत चालली आहे सरकारने वेळीच या विद्येला मदतीचा हात दिला नाही तर आपला हा वैदिक विद्येचा अमोल ठेवा कालातराने कायमचा नाहीसा होईल सर्व दृष्टीने ही एक फारच वाईच गोष्ट होईल मी बुद्धिवादी असलों तरी मलाही त्याबद्दल फार विषाद वाटेल वैदिक ग्रथाची व सबधित वाङमयाची काळजीपूर्वक जोपासना करावी वेदपठणात पारगत असलेल्याकडून वेदाच्या ध्वनिमुद्रिका घेऊन ठेवाव्यात हें वाङमय व मुद्रिका आपल्या प्राचीन सस्कृतीचा अभ्यास करणाऱ्याना सहज उपलब्ध होईल अशा तऱ्हेने देशात निरनिराळ्या केद्रात ठेवाव्या

माझ्या लहानपणी मुर्डीला शाळा नव्हती निदान चार इयत्तापर्यंत तरी शाळा काढावी अशी माझी फारा दिवसाची मनीषा होती १९२३ सालच्या सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या कायद्याचे बिल मीच प्रथम कौन्सिल मध्ये माडले होतें तें पास झाले, पण तो कायदा ग्रामीण विभागाला अजून (१९३४ साली) शिवला देखील नव्हता आपल्या मुर्डीची फारा दिवसाची शाळेची गरज भागेल व ग्रामीण विभागात सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा लहानसा का होईना पण पहिल्या प्रयोगाची सुरुवात होईल म्हणून मी १९३२ साली इग्लडहून परत आल्यावर त्या दृष्टीनें हालचालीला सुरवात केली गावातील पुढारी मडळीशी विचारविनिमय केला त्यांच्याकडून सहकार्य मिळाले तर शाळेकरता एक सोईस्कर इमारत व वार्षिक खर्चातील थोडासा वाटा म्हणून कायमनिधी या दोन्हीची तरतूद करण्याची मी तयारी दर्शविली त्याप्रमाणे एक पत्र डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डाला लिहिले सरकारची परवानगी मिळण्याची त्यानी खटपट करावी अशी त्याना विनती केली सरकारने

नकार दिला पुढें काही वर्षांनतर लोकशाहीतील आपले मंत्रिमंडळ अधिकारावर आल्याबरोबर त्या वेळचे मुख्यमंत्री व शिक्षणमंत्री श्री बाळासाहेब खेर यांची अनुमती मिळवली गावकऱ्यांचा उत्साह मोठा दांडगा शाळेच्या सोईची दोनमजली इमारत उभी राहिली तळमजल्यात वर्ग भरविण्याकरता मोठ्या दोन खोल्या, वरच्या मजल्यावर एक ऐसपैस दिवाणखाना एवढी व्यवस्था झाली शाळेला लागून वाचनालय हें असलेंच पाहिजे या मताचा मी आहे त्यामुळे साक्षरतेचा प्रचार व जोपासना हीं दोन्हीही होतात माझे बंधू श्री के पी परांजपे यांनी वाचनालयाकरता कायम निधी म्हणून रु २००० दिले १९३८ साली शाळेची सुरवात झाली सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचे पहिले कट्टे पुरस्कर्ते श्री गोपाळ कृष्ण गोखले यांचे नाव शाळेला दिले वाचनालयाचे नामाभिधान माझे वडीलांचे स्मारक म्हणून " पुरुषोत्तम केशव परांजपे वाचनालय ' असें केले श्री बाळासाहेब खेर यांनी १९३८ साली शाळेचे औपचारिक उद्घाटन केलें या समारंभाला आजूबाजूच्या पंचक्रोशीतून जवळजवळ तीन हजार गावकरी जमले होते शाळा चारच इयत्तेपर्यंत आहे दोन शिक्षक चारीही वर्ग घेत असत पहिल्या प्रथमच कष्टाळू व कर्तबगार असे शिक्षक शाळेला लाभले शाळेत सहा ते अकरा वर्षांपर्यंतच्या मुला-मुलींनी नावे नोंदवलीच पाहिजेत अशी सक्ती होती चवथ्या इयत्तेनंतर मुलामुलींना आजर्ल्याच्या प्राथमिक शाळेंत जाणे फारसे त्रासाचे होत नाही सक्तीच्या शिक्षणाचा कायदा अमलात आणणे हें काम काही फार सोपें नाही कामाला गेल्यावर घरात लहान भावंडांना संभाळायला मुलीचा उपयोग होतो, म्हणून बहुतेक पालक आपल्या लहान मुलींना शाळेत पाठवावयाला फार नाखूष असतात पटावर ऐंशी विद्यार्थी असले तरी प्रत्यक्ष हजर अगदी थोडे असावयाचे कायद्याने सांगितलेली शिक्षा अमलात आणू नये, त्यामुळें झाला तर तोटाच होईल, शिक्षणाबद्दल आधीच अनास्था असलेल्या या पालकांच्या मनात शिक्षणाबद्दल तेढ उत्पन्न होईल, असे मला वाटतें शाळेत मुलींना आणण्या-करता उत्तेजन हा एकच उपाय आहे म्हणून मी एक नवा उपक्रम सुरू केला ऐंशी टक्के दिवस हजर रहाणाऱ्या सर्व मुलामुलींना मी एक बक्षिस ठेवले दरवर्षी मी मुर्डीला गेल्यावर ही बक्षिसे वाटतो व त्यावेळी पालकांना मुलांना शाळेत पाठविण्याचा आग्रह करतो सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा पहिला ग्रामीण प्रयोग म्हणून शाळेचे एक मुख्याध्यापक श्री दिनकर धोंडो परांजपे यांनी एक वाचनीय पुस्तिका लिहिली आहे

प्राथमिक शाळेला संलग्न असलेल्या या वाचनालयामुळे मुर्डी व आजर्ले या दोन्हीही गावांची मोठी सोय झाली आहे वर्तमानपत्रांचे दररोज सुमारें चाळीस पन्नास वाचक आहेत घरी पुस्तके नेणारे दोनशेच्यावर आहेत त्याकरता अल्पशी अनामत रक्कम ठेवावी लागते मला आलेली किंवा मी विकत घेतलेली मराठी पुस्तके दरवर्षी मी या लायब्ररीला देतो माझे मित्रही बरेच वेळेला पुस्तके पाठवितात मुख्य अध्या-

पकानी एक बालवाचनालय सुरू केले आहे पुस्तके किंवा मासिके वर्गणीदार मुलाना घरी नेता येतात शाळा सुरू होण्याच्या आधी केव्हा केव्हा दोन तास सुद्धा मुले वाचण्याकरता शाळेत येतात हे ऐकून मला फारच आश्चर्य व कौतुक वाटले

मुले घाणेरडे व फाटके कपडे घालून शाळेंत येतात याला आपण काही उपाय करू शकाल काय असे काही वर्षांपूर्वी मला हेडमास्तराचें पत्र आलें शाळेंत जाणाऱ्या मुला-मुलीकरता साधा गणवेश असावा केवळ कपड्यामुळें दिसून येणाऱ्या गरीबी व श्रीमतीच्या भेदभावाचा परिणाम लहान मुलाच्या कोवळ्या मनावर होतो याची मला खात्री आहे म्हणून मुलामुलीना साधा गणवेश पुरविण्याची जबाबदारी मी उचलली मुलाचा गणवेश म्हणजे लाडी विजार, एक शर्ट व एक टोपी, मुलीचा म्हणजे परकर व पोलकी असा असावा अशी मी सूचना केली आठवड्यातून दोनदा आणि विशेष प्रसगाकरता हा गणवेश वापरीत असत नुकतेच म्हणजे १९६० सालीं त्याना हा गणवेश रोज घालता यावा याची मी व्यवस्था केली आहे या तपशीलवार लिहिलेल्या सर्व गोष्टी अगदी क्षुल्लक आहेत हें मी कबूल करतों, पण हे वाचून असल्या मामुली गोष्टी आपल्या खेडेगावाकरता करण्याची दुसऱ्याना स्फूर्ती व्हावी हीच माझी इच्छा

शाळाकरता फिरत्या वाचनालयाचा मी एक लहानसा प्रयोग केला मराठी चवथ्या व पाचव्या इयत्तेतल्या मुलाना वाचण्याला योग्य अशा पुस्तकाची यादी शिक्षणतज्ञाना विनती करून करून घेतली शभर पुस्तकाचा एक गट असे सहा गट केले दापोली तालुक्यातील सहा खेडेगावातील शाळातून ही फिरती वाचनालये क्रमाक्रमाने फिरवली या प्रयोगाचा दोन वर्षांचा खर्च मी केला त्यानतर ही वाचनालये लोकल बोर्डाला ताब्यात घेण्याची विनती केली एकूण सातशे रुपये खर्च झाला पुस्तके वाचण्याची गोडी मुलाना लागावी म्हणून केलेला हा प्रयोग थोडाफार यशस्वी झाला असे मला वाटतें बडोद्याचे सयाजीराव गायकवाड महाराज यानी हा उपक्रम सुरू केला होता हे मी ऐकले होते आपल्याकडे तो प्रयोग करून पहावा असें मला वाटले

खेड्यांतील माणसे कोठलीही नवीन सुधारणा उचलावयाला अगदी तत्पर असतात मात्र त्या सुधारणाची माहिती नीटपणें व जबाबदारीने त्याच्यापुढे माडली पाहिजे येवढेच खेड्यातील आयुष्य ज्यास्त सुखकर व आनदी करणें हें आपले कर्तव्य आहे अशी भावना सर्वांनी बाळगावी भारतात बहुसख्य लोक खेड्यात रहातात-लवकरच सर्वांगीण ग्रामसुधारणा झाली नाही तर खेड्यातील लोक सहाजिकच शहराकडे धाव घेतील हा लोढा थाबवण्याकरता दळणवळणात सुधारणा, जीवनोपयोगी वस्तूचा सतत पुरवठा, लहान उद्योगधदे काढण्याकरतां सक्रिय उत्तेजन, हे काहीं थोडे उपाय आहेत

प्रकरण एकविसावें

# खाजगी

१८९२ साली मी सोळा वर्षांचा असताना माझें लग्न झाले हें मी मागें लिहिलेच आहे तेव्हा मी फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्रीव्हियसच्या वर्गांत होतो अण्णाच्या घरी रहात असें अण्णाचे एक मित्र श्री एन बी जोशी यांची थोरली बहीण विधवा होती तिला एक बारा वर्षांची मुलगी होती बाई अंथरुणावर खिळलेल्या, दिवस मोजीत होत्या आपली मुलगी चागल्या घरीं पडलेली डोळ्यानी पहावी ही त्याची इच्छा असणे अगदी साहजिकच होतें अण्णानी आमचें लग्न ठरविण्यात पुढाकार घेतला, अर्थात त्यानी माझ्या आईवडलांची आगाऊ समती घेतलीच होती १८९२ च्या मे महिन्यात माझे मुरुडीला लग्न झालें पुढील शिक्षणाकरता बायकोचें नाव हुजूरपागेच्या शाळेमध्ये दाखल केले

मी इग्लडला जाण्याच्या आधी म्हणजे १८९६ साली ती मुबईला आपल्या चुलत्याच्या घरी लाब मुदतीच्या विषमज्वराने आजारी पडली त्यातून बरी झाली, व पुढे ती मुरुडीला कायमचीच माझ्या आईवडलांच्या कडे रहावयास गेली १९०० सालच्या पावसाळ्याच्या सुरवातीला ती धनुर्वात होऊन वारली माझ्या केंब्रिजच्या यशाची बातमी तिला आधी समजली होती, मी मात्र तिला पुन भेटू शकलो नाही ती मला न चुकता पत्र लिहीत असे माझ्या वडलानी मला लिहिलेल्या पत्रावर इग्रजी पत्ता तीच लिहावयाची आमच्या घरात इग्रजी पत्ता लिहिता येणारी अशी ती एकटीच होती

पहिल्या पत्नीच्या निधनानतर जवळ जवळ दीड वर्षांनी मी हिंदुस्थानात परत आलो १९०५ च्या मार्चच्या २५ तारखेला माझे सई (सीताबाई) जोशी इच्याशी लग्न झाले ती फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्रीव्हियसच्या वर्गांत (पहिल्या वर्षांत) शिकत होती वयाने अठरा वर्षांची होती तिच्या मातुश्री श्री यमुनाबाई जोशी या मुलगी तीन वर्षांची असतांनाच विधवा झाल्या त्यांचे दीर श्री गोपाळ विनायक जोशी हे डॉक्टरीच्या अभ्यासाकरतां अमेरिकेस जाणाऱ्या पहिल्या हिंदी विदुषी

श्री आनंदीबाई जोशी याचे पति आनंदीबाई पुढें अल्पायुषी ठरल्या श्री जोशी फार त हेवाईक होते एका काळी गाजलेल्या चहा ग्रामण्य प्रकरणाचे मूळ नायक हेच ते गोपाळराव जोशी साहेबाबरोबर चहापान केलेल्याच्या नावाना यानीच वर्तमान-पत्रातून प्रसिद्धी दिली होती गोपाळरावांनी आपल्या विधवा भावजयीला शिक्षणा-करिता हुजूरपागेंत ठेवलें होतें पुढे लेडी नार्थकोट योजनेनुसार नर्सिंगचा कोर्स पुऱ्या करणाऱ्या पहिल्या दोन हिंदी विद्यार्थिनीपैकी या एक होत्या त्यानी नर्स म्हणून बरीच वर्षे पुण्यात व्यवसाय केला सई या त्याच्या एकुलत्या एक मुलीचें शिक्षण हुजूरपागेतच झाले १९०४ सालीं ती मॅट्रिकच्या परिक्षेंत चागले गुण व यमुनाबाई दळवी शिष्यवृत्ती मिळवून उत्तम तऱ्हेने यशस्वी झाली तिने फर्ग्युसन कॉलेजमध्यें नाव दाखल केले होतें पण पुढे तीन महिन्यातच काही मित्रमडळीच्या मध्यस्थीने तिचे व माझे लग्न झाले तिच्या शिक्षणक्रमांत खड पडला आमची मुलगी शकुतला हिचा जन्म १७ जानेवारी १९०६ रोजी झाला तिच्या पाठीवर लगेच पधरा महिन्यानी एक मुलगा झाला तो वर्षाचा होण्याच्या आधीच वारला याचा परिणाम माझ्या बायकोच्या प्रकृतीवर झाला दोन तीन वर्षे जाऊ दिल्यावर तिने फर्ग्युसनमध्ये पुन नाव घातलें प्रीव्हियस कॉलेज व इटरची परीक्षा पास झाली त्यानतर तिची प्रकृती जी ढासळली ती कायमचीच तिला काय झालें होते याचें पक्के निदान शेवटपर्यंत होऊ शकले नाही कांहीं विचित्रच रोग झाला असावा असे मला वाटतें तिला चार पाच महिने उत्साह फार दाडगा असावयाचा थकवा म्हणून माहीत नसायचा कोठल्याही गोष्टीचा कटाळा नाही कोठेही जावयाची तिची अगदी जय्यत तयारी असावयाची, आणि मग एकदम ट्रान्सफर सीन झाल्यासारखे व्हावयाचें अगदी मलूल व्हावयाची, उत्साह कोठे पळून जावयाचा कोण जाणे ? ही मनाची स्थिती निदान चार पाच महिने तरी टिकावयाची काही विशिष्ट ग्रंथीचा स्राव थाबल्याचा हा परिणाम आहे असे काहीं तज्ञाचे मत पडले काय असेल ते असो पण शेवटपर्यंत तिच्या आजाराला उपाय म्हणून सापडला नाही

मी इडिया कौन्सिलवर सभासद म्हणून इग्लडला गेलो तेव्हा ती माझ्याबरोबरच होती आजारीपण चालूच होतें कदाचित् हा क्षयसुद्धा असेल अशी तेथील डॉक्टरानीं शका प्रदर्शित केली व तिला स्वित्झर्लंडमधील सॅनिटोरियमात काही दिवस रहाण्याचा सल्ला दिला दोन तीन वर्षे हे असेच चालले होते १९३१ सालच्या ऑक्टोबर मध्यें एका मैत्रिणीला भेटावयाला म्हणून ती मँचेस्टरला गेली होती तेथे इन्फ्ल्यु-एझानें आजारी पडली तापातून कुठें नुकतीच उठाबसावयाला लागली होती, तों स्कॉटलडमध्यें जाण्याचें तिच्या मनानें घेतलें स्कॉटलडला ती पूर्वी कधी गेली नव्हती डिसेबर महिन्यातच तेथें थडीचा कहर असतो, तू नुकतीच कोठे आजारातून उठली आहेस वगैरे कारणे सागून तिचा बेत बदलावा म्हणून मी पराकाष्ठा केली, पण तिनें आपला हट्ट म्हणून सोडला नाहीं उत्साही मनस्थितीत होती ती एडिंबरोला एकटीच

गेली तेथें पोचल्याबरोबर विश्राती वगैरे काही एक न घेता एडिंबरो पहावयास बाहेर पडली खूप श्रम झाले मग व्हायचे तेच झाले पुन्हा आजारी पडली मला लडन येथे कळल्याबरोबर मी एडिंबरोला गेलो अखेरचे दोन दिवस मी नर्सिगहोम-मध्यें तिच्याजवळ बसूनच होतों २५ डिसेंबर १९३१ रोजी चार दिवसाच्या आजारानतर तिला देवाज्ञा झाली एक आठवड्यानीच आम्ही हिंदुस्थानात परत जावयाला निघणार होतों

माझी एकुलती एक कन्या शकुतला १९२६ साली मुबई विश्वविद्यालयाची बी.एस्सी ची परिक्षा पहिल्या वर्गात पास झाली पुढील अभ्यासक्रम विलायतेत पुरा करण्यासाठी तिला हिंदुस्थान सरकारकडून शिष्यवृत्तीही मिळाली १९२९ साली ती केंब्रिजमधील गणिताच्या ट्रायपॉस मध्ये पास झाली त्यानतर तिने जिनीव्हाला इटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशनमध्यें काही वर्षे नोकरी केली तेथे असताना श्री यूरा स्लेप्टझॉफ या श्वेतरशियन गृहस्थाशी तिने विवाह केला श्री स्लेप्टझॉफ याचे कुटुब १९१७ च्या रशियन राज्यक्रातीच्या वेळेला स्विटझर्लंडमध्ये निर्वासित म्हणून आले व तेथेंच स्थाइक झाले होतें १९ मार्च १९३६ साली तिला मुलगी झाली तिचे नाव तिने आपल्या आईचे " सई " असे ठेवले १९३७ सालीं शकूचा व स्विटझर्लण्डच्या कायद्याप्रमाणे स्लेप्टझॉफचा घटस्फोट झाला, व ती हिंदुस्थानात मुलगी घेऊन परत आली तेव्हापासून शकू व सई दोघीही माझ्यापाशीच रहात आहेत

शकू सततिनियमनाच्या आचारविचाराच्या प्रचाराचें काम आज कैक वर्षे मोठ्या हिरीरीने करीत आहे या कामाचे तिचे स्फूर्तिस्थान म्हणजे सततिनियमनाचे भारतातले आद्यप्रवर्तक कै श्री रा धों कर्वे (ती अण्णाचें थोरले चिरजीव) हे होत शहरातून काय पण खेड्यापाड्यातून देखील या तिच्या प्रचारकार्याचा चागला परिणाम दिसावयाला लागला आहे १९५८ साली राज्य सरकारनें तिची विधान सभेवर नेमणूक केली तिनें थोडीशी वाङमयसेवाही केलेली आहे तिची मराठी नाटके, एक कादबरी व कांही लेख प्रसिद्ध झाले आहेत ऑस्ट्रेलियातील आमच्या तीन वर्षातील वास्तव्याचे अनुभव म्हणून Three years in Australia हा तिचा इग्रजीतील ग्रथ प्रसिद्ध आहे

माझी नात सई १९५६ साली ग्रॅज्युएट झाली ती सध्या (१९६०) आकाश-वाणी पुणे येथे काम करीत आहे तिची मराठी व इग्रजी लेखनशैली फारच मोहक आहे दोन्हीही भाषेंत तिनें लहान मुलाच्याकरता पुस्तके लिहिलीं आहेत ती हौशी नट आहे नाट्यशास्त्राचा तिचा अभ्यास चागला आहे ती नाट्य दिग्दर्शकही आहे लहान मुलाच्या बऱ्याचशा नाटकाचे तिने दिग्दर्शन केले आहे

माझ्या आईवडलाचा वशविस्तार फार मोठा झाला आहे माझे अगदी जवळचे असे नातेवाईक शभरच्यावर तरी असतील माझ्या आजोळच्या मडळीचा आणि माझा फारसा सबध आला नाही वडलाच्या नात्यातले म्हणजे फक्त कर्वे मडळीशीच

निकट संबंध आला मला आठवतें तेव्हापासूनच माझे सर्व चुलते मुरडी पासून बरेच लांब रहात असत त्यामुळे त्यांच्या कुटुंबाशी माझा निकट संबंध आला नाही माझे सख्खे पुतणे, पुतण्या, भाचे, भाच्या मिळून जवळ जवळ चाळीसच्यावर आहेत त्या सर्वांशी माझे मोठे प्रेमाचे व आपुलकीचे संबंध आहेत

माझे सर्व शिक्षण अण्णांनी केले माझ्या बऱ्याच नातेवाइकांना व इतरांना मीही शिक्षणाकरता मदत केली आहे काही वेळेला निराशा पदरात घ्यावी लागली त्याला इलाज नाही माझ्या दोन्हीही धाकट्या भावांचें म्हणजे हरी व कृष्णाचें शिक्षण मी केले त्या दोघांचीही मुले चांगल्या स्थितीत आहेत व मुलीही चांगल्या घरी पडल्या आहेत दुसऱ्या एका व्यक्तीच्या शिक्षणाला मी थोडासा हातभार लावला तिचा येथे नामनिर्देश करावयाला फारशी हरकत नाही असें मला वाटते त्या व्यक्ती म्हणजे सुप्रसिद्ध डॉ इरावती कर्वे ह्या होत तिचे वडील कै जी एच करमरकर यांनी आपल्या आयुष्याची बरीच वर्षे ब्रह्मदेशात घालविली म्हणून त्यांनी आपल्या मुलीचे नाव इरावती ठेवलें इरावतीनें वाङ्मयाच्या व शास्त्रीय जगतात समाजशास्त्रज्ञ व मानववंशशास्त्रज्ञ म्हणून मोठे मानाचे स्थान मिळविले आहे तिने ती अण्णा कर्वे यांचे चिरंजीव डॉ दिनकरराव कर्वे यांच्याशी लग्न केले ती सध्या डेक्कन कॉलेज इन्स्टिटयूट ऑफ रिसर्च मध्ये प्राध्यापक आहे

माझ्या वडलांची इस्टेट म्हणजे एक माडाचा व पोफळीचा बाग आणि एक भातशेत एका कुटुंबाचा स्वत खपून जेमतेम चरितार्थ चालण्याइतकीच ती होती माझा थोरला भाऊ विश्वनाथ यानें वैदिक शिक्षण घ्यावयाला सुरवात केली पण तें तो पुरे करू शकला नाही शेतावर काम करून भिक्षुकी करी बुद्धीने फार तल्लख, पण त्याचा उपयोग झाला नाही त्याच्या बुद्धीला मुळीच वाव मिळाला नाही त्याचे हस्ताक्षर अगदी मोत्याच्या दाण्यासारखे असे त्याच्या हस्ताक्षरातील ऋग्वेदाच्या पोथ्यांना त्या वेळी सुमारें पंचाहत्तर रुपये किंमत येई पाऊणशें वर्षांपूर्वी जुने ब्राह्मण छापील पोथ्यापेक्षा हस्तलिखितच पसंत करीत माझा दुसरा भाऊ विनायक आजर्ल्याच्या प्राथमिक शाळेत जात असे पण त्याचें शिक्षण तेथेच थांबले तो घरीच रहात असे मी तिसरा म्हणजे मधला भाऊ. माझ्या लहानपणीच माझ्या शिक्षणाची सर्व जबाबदारी अण्णांनी उचलली वयाच्या दहाव्या वर्षापासून मी फार क्वचितच आमच्या घरी असा राहिलों पदवीपरीक्षा पास झाल्याबरोबर मी थोडे पैसे मिळवायला लागलो लगेच माझे दोघे धाकटे भाऊ हरी व कृष्णा या दोघांना शिक्षणाकरिता पुण्याला घेऊन आलो त्यांचें सर्व शिक्षण मी पुरे केले हरीने वनस्पतिशास्त्राची पदवी घेतल्यानंतर शेतकी खात्यांत नोकरी केली व डिस्ट्रिक्ट हॉर्टिकल्चल ऑफिसर असताना अठ्ठावीस वर्षांपूर्वी सेवानिवृत्त झाला कृष्णा इंजिनियर झाला इंजिनिअर व नगरपालिकेचा मुख्य अधिकारी म्हणून बऱ्याच ठिकाणी त्याने नोकऱ्या केल्या तो सुद्धा आता सेवानिवृत्त झाला आहे महाराष्ट्र गर्ल्स एज्युकेशन

सोसायटीचा कार्यवाह म्हणून सतत बारा वर्षे त्याने या संस्थेची इमाने इतबारे सेवा केली

माझा थोरला भाऊ विश्वनाथ हा पचावन्न वर्षांपूर्वीच आपला हिस्सा घेऊन वेगळा झाला हरी, कृष्णा व मी दूर पुण्याला स्थाइक झालेलो एकटा विनायकच आमच्या आईवडलांच्या जवळ रहात असे कृष्णा व मी या दोघानी वडलोपार्जित इस्टेटीतील आमचा हिस्सा विनायक व त्याचा मुलगा नीळकठ याच्या नावाने करून दिला हरीनेही आपला हिस्सा त्यांना अगदी थोड्या मोबदला घेऊन दिला निदान एक पिढी तरी जमिनीचे तुकडे न पाडता ही इस्टेट रहावी हा त्यामागील हेतू होता

माझी सर्वांत थोरली बहिण मथुरा गोरे हिला १८९६ साली विहिरीत पडून अपघाती मृत्यू आला तिचे यजमान जाऊन नुकतेंच कोठे चार पाच महिने झाले होते पोरकी झालेली त्याची तीन्ही मुले आमच्या येथे म्हणजे आपल्या आजोळीच वाढली माझी दुसरी बहीण अहिल्या जोशी तिने आत्महत्त्या केली पाठिमागें दोन मुलें ठेऊन गेली सासरच्या जाचाला कटाळून तिने जीव दिला असे म्हणत असत माझ्या दोन धाकट्या बहिणी, धोंडी (काळे) व विठी (कर्वे) हयात आहेत त्या आपल्या कर्त्या मुलाच्या जवळ असतात, धोंडी आंजर्ल्याला व विठी सगमनेरला किंवा मुबईला रहाते विश्वनाथ ऐशीव्या व विनायक चौऱ्याहत्तर वर्षी वारला हरीला आतां (१९६०) एक्याऐंशी, कृष्णाला शहात्तर, धोंडीला चवऱ्याहत्तर, व विठीला बहात्तरावे वर्ष चालू आहे आमच्या कुटुबाची घडधाकट प्रकृतीची व दीर्घायुष्याची परपरा आम्ही चालू ठेवली आहे असे म्हणावयास हरकत नाही

माझी नात सई हिने नॅशनल इन्स्टिटच्यूट ऑफ ड्रामामध्यें दोन वर्षांचा अभ्यासक्रम १९६१–६३ पर्यंत पुरा केला ती आता फिल्म इन्स्टिटच्यूट ऑफ इडिया पुणे या सस्थेत प्राध्यापक आहे तिचा विवाह १९ एप्रिल १९६१ रोजी श्री अरुण जोगळेकर याजबरोबर झाला तिला आता १० महिन्याची मुलगी असून तिचें नाव अश्विनी असे ठेविले आहे श्री अरुण जोगळेकर हा सध्या नॅशनल इन्स्टिटच्यूट ऑफ ड्रामामध्ये शिकत आहे सध्या माझा बराचसा वेळ अश्विनीबरोबर खेळण्यांत जातो

गेल्या ५ वर्षांमधील माझ्या आयुष्यातील विशेष घटना म्हणजे अण्णासाहेब कर्वे याचे ९ नोव्हेंबर १९६२ रोजी झालेले निधन त्याच्या निधनाने माझ्या आयुष्यातील एक मोठा दुवा निखळला चिकाटीने कार्य केले म्हणजे लोकापवाद हळूहळू नाहीसा होऊन लोक खऱ्या कामाचे कौतुक करतात याचे उत्तम उदाहरण म्हणजे अण्णा कर्वे याचे जीवन आता मला दुसरे कोणी वडील माणूस शिल्लक नाही

माझी मुलगी शकुतला हिला गेल्या वर्षी राज्यसभेची सभासद म्हणून नेमण्यात आले कुटुबनियोजनाचे तिने हाती घेतलेलें काम जोराने चालू आहे तिला काहीं राज्यामध्ये या कामाचा प्रचार करण्याचें काम देण्यात आलें आहे

माझ्या वृद्ध मित्रमडळीपैकी सात मडळी आहेत त्यापैकीं मी, घारपुरे, भागवत

एवढेच तिथे आला शिल्लक आह्मी साठे, बाबा रानडे, बापूसाहेब जोग व अण्णा हे गेले

माझा आतापर्यंत पुण्यातील अनेक संस्थाशी संबध होता 'सार्वजनिक कामातील सन्यास' असा एक लेख मी मागेंच लिहिला होता साधारणत मनुष्यानें ७० वर्षांनतर असा सन्यास घ्यावा असें मी त्या लेखात म्हटलें होतें आज मला ९० वें वर्ष लागत असून या मर्यादेच्या पलीकडे १९ वर्षे हा सन्यास घेण्याचे मी टाळले पण आज पासून सर्व सार्वजनिक संस्थाच्या कार्यकारी समितीचा राजीनामा देण्याचे मी ठरविलें आहे

माझ्या मानसिक शक्ति वयोमानानुसार अजूनहि चांगल्या आहेत त्या तशा किती दिवस रहातील कोण जाणे ! जगामध्यें काय चाललें आहे हें जाणून घेण्याची इच्छा पूर्वीप्रमाणेंच आजहि बलवत्तर आहे आणि त्यामुळें वृद्ध मंडळी म्हातार-पणामध्यें आपला वेळ कसा जाईल याची जी चिंता करीत असतात ती चिंता मला नाही वर्तमानपत्रें वाचणें व वाचवून घेणे, ग्रंथ अथवा मासिकें वाचणें, लहानमुलांना शिकविणे व सध्याकाळीं ब्रिज खेळणें यामुळें माझा दिवस सुखांत जातो सकाळचें हिंडणें मात्र गेल्या वर्षी मूत्रविकार झाल्यापासून कमी झालें आहे अर्ध्या मैलापेक्षा आतां अधिक चालणें होत नाहीं

## प्रकरण बाविसावें

# प्रकाशनें

फर्ग्युसन कॉलेजात मी गणित शिकवीत असें तेव्हा मला शाळाकॉलेजाच्या उपयोगासाठी पाठ्यपुस्तकें लिहिण्याचा सल्ला वेळोवेळी देण्यात येई त्यायोगे जादा मिळकतीची तरतूद होईल असें हितचिंतक मंडळीचें म्हणणें असे पाठ्यपुस्तकें लिहिण्याची कल्पना मला मात्र कधीच रुचली नाही या कामी स्वत चें असे काही लिहिण्यास वाव नसतोच असे म्हटलें तरी चालेल या क्षेत्रांतल्या इतर लेखकानी आधीच लिहून ठेवलेल्या मजकुराची जरा वेगळ्या पद्धतीने जुळवणी करणें अथवा सरळसरळ उचल करणें एवढाच काय तो मार्ग होतकरू लेखाकसमोर असतो माझ्या शिकविण्याच्या ओघात वर्गाकरिता नेमलेल्या पुस्तकामध्ये दिलेल्या विविध विषयासबधींच्या नवीन नवीन कल्पना मी सुबोध करून सागत असें गणितासारख्या रुक्ष व अप्रिय विषयामध्ये गोडी उत्पन्न करण्याच्या दृष्टीने मी त्याच्या ऐतिहासिक प्रगतीबद्दलहि विद्यार्थ्यांना माहिती सागत असें आधीच सांगितल्याप्रमाणे गणितामधील प्रगत विषयावर लिहिण्यास मला माझ्या इतर कार्यामुळें सवडच मिळाली नाही

१९१५ मध्यें, गोखल्याच्या निधनानतर त्याच्या जीवनकार्यविषयक एक बराच मोठा लेख मी फर्ग्युसन कॉलेजच्या नियतकालिकांत लिहिला होता हाच लेख पुढे ज्ञानप्रकाश छापखान्याने स्वतत्र पुस्तिकारूपाने प्रकाशित केला या छोटेखानी पुस्तकाच्या बऱ्याच आवृत्त्या निघाल्या माझ्या माहितीप्रमाणे, गोखल्याबद्दल आस्था असलेले लोक अजूनहि त्याचा सदर्भासाठीं उपयोग करतात १९१५ च्या अखेरीस अण्णा कर्व्यांनी मराठीतून आत्मवृत्त प्रसिद्ध केलें या आत्मवृत्ताला मी लहानशी प्रस्तावना लिहिली होती त्याच वर्षी अण्णा मुबईमध्यें भरणाऱ्या हिंदी सामाजिक परिषदेचे अध्यक्ष होणार असल्याकारणाने त्याचें लहानसें चरित्र इग्रजीतून छापल्यास उपयुक्त होईल असे सर्वांचे मत पडले त्याप्रमाणे त्याच्याच आत्मवृत्तावर आधारून मी त्याचे एक सक्षिप्त चरित्र इग्रजींतून लिहून काढलें हे चरित्र काही वर्षें देशाच्यामराठी भाषेतर प्रांतातून वाचले जात असे आज ४५ वर्षांनतर ते सपूर्ण-

पणे जुने झाले आहे अण्णानीं स्वत लिहिलेल्या आत्मवृत्ताच्या ताज्या सुधारून वाढविलेल्या अशा बऱ्याच आवृत्याहि निघाल्या आहेत शेवटची आवृत्ती १९५८ साली त्याच्या शताब्दीच्या प्रसगी प्रसिद्ध झाली

इडिया कौन्सिलचा सभासद म्हणून मी इग्लडला गेलो असतां बुद्धिवादी प्रकाशन समितीला (रॅशनॅलिस्ट प्रेस असोसिएशन) आपल्या कार्याचा विस्तार वाढवून ख्रिस्ती धर्माबरोबरच हिदुधर्म व इतर धर्मांवर तत्वनिष्ठ (बुद्धिवादी) व वस्तुनिष्ठ दृष्टीकोनातून लिहलेली पुस्तके छापण्याची मी सूचना केली या प्रकाशन समितीचा मी कैक वर्षापासून सभासद आहे माझ्या कल्पनेचे या समितीने स्वागत केले, आणि मलाच एक प्रास्ताविक पुस्तक लिहण्यास सागितले अशा प्रकारे The crux of the Indian Problem (हिंदी समस्येची किल्ली) या माझ्या पुस्तकाचा उगम झाला हे पुस्तक १९३१ साली या समितीने प्रकाशित केले

लखनौ विद्यापीठाचा मी उपकुलगुरु होतो तेव्हा कलकत्ता विद्यापीठाचे उप-कुलगुरु डॉ बी सी रॉय यानी मला कमला व्याख्यानमालेत एक मालिका गुफण्यास सागितलें सर अशुतोष मुखर्जी यानी आपल्या मुलीच्या स्मरणार्थ ही व्याख्यानमाला सुरू केली होती कांहीशा नाखुषीच्या या बेतास मान्यता देऊन Rationalism in practice "प्रत्यक्षात बुद्धिवाद" या विषयावर मी चार व्याख्याने दिली ही व्याख्याने पुढें कलकत्ता विद्यापीठानें पुस्तकरूपाने छापली मला वाटते, त्याचे काही हिंदी भाषातूनहि भाषातर झाले आहे

बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यानी भारतीय समाजसुधारणा" या विषयावर मला तीन व्याख्याने द्यायला सागितली होती ही भाषणे पुढे एका पुस्तिकेच्या रूपाने बडोदा सरकारनेच प्रसिद्ध केली

१९३९ मध्ये फर्ग्युसनमधले लेक्चरर भा म गोरे यानी माझ्या वेगवेगळ्या अवातर लिखाणातलें व भाषणातले निवडक साहित्य प्रसिद्ध करण्याची इच्छा प्रदर्शित केली त्याना मी आवश्यक साहित्य पुरवले आणि १९३९ मध्यें मुबईच्या कर्नाटक प्रकाशन सस्थेने पुस्तक छापून प्रसिद्ध केले हे पुस्तक आर्थिकदृष्ट्या मात्र फारसे लाभदायक ठरलें नाही

हे आत्मवृत्त लिहिण्याचे काम मी अगावर घेण्याआधी पुस्तकरूपाने प्रसिद्ध झालेले माझे एवढेच लिखाण मी लिहलेल्या इतर अवातर लिखाणाधले काही साहित्य पुस्तक म्हणून कायम स्वरूपात प्रकाशित करण्याच्या योग्यतेचें आहे असे मला वाटतें या लिखाणातून बऱ्याचशा सामाजिक प्रश्नावरचा बुद्धिवादी पण बरेच वेळा अप्रिय असा दृष्टीकोन प्रथित झाला आहे पण हे काम अगिकारण्यास मजजवळ पुरेसे साधन नाही, आणि खरें म्हणजे उत्साहहि नाही

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ...३८७८३... वि: ...आरे म...
क्रमांक ...२२२८... नों दि: ...२१५/५४...

प्रकरण तेविसावे

# काळ आला होता

मला वाटते की प्रत्येक जण हा आता मरण ओढवेल असें वाटायला लावणाऱ्या अपघातातून अथवा न कल्पिलेल्या प्रसंगांतून गेलेला असतो असे प्रसंग आठवले कीं स्वतःच्या बलवत्तर नशिबाला दुवा दिल्याशिवाय राहवत नाही माझ्यावर गुजरलेला असा पहिलाच प्रसंग मला आठवत नाहीं कारण तो माझ्या जन्माच्याच वेळचा आहे जवळ जवळ मृत अशा अवस्थेंत मी या जगांत पदार्पण केले असे माझी आई सांगत असे

मात्र आज सत्तर वर्षांनंतरहि माझ्या पक्का ध्यानात राहिलेला प्रसंग दापोली जवळ जाल गावाला मी एस् पी जी मिशन हायस्कुलात शिकत असताना घडला मी पोहायला शिकत होतों कोंकणामध्यें बुडू नये म्हणून नवशिक्याच्या कमरेला दोन-तीन असोले सुकलेले नारळ अथवा सुरवडी दोरीने बांधतात देशात इतरत्र बांधण्यात येणारे पोकळ भोपळे वा रबराचे फुगे यांच्या जागी या नारळाचा उपयोग होतो पावसाळ्यात तळी तुडुंब भरली म्हणजेच पोहावयास उतरतात मी शिकत होतों तें तळें, माझ्याच पूर्वजांनी २०० वर्षांपूर्वी बांधलेल्या रामाच्या देवळाच्या जवळ होतें मी कमरेला सुरवडी बांधल्या व काही अंतर धावत येऊन तळ्यामध्यें उडी ठोकली दुर्दैवाने सुरवडीची गाठ सुटली आणि मी नारळाशिवाय खोल पाण्यांत पडलों माझ्या नाकातोंडात पाणी जाऊन मी बुडण्याच्याच पथाला लागलो होतों तळ्यातली इतर मुले माझ्याप्रमाणेच नवशिकीं होती नुकताच तरंगायला शिकलेला एक मुलगा माझ्या मदतीला आला पण तो काहीच करू शकला नाही, मी त्याला मिठी मारली असती तर माझ्याबरोबर तोहि बुडाला असता मी कायमचा पाण्याखाली जाणार, तोंच दापोली हायस्कूलचे एक शिक्षक, गणेश श्रीधर कोल्हटकर, यांचे माझ्या केविलवाण्या धडपडीकडे लक्ष गेले आणि त्यांनी तत्काळ तळ्यात उडी घेऊन मला सुखरूप वर आणले कोल्हटकर हे स्वतः उत्कृष्ट तालिमबाज व पट्टीचे पोहणारे होते

मला आठवत असलेला अशा प्रकारचा दुसरा अपघात २५ ऑक्टोबर १९२५ रोजी बंगलोरला घडला करावाबतच्या चौकशी समितीबरोबर मी काही महिने बंगलोरला राहिलो होतों मध्यान्हाच्या सुमारास, माझ्या बंगल्याच्या व्हरांड्यामध्ये आरामखुर्ची टाकून मी वर्तमानपत्र वाचीत बसलो होतों मध्येच सहज वर पाहता, समोरच्या एका खुर्चीनजीकच अवघ्या चारपाच फुटाच्या अंतरावर एक मोठा साप वेटोळे करून फणा काढलेला माझ्या दृष्टीस पडला कुपणालगतच्या माजलेल्या झाडाझुडपातून निघून व्हरांड्याला असलेल्या चारपांच पायऱ्या चढून तो वर आला असला पाहिजे प्रतिकार करण्यासाठी मजजवळ काठीसुद्धा नव्हती नोकराला हाका मारीत मी धावत घरात पळालो नोकर आला तेव्हा सर्पराज पायऱ्या सरपटत उतरून अंगणाच्या रोखाने जात होते माझ्याबरोबर तेव्हा रहात असलेल्या एका पुतण्याबरोबर नोकर त्या सापाच्या मागोमाग गेला तेव्हा तो खरा नाग असल्याचे त्याना आढळून आले पुरेशा हत्याराशिवाय त्या नागावर हल्ला करण्याची नोकराला भीति वाटली नागाचे शेपूट थोडेसे तुटलेले होतें संबध देशांत जेथे सर्पदंशामुळें होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण अधिक आहे, त्या रत्नागिरी जिल्ह्यात माझा जन्म झाला असल्याकारणाने, सापासबधी कैक आख्यायिका मी ऐकलेल्या होत्या नागाला जर कोणी इजा केली तर त्याचा डख अनेक वर्षे मनात धरून तो इजा करणाऱ्यास दंश करतो, असा समज आहे त्यामुळे त्या नागाला शोधून काढून त्यास ठार करणे मला आवश्यक वाटले व मी तिथल्या स्थानिक नोकराला गारुडी आणायला पाठविले एक गारुडी उगवला, पण त्याने सोबत पुंगी आणलेली नव्हती तेव्हा दुसऱ्या दिवशी पुंगी घेऊन पुन्हा येण्याचें त्याने कबूल केले दुसऱ्या दिवशी तो एका साथीदाराला घेऊन आला दोघेजण पुंगी वाजवीत काही वेळ आवारात हिडत होते वीस एक मिनिटात शेपूट तुटके नागोबा गारुड्याला हाती सापडले गारुड्यानें नागाचे दात काढले आणि त्याला आपल्याबरोबर नेले त्याने एका फुरशालाहि पुंगीच्या सहाय्याने बाहेर काढून मारले त्याच्या या प्रयोगात कुठेंहि फसवेगिरीचा अंश नव्हता तोपर्यंत मी गारुड्याच्या करामतीबद्दल साशक होतों पण या अनुभवामुळें मला माझे मत बदलावयास लागले

उल्लेख करण्याजोगता तिसरा प्रसंग १९५१ च्या एप्रिल महिन्यात मंडणगड ते केळशी या रस्त्यावर घडला दापोली तालुक्यातील केळशी गावच्या लोकानी स्वत तयार केलेल्या आठ मैल लांबीच्या रस्त्याच्या उद्‌घाटन समारंभाला मी चाललों होतो या रस्त्याच्या बांधकामात मुबई नगरपालिकेचे एजिनियर जी पी दाडेकर यानीं विशेष लक्ष घातले होते आमची मोटार दाडेकराचे भाऊ चालवीत होते माझ्याखेरीज मोटारीत एक नोकर व त्याच्या कुटुबांतील चार मंडळी होती डोंगरामधल्या एका खडकाळ रस्त्यावरून मोटार हिसके घेत घेत हळूहळू चढण चढत चालली होती रस्ता अतिशय खराब होता त्याच्यावरून पूर्वी क्वचितच मोटार

गेली असावी अचानकपणे, मोटार वळविण्याचा दांडा रस्त्याच्या मध्यभागी असलेल्या एका दगडावर आदळला व त्याचे दोन तुकडे झाले मोटारवरचा ताबा अर्थातच सुटला रस्त्याच्या एका कडेला ५०–६० फूट खोल असा खड्डा होता आमची मोटार डळमळत रस्त्याच्या काठापासून फुटभर अतरावर जाताच आम्ही आशा सोडली खड्ड्यामध्ये कोसळायला काही इचाचेंच अतर शिल्लक असताना गाडीचा बफर एका मैलाच्या दगडावर आदळला आणि गाडी जागीच थावली सुटकेचा निश्वास टाकून आम्ही भराभर खाली उतरलों दैवाने खैर केली होती केळशीला सायकाळीं ६ ला पोहोचण्याऐवजी, मडणगडाहून दुसरें वाहन मिळवून मुक्काम गाठायला आम्हाला मध्यरात्र झाली

हे सर्व प्रसग इतक्या अल्पावधीचे होते, की त्या क्षणी मृत्यूबद्दल माझ्या मनात काय विचार आले ते आतां आठवणे अशक्य आहे

पुनर्जन्मावर माझा कधीच विश्वास नव्हता केव्हाहि बोलावणें आले तरी माझी तयारी आहे

प्रकरण चोविसावें

# सिंहावलोकन – ध्येयें व आकांक्षा

दीर्घायुषी व कार्यशील अशा आयुष्याचें सिंहावलोकन करताना, उमेदीतील सगळ्या–निदान बऱ्याचशा आकांक्षा आपण पुऱ्या करू शकलो किंवा नाही, आपल्या बांधवांच्या सुखासाठी व प्रगतीसाठी अल्पप्रमाणात का होईना आपण हातभार लावला किंवा नाही, आपलें एकूण आयुष्य सुखात गेलें की नाही, हेंच आयुष्य संपूर्णपणें पुन्हा एकदा जगण्याची संधी मिळाल्यास आपण ती स्वीकारू की नाही, असे नाना प्रश्न मनात गर्दी करतात

आधुनिक शास्त्रानें उजेडात आणलेल्या काळाच्या व अंतराळाच्या अबाधित विस्ताराची नुसती कल्पनादेखील मनात आणली तर विश्वाच्या रचनेमध्ये मनुष्याच्या, किंबहुना मानवजातीच्या आयुष्याला काहीच महत्व नाही, हे सहज ध्यानात येईल, अत्यंत प्रख्यात वा यशस्वी माणसाचा देखील लोकाना आज ना उद्या विसर पडतो त्याच्या हयातीमध्येंहि जगातील बहुसंख्य लोकाना त्याची माहिती नसण्याचाच संभव जास्त असतो माणसाचे कर्तृत्व हें महासागरात दगड टाकल्यामुळें निर्माण होणाऱ्या तरंगाप्रमाणे असते एक दोन क्षणाचेच काय तें या तरंगाचें अस्तित्व फार काय, एकाद्या कालखंडातले वा भूमिवरचे देवदेखील दुसऱ्या एकाद्या कालखंडात वा प्रदेशात दानव म्हणून प्रसिद्धीस आले नाहींत तर निदान विस्मरण पावतात अशा प्रकारच्या चिंतनाने मानवी जिण्याचा फोलपणा व क्षुद्रपणा प्रतीत होतो काहीजण मन:शांती मिळविण्यासाठी दैवी अथवा गूढ अशा अध्यात्माकडे वळतात तर काही नैराश्याच्या खाईंत स्वत:ला लोटून घेतात माझ्या बाबतीत असें काहीच घडले नाही अध्यात्माकडे वा गूढवादाकडे माझी कधीच प्रवृत्ती नव्हती प्राप्त परिस्थितीत समोर येणाऱ्या गोष्टीचा स्वीकार करून यातून चांगले निष्पन्न करण्याचा मी प्रयत्न करतों मानवी जीवनाबाबतच्या गोष्टींची मी चिकित्सा करीत बसत नाही स्वत:च्या आयुष्याचें मोजमापहि मी वास्तववादी दृष्टीकोणातूनच करतों याच दृष्टीकोणातून मी स्वत:ला घातलेल्या प्रश्नाची उत्तरे देण्याचा प्रयत्न करणार

आहे आतासुद्धा मी विस्मृतीच्या पथावर आहे याची मला जाणीव आहे ५० वर्षा-नतर फारच थोड्याना माझें नाव ठाऊक असेल, २०० वर्षांनी तर माझ्या नावाची नोद काय ती माझा सबध आलेल्या सस्थाच्या व चळवळीच्या सविस्तर इतिहासात कदाचित् शिल्लक असेल, आणि हजार वर्षांनतर माझा मागमूसहि उरला नसेल याची मला खत नाही स्वत च्या काळात, वा देशात माणूस केवढाहि मोठा असला, तरी त्याच्या नशिबी काळाने हेंच लिहिले आहे तें चुकणे नाही किंबहुना काळाची ही पद्धती योग्यच आहे असे मी म्हणेन, नाहीतर भूतकाळाचे पिशाच्च कायम मानवाच्या प्रगतीच्या मार्गांत आडवे येत राहील प्रगतीची पाउले नेहमी पुढेच पडली पाहिजेत न परतणाऱ्या भूतकाळाशी तिने जखडून राहता कामा नये

शिक्षणाच्या सृष्टीत जेव्हा मी थोडेफार यश सपादन केलें, तेव्हा गणिताच्या क्षेत्रात नाव कमवावें अशी महत्वाकाक्षा साहजिकच माझ्या मनात उत्पन्न झाली या विषयातील नवनवीन घडामोडींशीं सपर्क ठेवण्याचा व शिवाय हिंदी गणित-शास्त्राचा सविस्तर इतिहास लिहिण्याचा माझा मानस होता चालू प्रगतीची माहिती करून घेण्यासाठी मी Jaburbuchieber die Fortschitte der Mathematik (गणितशास्त्राच्या प्रगतीचे वार्षिक समालोचन) या नियतकालिकाची वर्गणी भरली सर्व जगातील गणितविषयक मासिकातून प्रसिद्ध होणाऱ्या निरनिराळ्या प्रबधाचा साराश या नियतकालिकात येत असे माझ्या दुसऱ्या महत्वाकाक्षेच्या पूर्ततेची तयारी म्हणून मी सस्कृतच्या अभ्यासाला लागलों प्रारभीं मी भास्कराचार्यांचे लीलावती व बीजगणित वाचले याच सुमारास डेक्कन एज्युकेशन सोसायटीमधील माझ्या सहकाऱ्यांनी, मी फर्ग्युसन कॉलेजचे प्राचार्यपद स्वीकारावे असा आग्रह धरला त्याशिवाय देशातील तेव्हाची परिस्थिती लक्षात घेता, निव्वळ सशोधनकार्यापेक्षा देशात उच्च शिक्षणाचा प्रसार करणे हें अधिक महत्वाचें आहे असें गोखल्यानी मला सागितले मीहि निव्वळ पुस्तकातला किडा नव्हतों चालू घडामोडीमध्यें मी लक्ष घालीत असे त्यासाठी नेमाने वर्तमानपत्रें वाचीत असें त्यामुळे गोखल्याचे म्हणणें मला तत्काळ पटले प्रिन्सिपलपदाची कर्तव्यें व कामगिऱ्या सभाळताना व मुलाना शिकवताना मला सशोधनासाठी वेळच उरत नसे माझी सर्व शक्ति कॉलेजच्या उत्कर्षासाठीं व भरभराटीसाठी खर्च होऊ लागली, माझ्या प्रयत्नाना कितपत यश आले, हे इतरांनी ठरवायचे आहे, पण या शैक्षणिक कार्याची निवड मी जाणूनबुजून केली एवढें मात्र खरे या सबधात सर रामकृष्ण भाडारकर याच्याशी माझे बरेचदा बोलणे झाले होते आपणहि शक्तिचा व वेळेचा बराच भाग, सामाजिक व धार्मिक सुधारणा-साठी खर्ची घालतों असे त्यानी मला सागितले. प्राचीन व सास्कृतिक सशोधनकार्याला सपूर्णपणे वाहून घेण्यापेक्षा या त्यांच्या जिव्हाळ्याच्या कार्यांत मग्न होणे त्याना अधिक मानवत असे सस्कृत, इतिहास व कायदेशास्त्राचे पडित काशिनाथ त्रिबक तेलग, यानीहि त्याना पाठबळ दिले असल्याचे भाडारकरानी मला सागितले

अनेकाच्या म्हणण्याप्रमाणे माझी निवड चुकली-असली, तरी दुसऱ्या थोर माणसानी हीच चूक केली आहे एवढेच मला समाधान वाटतें

कॉलेजच्या कारभारामुळे सर्वसाधारण शैक्षणिक प्रश्नाशी माझा सबध येऊ लागला मुबई विद्यापीठाच्या कारभारासबधी तर विशेष आपुलकीने लक्ष घालावें लागे त्यामुळे साहजिकच राजकीय चर्चा व चळवळी याच्यात भाग घेण्याचा प्रसग येई माझा स्वत चा तात्विक कल आणि गोखल्यासारख्या व्यक्तीचा दीर्घ सहवास, यामुळे मवाळ अथवा उदार मतवादी विचाराचाच प्रभाव माझ्यावर अधिक पडत असे गणित व शास्त्रासारख्या विषयाच्या अभ्यासामुळें कोणत्याहि विधानातूनही बिनचूक असदिग्धपणा ठेवण्याची मला सवय लागली

तत्वाच्या बाबतीत कुणी तडजोड करण्याचा प्रयत्न केला तर मला तें खपत नाही नेपोलियनचा गृह खात्याचा मत्री लाप्लास, याच्यासबधी बोलताना तो राज्य-कारभारांत Infinitesimal Calculus (शून्यलब्धि) चा वापर फार करतो असे उद्गार खुद्द नेपोलियनने काढलें होते या उद्गाराचे मर्म मला पटले तरी प्रमुख ध्येय हे सतत डोळ्यापुढें ठेवून तपशिलाच्या बाबतीमध्येच तडजोड पत्करावी असेच मला वाटते

हे उद्दिष्ट अथवा ध्येय, म्हणजेच माझ्या देशबाधवाना अधिक परिपूर्ण स्वतत्र व बुद्धिवान असे जीवन जगता यावे अशी परिस्थिती प्राप्त करून देणें, व त्या अनुषगाने कोणत्याहि प्रकारच्या गुलामगिरीच्या प्रवृत्तीमधून त्याची मुक्तता करणे मग गुलामगिरीची ही प्रवृत्ती धर्मगुरू, जमीनदार, राजकीय पुढारी, हुकूमशहा, किबहुना गतकाळ वा रूढी यापैकी कोणत्याहि कारणामुळे निर्माण झालेली असो शिक्षणक्षेत्रात घोषणाच्या अथवा व्यक्तीच्या आहारी न जाता, प्रत्येक प्रश्नावर स्वतत्र रीत्या विचार करण्याची शिकवण मी विद्यार्थ्यांना देत आलो आहें सार्वजनिक कार्याच्या विशाल क्षेत्रातहि मी हीच वृत्ती ठेवली स्वत च्या उत्कर्षाचा हा मार्ग नव्हे, याची मला पूर्ण कल्पना आहे पण लहानपणापासून अण्णा कर्वे व गोखले यासारख्या महापुरुषाची उदाहरणे डोळ्यापुढे असल्यामुळे, परिणामांचा विचार न करता अप्रिय मतेहि बेधडकपणे मी समाजात माडीत आलो मुबईमधले माझे शाळकरी जीवन वास्तववादी व समाजकारणी अशाच वातावरणातून गेलें स्त्रियाचा उद्धार करणारा एक महान कार्यकर्ता म्हणून जगाला अण्णाची ओळख होण्यापूर्वीच्या काळात देखील, त्याचे आयुष्य हे नि स्वार्थी व अविश्रात अशा लोकसेवेला वाहिलेले होतें अण्णाचे स्वभाववैशिष्टय असलेला त्याचा आत्यतिक साधेपणा माझ्या अगी उतरला आहे असे मी म्हणू शकत नाही माफक प्रमाणात का होईना, पण आयुष्यातील चागल्या गोष्टीचा आनद मी लुटू शकतो त्याच्या आहारी मात्र जात नाही स्वत चा उत्कर्ष साधण्यापलीकडे प्रत्येकाला आयुष्यात काहीतरी ध्येय असलेच पाहिजे, हे अण्णाकडूनच शिकण्याचे भाग्य मला लाभले याच विचारसरणीमुळें मी सुरुवातीला

डेक्कन एज्युकेशन सोसायटीमध्यें सामील होण्यास प्रवृत्त झालों नंतरच्या काळात बुद्धिवादाचा व समाजसुधारणेचा प्रसारहि मी याच प्रेरणेने केला समाजसुधारणेचा नेता मात्र मी कधीच झालो नाही

ज्या स्वरूपामध्यें आज धर्माचें आकलन व आचरण होतें, त्या स्वरूपात तें प्रगतीला बाधकच ठरते असे मी म्हणेन कारण धर्माचा प्रसार करणाऱ्यापैकी फारच थोडेजण त्याची तत्वे स्वत च्या जीवनात पाळतात वृत्तीने व कृतीने खरोखरच धार्मिक असलेले माझ्या वडिलासारखे आणखी बरेच लोक माझ्या पाहण्यात आले असते, तर कदाचित् मी आज आहें इतका कट्टर निरीश्वरवादी झालो नसतों पण दुर्दैवाने धर्माचे स्तोम माजविणारे लोक निव्वळ लुच्चे व भोंदू असतात स्वत चा स्वार्थ साधण्यासाठींच ते मोठमोठ्या तत्वाचे व शब्दाचे अवडबर माजवितात सतत उदाहरणें व उपदेश याच्या जोरावर समाजाला हळूहळू प्रामाणिकपणाचे व विचार-सुसगतीचे पाठ देता येतील याची मला खात्री वाटते उद्दिष्टासाठी जनताशिक्षणाचे सर्व मार्ग उपयोगात आणले पाहिजेत ह्या मोहिमेमध्ये नेहमीच्या शिक्षणसस्था हें केवळ एक माध्यम आहे

शिक्षक स्वत जर कळकळ असलेले व कार्यास वाहून घेतलेले असतील, व सस्थेमधील एकूण वातावरण उदार असेल, तरच शाळा-कॉलेजातील शिक्षणाचा परिणाम विद्यार्थ्यांच्या चारित्र्यावर कायम राहील विद्यार्थ्यांच्या शीलवर्धनासाठी औपचारिक अशा धार्मिक शिक्षणाची शाळातून सोय करण्याची कल्पना आपल्या देशांत व इतर देशातूनहि बरीच बळावली आहे अशा प्रकारच्या शिक्षणाचा काडीमात्र उपयोग होत नाही, एवढेंच नव्हे तर आपल्या लोकामधील फुटिर प्रवृत्ति वाढीस लावण्यास मात्र तें कारणीभूत होतें असें माझे ठाम मत आहे १९०४ मध्ये माझे हे विचार मी धार्मिक शिक्षण या विषयावरच्या ईस्ट अँड वेस्ट या मासिकातील एका लेखामध्यें प्रकट केले होते हे मासिक बी एम् मलबारी हें सपादित असत या लेखामुळें चिडून जाऊन 'केसरीनें' माझ्यावर कडाडून हल्ला चढविणारा एक लेख प्रसिद्ध केला त्या लेखाचे शीर्षक प्रासादशिखरस्थोऽपि काको न गरुडायते ', हे शीर्षक लोकमान्य टिळकाच्या कल्पनेतून निघाले व लेख न चिं केळकराच्या लेखणीमधून असे मला नतर कळलें तेव्हाच्या माझ्या लेखामधले विचार आतां बहुसख्य शिक्षित लोकाना मान्य झालेले आहेत, असें अनेकानी मजजवळ बोलून दाखविले आहे तथापि अप्रिय विचार माडण्यास आपल्यामधील सुशिक्षित लोकांची फारशी तयारी नसते त्यामुळें धार्मिक शिक्षणाच्या आवश्यकतेविषयी काही भागातून प्रसार होत आहे शिक्षणसस्थामधून जगातील प्रमुख धर्माची मूलतत्त्वे समजावून सागणाऱ्या भाषण-माला सुरू करण्यात याव्यात, अशी भारत सरकारच्या अलिकडच्या एका समितीच्या अहवालात शिफारस केलेली आहे बौद्धिक दृष्टीकोणातून पाहता, अशी भाषणमाला बोधप्रद ठरेल, इतकेच नाहीं, तर समाजशास्त्र वा सामान्यज्ञान या विषयाच्या तयारी-

साठी तिचा विशेष उपयोग होईल मात्र धर्मशिक्षणाचा अट्टाहास धरणाऱ्यांचें त्यायोगें समाधान होईल असें वाटत नाही कारण अशा लोकाना एका विशिष्ट धर्माच्या तत्वाचा प्रसार करावयाचा असतो, व तो धर्म इतर धर्मांच्या मानाने कसा सरस आहे हें सिद्ध करावयाचें असतें धार्मिक शिक्षण देणाऱ्या सस्थामधून बाहेर पडणारे विद्यार्थी हे इतर सस्थामधील विद्यार्थ्यांपेक्षा कोणत्याहि दृष्टीने सरस असतात असे मला वाटत नाही

बहुजनशिक्षणासाठी वर्तमानपत्रे, ललित वाङमय, सभा, वादविवादमडळें आकाशवाणी, नाटके व चित्रपट अशी इतरहि अनेक साधने आहेत ही सर्व प्रगतीचीं सामर्थ्यवान अस्त्रे आहेत मात्र त्याचा योग्य वापर न केल्यास दुष्परिणाम होण्याचा सभव असतो मला स्वत ला वृत्तपत्रव्यवसायाबद्दल विशेष आपुलकी वाटते वेग-वेगळ्या वृत्तपत्रासाठी व पत्रकासाठीं मी स्वतत्रपणे बरेच लिखाण केले आहे माझे स्नेही व एके काळचे सहकारी प्रा हरिभाऊ लिमये याच्याशीं मी वृत्तपत्रामधील लिखाणाबद्दल बरीच चर्चा करीत असें ते हयात असेपर्यंत आम्ही दोघे, सर्व्हन्ट्स् ऑफ इडिया सोसायटीने काढलेल्या ज्ञानप्रकाश ' व ' सर्व्हन्टस् ऑफ इडिया ' या दोन नियतकालिकांतून लिहीत असू दुर्दैवाने ही दोन्ही प्रकाशने आता बद झाली आहेत सूज्ञपणाचे व वास्तववादी विचार सौम्य भाषेत माडणाऱ्या वृत्तपत्राला आपल्या देशात फारसा वाव नाही असे वाटल्याखेरीज रहात नाही आवेशयुक्त, सनसनाटी व क्वचित ग्राम्य भाषा वापरणारी वृत्तपत्रें लोकाना अधिक आवडतात असे दिसते तथापि आर्थिक दृष्ट्या जरी यशस्वी झाली नाहीत, तरी आगरकरां-प्रमाणे कार्यनिष्ठेने चालविलेल्या भारदस्त पत्राना अजूनहि वाव मिळेल असे मला वाटतें पुजीपतींचा वृत्तपत्र व्यवसायावरचा वाढता ताबा हाहि या धद्याला मिळालेला एक शाप आहे प्रौढ शिक्षणाच्या या क्षेत्रामध्यें मी याहून अधिक काहीं करू शकलों नाही याचा मला नेहमी विषाद वाटत आला आहे प्रत्येक सामाजिक प्रश्नावरची समतोल व वास्तववादी बाजू माडण्यास माझ्या हाती असे एकादें नियमित साधन असतें तर माझ्या आनदाला पारावार उरला नसता साकार होऊ न शकलेल्या माझ्या स्वप्नमालिकेमधले हें एक स्वप्न आहे

जाहीर सभा, समेलने, विधानपरिषद व इतरत्र भाषणे करण्याचा मजवर अनेकदा प्रसग आला असला तरी या क्षेत्रांमध्यें मी फारसे प्रावीण्य मिळवले नाही मला वाटतें, बोलण्यापेक्षा लिहिण्याचें काम मला बरे जमतें माझ्या लिखाणामध्यें वाचकाच्या बुद्धीला आव्हान करण्याचा प्रयत्न असतो एकादा मुद्दा बिनतोड पटवून द्यावा म्हणून मी क्वचितप्रसगी उपहास व टवाळीचा अवलब करण्यास कमी करीत नाही विशेषत मूर्खपणाच्या रूढीची टर उडविताना ही शैली उपयोगी पडते या शैलीचे दोन दर्दी, व्हॉल्टेअर व स्विफ्ट, याच्याबद्दल मला वाटत असलेल्या नितात आदराचा प्रत्यय क्वचित माझ्या लिखाणांतून आढळेल मात्र मी अशाच प्रकारचे

लिखाण, समाजातील गैरप्रवृत्ती व विसंगती उजेडात आणण्यापुरतेंच करतों सर्व-साधारणपणे, मिल, मोर्ले व जेन ऑस्टिन यांच्या शैलीचे अनुकरण करण्याचा माझा प्रयत्न असतो माझे किरकोळ लिखाण हे बहुधा [illegible] राजकीय, शैक्षणिक अथवा सामाजिक स्वरूपाच्या चालू प्रश्नावर असतें काव्य वा ललित वाङमय हे प्रांत मी कधीच हाताळले नाहीत स्कॉट, फील्डिंग, जेन ऑस्टेन, जॉर्ज एलियट आणि हरि नारायण आपटे याच्या जगविख्यात कादबऱ्या, व शेक्सपिअर, बायरन, मोलिएर, गोल्ड स्मिथ व इतर महान नाटककाराची नाटके मात्र मी अत्यंत आवडीने व भक्ति-भावानें वाचली आहेत अलिकडच्या इंग्रजी वा मराठी कादबरीकारानी माझे लक्ष फारसें वेधून घेतले नाही, हे मात्र मी कबूल करितो

वयाला ८४ वर्षे होऊन गेली की मनुष्य नवीन सुखाच्या वा अनुभवाच्या क्वचित् आकांक्षा बाळगतो नातलग वा इष्टमित्राबद्दलच्या काही आकांक्षा सोडल्या तर स्वत साठी काहीं मागण्याची त्याची इच्छा उरलेली नसते स्वत ची नेहमीची व्यक्तिगत कामे दुसऱ्याला भारभूत न होता जोपर्यंत मी स्वत करू शकतों, व जोपर्यंत माझी गात्रें बडधाकट आहेत, विशेषत स्मरणशक्ति शाबूत आहे, तोपर्यंतच जगण्याची माझी इच्छा आहे मनुष्य जेव्हा स्वत ची कामे करण्यास असमर्थ होतो, व दुसऱ्याला भारभूत होतो, तेव्हा आयुष्याचा मोह धरण्याचा त्याला हक्क नाही, असे मला वाटते स्ट्ल्डब्रग्स या अमर लोकांचे स्विफ्टने रंगविलेलें भयानक चित्र वाचले तर नुसते वनस्पतीप्रमाणे दीर्घायुष्य विचारी माणसाला नकोसें वाटेल अत्यंत दु सह व असाध्य रोगानें पछाडलेल्या, अथवा कायमचे वेड लागलेल्या माणसानें ऐच्छिक आत्मनाश (Euthanasia) करून घ्यावा या मताचा मी आहें माझ्या स्वत च्या बाबतीतहि अशी कायमची समाधी घेण्याची कल्पना मला भयकारक वाटत नाही किंबहुना त्यायोगे मला लाभलेल्या सुखी आयुष्यावर कळसच चढल्याप्रमाणे होईल असे मी म्हणेन

एक मानवतावादी व बुद्धिवादी म्हणून मात्र माझ्या बांधवासाठी मनात काही इच्छा बाळगून मी आहें मनुष्यप्राणी हा अधिक वास्तववादी आणि स्वतंत्र वृत्तीचा व्हावा, असत्‌विश्वाबद्दल डोके खाजवीत बसण्यापेक्षा त्याने वास्तवातील दुनिये-विषयी आस्था दाखवावी, आणि आपल्या बांधवाच्या सुखासाठी व हितासाठी त्याने सतत प्रयत्न करीत रहावे असे मला फार वाटतें स्पर्धेऐवजी सहकाराचा फैलाव व्हावा, नवनवीन शास्त्रशोधामुळे मनुष्यजात नष्ट होण्याची उत्पन्न झालेली भीति सर्व राष्ट्रांमध्यें समझोता होऊन फोल ठरावी, उत्पादनाच्या प्रमाणाबाहेर होणाऱ्या लोकसंख्येच्या अमर्याद वाढीमुळे मनुष्याची उपासमार होण्याची जी लक्षणे दिसू लागली आहेत, त्याचा समूळ नायनाट व्हावा, आणि जगात शांतिसुखाचे राज्य नांदावे एवढेंच माझे आता मागणे आहे मनुष्यस्वभावामध्ये हळूहळू उत्क्रांती होत गेली तरच हे सर्व शक्य आहे

माझ्या आयुष्याचा साधारण अर्धा भाग सक्त ब्रिटिश अमलाखाली गेला व अर्धा भाग भारतातील अर्धवट स्वायत्तता व पूर्ण स्वायत्तता याच्या कालात गेला या दोन कालखडाची तुलना करतांना पुष्कळदा असा विचार येतो की देशातील सामान्य जनता पहिल्या कालखडात अधिक सुखी होती की आता आहे ?

पहिल्या कालखडातील राजकीय कारभाराची घडी जास्त सुसघटित होती, असे पुष्कळदा सागण्यात येते व त्यामध्ये बराचसा सत्याश आहे असे देखील वाटते अर्थात पहिल्या कालखडात सरकारकडून लोक फारशा अपेक्षा करीत नसत हल्ली मात्र कल्याणकारी राज्याकडून लोक अधिक अपेक्षा करतात असे दिसतें परतु पहिल्या काळात वशिलेबाजी, लाचलुचपत, राजकीय सत्तेचा दुरुपयोग सध्यापेक्षां कमी होता असे पुष्कळाप्रमाणे माझेहि मत आहे

लोकाची आर्थिक परिस्थिति हल्ली जास्त खालावलेली दिसते लोकसख्येच्या अमर्याद वाढीमुळे भारतापुढें अन्नधान्याच्या अडचणी जास्तीच तीव्रतेने उभ्या आहेत परतु लोकानी आहे त्या परिस्थितीचा नीट उपयोग करण्याचे मनांत आणलें आणि चैन, करमणूक वगैरेवर हल्ली जो अवास्तव खर्च चालला आहे तो कमी करण्याचें ठरविले तर ही परिस्थिति थोडीतरी नि सशय सुधारेल

माझा परमेश्वरावर जरी विश्वास नसला तरी मानवापुढील प्रश्न लोकानी गभीरपणाने विचारांत घ्यावेत व त्याप्रमाणे आपले वर्तन ठेवावे अशी माझी मना-पासून इच्छा आहे चैनी, करमणूक यांकडे कमी लक्ष देऊन आमच्या बाधवाची सेवा करण्याकडे थोडेतरी सर्वांनी लक्ष दिले तर हल्लीच्या परिस्थितीत पुष्कळच सुधारणा होईल अशी मला खात्री आहे

माझ्या बहुसख्य बाधवापेक्षा या आयुष्यात मी सुदैवी ठरलों असें म्हणायला हरकत नाही राव ना रक अशा मध्यम कुटुबामध्यें माझा जन्म झाला आजच्या भारताचे एक महापुरुष भारतरत्न धोडो केशव कर्वे, याचें मार्गदर्शन लाभण्याची महान् सधी मला प्राप्त झाली मला मिळालेल्या अल्प यशाचे श्रेय थोडें स्वत कडे घ्यायचेंच म्हटले, तर या सधीचा मी चांगला उपयोग करून घेतल्यामुळेंच पुढचा योग जमू शकला असे म्हणता येईल आपणापैकी प्रत्येकाच्या जीवनात, एवढे मोठे नसले तरी काही योग येत असतात आलेल्या सधीचा आपण कसा उपयोग करून घेतो यावर आपल्या भावी जीवनाचा मार्ग अवलबून असतो चालून आलेल्या सुसधीचा जर अखिल मानवजातीनें योग्य लाभ घेतला, तर हें जग कितीतरी अधिक आनदमय होईल प्रत्येकाप्रमाणे माझ्या आयुष्यातहि चढउतार आले, तसेच अकल्पित दुर्घटनाहि घडल्या क्वचितप्रसगी माझ्याकडून चुकीचे निर्णय घेतले गेले परतु सर्व गोष्टी लक्षात घेतां, हेंच आयुष्य, त्यातील यशापयशासह पुन्हा जगण्याची मला सधी मिळाली तर मी तिचा आनदानें स्वीकार करीन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.

REFBK-0014465



ऑस्ट्रेलियाच्या वाटेवर